टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# ''डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : चिकित्सक अभ्यास'' (१८८८ - १९४९)


## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग


तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर करण्यात आलेला

शोधप्रबंध


संशोधक

**मनिषा माणिकराव जगदाळे**

मार्गदर्शक

**डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके**


एप्रिल - २०१६

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, तात्त्विक, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी मनिषा माणिकराव जगदाळे यांनी **''डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : चिकित्सक अभ्यास'' (१८८८-१९४९)** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यू.जी.सी) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरुन सदर प्रबंधाचे काम केलेले आहे.

**स्थळ - पुणे**

**दिनांक - / /२०१६**

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके**

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, **''डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : चिकित्सक अभ्यास'' (१८८८-१९४९)** submitted by **Smt. Manisha Manikrao Jagadale** to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph.D.) is a confide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview and submission Viva.

**Place : Pune**

**Date :**

**Signature of Research Guide**

# घोषणापत्र

मी असे घोषित करते की, **''डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : चिकित्सक अभ्यास'' (१८८८-१९४९)** हा माझा स्वतःचा शोधप्रबंध असून मी हा शोधप्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर शोधप्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती संशोधनात्मक विधाने ही मी स्वतः अभ्यासून घेतलेली आहेत.

**स्थळ - पुणे**

**दिनांक - / /२०१६**

**संशोधक**

**मनिषा माणिकराव जगदाळे**

# ऋणनिर्देश

'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे' विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी "डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : चिकित्सक अभ्यास" (१८८८-१९४९) हा शोधप्रबंध लिहिण्याकरिता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने बहुमोल सुवर्णसंधी प्राप्त करुन दिली, त्याबद्दल मी या विद्यापीठाची अत्यंत आभारी आहे. शोधप्रबंध परमेश्वराच्या कृपा आशीर्वादाशिवाय काहीही होत नसते, त्याची रुपेही वेगळी असतात. आमच्या गावचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज, जिल्हयाचे श्रध्दास्थान मिरावली बाबांच्या कृपा आशीर्वादाने मी हा शोधप्रबंध पूर्ण करु शकले. मी त्यांच्यासमोर नतमस्तक आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके यांनी वेळोवेळी आत्मीयतेने व जिव्हाळयाचे मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक ऋणी आहे. सदरचा प्रबंध पूर्ण करण्यासाठी सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव येथील प्राचार्य डॉ. गोविंदराजे निंबाळकर यांनी मार्गदर्शन केले. सावित्रीबाई कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.बी. आहेर तसेच श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथील प्राचार्य, एस.पी. लवांडे तसेच इतिहास विभाग प्रमुख प्रा. एस.आर. जामदार, दौंड तालुका, कला, वाणिज्य महाविद्यालय, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. अरुणा मोरे, सावित्रीबाई कला महाविद्यालय पिंपळगाव पिसा येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा. एन.डी. वाजगे तसेच माझे पती प्रा. डॉ. आर.एम. कुरुमकर यांनी बहुमोल सहकार्य केले आहे, मी त्यांचीही ऋणी आहे.

प्रबंधाच्या पूर्ततेसाठी मुंबई येथील इतिहास अभिलेखागार (अर्काइव्ह) येथील नरेंद्र पाटील, नम्रता पाटील यांनी विविध प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथपाल, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल, सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा येथील ग्रंथपाल, कै. माणिकराव बाबुराव जगदाळे अध्यापक विद्यालय, लिंपणगांव येथील ग्रंथपाल यांनी मला विशेष सहकार्य केले. मी त्यांचीही ऋणी आहे.

या प्रबंधाच्या परिशिष्टामध्ये समाविष्ट असलेली छायाचित्रे प्रा. शेळके मॅडम यांनी अत्यंत उत्साहाने आणि प्रयत्नपूर्वक मला मिळवून दिली. त्यांच्या मदतीनेच मी परिशिष्टाचा सहभाग या प्रबंधामध्ये सादर करु शकले, त्यांचीही मी ऋणी आहे.

संशोधनाबद्दल आदर बाळगणाऱ्या आणि संशोधकाला सर्वोतोपरी मदत करणाऱ्या, ज्यांच्या मदतीमुळे सातत्याने संशोधन करत रहावे, अशी इच्छा संशोधकाच्या मनात निर्माण होत राहील, असे विविध मान्यवर, ज्यांनी मला आपला बहुमोल वेळ देऊन मार्गदर्शन केले, या सर्वांची मी ऋणी आहे. श्री पांडुरंग कृपा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माझे बंधू पांडुरंग जगदाळे यांनीही मदत केली, तसेच माझी बहीण वैष्णवी व तिचे यजमान वसंत शितोळे यांनीही बहुमोल सहकार्य केले. या सर्वांची मी सदैव ऋणी आहे.

वेळोवेळी मित्रत्वाच्या नात्याने मदत व मार्गदर्शन करणारे प्रा. नंदकुमार पवार, दत्तात्रय पवार, प्रा. नानासाहेब कुरुमकर, प्रा. युवराज इथापे, प्रा. संतोष गावडे, प्रा. प्रवीण पिसे, प्रा. उर्मिला घोलप, प्रा. शिल्पा कुलकर्णी अशा अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींचा तसेच मित्र परिवाराचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या मिळालेल्या सहकार्यामुळेच मी हा शोधप्रबंध पूर्ण करु शकले, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच पांडुरंगकृपा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेतील प्राचार्य, शिक्षक स्टाफ यांची मी आभारी आहे.

माझी मार्गदर्शक आई श्रीमती कमलबाई माणिकराव जगदाळे, वहिणी अर्चना, तसेच माझे सासू-सासरे मुगुटराव कुरुमकर, ताराबाई कुरुमकर तसेच माझ्या कुरुमकर परिवारातील युवराज कुरुमकर, स्वाती, रुपाली ताई, प्रियंका ताई, तसेच आजी राधिकाबाई या सर्वांच्या सहकार्याने हे संशोधन कार्य पूर्ण करु शकले. हे संशोधन करत असताना बाळबोध प्रश्न विचारत राजनंदिनी, देवयानी, वेदिका, उत्कर्षा, तनुजा, स्वानंदी, कृष्णराजे, यांचीही मदत झाली.

प्रबंधाचे टंकलेखन सुबकरीत्या करुन देणारे, 'अभिनव टाईपरायटिंग इन्स्टिटयुट'च्या प्राचार्या अंकिता बुनगे यांचीही, तसेच उपमुद्रित तपासून देण्याचे काम शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगांव येथील प्रा. एम.आर. गोंटे यांनी केले, त्याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

**स्थळ - पुणे**
**दिनांक - / /२०१६**

**मनिषा माणिकराव जगदाळे**
**संशोधक**

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ. क्र. |
|---|---|---|
| | **प्रमाणपत्र** | **I-II** |
| | **घोषणापत्र** | **III** |
| | **ऋणनिर्देश** | **IV-V** |
| | **प्रस्तावना** | **VII-XII** |
| १. | जीवन व चरित्र | १ - २९ |
| २. | क्रांतिकार्य | ३० - ७२ |
| ३. | वृत्तपत्रीय कार्य | ७३ - १३८ |
| ४. | राजकीय कार्य | १३९ - १७८ |
| ५. | सामाजिक कार्य | १७९ - २१० |
| ६. | साहित्यिक कार्य | २११- २३० |
| ७. | उपसंहार | २३१ - २३८ |
| ८. | संदर्भग्रंथ सूची | २३९ - २४५ |
| ९. | परिशिष्टे | २४६ - २६७ |

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्याला पासष्ट वर्षे पूर्ण झाली. स्वराज्याचे अर्धशतक केव्हाच पूर्ण झाले. टिळक, गांधी, सावरकरांपासून नेहरु, पटेल, सुभाषचंद्रापर्यंत सर्वांनी राष्ट्रासाठी आपला देह झिजविला. कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर, बंकिमचंद्रांपासून क्रांतीचा जयजयकार करणाऱ्या स्वातंत्र्यशाहीर गोविंद, आनंदराव टेकाडे, केशवसुतांपासून ज्वलत्‌जहाल 'कीचकववध' लिहिणाऱ्या नाटयाचार्य खाडिलकरांपर्यंत सर्वांचे परिश्रम कारणीभूत झाले. उत्कृष्ट देशभक्ती आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य, हा हया पिढीचा गुणविशेष ठरला.

तथापि, राष्ट्रीय लढयाचा एकूण इतिहास लक्षात घेतल्यास, निःस्वार्थी देशभक्तीची दुसरी, तिसरी फळीही काही कमी कर्तृत्वाची नव्हती. शिवराम महादेव परांजपे, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, लोहिया, टंडन, सानेगुरुजी, चापेकर बंधू, भगतसिंग, राजगुरु यांचा क्रांतिकारक म्हणून गौरव झाला, तोच गौरव, इ.स. १८५७ सालचा वीर मंगल पांडे, विष्णू गणेश पिंगळे, गणेश दामोदर सावरकर, डॉ. नारायण दामोदर सावरकर इत्यादिकांच्या वाटयाला का आला नाही? बहिष्कार, कायदेभंगाच्या चळवळीपासून सशस्त्र क्रांतीच्या उठावापर्यंत सर्वांनी आपआपल्या मार्गांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

एवढेच काय, गरिबांचे कैवारी उमाजी नाईक, तंटया भिल्ल की, ज्यांनी ब्रिटिशांविरुध्द आपल्या पध्दतीने व बुध्दीने लढा दिला, ब्रिटिशांना सळो की पळो करुन सोडले. लूट केली असेल, तर ती ब्रिटिशधार्जिण्यांची, गोरगरिबांची नाही, परंतु त्यांची लुटारु नि दरोडेखोर म्हणून संभावना झाली. त्यांच्या बाबतीत इतिहास संशोधकांची लेखणी अदयाप का सरसावली नाही ? राष्ट्राच्या अदययावत इतिहासाच्या रचनेत, हया उणिवा निपटून न काढता, त्या तश्याच राहू दिल्या, तर अशा निष्ठावंत राष्ट्रसेवकांची ती अक्षम्य उपेक्षाच ठरेल.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात, सशस्त्र क्रांतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करुन ठेवावे, असे क्रांतीसंघटनकार्य सर्वश्री गणेश, विनायक, नारायण या तिघा सावरकरबंधूंनी केल्याचे इतिहासात नमूद झाले आहे. त्यापैकी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची अनेक चरित्रे इंग्रजी, मराठी, हिंदी, व अन्य काही भारतीय

भाषांतून प्रकाशित झाली आहेत . वीर सावरकरांच्या हयातीतच त्यांची काही गाजलेली आणि सविस्तर माहिती देणारी चरित्रे प्रकाशित झाली. त्यांच्या गुप्त कार्याप्रमाणेच प्रकट आणि विश्र्वविख्यात झालेल्या कार्याचा व्याप प्रचंड होता. विनायक सावरकर यांचे धाकटे बंधू डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचा जन्म २५ मे १८८८ मध्ये नाशिक जिल्हयात भगूर येथे झाला. त्यांच्या राजकीय, सामाजिक, क्रांतिकार्याचा, साहित्यिक चळवळीचा अभ्यास सदर संशोधनात केला जाणार आहे.

सावरकर बंधू म्हटले की, आपल्या देशासाठी मोठा त्याग केला. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे मोठे बंधू गणेश दामोदर सावरकर यांच्यावर विशेष लेखन झाल्याचे आढळून येत नाही. सदर प्रबंधात डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या कार्याचा आढावा घेणार आहे.

समाजाच्या विविध क्षेत्रांत आपआपल्या कर्तृत्वाने पुढे आलेली माणसे, त्यातली काही कालांतराने उपेक्षिली जातात. असे अनेक राष्ट्रभक्त होऊन गेले आहेत की, ज्यांनी देशासाठी मरण पत्करले. परंतु ते जनतेच्या स्मरणात राहिले नाहीत. उदा. ज्वलत्जहाल क्रांतिकारक म्हणून प्रसिध्द पावलेल्या त्रिवर्ग सावरकर बंधुपैकी सर्वात धाकटे डॉ. नारायणराव दामोदर सावरकर होय. हे तर कमालीचे उपेक्षिले गेले. कार्यकर्तृत्व गाजवूनही त्यांच्या कार्याचे तेज दिसू शकले नाही. यात कर्तृत्वापेक्षा परिस्थितीजन्य अपरिहार्यतेचाच भाग अधिक असावा, असेच शेवटी वाटू लागते.

बॅरिस्टर वि. दा. सावरकर विलायतेला असताना, आणि त्यानंतर दे. भ. गणेशपंतांसह हे दोघे ज्येष्ठ बंधू अंदमानात असताना, त्यांच्याकडून तेथून सूटून भारतात आलेल्या बंदयांमार्फत प्राप्त झालेले साहित्य घरात लपवून ठेवणे, गुप्तस्थळी ठेवलेल्या छपाईयंत्रावर ते प्रकाशित करणे आणि त्याचबरोबर क्रांतिसंघटना जिवंत ठेवण्यासाठी भारताबाहेर भूमिगत असलेल्या क्रांतिकारकांशी संबंध प्रस्थापित करुन चळवळीचा समन्वय करणे, हे अतिजोखमीचे गुप्तकार्य त्या काळी डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांनी केले.

नारायणराव सावरकरांनी धाकटा बंधू हया नात्याने बाबा आणि तात्या अंदमानात असताना, त्यांचा उद्ध्वस्त संसार मोठया कष्टाने सांभाळला.

क्रांतिकारकांची संघटना निर्धाराने पुढे चालवून राष्ट्राचा संसार त्यांनी पाहिला. क्रांतिकार्य, राष्ट्रकार्य ही दोन्ही कार्य डॉ. सावरकरांनी सर्व संकटांना तोंड देत पार पाडली. जप्त्या, पोलिसांच्या धाडी, कुटुंबियांची छळवणूक कित्येक वेळा इंग्रज सरकारने त्यांना पकडून गजाआड केले.

हे सर्व कार्य करीत असता वैदयकीय व्यवसायाची हेळसांड झाली. त्यामुळे पैशांची अडचण निर्माण झाली. तथापि, स्वदेशासाठी केलेला अपूर्व त्याग जनता समजू शकली नाही. डॉ. नारायणराव सावरकर हे अशा अनेक उपेक्षित, दुर्लक्षित स्वातंत्र्यसैनिकांचे एक प्रतीक आहेत आणि म्हणून त्यांच्या ज्वलंत देशभक्तीचे भावी पिढयांना स्मरण रहावे, यासाठी डॉ. सावरकरांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे अत्यंत जरुरीचे वाटले. आजपर्यंत स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकरांवर लेखन झाले. देशभक्त गणेशपंत सावरकरांवरही बरेच लिखाण झाले आहे. त्यांचे 'क्रांतिवीर बाबाराव सावकर' चरित्र सुप्रसिध्द आहे. तथापि, डॉ. नारायणराव सावरकरांवर अद्याप संशोधन झालेले नाही. तेंव्हा नारायणरावांचे संशोधन आवश्यक वाटले.

'लोकसत्ता', 'तरुण भारत', 'प्रज्वलंत', 'सांगलीचा स्मृतिसंचय' इत्यादी वृत्तपत्रे विशेषांकातही डॉ. सावरकरांचे राष्ट्रकार्य, ज्येष्ठ बंधूंच्या तेजस्वी इतिहासाने झाकले जाऊ नये, ही एकच प्रेरणा संशोधनामागे आहे.

टिळक काळापासून सावरकर घराण्याचे वेलकर घराण्याशी घरोब्याचे संबंध होते. डॉ. सावरकर डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर दोघेही टिळकभक्त मुंबईतल्या लोकमान्यांच्या राष्ट्रीय चळवळीत दोघांनी खांद्याला खांदा लावून कामे केली, त्यामुळे अखेरपर्यंत ते जीवश्च कण्ठश्च मित्र राहिले. आम्ही डॉ. सावरकरांना दादा म्हणत. दादांचे वागणे, बोलणे, चालणे वेलकर घराण्याला चांगलेच परिचयाचे. 'संदेश'चे संपादक अच्युतराव कोल्हटकर, 'राष्ट्रमता' चे सीताराम विष्णू लळित, 'बॉम्बे नॅशनल युनियन'चे डॉ. दिनकर धोंडो साठये, 'कुलाबा समाचार'चे रामभाऊ मंडलिक, 'निर्भीड'कार अनंत हरी गद्रे हेही डॉ. सावरकरांचे सहाध्यायी होते.

ग.दा. सावरकर आणि वि.दा. सावरकर स्थानबध्द असताना क्रांतिकार्ये, राष्ट्रीय चळवळी, सामाजिक चळवळी, डॉ. सावरकरांच्या अखंडित चालू असायच्या. ही सर्व कार्ये औषधालय सांभाळून ते करीत. दंतवैद्य व्यवसायात त्यांचा जम बसला होता. परंतु त्यांचे औषधालय केवळ उपचारापुरते मर्यादित नव्हते.

जनसेवेचे ते केंद्र होते. भूमिगत क्रांतिकारकांचे आश्रयस्थान होते. अर्थातच, त्यांचा बहुतांश वेळ देशसेवा आणि जनसेवा यातच व्यतीत होई. त्यामुळे त्यांचे व्यावसायिक उत्पन्न हे कौटुंबिक कारणापेक्षा सार्वजनिक कार्याकरिता उपयोगिले जाई. सार्वजनिक कार्याचा व्याप सांभाळताना त्यांना नेहमी आर्थिक चणचण भासायची. त्याची जाण कोणालाही झाली नाही की, त्याचा विचारही कोणी केला नाही.

अशा तळमळीच्या कार्यकर्त्याला, डॉ. नारायणराव सावरकरांच्या मृत्यूनंतर उशिरा का होईना न्याय मिळवून द्यावा, स्वदेशासाठी, स्वधर्मासाठी बलिदान करणाऱ्या राष्ट्रसेवकाचा सत्य इतिहास पुढील पिढयांना माहीत असावा, हा एकच उद्देश पुढे ठेवून त्यांचे संशोधन लिहिण्यास घेतले.

डॉ. नारायणराव सावरकर यांच्या जीवितकार्याचा विचार करताना एक महत्त्वाचा सिध्दांत लक्षात घेतला आणि तो म्हणजे वस्तुनिष्ठतेसंबंधीचा इतिहास लेखन करताना, कठोर वस्तुनिष्ठता राखली पाहिजे, हे जरी खरे असले तरी लिहिताना अनेक कारणांमुळे प्रत्यक्ष पुरावा मिळणे शक्य नव्हते. याचे कारण ब्रिटिश शासनाविरुध्द क्रांतिकारकांनी केलेल्या सशस्त्र आणि गुप्त चळवळीचा इत्थंभूत इतिहास उपलब्ध नव्हता. पोलिसांच्या अचानक धाडी येत, जप्त्यांमुळे महत्त्वाची कागदपत्रे नाहिशी केली जात असत. क्रांतिकार्यात अपरिहार्य ठरलेल्या गुप्तकार्यामुळे बरीच महत्त्वाची प्रकरणे अज्ञानातच राहिली वा ठेवावी लागली. सावरकरबंधू अंदमानात असताना त्यांच्या निवासस्थानी अनेक गुप्त कागदपत्रे अशीच नाहिशी झाली. अगदी अलीकडे ज्या काळात सार्वजनिक कार्याची नोंद ठेवणे शक्य होऊ लागले, त्या वेळीही अत्यंत महत्त्वाचे संदर्भ व दस्तऐवज, गांधीवधानंतर डॉ. सावरकरांचेवर सरकारच्या वक्रदृष्टीमुळे धाड पडण्याची शक्यता लक्षात घेऊन, सरसकट जाळून टाकण्यात आले, अशा वेळी परिस्थितीजन्य वास्तवाचा तर्कशुध्द अर्थ सांगणे क्रमप्राप्त होते. याचाही सांगोपांग विचार लिहिताना करावा लागला.

डॉ. नारायणराव सावरकरांचे लेखन करीत असताना, वस्तुनिष्ठता तसेच परिस्थितीजन्य पुरावा पुढे ठेवून लेखन केले. या दोन्ही गोष्टी राखल्या गेल्या नाहीत तर इतिहासाचे राजकीयीकरण होऊन तो इतिहास आक्षेपार्ह ठरला जाईल, ही शक्यता लक्षात ठेवून संशोधन केले. संशोधन हा सर्वगुणसंपन्न महामानव असल्याचे

दाखविण्याचा खोटेपणा करायचा नाही, हा सुप्रसिध्द विचार लक्षात घेऊनच डॉ. सावरकरांचेवर संशोधनाचा प्रयत्न केला आहे.

डॉ. सावरकरांच्या जीवनातली ऐतिहासिक स्थळे हुडकण्यासाठी सरकारी आर्काइव्ह फाईली अभ्यासाव्या लागल्या. दोन्ही वडील बंधू कारागृहात असताना त्यांचे क्रांतिकार्य डॉ. सावरकरांच्या माध्यमातूनच होण्याची शक्यता लक्षात घेऊन, ब्रिटिश शासनाने डॉ. सावरकरांवर २४ तास सतत पाळत ठेवून, गुप्तचरांमार्फत त्याची नोंद ठेवली. त्या शासकीय गुप्त फाईली आता अभ्यासासासाठी उपलब्ध झाल्याने, बरेच निष्कर्ष काढणे शक्य झाले. त्याचप्रमाणे 'संदेश', 'केसरी', 'नवाकाळ', 'प्रभात', 'श्रध्दानंद', 'प्रज्वलंत', 'मुंबई क्रॉनिकल' आदि वृत्तपत्रीय लिखाणांची तसेच चरित्रकार गोखले, करंदीकर यांची दिनांक, स्थळे, घडामोडीच्या संदर्भात फार मोठी मदत झाली.

प्रस्तुत संशोधनात डॉ. सावरकरांची होमरुल चळवळीच्या वेळची स्फूर्तिदायक भाषणे, विशेषतः 'केसरी', 'प्रभात', 'श्रध्दानंद' यांत आलेले, लेख, पुराण, प्राचीन इतिहासावरील अभ्यासपूर्ण लेखमाला, लो. टिळकांचे प्रतियोगाचे तत्त्वज्ञान, गांधजींची असहकारिता, वगैरे डॉ. सावरकरांच्या प्रभावाखाली लोकोत्तर गुणांची परस्पर ओळख करुन देतील. डॉ. सावरकरांचे संघटन, स्वदेश, स्वधर्मविषयक लिखाण संकलित करुन त्यांच्या शब्दांत ठेवले आहे.

शिवाय चरित्र भाग, संपूर्ण स्वरुपात जनतेसमोर यावा, या उद्देशाने डॉ. सावरकारांचे मिळालेल्या उपयुक्त माहितीवरुन प्रामाणिकपणे संशोधन केले आहे. या संशोधनात डॉ. सावरकरांच्या बालपणापसून शिक्षण, विद्यार्थी दशा, ज्ञानार्जनाचे मार्ग, वैद्यकीय व्यवसाय, डॉक्टरांच्या राजकीय, सामाजिक, सार्वजनिक चळवळी, त्यांत त्यांना आलेले अनुभव व बनलेली मते, इत्यादी विषयांचा आढावा हा एक भाग व त्याचबरोबर दुसऱ्या भागात परिशिष्टांत, त्यांच्या मौलिक विचारांची, संशोधनपर लिखाणांची, वृत्तपत्रांत, अधिकृत कागदपत्रांत, ग्रंथात आलेली माहिती एकत्र करुन संक्षिप्त स्वरुपात त्या सर्वांचे संकलन करुन डॉ. सावरकरांचे संशोधन केले आहे.

हे संशोधन डॉ. सावरकरांच्या जीवनाचे एक संकलित सारच आहे. 'ज्यांच्या जीवनाचा, लोकजीवनावर परिणामकारक प्रभाव पडू शकेल, अशांच्या स्मृति आणि

अंशाच्या आठवणी सार्वजनिक हितार्थ चिरस्मरणीय ठरतात. अशा व्यक्तींची चरित्रे, जीवनस्मृति सार्वजनिक हितार्थ ग्रंथित करुन प्रसिध्द केली, तर अशा व्यक्ती वैयक्तिक मरणाबरोबर विस्मृतीच्या राखेत नाहीशा न होता, सार्वजनिक स्मृतींच्या संग्रहालयात राखल्या जातात आणि तशा त्यांना राखून ठेवण्याचा प्रयत्न करणे, हे प्रत्येक ऐतिहासिक लेखकाचे उचित कर्तव्य ठरते, असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी नमूद केले आहे. आयुष्याचा होम करणाऱ्या या थोर देशभक्ताचे, डॉ. नारायण दामोदर सावरकर यांचे क्रांतिकार्य, वृत्तपत्रीय कार्य, राजकीय कार्य, सामाजिक कार्य, साहित्यिक कार्याचा सदर संशोधनातून अभ्यास केला आहे.

# प्रकरण पहिले

# जीवन व चरित्र

## प्रकरण पहिले

## जीवन व चरित्र

**१.१ प्रस्तावना :-**

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात, सशस्त्र क्रांतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करुन ठेवावे, असे क्रांतिसंघटनकार्य गणेश, विनायक, नारायण या तिघा सावरकरबंधूंनी केल्याचे इतिहासात नमूद झाले आहे. त्यापैकी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची अनेक चरित्रे इंग्रजी, मराठी, हिंदी व अन्य काही भारतीय भाषांतून प्रकाशित झाली आहेत. वीर सावरकरांच्या हयातीतच त्यांची काही गाजलेली आणि सविस्तर माहिती देणारी चरित्रे प्रकाशित झाली. त्यांच्या गुप्त कार्याप्रमाणेच प्रकट आणि विश्वविख्यात झालेल्या कार्याचा व्याप प्रचंड होता. विनायक सावरकर यांचे धाकटे बंधू डॉ. नारायणराव दामोदर सावकर यांचा जन्म २५ मे १८८८ मध्ये नाशिक जिल्हयात भगूर येथे झाला. त्यांच्या राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, साहित्यिक चळवळींचा अभ्यास सदर संशोधनात केला जाणार आहे.

सावरकरबंधू म्हटले की, आपल्या देशासाठी त्यांनी काय त्याग केला, देशाकरिता देशाच्या स्वातंत्र्याकरिता तिघाही सावरकरबंधूंनी आपल्या जाहगिरीवर पाणी सोडले. वि. दा. सावरकर आणि त्यांचे मोठे बंधू सावरकर यांच्यावर बऱ्यापैकी लिखाण झाले आहे. परंतु डॉ. नारायण दामोदर सावरकर यांच्यावर विशेष लेखन झाल्याचे आढळून येत नाही. सदर प्रबंधात डॉ. नारायण दामोदर सावरकर यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

**१.२ अभ्यासाचे महत्त्व :-**

भारतीय स्वातंत्र्यलढयात महाराष्ट्राचे योगदान फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रामध्ये नाशिक जिल्हयात ज्या वेगवेगळया चळवळी झाल्या, त्या राजकीय चळवळ, सामाजिक चळवळ, क्रांतिकारी चळवळ, ऐतिहासिक चळवळ होत. या चळवळींचा अभ्यास समाजातील सर्वघटकांपुढे मांडणे व संशोधन रुपाने अभ्यास करणे. तसेच अप्रकाशित कागदपत्रे प्रकाशात आणणे.

**१.३ संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या क्रांतिकार्याचा अभ्यास करणे.

२) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या वृत्तपत्रीय कार्याचा अभ्यास करणे.

३) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.

४) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

५) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या साहित्यिक कार्याचा अभ्यास करणे.

६) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचे कार्य प्रकाशात आणणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१) टिळकयुगीन व गांधीयुगीन स्वातंत्र्यलढयात नाशिक जिल्हयात अनेक स्वातंत्र्य चळवळी झाल्या. त्यामध्ये नाशिक जिल्हयाचे योगदान मोठे आहे.

२) भारतीय स्वातंत्र्यलढयाचे परिणाम नाशिक जिल्हयातील स्वातंत्र्यसैनिकांवर झालेले दिसतात.

३) असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चले जाव चळवळ यासारख्या चळवळी नाशिक जिल्हयातील स्वातंत्र्यसैनिकांनी नेटाने पार पाडल्या.

४) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या जीवनावर वि.दा.सावरकर व ग.दा. सावरकर या बंधूंच्या विचारांचा प्रभाव होता.

**१.४ संशोधनाची व्याप्ती :-**

संशोधकाने डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या जन्मापासून म्हणजेच १८८८ ते १९४९ या कालखंडातील वरील कार्याचा अभ्यास करण्याचा विचार केला आहे. एकंदरीत संशोधन विषयाची व्याप्ती ही डॉ. नारायणराव दामोदर सावकर यांच्या कार्याचा या शोधप्रबंधात ऐतिहासिक घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

**मर्यादा :-**

महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक होऊन गेले. एकूणच क्रांतिकारकांचा इतिहास पाहता स्वातंत्र्यपूर्व काळातील डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या ऐतिहासिक कार्याचा संशोधनाच्या दृष्टीने विचार करता निवड केली. नारायणरावांच्या

जन्मापासून म्हणजेच १८८८ ते १९४९ या काळाचाच या संशोधनात प्रामुख्याने विचार केला जाणार आहे.

या संशोधनाची प्रमुख मर्यादा म्हणजे पुणे व मुंबई पुराभिलेखागारातील कागदपत्रेच यात साधन म्हणून वापरलेली आहे. तसेच काही अप्रकाशित कागदपत्रांचा समावेश केला आहे.

**कालखंड :-**

डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचा जन्म २५ मे १८८८ ते मृत्यू १९ ऑक्टोबर १९४९ पर्यंतच्या कार्याचा मर्यादित अभ्यास केला जाणार आहे.

**१.५ साहाय्यभूत माहिती संकलन :-**

ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, गॅझेटर, वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ इ.

**संशोधन तंत्र :-**

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना संशोधनाच्या काही तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे. यासाठी मूळ विषयाच्या संदर्भासाठी प्राथमिक व दुय्यम साधने असे विभाजन करुन निवडलेल्या साधनांच्या आधारे प्रस्तुत विषयाचे विश्लेषण केले आहे. निवडलेल्या साधनांच्या आधारे घटनांची सत्यता तपासण्यात आलेली आहे. प्रस्तुत साधनांच्या आधारे तळटीपा दिलेल्या आहेत. संदर्भग्रंथ यादी, निवडक छायाचित्रे व योग्य परिशिष्टे दिलेली आहेत.

**१.६ संशोधन पध्दती :-**

अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत पुढील तंत्र वापरण्यात येणार आहेत. उपलब्ध माहितीच्या आधारे तसेच संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करुन शास्त्रीय पध्दतीने मांडणी केली जाणार आहे. याद्वारे डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या कार्याचा अभ्यास करणार आहोत.

संशोधनासाठी निवडलेला विषय हा डॉ. नारायणराव सावरकर यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. विविध संग्रहित झालेली माहिती यांची पध्दतशीरपणे मांडणी केली आहे.

संशोधन प्रकार - वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन.

संशोधन पध्दती - मुलाखत, संदर्भ पध्दती.

**१.७ सावरकर घराण्याचा इतिहास :-**

रत्नागिरी जिल्हा म्हणजे नर-रत्नांचे आगार. तिथून आजवर अनेक घराणी नशीब काढण्यासाठी देशावर आली आणि त्यांनी इतिहासाच्या शिलालेखावर आपली नावे कोरुन ठेवली. सावरकर घराणे हे अशा घराण्यांपैकी एक होय. या घराण्याचे मूळ गाव रत्नागिरीच्या चिपळूण तालुक्यातील गुहागर पेटयामधील पालशेत. पालशेतला, सावरीच्या झाडांच्या वेंपुल्यामुळे नाव मिळाले असावे, अशी सावरवाडी नावाची वाडी आहे. तिथे, अतिशय विस्तारलेल्या ओक आणि बापट घराण्यांतल्या ज्या शाखा राहत त्यांना व्यवहारसौकर्यासाठी 'सावरवाडीकर' म्हणू लागले आणि पुढे या 'सावरवाडीकरां'चा संक्षेप होता होता सावरकर आडनावाचा जन्म झाला, असा तर्क आहे. 'सांवरकर' मधील 'सा' वरील अनुस्वारालाही कालांतराने संक्षेप मिळाला आणि सध्या प्रचलित असलेले 'सावरकर' हे अनुस्वार-रहित नाव शेष राहिले. मात्र डॉ. नारायणराव सावरकरांच्या स्वाक्षरीत या अनुस्वाराची स्मृति अजून जिवंत राहिली आहे.'[१]

**राहुरीची जहागिरी :-**

'सावरवाडीचे जसे सावरकर तसेच 'धोंपावे' गावचे धोंपावकर होते. ही दोन घराणी मट नि मानु या इतिहासप्रसिध्द घराण्यांप्रमाणे, नाशिबाची झाकली मूठ उघडण्यासाठी जोडीने देशावर आली आणि त्यांनी नाशिक जिल्हयांतल्या भगूर गावी वास्तव्य केले. पुढे बाळाजी बाजीरावांच्या राजवटीत त्यांना भगूर शेजारी दारणा नदीच्या पलीकडे असलेला राहुरी हा गाव जहागीर मिळाला. यासंबंधी धोंपावकर मंडळी अशी अख्यायिका सांगतात की, कोणी मराठा सरदार एकदा साशंक मनाने मोगलाईत दिग्विजयासाठी जात असता त्या धोपावकर घराण्यांतल्या एका सत्पुरुषाचा आशीर्वाद घेतला आणि मग विजय मिळाल्यावर हर्षनिर्भर होऊन त्याने पेशव्यांकडून राहुरी गाव त्यांना जहागिरी देऊ केला, पण सत्पुरुष पडले निरिच्छ! तेंव्हा त्यांचे शिष्य महादेव दीक्षित सावरकर हेच पुण्यास गेले आणि त्यांनी पुढील कागद पेशव्यांकडून करुन आणला.

'वेदमूर्ती रा. महादेव दीक्षित बिन हरी दीक्षित उपनाव सावरकर गोत्र वसिष्ठ सूत्र हिरण्यकेशी व नारायणीभट बिन काशिनाथ भट उपनाम खरे गोत्र कौशिक सूत्र हिरण्यकेशी गुहागरकर हल्ली वस्ती मौजे भगूर या थोर सत्पुरुष ब्राम्हणाच्या

कुटुंबाचा योगक्षेम चालावा, म्हणून या दोन ब्राम्हणांना राहुरी गाव नूतन इनाम करुन दिला असे.'[२]

'या कागदपत्रांची धोंपावकर मंडळी वरची अख्यायिका सांगतात पण सावरकरांच्या कुटुंबात एक वेगळीच वदंता प्रचलित होती. ती आपल्या वडिलांच्या तोंडून जशी ऐकली तशीच डॉ. नारायणराव सावरकर सांगतात, सिन्नर तालुक्यात दरेकर नावाच्या कोणी बंडखोराने एकदा पुंडावा मांडला तेव्हा स्वपराक्रमाच्या आविष्कारासाठी संधी शोधणाऱ्या महादेव दीक्षित सावरकरांची त्या कामावर नेमणूक झाली आणि त्यांनी पळीपंचापात्रांऐवजी ढाल तलवार प्रथमच हातात धरली असूनसुध्दा पुंडाव्याचा बीमोड यथास्थित केला! या कामगिरीसाठी राहुरी गाव त्यांना जहागीर मिळाले पण प्राप्तीच्या अर्ध्या वाटयाच्या करारावर सावरकर धोंपावकर मंडळी बाहेर पडली असल्याने तो गाव दोघांकडेही चालू झाला.

आख्यायिकांनी काहीही सांगितले तरी एवढे निश्चित की राहुरी गाव सावरकर नि धोपावकर या दोन घराण्यांना जहागीर मिळाली होती आणि ही मिळकत सावरकर घराण्यांतले देशावर आलेले मूळ पुरुष नारायण दीक्षित यांचे नातू महादेव दीक्षित यांनी केली होती. या नंतरच्या काळात कोण्या सावरकराने आपला कीर्तिस्तंभ रोवलेला इतिहासात आढळत नाही. मात्र, दुसऱ्या बाजीरावांना दसऱ्याचे सोने देण्यासाठी वाडयांत आलेल्या सरदार मुत्सदयांच्या तालिकेत बळवंत रामचंद्र सावरकरांचे नाव ग्रथित झाले आहे आणि १८१७ मध्ये नरवीर बापू गोखले एल्फिन्स्टनसाहेब यांच्या सेना पुणे खंड खडकीला समोरासमोर ठाकल्या, तेव्हा परशरामपंत सावरकर युध्द टाळण्यासाठी कृष्णशिष्टाईला इंग्रजांकडे गेले होते. असा उल्लेख नोंदला गेला आहे. शिवाय य.न. केळकरांच्या स्मृतीप्रमाणे दुसऱ्या बाजीरावांनी आपल्या प्रसिध्द पलायनाच्या प्रारंभी पेशवे कुटुंबातल्या स्त्रियांच्या रक्षणाचे काम विश्वासू म्हणून कोणा सावरकरांकडे सोपविले होते. बस्स याव्यतिरिक्त इतिहासाच्या आकाशांत सावरकरी बीज विरोपत्वाने कधीच तळपले नाही. सावरकर घराण्याची वंशवेल, देशावर प्रथम आले त्या नारायण दीक्षितांपासून, विस्तारत गेली.'[३]

क्रांतिकारक सावरकरबंधूंनी स्वातंत्र्याचा इतिहास घडविला. क्रांतीची ध्वजा खांद्यावरुन नेणाऱ्या सावरकरांची पार्श्वभूमी त्यांच्या पूर्वजांपासून इतिहास संपन्न

होती. पूर्वोर्जित परंपरेच्या परिपाकातून निर्माण झालेल्या या सावरकर पिढीने इंग्रजी अंमलाखाली निस्तेज, निःसत्त्व झालेल्या प्रजेमध्ये चैतन्य निर्माण केले. या क्रांतिकारक सावकरबंधूंना क्षात्रतेजाचा वारसा त्यांच्या पूर्वजांपासून मिळाला. सावरकर घराणे पेशवेकाळातले. पेशव्यांच्या दरबारात सावरकरांचे पूर्वज सरदार होते, असा इतिहास आहे. विश्वनाथ सावरकर उर्फ विसाजी हरि, बळवंतराव, रामचंद्रपंत, परशुरामपंत, असे अनेक कर्तबगार पुरुष सावरकर घराण्यात होऊन गेले.

**खरे वृत्तान्त :-**

इ.स. १७५६ सालच्या खरे वृत्तान्तात सावरकरांच्या पूर्वजांविषयी 'दीक्षित सावरकर' म्हणून निश्चित असा पुढील प्रमाणे उल्लेख आढळून येतो. 'वेदमूर्ति रा. महादेव दीक्षित बिन हरी दीक्षित उपनाम सावरकर, गोत्र वसिष्ठ, सूत्र हिरण्यकेशी व नारायण भट बिन काशिनाथ भट, उपनाम खरे, गोत्र कौंशिक, सूत्र हिरव्यकेशी गुहागरकर हल्ली वस्तू मौजे भगूर खरे कुलवृत्तान्त श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशव्यांचा काळ, शके १६७८ इ.स. १७५६'[४]

श्रीमंत बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव, सवाई माधवराव, नाना फडणीस, दुसरे बाजीराव, यांच्या काळी सावरकर घराण्यातल्या कर्त्या पुरुषांनी कोणकोणत्या क्षेत्रात काय काय करामती केल्या, याची माहिती, इतिहास संशोधक जोशी वाईकर आणि वि.का. राजवाडे यांच्या संशोधनात आली आहे.

**सावरकरांचे पूर्वज :-**

सुमारे इ.स. १७५० साली मोगलांच्या कारकीर्दीत सावरकरांचे पूर्वज कोकणातून नशीब उघडण्यासाठी देशावर कामानिमित्त आले व नाशिक जिल्हयातील गुहागर पेटयातल्या भगूर गावी वस्ती केली. त्यांच्याबरोबर धोपावे गावची धोपावकर कुटुंबीय मंडळीही होती. सावरकरांचे एक पूर्वज महादेव हरभट दीक्षित हे सत्पुरुष होऊन गेले. त्यांच्या सत्कृत्यांची कीर्ती त्या काळी सर्वत्र पसरली होती.

सावरकरांच्या हया पूर्वजाने जपजाप्य, यज्ञ, कर्मकाण्ड वगैरे वंशपरेपरेने चालत आलेल्या गोष्टींवर केवळ अवलंबून न राहता राष्ट्रधर्माला प्रमाण मानिले व त्या ध्येयपूर्ततेसाठी पेशव्यांच्या सैन्यात भरती करुन घेतली. नानासाहेब पेशव्यांनी सावरकरांची कार्यक्षमता पाहून त्यांना मिळत असलेल्या पूर्वापार वर्षासनाबरोबर

भगूर गावाजवळील नदीपलीकडचा राहुरी गाव इनाम म्हणून दिले आणि तेंव्हापासून सावरकर राहुरीचे जहागीरदार झाले.[५]

इ.स. १७९६ साली पेशवाई काळात बाळाजी बाजीराव उर्फ श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनी क्रांतिकारक सावरकरांच्या पूर्वजांना, लढाईत मर्दुमकी दाखविल्याबद्दल त्यांच्या धाडसी गुणांवर लुब्ध होऊन नाशिक जिल्हयातील राहुरी गाव इनाम दिला होता. त्यामुळे महादेव भट बिन हरीभट दीक्षित, सावरकरांचे पूर्वज पेशव्यांच्या सैन्यात तेंव्हापासून पदाधिकारी नेमले गेले.

क्रांतिकारक सावरकर बंधू गणेश, विनायक आणि नारायण यांचे वडील दामोदरपंत, सावरकर वंशावळीतले सहावे पुरुष. बापूकाकांचा विवाह झाला होता, परंतु अपत्य नव्हते. दामोदरपंतांचा विवाह कोठुरच्या मनोहर कुटुंबातील राधाबाईशी झाला होता. दामुअण्णा आणि राधाबाई यांना चार अपत्ये झाली. पहिले गणेश तथा बाबाराव, दुसरे विनायकराव तथा तात्याराव, तिसरी कन्या माई व चौथे सर्वात धाकटे नारायणराव सावरकर होत.

**१.८ जन्म व बालपण :-**

डॉ. नारायण दामोदर सावरकर हे क्रांतिकारक त्रिवर्ग सावरकरबंधूंपैकी सर्वात धाकटे. त्यांचा जन्म २५ मे १८८८ जन्मगांव नाशिक जिल्हयातील भगूर गावी झाला. डॉ. नारायण सावरकरांचे आजोबा, रा. विनायक दीक्षित सावरकर यांना दोन मुले, मोठे महादेवपंत तथा बापूकाका व धाकटे दामोदरपंत तथा दामुअण्णा, राहुरी गांव आणि भगूरची इतर इनामे सावरकर घराण्यात अव्याहत चालत आल्यामुळे सावरकर कुटुंब सधन होते.

एकत्र कुटुंबपध्दतीमुळे जमिनीचे उत्पन्न व व्यवहार ज्येष्ठ बंधू बापूकाका पाहत असत. दामुअण्णा घरात देवपूजा करीत व पुराण वाचीत. त्यांना वामन पंडितांचे काव्य व संस्कृत घराण्यातील भाऊबंदकीमुळे भगूर येथील दोन बंधूंचे वास्तव्य दोन निरनिराळया घरात झाले. जुन्या घरात बापूकाका व नवीन घरी दामुअण्णांनी संसार मांडला. तथापि, दामुअण्णांच्या मुलांचे बापूकाकांकडे जाणेयेणे असे.'[६]

### १.९ आई-वडील :-

दामोदरपंतांचा विवाह कोठूरच्या मनोहर घराण्यातल्या राधाबाईंशी सुमारे १८७० साली झाला होता. दामुअण्णा आणि पत्नी राधाबाई यांचे प्रेमाचे संबंध आणि दोघा मातापित्यांचे मुलांवरील वात्सल्य, त्यामुळे घरात सुखसमाधान आनंदाने नांदत होते. नारायणराव सावरकर सर्वात लहान, त्यामुळे नारायणाला आईवडिलांचे ममत्त्व संपूर्णतः मिळाले.

**आई-वडिलांचे संस्कार :-**

ऐतिहासिक परंपरेत मुरलेले सावरकर घराण्यातील सहावे पुरुष दामोदरपंत सावरकर शस्त्रे, तलवार, बंदुका, धनुष्यबाण वापरण्यात उदास नव्हते. पूर्वजांची शस्त्रास्त्रे घरात पडून होती. लहानपणी बाबा व तात्या यांच्या लुटुपुटीच्या लढाया चालत. बाळ नारायण आईचे मांडीवर असे. दामोदरपंत सावरकरांचे मुलांच्या हया खेळाला प्रोत्साहन असे. राधाबाईंनी मुलांमध्ये संस्कार, शिक्षणाची व पोथ्या पुराणांची आवड निर्माण केली. त्यामुळे आईवडिलांच्या शिकवणीचा परिणाम वडील बंधूंप्रमाणे नारायणराव सावरकरांवरही त्यांचे लहानपणीच झाला होता. आई-वडिलांचे संस्कार नारायणरावांवर झाले व त्याचा फायदा त्यांच्या पुढील आयुष्यात झाला.

**राधाबाईंचे निधन :-**

दामुअण्णा त्या वेळी राधाबाईच्या आवडीच्या नव्या घरी राहात होते. त्यांची आई ३२ वर्षांची असावी. एके दिवशी राधाबाईंना महामारीने गाठले. नारायणराव अवघे चार वर्षाचे होते. धाकटे मूल नारायणाला आईचा लळा फार होता. तो क्षणभरही दूर होत नसे. खुणेने त्या लेकरास सांभाळा, असे त्या म्हणाल्या, उचकी आली आणि त्यांनी प्राण सोडला.'[७]

'दामोदरपंत त्यांच्या शवापाशी बसून मोठमोठयाने रडू लागले, त्यांचे भाऊ बापूकाका आणि ते यांच्यात भयंकर भाऊबंदकी, पण राधाबाईंचा द्वेष करील असा कोणी नसे. बापूकाका आपल्या पुतण्यांना पोटाशी घेऊन "राधे! माझ्या चिल्यापिल्यास पोरकी करुन तू कशी गेलीस; आमच्या घरची लक्ष्मी आम्हास अंतरली", असे स्फुदस्फुंदून शोक करु लागले.

दामोदरपंतांना गृहिणीहीन घरांत राहवेना, त्यांनी जुन्या घराला लागूनच बांधण्यात आलेल्या नव्या घरांची रंगरंगोटी घाईघाईने उरकली नि ते तिथे राहू लागले. जुन्या घरांत त्यांचे बंधू बापुकाका राहात. दामोदरपंतांचे वय त्यावेळी ४०-४५ च्या आसपास होते पण त्यांनी तत्कालीन लोकांचारास अनुसरुन दुसरे लग्न केले नाही. उलट मायेची पाखर घालून त्यांनी पोरांना असे सांभाळिले की, त्यांना आईची आठवणही होऊ नये. घरात गडी माणसे होती पण आईने म्हणून मुलाचे जे करावयाचे असते ते सगळे काम तसेच करीत. मुलांना गाणी म्हणून निजवावे त्यांनी, राधाबाईच्या मागे त्यांनी मोठया धैर्याने संसार केला. घराची व्यवस्था अशी ठेवली की जी एखादया अनुभवी सुगरणीलाही जमू नये. दामोदरपंतांनी मुलांना कधी शिळेपाके वाढले नाही. मुलाचे कपडे स्वतःच धुवीत आणि दर आठवडयाला त्यांची नखे नि कानातला मळ काढायलाही चुकत नसत. आईवेगळया पोरक्या पोरांचा सांभाळ त्यांनी फार मायेने केला. त्या कनवाळू स्पर्शासरशी आई म्हणून कोणतीही उणीव या जगात आहे याची कल्पनासुध्दा मुलांना येत नसे.[८]

**नारायणरावांना प्लेग :-**

बाबांनी भगूरमध्ये पाय ठेवला तेव्हाच उंदीर पडू लागले. त्याच दिवशी एक शिंपी नि एक गवंडी साथीला बळी पडले. दामोदरपंत हे गावांतले वडीलधारे, वजनदार गृहस्थ, त्यांचा स्वभाव शेजाऱ्यांच्या आपत्तीत उपयोगी पडण्याचा. तेव्हा दया बुध्दीने ते अशा साथीने लागण झालेल्या काही लोकांच्या घरी समाचाराला गेले आणि द्वादशीला घरी आले. ते पाय मुरगळल्याचे निमित्त होऊन लंगडत आले. या लंगडण्यांत विशेष काही असेल असे त्या वेळी कोणास वाटले नाही. पण दुसऱ्या दिवशी निश्चित झाले. तात्यांनी गाठीवर एक गावठी लेप करुन लावला पण त्याचा काही उपयोग न होता त्या दिवशीची रात्र दामोदरपंतांना तगमगतच काढावी लागली. चतुर्दशीचे दिवशी सकाळी गाठीला जळवा लावल्या पण त्यामुळे गाठी कमी न होता उलट फुगूनच आल्या आणि दुर्दैव असे की अकरा वर्षाच्या नारायणरावांच्या जांघेत गाठ उठून दुसरा आघात सावरकर कुटुंबावर झाला! घरात त्यावेळी मोठे मनुष्य कोणीही नव्हते, शेजारी बापुकाका राहात, पण पूर्वापार भाऊबंदकीची अढी मनांत बाळगून ते इकडे फिरकले नाहीत आणि बाबा तर बाहेरगावी गेलेले. त्यामुळे या संकटाचा सगळा भार तात्या नि येसूवहिनी या सोळा सतरा वयाच्या अल्पवयीन

मुलांवर पडला. त्यांनी तो मोठया धैर्याने सोसला नि दोन्ही रुग्णांची आलटून पालटून शुश्रूषा चालवली, पण रात्री जेव्हा दोघांनाही वात झाला आणि माडीत बंद करण्यापर्यंत दामोदरपंतांचा वात अनावर झाला तेव्हा मात्र ती दोघे भांबावून गेली आणि बाबांच्या वाटेकडे त्यांचे डोळे आशेने लागून राहिले.'[९]

दि. ५ नोव्हेंबर १८९९ साली प्लेगच्या साथीत दामोदरपंत मृत्यू पावले. त्याच दिवशी सावरकरबंधूंना सरकारी नियमानुसार घर सोडावे लागले. बाबा, तात्या, ताई येसूवहिनी ही कोवळी मुले गावच्या वेशीपाशी महादेव गणपतीच्या देवालयात त्या रात्रीपुरते राहण्यास गेली. नारायणरावांचे दुखणे फारच विकोपाला गेले होते. रुग्णालयात नारायणाची गाठ दोनदा कापण्यात आली परंतु टाके फाटले आणि त्यांच्या वेदनांत जास्तच भर पडली. आई, वडील, बापुकाका यांचा मृत्यू थोडया थोडया अंतराने झाला नाही, तोच पाठोपाठ नारायण नि बाबा त्याच निर्धर रोगात सापडले. तात्याराव काय ते सहीसलामत राहिले.'[१०]

**सावरकर युगाच्या इतिहासाची पूर्तता करणारे चरित्र :-**

विनायक दामोदर सावरकर यांची अनेक चरित्रे इंग्रजी, मराठी, हिंदी व अन्य काही भारतीय भाषांतून प्रकाशित झाली आहेत. वीर सावरकरांच्या हयातीतच त्यांची काही गाजलेली आणि सविस्तर माहिती देणारी चरित्रे प्रकाशित झाली. त्यांच्या गुप्त कार्याप्रमाणेच प्रकट आणि विश्वविख्यात झालेल्या कार्याचा व्यापच इतका प्रचंड होता की, अगदी शासनाद्वारे प्रकाशित झालेल्या कागदपत्रांच्या आधारेही त्यांचे चरित्र परकीय ब्रिटिश राजवटीतही प्रकाशित करता आले. वीर सावरकर रत्नागिरी येथे स्थानबध्द असताना 'चित्रगुप्त' या टोपण नावाने भारताचे पहिले गव्हर्नर जनरल राजगोपालाचारी यांनी इंग्रजीत सावरकर चरित्र लिहून १९२५ मध्ये प्रकाशित केले. अर्थात, त्यात सावरकरांच्या क्रांतिकार्याचाच प्रामुख्याने उल्लेख होऊ शकला.

त्यानंतर प्रकाशित झालेले महत्त्वाचे चरित्र म्हणजे शि.ल. करंदीकर लिखित सावरकर चरित्र कथन. (प्रथम प्रकाशन : मे १९४३. स्वातंत्र्यवीर सावरकर एकसष्टी समारंभ). या ग्रंथात वीर सावरकरांच्या जीवनातील १९४३ पर्यंतच्याच घटना आल्या. १९५० मध्ये वीर सावरकर ॲण्ड हिज टाईम्स या धनंजय कीर लिखित विस्तृत साधार इंग्रजी चरित्रात अधिक पुढचा काळ चित्रित झाला. या चरित्र लेखनापूर्वी डॉ. कीरांनी स्वतः विनायक सावरकरांशी बोलून, चर्चा करुन, विस्तृत

साधार माहिती व संदर्भ मिळवले होते. त्यात अनेक गुप्त गोष्टीचा उल्लेख करणे शक्य नव्हते. 'शत्रूच्या शिबिरात' या त्यांच्या लंडनमधील कार्यासंबंधी माहिती १९६५ मध्ये प्रकाशित झाली. स्वतः वीर सावरकर लिखित आत्मकथेतही हुतात्मा मदनलाल धिंग्रांनी केलेल्या कर्झन वायली वधासंबंधी केवळ सूचकतेने माहिती देऊन तेथेच आत्मचरित्र संपवले आहे. म्हणजे स्वातंत्र्य संपादनानंतरही क्रांतिकारकांना किती प्रकट लेखन व भाषणातही सावधगिरी बाळगावी लागे याची यावरुन कल्पना येते.

**क्रांतिवीर बाबाराव सावरकरांचे चरित्र :-**

थोरले बंधू क्रांतिवीर गणेश दामोदर तथा बाबाराव सावरकर यांचे साधार चरित्र डॉ. द.न. गोखले यांनी बाबारावांकडून प्रत्यक्षात माहिती मिळवून लिहिले. याखेरीज त्यांचा प्रचंड पत्रव्यवहार त्यांना आधारार्थ, संदर्भार्थ उपलब्ध झाला. उपरोक्त दोन्ही चरित्रातून कै. डॉ. नारायणराव सावरकरांचे अनेक ओझरते उल्लेख आढळतात. परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे डॉ. ना.दा. सावरकर यांचे चरित्र अजूनपर्यंत प्रकाशित झालेले नाही.[११]

**स्वातंत्र्याचे बाळकडू :-**

ग.दा. सावरकर धीरगंभीर होते. परंतु ज्येष्ठ बंधूंच्या जन्मठेपेची शिक्षा ऐकूण नारायणराव सावरकरांच्या मनावर मात्र वज्राघात झाला. क्रांतिप्रयत्नात चंद्रमाप्रमाणे झिजणाऱ्या येसूवहिनी त्यांच्या नजरेसमोर आल्या. बाबा नसताना त्यांचे कसे काय होणार, अशा परिस्थितीत तात्या विलायतेत याच गुन्हयापायी तात्याही विलायतेत अडकण्याचा संभव आणि इजा, बीजा, तिजा प्रथेप्रमाणे आपणही जर बंदीत अडकलो तर स्वतःचे अपुरे शिक्षण, दोन्ही वहिन्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी, अशा क्रांतिकालातील संसारचिंता नारायणरावांना भेडसावू लागल्या. त्यांचे कौटुंबिक दायित्त्व वाढले होते. परंतु बाबांचे आणि तात्यांचे रक्त नारायणरावांमध्येही होते. स्वतःच्या पायावर समर्थपणे उभे राहू शकतील इतके नारायणराव सावरकर आता मोठे झाले होते.

**'किशोर'मंडळ :-**

'नारायणराव सावरकरांचे बालमित्र महाबळ लिहितात, नाशिकला आम्ही तालमीत जात असून तेथे रंगोपंत कुलकर्णी मधूनमधून शिकविण्यास येत असत. मल्लखांब, कुस्ती, लाठी, फरोदका, पट्टा हे विषय घडविण्याचे विशेष लक्ष पुरविले

जाई. म्हसरुळ रस्त्यावरील ठकरीच्या मैदानात किंवा डोंगरउतारणीवर रात्री १० नंतर आम्ही दोन संघ करुन निरनिराळया ठिकाणी आपआपले निशाण रोवून ठेवून त्याच्या रक्षणार्थ मंडळी ठेवून दुसऱ्यांचे निशाण ताब्यात घेण्याचा प्रयत्न प्रत्येक संघाने करीत असून व बऱ्याच वेळा निशाणरक्षणाचे काम मी व बाळ यांजकडे आलेले असे. कधीकधी जोडीने हल्ला करणारेही आम्ही असू.'

'नारायणराव सावरकरांना 'किशोर'मंडळ स्थापन झाल्यापासून आपल्या मित्रांना शब्दांनी आवाहन करण्याची कलाही चांगली अवगत झाली होती. एके वर्षी दसरा उत्सवाला नाना फडणीसांवर नारायण सावरकरांनी आपला निबंध न वाचता किशोर मंडळापुढे भाषणाच्या स्वरुपात इतका उत्कृष्टपणे मांडला की, विनायक सावरकरांनी त्यांची पाठच थोपटली. म्हणाले, 'तू उत्तम वक्ता होशील' एकदा किशोरांच्या सभेत बोलताना नारायण सावरकर म्हणाले, 'माझ्या लाडक्या बालमित्रांनो, स्वातंत्र्यसूर्य क्षितिजावर येऊ लागल्यामुळे तुमच्यासारख्या चिमणे बुलबुल पक्षी गाणी गात, त्याला आता सामोरे जाऊ लागले आहेत.'

नारायणराव सावरकरांची लहानपणापासूनच ओजस्वी, काव्यमय भाषा भाषणात असल्यामुळे किशोर मंडळातला विद्यार्थीवर्ग त्यांच्याभोवती डोलत राही. राजकीय विचारांचा अभ्यास व क्रांतीची साधने हयांचे बाळकडू वडील बंधूंच्याकडून विद्यार्थी दशेतच मिळाल्यामुळे त्यांची भाषाशैली अगदी बालपणापसून ओजस्वी, उत्स्फूर्त बनली.'[१२]

**१.१० शिक्षण व व्यवसाय :-**

नारायण सावरकर सन १९०१ साली पंचवटीच्या मराठी शाळेतून नाशिकच्या शिवाजी हायस्कूलमध्ये सहाव्या इयत्तेत इंग्रजी शाळेत आला. सहावीत बाळचे वय सुमारे १२ वर्षाचे असावे. त्यावेळी विश्वनाथ नारायण वैद्य हे हेडमास्तर होते. त्यांच्याच हाताखाली आमचे शिक्षण होत होते. पूर्वीचा अल्पपरिचय, आता वर्गबंधू म्हणून दृढ होत चालला होता. बाळकडे लक्ष वेधण्याला एक कारण घडले. त्या वेळचे मराठी शाळेचे एक शिक्षक घनःशाम बाळकृष्ण चिपळूणकर यांच्या सावरगांवकर वाडयातील निवासस्थानात १९०१ साली एका शनिवारी बाळचे व्याख्यान आहे, असे कळले. त्या वेळी आम्ही सरासरी १५/२० विद्यार्थी असू बाळच्या व्याख्यानाचा विषय होता तलवार.

महाबळ लिहितात, एके दिवशी मित्रमंडळ स्थापन करण्याची इच्छा बाळने आमचेजवळ काढली. कल्पना मान्य होण्याला काहीच अडचण नव्हती. म्हणून बाळ श्रीधर, दत्तू केळकर, भाऊ केतकर, सोताराम मशीचे, बापू दातार व मी इतक्या मंडळींनी 'किशोर मंडळ' स्थापन केले. हेच 'किशोर मंडळ' नंतर विनायक सावरकरांच्या 'मित्रमेळयात' अंतर्भूत झाले. नारायणराव सावरकरांची राष्ट्रभक्ती मित्रमेळयातल्या किशोर मंडळाच्या वाढीबरोबर वाढत गेली. किशोर मंडळात देखील व्यायाम, लाठीकाठी, शारीरिक कसरती यांचा समावेश होता. किशोरांचे खेळही स्वातंत्र्याचे ध्येय पुढे ठेवून खेळले जात. 'मित्रमेळा', 'अभिनव भारत' या संस्थांप्रमाणे किशोर मंडळातील मुलेही डोंगर चढणे, खंदकात लपून बसणे इ. आक्रमक स्पर्धेत पारंगत झाली.'[१३]

'डॉ. नारायणराव सावरकरांच्या जीवनाला झालेला प्रारंभ म्हणजे ते एक प्रकारचे आव्हानच होते. पण बाळ नारायणाने ते स्वीकारले आणि मिळेल तसे शिक्षण मिळवून शालांत परीक्षा तो उत्तीर्ण झाला. पुढे वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांनी कलकत्ता निवडले. विनायक सावरकरांनी शत्रूच्या शिबिरात शिरुन ते उडविण्यासाठी उच्च शिक्षणार्थ ब्रिटिश साम्राज्याची राजधानी असणाऱ्या लंडनची निवड केली. तसेच नारायणरावांनी कलकत्त्यातील राष्ट्रीय विचाराने चालविलेल्या नि भारलेल्या नॅशनल विद्यालयात प्रवेश मिळवून बंगाली युवकांत क्रांतीच्या ज्वाला पसरविण्यास प्रारंभ केला. त्या राष्ट्रीय महाविद्यालयात त्यांना मिळालेल्या महाराष्ट्रीय सहकाऱ्यांत हेडगेवार, पळसुले प्रभृतीचा समावेश होता. ही सर्व मंडळी पुढे डॉक्टर झाली.

**डॉक्टर होण्यासाठी महाविद्यालयीन प्रवेश ब्रिटिशांनी नाकारला :-**

'विनायकराव सावरकरांनी विलायतेत लिहिण्यास घेतलेल्या १८५७ सालचा स्वातंत्र्ययुध्दाचा इतिहास, १९०८ साली पुरा केला. त्याच वर्षी भारतात त्यांचे धाकटे बंधू नारायण सावरकर हे नाशिकच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयातून त्या शाळेची अंतिम परिक्षा मॅट्रिक पास झाले. त्या वेळी अभिनव भारताच्या क्रांतिसंघटनेचे लोण वरिष्ठ बंधू बाबाराव सावरकर यांच्या सतत प्रयत्नामुळे महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यापर्यंत पोहोचले होते. नारायणराव सावरकरांची साथ लाभल्यामुळे क्रांतिसंघटना वाढतच गेली. १९०८ मध्ये तर बाबारावांनी हिंदी संस्थानिकांनाही

देशातील क्रांतिकार्यात गोवण्यासाठी आटोकाट प्रयत्न चालविले होते. संघटनेचे व्यवहार नारायणराव सावरकरच करीत असत.'[१४]

**नारायणराव सावरकरांना बॅरिस्टर होण्याची इच्छा :-**

'१९०८ साली मॅट्रिक पास झाल्यावर नारायणराव सावरकरांना आपल्या थोरल्या बंधूंप्रमाणे, विनायकरावांसारखे बॅरिस्टरच व्हायचे होते. त्यासाठी नारायणरावांनी तयारीही चालविली होती. कपडेही शिवायला टाकले होते. नारायणरावांचा मुलगा विक्रम सावरकर यांचेकडून ही गोष्ट प्रस्तुत लेखकाला समजली. या गोष्टींच्या पुष्टयर्थ नारायणराव सावरकरांचे मित्रमेळयातील एक स्नेही आनंदरावजी साधले यांची एक आठवण येथे देत आहे. साधले लिहितात, 'नारायणराव सावरकर विलायतेत बॅरिस्टर होण्याकरताच जाणार होते. पण ती जोडगोळी पचू शकली नाही कारण १९०८ साली बाबाराव सावरकर यांच्या वंदे मातरम् खटल्याची व्यवस्था नि घरची व्यवस्था पाहाणे नारायणरावांना भाग पडले. त्यामुळे नारायणराव सावरकरांच्या महत्त्वाकांक्षेत खंड पडला.'[१५] थोडक्यात त्यांची बॅरिस्टर होण्याची इच्छा अपूर्ण राहिली.

**हिंदी संस्थानांमध्ये देशभक्तांना अधिक स्वातंत्र्य :-**

'नारायणरावांनी मग भारताच्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे ठरविले. तथापि, अभिनव भारताच्या भारतातील क्रांतिकारी कारवाया व बाबाराव सावरकरांवरील अभियोगामुळे नारायणराव सावरकरांना भारतातल्या कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळणे मुश्किल झाले, तेंव्हा त्यांनी ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षा ब्रिटिशांकित हिंदी संस्थानांमध्ये तेथील महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा प्रयत्न केला. त्या काळात ब्रिटिशांकित हिंदी संस्थानांमध्ये देशभक्तांना अधिक स्वातंत्र्य होते, अनुकूल वातावरण होते. शिवाय ब्रिटिश ससेमिरा त्या मानाने कमी असे. म्हणून राजकीय चळवळींना अनुकूल असलेल्या श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांच्या बडोदे संस्थानात नारायणरावांनी प्रवेश केला. विनायक सावरकर विलायतेत गेल्यापासून बडोदे व लंडन यामध्ये वैचारिक देवाणघेवाण यापूर्वीच झाली होती. शिवाय देशभक्त बाबू अरविंद घोष त्या काळी बडोदे संस्थानच्या राजकीय सेवेत होते आणि त्यातही बडोदे संस्थानचे राजे स्वतः देशभक्त व पुरोगामी विचारांचे क्रांतिकारी चळवळ संघटित करण्यास पोषक वातावरणासाठी संस्थानची भूमी

अनुकूल होती. हा सर्व सारासार विचार करुन गणेश सावरकरांनी स्वतः त्रास सहन करुन नारायणरावांना बडोदे येथेच उच्च शिक्षणासाठी पाठविले.[१६]

**'लोकमान्यांना राजद्रोहाबद्दल शिक्षा :-**

लोकमान्य टिळकांना 'केसरी' तील 'देशाचे दुर्दैव' हया अग्रलेखाबद्दल राजद्रोहाच्या अभियोगात २२ जुलै १९०८ रोजी सहा वर्षाची कठोर शिक्षा झाली. त्या वेळी नारायणराव सावरकरांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली बडोदे शहरात कडकडीत हरताळ घडवून आणला. निषेध करणाऱ्या जमावाला प्रोत्साहित केले, प्रसंगी दगडफेक करुन रेल्वे वाहतूक जमावाच्या मदतीने बंद पाडली. दि. १३/११/१९०९ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड मिंटोवर कर्णावतीला (अहमदाबादला) एका गुप्त क्रांतिकारकाने बॉम्ब फेकला. परंतु व्हाईसरॉय जखमी न होता एक दलित घायाळ झाला. पोलिसांनी ताबडतोब बडोदे येथे जाऊन नारायणराव सावरकरांना व मित्रसमाजातील इतर युवकांना पकडले व कर्णावतीला आणले. परंतु बॉम्बफेकीबद्दल शासनाला काही एक माहिती मिळू शकली नाही. बॉम्बफेकीचे दिवशी नारायणराव सावरकर नेमके बडोदेहून पुण्यास आले होते, असे पोलिसांना सांगण्यात आले. या प्रकरणी तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पुण्यातील एका शिक्षकाकडे चौकशी केली, तेंव्हा त्या शिक्षकाने अहमदाबादमध्ये बॉम्बस्फोट घडलेल्या घटनेच्या दिवशी नारायणराव सावरकर व मी पुण्याच्या भाजी मार्केटमध्ये होतो, असे त्या अधिकाऱ्यांना सांगून टाकले. त्या शिक्षकाने साक्ष दिल्यामुळे नारायणराव सावरकर वाचू शकले, कारण तो शिक्षक देशभक्त होता. त्यामुळे पोलिस अधिकाऱ्यांना नारायणराव सावरकरांवरील आरोप सिध्द करता आला नाही. शिक्षकाच्या साक्षीमुळे नारायणराव सहीसलामत सुटले.'[१७]

**नारायणरावांचा बडोदे संस्थानचा त्याग :-**

अशा घटना घडल्यामुळे बडोदे संस्थानातील राज्यकर्त्यांनाही, क्रांतिकारकांना गुप्तपणे प्रोत्साहन देण्याच्या इच्छेला निश्चितच मर्यादा घडल्या. ब्रिटिश सरकारच्या अनुभवातून जे क्रांतिकार्याशी निगडित होते, त्यांना प्रकटपणे तेथील महाविद्यालयातही प्रवेश देणे शक्य नव्हते. अखेर नारायणराव सावरकरांना उच्च शिक्षण घेण्याच्या तीव्र इच्छेने बडोदे संस्थान सोडावे लागले.

नारायणराव सावरकर नाशिक येथील घरी परतले. घरी पोहोचतात न पोहोचतात तोच डॉ. कलेक्टर जॅक्सनचा विजयानंद नाटयगृहात खून झाला. खून करणाऱ्या अनंत लक्ष्मण कान्हेरेला पिस्तुले पुरविल्याच्या आरोपाखाली विनायकराव सावरकरांना विलायतेत संशयावरुन अटक करण्यात आली. त्यांना हिंदुस्थानात आणण्यात आले. सरकारने भरलेल्या नाशिक कटाच्या खून खटल्यात नारायणरावांना अल्पवय कारणास्तव सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा ब्रिटिशांनी ठोठावली.[१८]

**१.११ मादाम कामांची मदत :-**

नारायणरावांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला तरी तेथील विद्याभ्यासासाठी लागणारा पैसा त्यांना सहजपणे उपलब्ध होऊ शकला नव्हता. तेंव्हा विनायक सावरकरांच्या पॅरिसमधील सहकारी मादाम भिकाजी रुस्तम कामा यांनी, नारायणराव सावरकरांना डॉक्टर व्हायचे आहे, हे ध्यानात धरुन, त्यांच्या कॉलेजचे शुल्क भरण्यास मदत केली. नारायणरावांचा अभ्यासक्रम अशा रीतीने सुरु झाला. तरी घरचा संसार चालविण्यासाठी येसूवहिनींना पैशांची गरज भासे. देशभक्त बाबाराव सावरकरांच्या त्या पत्नी असूनही, त्यांचेविषयी सहानुभूती दाखवायलाही माणसे भीत असत. दोघेही सावरकरबंधू गणेश नि विनायक हे अंदमानात होते, हे जाणून सावरकर कुटुंबाला संसाराच्या काळज्या मिटविण्यासाठी मादाम कामा प्रती मासी ६० रुपयांचे साहाय्य पॅरिसहून पाठवित असत. कामाबाईंनी विनायकराव सावरकर व त्यांचे बंधू नारायणराव व गणेश यांचेवरचा लोभ अखेरपर्यंत कायम ठेवला होता. विनायकरावांनी अंदमानातून धाडलेल्या पत्रांमध्ये आपल्या मातृत्व कामाबाईंविषयी प्रेमळ उल्लेख व तेवढयाच प्रेमळ शब्दात नारायणरावांनी कामाबाईंच्या पत्रात व्यक्त केलेली उत्कृष्ट मातृभक्ती पाहून मन हेलावून जाते.'[१९]

(परिशिष्टात मादाम कामांचे पत्र टाकले आहे.)

**विवाह :-**

येसूवहिनींचा जेव्हा गणेश तथा बाबारावांशी विवाह झाला, तेंव्हा ते क्रांतिकार्याशी संबंधित नव्हते. यमुनाबाईचा, विनायकरावांशी विवाह झाला. तेंव्हा विनायकरावांच्या क्रांतीप्रयत्नांचा शासनाला सुगावा नव्हता. त्यांच्या क्रांतिकार्याला नुकताच प्रारंभ झाला होता. परंतु शांताबाई मात्र क्रांतिकार्यात शिक्षा भोगून आलेल्या

नारायणरावांना देशकार्यात सर्वार्थाने सहकार्य देण्याच्या हेतूनेच त्यांच्याशी विवाहबध्द झाली.[२०]

'क्रांतिकारक त्रिवर्ग सावरकरबंधूंपैकी धाकटे डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचा शांताबाई यांच्याशी १९१५ मध्ये विवाह झाला. त्यांना मोहरी हरिदिनी म्हणत.

**नारायणराव सावरकरांना डॉक्टर पदवी :-**

अत्यंत कष्टमय हालाखीच्या अवस्थेत हे शिक्षण त्यांनी निर्धाराने पार पाडले. डॉ. नारायणराव यांचा विवाह वैद्यकीय पदवी घेण्याआधीच सन १९१५ मध्ये झाला होता. नारायणराव मेडिकल कॉलेजमध्ये गेल्यापासून आपला पुत्रवत दीर जणू काय मिळविताच झाला, असे येसूवहिनींना वाटू लागले होते. मातृवत येसूवहिनींच्या प्रेमाखातर नारायणरावांनी वैद्यकीय अभ्यासक्रम पुरा होण्याआधी विवाह केला. १९१५ मध्ये नारायणरावांचा त्र्यंकबेश्वरी साध्या पध्दतीने विवाह झाला. घाणेकरांच्या घराण्यात जन्मलेल्या सरळ नासिकेच्या, निळया डोळयांच्या, गौरवर्णाच्या, दिसायला गोंडस अशा हरिदिनीशी डॉ. सावरकर विवाहबध्द झाले. येसूवहिनींनी लग्नानंतर हरिदिनीचे नाव शांता ठेवले. तेंव्हापासून शांताबाई नारायण सावरकर डॉ. सावरकरांच्या पत्नी म्हणून प्रसिध्दीला आल्या.'[२१]

'अनेक संकटांना तोंड देत अर्धपोटी राहून नारायणराव सावरकरांनी डॉक्टरकीची परीक्षा पूर्ण केली. १९१६ साली नारायणराव सावरकर अखेर दंतविशारद झाले.

**१.१२ डॉ. नारायणराव सावरकरांची स्वभाव गुणवैशिष्टये :-**

**वक्ता, विद्वान, लेखक :-**

सावरकर प्रभावळीत शोभणारे नारायणराव कट्टर देशभक्त, चतुर हिंदू संघटक, धाडसी संपादक, सिध्दहस्त लेखक, पट्टीचे वक्ते म्हणूनही त्यांची ख्याती होती. १९१४-१५ ते १९४६-४७ पर्यंतचा त्यांचा काळ अशा वातावरणातच गेला. 'श्रध्दानंद' साप्ताहिक आजही त्यांच्या पत्रकारितेची साक्ष देते. 'मरण की लग्न' ही कादंबरी त्यांचे ललित साहित्याशी असलेले नाते दाखवते. तसेच 'गुन्हेगार' इ. अनेक पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना त्यांच्या लेखनीचे कर्तृत्व सिध्द करण्यास समर्थ आहेत. अशा विविध साहित्यासमवेतच त्यांचे काही काव्यही उपलब्ध आहे. ते असे

पट्टीचे फर्डे वक्ते होते की, विरोधक त्यांचे वर्णन 'मुलुख मैदान तोफ' असे करीत असत.

**डॉ. सावरकर चरित्र लेखनातील अडचणी :-**

गणेश सावरकर आणि विनायक सावरकर या दोघा वडील बंधूंनी डॉ. नारायणरावांना अनेक वेळा जमेल तितके आत्मचरित्र लिहून ठेवण्याच्या सूचना केल्या. अतिशय घाईगडबडीच्या जीवनक्रमातही दि. २३ मार्च १९२४ ला 'या उपक्रमाचा प्रारंभ का'? या मथळयाखाली वहीचे एक पृष्ठ लिहून डॉ. सावरकरांनी केला. परंतु त्यानंतर पुढे प्रगती झाली नाही. मात्र, सुमारे तब्बल २० वर्षांनी म्हणजे २-१२-१९४३ ला 'आत्मचरित्र' या मथळयाखाली त्याच वहीची सुमारे वीस पृष्ठे दि. २०-०४-१९४४ पर्यंत प्रस्ताविक रुपात लिहिलेली आढळतात.

'असे का व्हावे'? त्या काळात वावरलेल्या व्यक्तींना त्याचे कारण सहज समजू शकते. आमच्याही ऐकण्यात तीच मीमांसा आली आहे. डॉ. सावरकरांच्या जीवनकार्यातील सुमारे ९० प्रतिशत भाग हा विविध प्रकारची कार्ये प्रत्यक्ष घडवून आणण्यात व्यतीत झाला. विशेषतः क्रांतिसंघटनांना आणि क्रांतिकारकांना सर्वांगीण कृतिशील सहकार्य या अत्यंत दाहक गोष्टीबरोबरच उपलब्ध लोकशाही प्रकट मार्गाने स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ पुढे चालविणे, हे त्यांचे महत्त्वाचे कार्य असे. जातीय दंग्यातील हिंदूंच्या संरक्षणापासून तो परकीयांनी पळविलेल्या अनाथ हिंदू स्त्रियांची मुक्तता करुन त्यांना आश्रय देण्यापर्यंत विविध प्रकारची कार्य करावी लागली. गणेश व विनायक सावरकर बंधू अंदमानात असताना त्यांच्याकडून तेथून सुटून भारतात आलेल्या बंद्यांमार्फत प्राप्त झालेले साहित्य टोपण नावाने प्रकाशित करणे आणि त्याबरोबर भारताबाहेर भूमिगत असलेल्या क्रांतिकारकांशी संबंध प्रस्थापित करुन चळवळीचा समन्वय करणे हे अति जोखमीचे आणि गुप्त कार्य त्यांनी केले. आता या कार्याची सविस्तर नावानिशीवर तपशीलवार माहिती लिहून ठेवणे म्हणजे स्वतःच्याच हाताने आपल्या घरादारावर आणि संबंधित व्यक्तींच्या घरादारांवर निखारे ठेवण्यासारखे नव्हते काय? अशा परिस्थितीत त्यांना आपल्याच हस्ताक्षरात परकीय ब्रिटिश सत्तेला पुरावा उपलब्ध होऊ नये म्हणून तत्कालीन घडामोडी लिहून ठेवता आल्या नाहीत हे उघड आहे.[२२]

**समाज कुटुंबी :-**

डॉ. सावरकर म्हणजे केवळ, डॉक्टर, वकील, व्यापारी, कर्मचारी अशा सर्व क्षेत्रांत त्यांचा मित्रपरिवार पसरलेला, तसेच साहित्यिक नि राजकीय वर्तुळातही त्यांना मानाचे स्थान असे. व्यायामशाळा, आखाडयांशीही त्यांचे संबंध होते. सशस्त्र क्रांतिकारकांपासून सामान्य कर्मचाऱ्यापर्यंत त्यांचे संबंध आपलेपणाचे नि कौटुंबिक स्वरुपाचे असत. डॉ. सावरकर हे सर्वांचे आशास्थान होते. अडला नडला त्यांच्याकडे येऊन अडचणीतून पार पडे. कित्येक प्रसंगी घरी भोजनप्रसंग आयोजित करुन आल्यागेल्यांची ते सोय करीत.

**वडीलबंधू पितृवत :-**

दोन्ही वडील बंधू डॉक्टरांच्या लहानपणीच काळया पाण्यावर गेले असले तरी कारागृहातून परत आलेल्या बाबरावांचे वास्तव्य डॉक्टरांकडेच असे विनायकराव हे तर त्या घराण्याचे आराध्यदैवतच. सावरकर नाव गाजले नि तेही भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात ते विनायकरावांमुळे. सावरकर म्हणजे सामाजिक क्रांती, धार्मिक क्रांती, सांस्कृतिक नि शैक्षणिक क्रांती, अशा जीवनाच्या सर्वांगातून त्यांनी क्रांतिकारकता निर्माण करुन खेळवली. तिची ओळख करुन घेऊन समाज जर तिचे स्वागत करील, तर हा देश पुन्हा एकदा जगावर साम्राज्य गाजवील, अशा अद्ययावत नि सुधारणावादी कुटुंबात वडीलबंधू पितृवत मानले जात. पित्याचे छत्र नाहीसे झाल्यावर मोठया बंधूनींच आपले छत्र लहान भावंडांवर धरले होते.'[२३]

**१.१३ स्वातंत्र्यानंतरही ओढवलेल्या आपत्ती :-**

काळ झपाटयाने बदलत होता आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे ब्रिटिश शासनाची भारतावरील पकडही अगतिकतेने ढिली पडत चालली होती. इतकी की दुसऱ्या महायुध्दाचा लाभ घेऊन ब्रिटिशांना असलेली भारतीय सैन्यभरतीची आवश्यकता लक्षात घेऊन विनायक सावरकर हिंदू महासभेच्या अध्यक्षपदावरुन अगदी उघडपणे 'देशभक्त हिंदु तरुणांनो, ब्रिटिशांची गरज लक्षात घेऊन अधिकाधिक संख्येत तात्काळ सैन्यात भरती व्हा. बंदुका, तोफा, रणगाडे आणि विमान चालविण्याचे शिक्षण आत्मसात करा. आत्मसात केलेले युध्द साहित्य आणि युध्दकलेचा उपयोग आघाडीवर गेल्यावर कसा करावयाचा, बंदुकीच्या नळया कोणत्या दिशेने वळवायच्या हे आपोआपच आपणास कळेल, असा उपदेश करीत.

त्याचा उपयोग नेताजींच्या आझाद हिंद सेनेला कसा झाला ते सर्वज्ञातच आहे.[२४] थोडक्यात, स्वा. सावरकरांनी 'लेखण्या मोडा व बंदुका हाती घ्या' या संदेशाचा उपदेश लोकांना केला.

**कागदपत्रांची होळी :-**

डॉ. सावरकररुग्णालयात असताना तेथेही नावाबाबत गुप्तता राखण्यात आली होती. माझे वडील बंधू अशोक नारायणराव सावरकर यांच्या बरोबर मी बराच शोध घेतल्यानंतर रुग्णालयात डॉ. सावरकरांना भेटू शकलो. त्या वेळी तेथे असलेल्या नर्सने डॉ. सावरकरांना कुतूहलाने विचारले, 'ही मुले आपली कोण?' तेव्हा क्षणभर थांबून क्षीण आवाजात डॉ. सावरकरांनी उत्तर दिले, 'ही माझ्या बहिणीची मुले आहेत' कारण ही सावरकरांची मुले आहेत. अशी वार्ता पसरली असती तर त्या मुलांनाही जनक्षोभाची झळ पोहचली असती, ती टाळावी म्हणून असे उत्तर देणे भाग पडले.

त्यानंतर आम्हांशी झालेल्या संवादात काही प्राथमिक सूचनांनंतर डॉ. सावरकरांनी अगदी हळू आवाजात सांगितले की, शक्यतो आज रात्रीच औषधालयात जा. (म्हणजे त्यांच्या दवाखान्यात हे, औषधालय दादर येथील मारुती मंदिराला चिकटून असलेल्या पोलिस चौकीसमोरील पाध्ये चाळीत पहिल्या मजल्यावर होते) दार आतून बंद करुन दिवे मालवा आणि बॅरीच्या प्रकाशात तेथील कपाटात असलेली सर्व कागदपत्रे बाहेर काढा. त्यात माझ्या (डॉक्टरांच्या) हस्ताक्षरांतील जितके कागद असतील ते सर्व आणि काही विशिष्ट व्यक्तीची आलेली पत्रे इत्यादी पत्रव्यवहार बादलीत गठ्ठयागठ्ठयाने जाळून झालेली राख क्लशच्या संडासात टाकून द्या, वाचण्याच्या नादात वेळ घालवू नका'.

त्या आदेशानुसार आम्ही दोघा भावांनी मध्यरात्री औषधालयात जाऊन ती कार्यवाही यशस्वीरीत्या पूर्ण केली नाही. म्हटले तरी कागदपत्रे जाळण्यापूर्वी त्यावरुन फिरलेल्या नजरेने अनेक महत्त्वाची कागदपत्रे पाहिल्याचे अजूनही स्मरते काही पत्रव्यवहार तसा निरुपद्रवी होता आणि काही पत्रे लोकनायक बापूजी अणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न.वि. गाडगीळ, सरकारमान्य नामवंतांची होती. परंतु कोणत्याही प्रकारचा धोका पत्कारायचा नसल्याने तीही कागदपत्रे जाळावी लागली.

विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय संबंधात असलेला पत्रव्यवहारही भस्मसात करावा लागला.

पण तत्पूर्वीही माझ्या वडिलांचा म्हणावा तसा सहवास मला घडला नाही (आम्ही वडिलांना दादा म्हणत असू) १९४२ मध्ये ती दादांवर आंत्रपुच्छाची मोठी शस्त्रक्रिया करावी लागली. त्यानंतर त्यांना पूर्ण विश्रांती आणि वायुपालटाचा समादेश मिळाल्याने आमचे पूर्ण कुटुंबच, ती दादा, सौ. आई आणि आम्ही पाच भावंडे कर्नाटकातील जमखिंडी या ठिकाणी रहाण्यास गेलो. तेथील वर्षभराच्या वास्तव्यात त्यांची रुग्णावस्था आणि माझे बालवय, त्यामुळे त्यांच्या स्वभावाची व कर्तृत्वाची विशेष जाणीव झाली नाही.

त्यांना बरे वाटताच ते पुनश्चः दादरला (मुंबई) परतून वैद्यकीय व्यवसायास लागले. थोरले काका गणेश सावरकर त्या वेळी आजारी होते. त्यांना कोरडया वायुमानात राहण्याचा समादेश वैद्यांनी दिल्याने आमचे त्यांच्यासह सांगलीत जाण्याचे ठरले. जून १९४३ ते १९४५ एप्रिलपर्यंत आम्ही सांगलीत होतो.दादा मुंबईत, सांगलीत निधन १६ मार्च १९४५ ला झाले. त्यानंतर आम्ही भावंडे व आई मुंबईस परतल्यावर पुन्हा लगेचच जून १९४५ मध्ये मी नागपुरास आजोळी शिक्षणासाठी गेलो. मार्च १९४७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा देऊन मुंबईस परतलो. पोद्दार महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि केवळ ८ महिन्यांत दि. ३० जानेवारी १९४८ च्या गांधीवधानंतर पुन्हा वडिलांपासून मला दूर जावे लागले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी मी पुन्हा नागपुरास गेलो आणि त्याच काळात १९ ऑक्टोबर १९४९ ला दादांचे निधन झाले. वरील घटना क्रमावरुन माझ्या वडिलांचा सहवास मला किती कमी प्रमाणात घडला याची तुम्हाला कल्पना यावी.

दादांच्या निधनानंतर, माझ्या वाचनाची, विचारसरणीची आणि सार्वजनिक जीवनाची जाणीव कारावासातील तशा वेदना भोगण्याची पाळी आली नाही. परंतु प्रतिकूल परिस्थितीत स्वतःचे शिक्षण पूर्ण करणे कौटुंबिक दायित्व सांभाळणे, त्याबरोबर देशभक्तीचे गुप्त क्रांतिकार्य वाढवणे आणि पुढे, अंदमानात खिचपत पडलेल्या बाबा आणि तात्यांना सोडवून आणण्यासाठी जन आंदोलन उभारणे, अशी विविध कर्तव्ये, शासकीय वक्र दृष्टीला चुकवून साधनहीन अवस्थेत करावी लागली. व्यावहारिक जीवनातील अडचणी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानातून

नियमानुसार वर्षाला एक याप्रमाणे धाकटे बंधू नारायणराव सावकर यांना पत्रे लिहिली, ती 'अंदमानच्या अंधेरीतून' या पुस्तकात प्रसिध्द झालेली आहेत. त्यातील आशय लक्षात घेतल्यावर, अंदमानात खितपत पडलेल्या दोन्ही वडील बंधूंच्या अनुपस्थितीत डॉ. ना.दा. सावरकर यांनी कसे अनेकांगी कार्य केले याची काहीशी कल्पना येते.

गणेश आणि विनायक सावरकर यांची संपूर्ण मुक्तता होईपर्यंत निदान महाराष्ट्रात तरी दादांनी देशभक्त कार्यकर्त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्या कार्याची तपशीलवार सुसंगत नोंद करणे हे आवश्यक आहे. जी माहिती मला थोडीफार कळली, त्यावरुन लोकांसमोर न आलेले दादांचे विविधांगी कर्तृत्व लक्षणीय होते हे मला उमगले.[२५]

**१.१४ डॉ. नारायणराव सावरकरांचा उद्वेगजनक अंत :-**

डॉ. नारायण दामोदर सावरकर यांनी संपूर्ण जीवन राष्ट्रोध्दारासाठी खर्च केले. त्याचे बक्षीस त्यांना, त्यांच्या आयुष्याच्या अखेरीला गांधीवधात मिळाले. गांधीवध झाल्यानंतर दुसरे दिवशी म्हणजे दि. ३१ जानेवारी १९४८ ला, त्यांच्यावर हिंदुसभेचे पुढारी म्हणून, काँग्रेस गुंडांनी प्राणघातक हल्ला केला. जबर जखमी झालेले डॉ. सावरकर इस्पितळात पडून होते. त्या वेळी गांधीवधाच्या संबंधात त्यांच्यावरही अटक आज्ञा बजावण्यात आली. रुग्णावस्थेतील डॉ. सावरकर शासकीय आदेशानुसार अटकेतच होते. त्यांच्या पलंगाभोवती पोलीस पहारा देत होते. त्या हल्ल्यापासून ते बचावले, परंतु ढासळलेली प्रकृती पूर्ववत् सुधारण्याच्या आधीच त्यांना अतिश्रमामुळे अर्धांगवायूचा झटका येऊन, त्यातच मेंदूतील रक्तस्त्राव सुरु झाला. त्या वेळी ते बेशुध्द झाले, आणि सुमारे दोन आठवडयांनी त्यांचा दुःखद अंत झाला.

डॉ. सावरकरांच्या आयुष्यातल्या अखेरच्या दिवसांच्या आठवणी, त्यांच्या पत्नी शांताबाई सावरकर आणि सुकन्या स्नेहलता साठे यांनी 'हरिदिनी' आत्मवृत्तामध्ये व 'प्रज्वलंत' मासिकात प्रकाशित केल्या, त्या अत्यंत हृदयद्रावक होत्या. डॉक्टरांचे मरण किती हृदयभेदक होते, हे प्रत्यक्ष घरातल्या त्यांच्या नातलगांनीच सांगितलेले बरे. तसेच नाशिकच्या 'मित्रमेळयात'ल्या त्यांच्या अगदी

जिवाभावाच्या सहकाऱ्याने कृ. ब. महाबळ यांनी डॉ. सावरकरांच्या मरणोत्तर पाठविलेल्या शोकपत्रात, अनेक अज्ञात आठवणी सांगितल्या.

डॉ. नारायणराव सावरकर शिवाजी पार्क दादर जवळच्या 'सावरकर सदन' मध्ये तळमजल्यावर राहात असत, त्या वेळची हकीकत. डॉ. सावरकर बरेच आजारी होते. त्यांचेवर पित्ताशयाची शस्त्रक्रिया झाली होती. ते हवा पालटण्यासाठी जमखिंडाला गेले होते. ते एकटेच मुंबईला परत आले. शांताबाई, मुले व बाबाराव सावरकर मुंबईला न येता सांगलीला गेले. सांगलीला असतानाच बाबारावांचे १९४५ साली निधन झाले. तेव्हा शांताबाई सांगलीस न राहाता मुलांना घेऊन मुंबईला परतल्या. त्याच वेळी डॉक्टरांची प्रकृती बरी नव्हती. डॉक्टर शांताबाईंना पाहून म्हणाले, "माझा काही भरंवसा नाही, मृत्यू जवळ आलाय असे वाटते ! वेळ आली तर उपयोगी पडावे म्हणून उशीखाली पाचशे रुपये ठेवलेत, आणि ही रिकामी इंजेक्शनची बाटली आणि हा रुग्णालयातला ग्लास, माझी आठवण म्हणून एवढेच. वेळोवेळी सहकार्य दिलेस. वेळेला अंगावरचे सोनेसुध्दा दिलेस. म्हणून आपल्या सावरकर कुटुंबासाठी व देशहितासाठी पैसा मी मिळविला नि निरपेक्षतेने खर्च केला. पण, अखेर मुलांसाठी काही केले नाही. तुलाही शिल्ल्क ठेवले नाही."

डॉ. सावरकर त्यातून बरे झाले. पुढे काही दिवसांनी डॉ. नारायणराव आणि कुटुंबीय मंडळी दादर येथील पाटीलवाडीतल्या घरात राहायला गेली. गांधीवधानंतर दुसऱ्या दिवशी या घरावर हल्ला झाला. आरडाओरडीचा हैदोस घालीत गुंड घरावर धक्के मारुन जाळावयाच्या धमक्या देऊ लागले. डॉक्टर अशक्त झाले होते. दार उघडायला कोणी गेले नाही. शांताबाईंनी तिखट घेऊन त्यात रांगोळी मिसळली आणि त्याच्या पुडया मुलांच्या हातात देत म्हणाल्या, "तिखटाच्या पुडया आहेत या, बाहेरचे लोक मारायला आले की, त्यांच्या डोळयात फेका". मुलांच्या हातात काठया, कलथे दिले. बत्ता, वरवंटा पण काढून ठेवला. ओचापदर खोचून हातात कोयता घेऊन आल्या. प्रसंगाला तोंड द्यायला शांताबाई तयार झाल्या.[२६]

एवढयात ते गुंड खिडकी फोडून आत शिरण्याचा प्रयत्न करीत म्हणाले, "डॉक्टर कुठे आहेत? आणि हातात कोयता कशाला घेतलास ?" शांताबाई संतापून म्हणाल्या, "तू पुढे तर ये, मग कोयता कशाला घेतलाय ते सांगते." तेवढयात "डॉक्टरांना हाणा मारा, त्यांना जिवंत ठेवू नका. रॉकेलचे बोळे आणा, पेटवून देऊ."

अशा क्रूर आरोळया शांताबाईंच्या कानावर पडल्या. तेव्हा शांताबाईंच्या लक्षात आले की, त्या नको नको म्हणत असतानाही, घर वाचावे म्हणून डॉ. सावरकर दुसऱ्या दाराने बाहेर पडले होते.

बाहेर डॉक्टरांच्यावर दगडांचा मारा चालू झाला. माथेफिरुंनी डॉक्टरांच्या डोक्यावर मोठा दगड घातला. रक्ताच्या थारोळयात ते जमिनीवर कोसळले. जवळच राहणाऱ्या चव्हाण नावाच्या सद्‌गृहस्थाने डॉक्टरांना पाणी आणून पाजले. ते पाहून गुंडांनी त्यालाही धमकी दिली, "काय रे, सावरकराला पाणी पाजून जिवंत ठेवतोस, तुलाही पाहून देऊ."

डॉक्टर सावरकरांना रुग्णालयात गेल्यानंतर, मुलेबाळे आणि शांताबाई सावरकर नेसत्या वस्त्रनिशी बाहेर पडल्या आणि फडकेबंधू यांच्या निवासस्थानी राहाण्यास गेल्या. गांधीखुनानंतर झालेल्या हल्ल्यातून डॉ. सावरकर पूर्ण बरे कधीच झाले नाहीत. दिवसांमागून दिवस जात होते. एके दिवशी नागपूरहून निरोप आला. शांताबाई पुढे झाल्या. मागाहून डॉ. सावरकर जाणार होते. दै. 'प्रभात' मध्ये 'हिंदूचा विश्वविजयी इतिहास' ही त्यांची लेखमाला चालू होती. ती पुरी करुन दुसऱ्या दिवशी ते नागपुराला निघणार होते.

घरात मुलांनी हट्ट केला, आज आई नाहीय, तर तुम्ही लवकर घरी या. तुम्ही आल्याशिवाय आम्ही जेवणार नाही. हसत हसत दादा (नारायणराव) त्यांना म्हणाले, "एवढेच ना, मी नक्की लवकर येतो, आपण एकदम जाऊ  या." परंतु जेवण्यासाठी ते काही आले नाहीत. मुलांनी जेवणासाठी पुष्कळ वाट पाहिली. आई घरी नाही म्हणून मुलांच्याबरोबर जेवायला येणारे दादा दुपारचे तीन वाजून गेले तरी आलेच नाहीत. तेव्हा मात्र, मुले धास्तावली. त्यांना काळजी वाटायला लागली. त्यांनी औषधालयात - त्यांच्या दवाखान्यात जाऊन चौकशी करायचे ठरविले. औषधालयात कधी मुले आली की, त्यांचे दादा त्यांना तळमजल्यावरच्या गुऱ्हाळातून रस मागवायचे. पण त्या दिवशी गुऱ्हाळाकडे न बघता मुले एका दमात जिना चढून औषधालयात गेली.

पुढच्या खोलीचे दार सताड उघडे होते. डॉक्टर सावरकर बसावयाच्या फिरत्या खुर्चीवर नव्हते. म्हणून मुलांनी पार्टिशनमधून आत नजर टाकली. डॉ. सावरकर जमिनीवर वेडेवाकडे पडलेले दिसले. मुलांनी पाणी आणून पलंगावर ठेवले.

औषधपाणी, इंजेक्शने चालू होती. नागपुराहून शांताबाई, विक्रमराव आले. पंधरा दिवस असेच निघून गेले. सर्वांच्या सदिच्छा होत्या, परंतु औषधयोजनेला यश आले नाही. दि. १९ ऑक्टोबर १९४९ ला डॉ. नारायणराव सावरकरांचा अंत अशा रीतीने झाला.[२७]

गांधीवधात, गुंडांनी कपाळावर दगड घातल्यामुळे जबर जखमी झालेले डॉ. सावरकर रुग्णालयात पडून होते. त्या वेळी त्यांचे बालमित्र, मित्रमेळयाचे सदस्य कृ. ब. महाबळ समाचारास गेले असताना डॉ. नारायणराव सावरकर त्यांना म्हणाले, "कृष्णा, मातृभूमीच्या सेवेसाठी, त्यागपूर्वक प्रयत्नाची कास धरुन बांधवांकरिता अनेक प्रकारचे कष्ट सोसले. त्यांच्या अडीअडचणींच्या वेळी बनेल त्या प्रकारे साहय दिले. रात्र नाही, दिवस नाही, तहान नाही, भूक नाही, अशा प्रकारे ज्यांच्यासाठी श्रमलो, तेच लोक आपल्या डोक्यात दगड घालण्यास मागे-पुढे बघत नाहीत. हा दैवदुर्विपाकच म्हणावयाचा. केवळ हिंदू सभेचा द्वेष धरुन मागचे संबंध विसरले जाऊन आपल्या बांधवांवर अत्याचार करण्यास प्रवृत्त होतात. प्रसंगी प्राणही घेतात. हेच भारताचे दुर्भाग्य होय."

डॉ. सावरकरांच्या तोंडून आलेले वरील शब्द न् शब्द त्यांच्या बालमित्र महाबळांनी डायरीत टिपले होते. शांताबाई सावरकरांना लिहिलेल्या शोकपत्रात महाबळ पुढे लिहितात, "परंतु, शेवटच्या आजारात मी पुन्हा भेटण्यास गेलो, पण तो शुध्दीवर नव्हता."

आयुष्यभर डॉ. सावरकर झगडले. ना लाभ ना लोभ. हे सर्व करताना घरदार ओस पडले. पोरे-बाळे उघडयावर पडली. त्यांनी व त्यांच्या पत्नी शांताबाई सावरकरांनी अतिशय दु:ख सहन केले. सावरकरांनी घरावर अक्षरशः निखारे ठेवले व नोकरशाहीशी झगडता झगडता आपले आयुष्य संपविले.

सुप्रसिध्द पत्रकार साहित्यिक पा. वा. गाडगीळ यांनी एकदा आपल्या अग्रलेखात लिहिल्याचे आठवते. "त्यांच्या मृत्यूने झालेली हानी कधीही भरुन येणार नाही. ईश्वर मृताचे आत्म्यास शांती देवो, असे प्रत्येक थोर माणसाच्या मृत्युलेखासंबंधाने आपण लिहित असतो. त्यातला पहिला भाग बहुधा खराच असतो. पण दुसऱ्या भागात मृताच्या आत्म्यास शांती देवो, अशी जी प्रार्थना असते ती क्वचितच खरी ठरते." सत्य आहे ते. डॉ. सावरकरांनी राष्ट्राकरता केवढा स्वार्थत्याग

केला ! परंतु राष्ट्राने त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना काय दिले? काळज्या, विवंचना व संकटांवर संकटे. नारायणराव सावरकरांच्या मृत्यूने झालेली हानी कधीही भरुन येणे शक्य नाही. मग त्यांच्या आत्म्यास काय वाटत असेल व कसली शांति ? ती देण्याचे काम फक्त ईश्वराचेच आहे असे मानून, सबंध राष्ट्राने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. किती दैवदुर्विलास हा![२८]

थोडक्यात, भारतातील कोणत्याही क्रांतिकारकांना हालअपेष्टा दुःखद यातना, अवमान, लोकक्षोभ याशिवाय काहीही पदरात पडले नाही; असे आपणास दिसून येते.

## तळटिपा

१) गोखले द. न. 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' मङ्गल साहित्य प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती - २००३, पृष्ठ - १.

२) कित्ता; पृष्ठ - ३; पुणे पुराभिलेखागार मधील नगर जमाव (मौजे राहुरी) रुमाल नं. १७७८.

३) करंदिकर शि. ल. 'सावरकर चरित्र' सीताबाई करंदीकर (प्रकाशक) पुणे, १९४३, पृष्ठ - ५५; पुणे पुराभिलेखागार मधील नगर जमाव (मौजे राहुरी) रुमाल नं. १७७८.

४) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर', मनोरमा प्रकाशन, दादर मुंबई, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००२; पृष्ठ - २७, पुणे पुराभिलेखागार मधील नगर जमाव (मौजे राहुरी) रुमाल नं. १७७८.
पृष्ठ -२७.

५) कित्ता; पृष्ठ - ३१; पुणे पुराभिलेखागार मधील नगर जमाव (मौजे भगूर) रुमाल नं. १७६९.

६) कित्ता; पृष्ठ - ४०.

७) कित्ता; पृष्ठ - ४१.

८) करंदीकर शि. ल. उपरोक्त, पृष्ठ - ५६.

९) कित्ता; पृष्ठ - ५६.

१०) वेलकर प्रताप ; उपरोक्त, पृष्ठ - ४५

११) कित्ता; पृष्ठ - ६, ७.

१२) कित्ता; पृष्ठ - कित्ता; पृष्ठ - ५६, ५७.

१३) पटवर्धन श.,(संपा), ना.दा.सावरकर, 'स्मृती संचय', क्रांतिवीर बाबाराव सावरकर, स्मारक मंडळ - सांगली, १९८४-८५, पृष्ठ - ११.

१४) वेलकर प्रताप, उपरोक्त, पृष्ठ - १०८.

१५) कित्ता; पृष्ठ - १०८.

१६) कित्ता; पृष्ठ - १०९.

१७) कित्ता; पृष्ठ - ११०.

१८) कित्ता; पृष्ठ - ११०, १११.

१९)   कित्ता; पृष्ठ - ११२.

२०)   कर्वे, नि., 'हरिदीनी' लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९८५, पृष्ठ -१.

२१)   वेलकर प्रताप, उपरोक्त, पृष्ठ - ११४, ११५.

२२)   कित्ता; पृष्ठ - ८.

२३)   पटवर्धन श.,(संपा), उपरोक्त, पृष्ठ - १२.

२४)   वेलकर प्रताप, उपरोक्त, पृष्ठ - ८.

२५)   कित्ता; पृष्ठ - ९, १०.

२६)   कित्ता; पृष्ठ - २७४.

२७)   साठे स्नेहलता, 'प्रज्वलंत ' दि. ३१ जानेवारी  १९९५, पृष्ठ - ३०.

२८)   दैनिक मुंबई 'लोकमान्य' अग्रलेख १९४५

# प्रकरण दुसरे

# क्रांतिकार्य

## प्रकरण दुसरे

## क्रांतिकार्य

### २.१ प्रस्तावना :-

अर्जविनंत्यांनी इंग्रज केव्हाही हिंदुस्थान सोडून जाणार नाही व सनदशीर राजकारण करण्यास सनदच नाही म्हणून हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यास इंग्रजी राज्याच्या मुळावर घाव घालणे, सशस्त्र क्रांती हाच मार्ग हया विचारातून सावरकरांनी सन १९०० 'मित्रमेळा' हया क्रांतिकारक संस्थेची स्थापना केली. सन १९०४ मध्ये मित्रमेळयाचे 'अभिनव भारत' हया संस्थेत रुपांतर झाले. 'फ्री इंडिया सोसायटी' ही संस्थाही सावरकरांनी काढली होती. हया संस्थेच्या द्वारे सावरकरांनी हिंदुस्थानातून उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला येणाऱ्या अनेक बुध्दिमत्ता तरुणांची मने क्रांतिप्रवण केली. मॅझिनीच्या लेखांच्या अनुवादाला लिहिलेल्या दीर्घ प्रस्तावनेत व 'सत्रावनाचे स्वातंत्र्य समर'मध्ये सावरकरांनी क्रांतीची योजना, तिच्यातील संभाव्य दोष, तिच्या पराभवाची कारणे इत्यादींची चर्चा केली. Choose of Indian princes! हया सारख्या पत्रकांनी चर्चातून भाषणातून, तलवार, विहारी इत्यादी नियत कालिकांतील लेखांतून सावरकरांनी हिंदुस्थानातील सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला. त्यांच्याच क्रांतिकारक संस्थेतील सेनापती बापट व हेमचंद्र दास हयांनी रशियन क्रांतिकारकांकडून बॉंब करण्याची विदया मिळवून ती हिंदुस्थानात आणली.[१]

### २.२ प्रत्येक क्रांती हा एक प्रयोग :-

विश्वनियमानुसार क्रांती व उत्क्रांती यांचे प्रवाह अखंड व सतत वाहत असतात. कालाच्या उतरणीवरुन अकल्पनीय जोराने आपटत आपटत कोसळणाऱ्या प्रपातांना क्रांती म्हणतात व समप्रदेशावर वाहत जाणाऱ्या नदीप्रमाणे विश्ववृत्तीचे जे प्रगमनात्मक मंदौघ त्यांना उत्क्रांती म्हणतात. क्रांती व उत्क्रांती ही एकमेकांची कार्ये व कारणे होत. क्रांतीतून उत्क्रांती व उत्क्रांतीतून क्रांती. ती उत्पन्न होणे हे उत्क्रांती. क्रांतिचक्र कालचक्राच्या आरंभापासून गतिमान झाले आहे. क्रांत्या हया गणिताच्या बेरीज वजाबाकीने चालत नसतात. तर हृदयातील अवसानाच्या अतर्क्य बळाने विजय पावतात. मदनेच्या थंडपणाने थंड पडतात. तर गतीच्या उष्णतेने त्या उष्ण राहतात. संघटना चालली असता शांतता असावी, गणित करावे, थंडपणाने कालनिश्चितता ठरवावी, परंतु एकदा शीळ फुंकली गेली की मग जीव जावो अथवा

राहो, अशा मारामारीने भयंकर गर्दी उडवून दयावी. तिथे जो धरसोड करील त्याचा जीव गेलाच. तिथे उठू का नको म्हणून जो म्हणेल तो कायमचा खाली कोसळलाच.

**क्रांती म्हणजे असंतोषाचा उद्रेक :-**

हिंदुस्थानात पहिला पिस्तुलाचा बार १८९७ साली उडाला आणि त्यांनतर १९०५ पासून जे सत्र सुरु झाले, त्याची पूर्वभूमिका वाचकांच्या ध्यानात यावी म्हणून ते तात्त्विक विवेचन येथे केले आहे. मात्र, त्यावरुन प्रत्येक बॉंब प्रकरणाच्या मागे किंवा खुनाच्या मागे एकच एक स्वातंत्र्य भावना होती, असे मानण्याचे कारण नाही. कित्येक अत्याचार प्रासंगिक कारणांमुळे झाले. कित्येकांच्या मागे सूडाची प्रेरणा होती. संघटित कटातून कित्येकांचा जन्म झाला होता. तर काही निद्रिस्त हिंदी जनतेला मागे करण्यासाठी झाले. ब्रिटिश राज्य उलथून पाडण्यासाठी व स्वातंत्र्याची स्थापना करण्यासाठी क्रांतिकारकांनी कर्मकांड केले. हिंदी जनतेच्या असंतोषाचा उद्रेक ब्रिटिश राष्ट्राला कळण्यासाठी काही बॉंब टाकण्यात आले होते.[२]

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात सशस्त्रक्रांतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करुन ठेवावे, असे क्रांती संघटन कार्य गणेश, विनायक, नारायण या तीन सावरकरबंधूंनी केल्याचे इतिहासात नमून झाले आहे.

सावरकरांचे पूर्वज पेशव्यांचे सरदार असल्यामुळे पूर्वजांची शस्त्रास्त्रे धनुष्यबाण, गंजलेल्या तलवारी, जंबियो घरात पडून होती. शाळेच्या सुट्टीत घरात बाबा आणि तात्यांच्या लुटपुटीच्या लढाया चालत, दामु आण्णा जुन्या परंपरेच्या अभिमानाचे, त्यामुळे मुलांचे खेळ आस्थेने पाहात असत. मुलांना त्यांचेकडून प्रोत्साहन मिळे. शिवाजी महाराज, झाशीची राणी, वासुदेव बळवंत फडके यांच्या इतिहासाचा परिणाम त्यांचेवर झाला होता. त्यामुळे घरातच तिन्ही मुलांच्या राजकीय संसाराची वाढ झपाटयाने होत गेली. तो काळ सावरकरबंधूच्या बालपणाचा होता. सावरकरबंधूच्या अंगी उपजतच असलेल्या देशप्रेमामुळेच की काय त्यांच्या खेळाचेही स्वरुप ऐतिहासिक असे. मुले मोठी होत गेली तशी ती हातात छडया घेऊन घराबाहेरच्या झाडाझुडुपांवर त्यांना इंग्रजांची फौज समजून तलवारीचे वार करुन घायाळ करीत, शालेय जीवनात सुट्टयांच्या काळात एखादया टेकडीवरुन रात्री अपरात्री 'हरहर महादेवा'च्या गर्जना ऐकू येत. भगव्या झेंडयाच्या रक्षणासाठी लुटुपुटीची युध्दे त्या ठिकाणी चालत.

बाबा आणि तात्या शिकत होते. बाबांचे भगूर येथील शिक्षण संपत आले होते. मराठी पाचवीनंतर इंग्रजी शिक्षणासाठी दामु आण्णांनी बाबांना नाशिक येथे पाठविण्याचे ठरविले. परंतु त्या आधी त्याकाळाच्या रितीरिवाजानुसार त्यांना चतुर्भुज करायचे आण्णांनी ठरविले. सन १८९६ साली १७ व्या वर्षी त्र्यंबकेश्वरचे नानाराव फडके यांच्या पुतणीशी यशोदेशी बाबांचे लग्न झाले. त्याच पुढे येसूवहिनी म्हणून क्रांतिकारक सावरकर कुटुंबातल्या एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून नावलैकिकाला आल्या. येसू वहिनींच्या आगमनाने कुमार नारायण रावांना मातृछाया पुन्हा प्राप्त झ ाले.

लोकमान्य टिळक एकदा भाषणात म्हणाले, स्वराज्य हे एकच ध्येय समोर असावे, मग ते साध्य करण्यासाठी उपाय कोणतेही असोत, बदलत्या परिस्थितीनुरुप आपले उपाय योजावे व बदलावे. लोकमान्यांचे हे विचार सावरकरबंधूंच्या मनामध्ये खोलवर रुजले होते. कोणतीही राष्ट्रीय चळवळ सशस्त्र क्रांतीशिवाय यशस्वी होणे शक्य नाही हे सावरकर जाणून होते, आणि म्हणूनच टिळकांच्या राजकीय मुद्दयातील मख्खी ओळखून सावरकरबंधूंनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला.

सशस्त्र क्रांतीच्या याशस्वितेसाठी पुरेशी शास्त्रास्त्रे जमविणे जरुरीचे होते. आणि ते जमविण्याचे धाडस विलायतेत अध्ययन चालू असतानाही विनायक सावरकर यांनी अंगिकारले. लंडनला 'अभिनव भारत'च्या सभासदांसाठी तसेच भारतात मित्र मेळयातील सभासदांना वाटून देण्यासाठी विनायक सावरकर शस्त्रे गोळा करण्याच्या मार्गाला लागले. विलायतेत 'इंडिया हाऊस' वसतिगृहात मदनलाल ग्यानचंद वर्मा, भाई परमानंदसारखी श्रीमंताची मुले शिक्षण घेत असल्यामुळे विनायक सावरकरांना शस्त्रे खरेदी करणे शक्य  झाले. सावरकरांनी पॅरिसहून इंग्लंडमध्ये बुटांच्या पार्सलांतून पिस्तुले आणली. १९०७ वसतिगृहातल्या त्यांच्या चतुर्भुज नावाच्या आचाऱ्याने बुटांचा धंदा करतो म्हणून बूट आणले व त्यातून ती मिळविली. पुढे पेटीत झाकून सावरकरांनी त्याला वाटण्यासाठी भारतात पाठवून दिले.

**डॉ. सावरकरांचा दवाखाना क्रांतिकेंद्र :-**

डॉ. नारायणराव सावरकर वैदयकीय व्यवसायासाठी १९१७ साली आपल्या प्रिय पत्नी शांताबाई यांना घेऊन संसाराला लागणारी नवीन भांडयाची एकच ट्रंक

बरोबर घेतली होती. कारण अनेक वेळा झडत्या आणि जप्त्यात बरीच भांडी पोलिसांनी लंपास केली. ही एकच ट्रंक कशीबशी सहीसलामत सुटली होती. मुंबईला आल्यावर डॉ. सावरकरांनी ताडदेव येथे दवाखाना काढला आणि व्यवसायाला सुरुवात केली. दवाखान्याच्या उद्‌घाटनासाठी न.चि. उर्फ तात्यासाहेब केळकर यांना आमंत्रित केले. वर्षभर त्यांनी बिऱ्हाड दवाखान्यातच थाटले. पुढे ते गिरगावात सोमन बिल्डिंगमध्ये मोघे यांच्या खोलीत पोटभाडोत्री म्हणून राहण्यास आले त्यानंतर त्यांनी आपला दवाखाना जवळच असलेल्या ब्राम्हण सभेच्या बाजूला थाटला.

डॉ. सावरकरांच्या दवाखान्यात वैदयकीय व्यवसायाखेरीज इतर अनेक सामाजिक भानगडी, राजकीय उलाढालीवर चर्चा चाले. त्यात गणेश, विनायक सुटकेचा प्रश्न, व्याख्याने, सभा, प्रचार, दौरे ही सर्व कामे डॉ. सावरकर आपला दवाखाना संभाळून करीत. वेळप्रसंगी दवाखान्यासाठी रजा देत. तेथेच क्रांतिकारकांचा भेटी, बातचीत, पत्रव्यवहार, जे जे करावे लागे ते ते संकट न मानता न चिडता डॉ. सावरकर कर्तव्यबुध्दीने करीत असत. संसाराचे सुरुवातीचे सुखाचे दिवस डॉ. सावरकरांनी नि शांताबाईंनी कधीच भोगले नाहीत. नाटक, सिनेमा सोडाच, पण फिरायलाही जाणे दोघांना जमत नसे. असे दिवस त्यांनी काढले.

डॉ. सावरकारांनी येसू वहिनींनाही मुंबईला बोलावून घेतले. येसू वहिनींनी डॉ. नारायणरावांना मातेचे प्रेम दिले होते. तेव्हा त्यांना नाशिकला एकटे ठेवणे नारायणरावांना प्रशस्त वाटेना. तात्यारावांच्या पत्नी माई सावरकर त्या वेळी माहेरी गेल्या होत्या. मुंबईत आल्यावर वैदयकीय व्यवसायात मन गुंतवून आपल्या काळज्या सुटतील, असे वाटले, परंतु डॉ. सावरकरांच्या नशिबी भोगच होता. एके दिवशी घरातच उंदीर पडला. येसूवहिनी ग्रंथिज्वराने आजारी झाल्या. अशा अवस्थेत बिऱ्हाड सोडायचे कसे, शेवटी डॉ. सावरकर तेथेच राहिले व येसू वहिनींची औषध पाण्याची सोय केली. हे दिवस काढतात न काढताच तोच कोर्टाची अचानक तार आली. मोघ्यांनी मालकाचे वर्षाचे भाडे थकविले होते व स्वतः परंगदा झाले. डॉ. सावरकरांना पोटभाडोत्री म्हणून घर सोडायचा हुकूम मिळाला परंतु ते शक्य नव्हते. सरते शेवटी डॉ. सावरकरांनीच थकलेले भाडे भरले. परंतु या पोटभाडोत्री म्हणून राहायचे नाही, असे ठरवून एके दिवशी डॉ. सावरकरांनी सोमन बिल्डिंग सोडले आणि दादर येथे जावळेवाडीत राहण्यास आले व जवळच्या पाटीलवाडीतच पहिल्या

मजल्यावर दवाखाना उघडला. डॉक्टरांनी नाशिक सोडले, परंतु संकटे काही डॉक्टर सावरकरांना सोडायाला तयार नव्हती.

पण येथे आल्यावरही डॉ. सावरकरांनी वैदयकीय व्यवसायाव्यतिरिक्त समाजकाकरण, राजकारण अशा अनेक उलाढाली चालूच ठेवल्या. अस्पृश्यता निवारण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा, गणपती, शिवाजी उत्सव दौरे व्यापलेले असत. काही वेळा जेवणखाणही वेळी अवेळी करावे लागे. शांताबाईंनी 'हरिदिनी' आत्मवृत्तात डॉक्टरांच्या हालचालीविषयी सर्व काही लिहिलेले आहे. दवाखान्यात रुगणापेक्षा गरजवंतच संख्येने जास्त असत. कपाळाला आठया न घालता, न चिडता डॉ. सावरकर त्यांची गाऱ्हाणी ऐकूण घेत व मदतीचा हात पुढे करी.

डॉ. सावरकरांनी उपजीविकेचे साधन म्हणून मुंबईत येऊन गिरगावात आपला दवाखाना थाटला. तथापि, रुग्णांपेक्षा सामाजिक कार्य कर्त्यांचीच गर्दी दवाखान्यात जास्त होऊ लागली. बाबा बंदिवासात आणि तात्या रत्नागिरी येथे स्थानबध्दतेत त्यामुळे राजकीय घडामोडीच्या संदर्भात थोरल्या बंधूच्या मार्गदर्शनासाठी हे कार्यकर्ते डॉ. सावरकरांच्या औषधालयात येऊन डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत. जेव्हा सार्वजनिक कार्यकर्त्यांचीच वर्दळ औषधालयात रुग्णांपेक्षा जास्त असे, परिणामी, सरकारी गुप्तचरांची दवाखान्यात योणाऱ्या जाणाऱ्यांवर अगदी करडी नजर असे. यावर गुप्तचरांचे तर्क-वितर्क चालत. गुप्तपणे डायऱ्यांमध्ये ते सतत नोंद ठेवीत. पोलीस फाईली स्वातंत्र्योत्तर उपलब्ध झाल्यामुळे उघडकीस आले. प्रत्येक दिवशी डॉ. सावरकर कोठे होते, दवाखान्यात काय करीत होते, काय भाषणे केली, कोठे केली, हया सर्व घटनांची नोंद सविस्तरणे पोलिस फाईलमध्ये आढळून आली.

जे लोक रुग्ण म्हणून डॉ. सावरकरांच्या दवाखान्यात येत, त्यांच्यावरही हीच पाळी येत असे. डॉक्टरांना भेटावयास येणाऱ्या सर्वांना भर रस्त्यात गाठून त्यांची फसून चौकशी हे गुप्तचर करीत. अनेक प्रश्न विचारुन ते त्यांना हैराण करीत. त्यामुळे रुग्ण दवाखान्यात येण्यास कचरत असत. डॉ. सावरकरांच्या वैद्यकीय व्यवसायावर त्यामुळे वाईट परिणाम झाला. गुप्तचरांच्या त्रासामुळे रुग्णाचे येणे कमी झाले. अशा रीतीने डॉ. सावरकरांनी आर्थिक आपत्तींना अखेरपर्यंत तोंड दिले.[३]

**गुरख्यांची संघटना :-**

मुंबईत पूर्वी सर्व गिरण्या व कारखाने यांचे संरक्षण पठाण पहारेकऱ्याकडून गिरणी मालक व कारखानदार करवून घेत असत. हे पठाण मजुरांना त्यांच्या गरजेसाठी कर्जही पुरवीत असत. दामदुप्पट व्याज घेऊन मारामारी करुन ते कर्जवसुली करीत. हिंदू-मुसलमानांच्या दंग्यात खुनशी पठाणांना कामावरुन दूर करण्यासाठी डॉ. सावरकरांनी गिरगाव हिंदू महासभेच्या वतीने मुंबई आर्य समाजाचे साहाय्य घेऊन एक महत्त्वाची उपाय योजना आखली. डॉ. सावरकरांनी नेपाळच्या गुरख्यांची एक संघटना बांधली. पठाण पहारेकऱ्यांच्या जागी हिंदू गुरखे पहारेकरी नेमून भावी दंग्यातील संकट दूर केले. आज मुंबई शहरात जागोजागी बँकावर व इतर महत्त्वाच्या ऑफिसांत गुरखे पहारेकरी नेमले जातात. त्याचे बरेचसे श्रेय डॉ. नारायणराव सावरकरांना दयायला पाहिजे. योजना साकारण्यासाठी हिंदु तत्त्वनिष्ठ गिरणी मालक नारायणलाल बन्सीलाल पित्ती यांचा फार मोलाचा उपयोग झाला. हया सर्व उलाढाली दवाखान्याच्या आवारात बसूनच त्यांनी केल्या.

**हिंदू सभेची सैनिकी संघटना - रा. स्व. सेवक संघ :-**

गणेश सावरकरांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्याच प्रेरणेने हिंदूची एक सैनिकी संघटना १९२५ मध्ये डॉ. नारायणराव सावरकरांचे महाविदयालयीन मित्र डॉ. केशव बळिराम हेडगेवार यांनी नागपूर येथे स्थापन केली. किंबहुना डॉ. हेडगेवारांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघटना ही बाबारावांच्या हिंदूसभा दलाचेच पुढचे पाऊल होते. रा.स्व. सेवक संघ स्थापन झाला, त्याची शाखा मुंबईसारख्या औदयोगिक शहरात असायला पाहिजे. यासाठी डॉ. हेडगेवारांनी मुंबईला येऊन डॉ. सावरकरांच्या गिरगावातील सोमण बिल्डिंगमध्ये दवाखान्यात समविचारांच्या व्यक्तीची एक बैठक घेतली. १९३२ त्यावेळी दादाराव नाईक डॉ. वेलकर, खानविलकर, मोतीवाले, अ.ह.गद्रे, धारप ओगले माधवाश्रमांचे परशुरामपंत महाजन, गोविंदराव वर्तक इ. व्यक्ती हजर होत्या. बाबाराव सावरकरांनी हिंदू संघटनेची उपयुक्तता पटवून दिली. डॉ. हेडगेवारांनी रा. स्व. सेवक संघाचा व्यापक दृष्टिकोन सर्व उपस्थितांना समजावून सांगितला. चर्चा शंकानिरसन होऊन कार्याला सुरुवात होणार तेवढयात मुंबईला हिंदू-मुसलमानांना मोठा दंगा सुरु झाला. संबंध मुंबई शहर लष्कराच्या ताब्यात गेले. सहा महिने दंगा चालला होता. त्यामुळे ते वर्ष

वाया गेले. दंगा शमल्यावर हिंदू सभेच्या कार्यकर्त्यांनी रीतसर रा.स्व. सेवक संघाची शाखा डॉ. सावरकरांच्या औषधालयात व जवळील मोकळया जागेत सुरुवातीच्या काळात तब्बल सहा महिने चालविली होती. नंतर त्यांना गिरगावातील मारवाडी विदयालयाचे पटांगण मिळाले.[४]

**२.३ राष्ट्रभक्त समूहांतून मित्रमेळा :-**

नाशिक येथे स्थायिक झाल्यावर व सर्व काही स्थिरस्थावर झाल्यावर विनायक सावरकरांनी 'राष्ट्रभक्तसमूह' नावाची एक गुप्त संघटना आण्णा म्हसकर आणि रावजी पागे हया नाशिक रुग्णालयात काम करणाऱ्या समविचारी सहकाऱ्यांच्या सहाय्याने उभी केली. १८९९ भक्तसमूहाचे मुख्य उद्दिष्ट लोकसंग्रह व राजकीय शिक्षणाने मनःक्रांति घडवून आणणे हे होते. तिचे कार्य बाहयत धार्मिक दिसावे म्हणून मोठया धूर्ततेने त्या संस्थेचे लेखी आणि तोंडी प्रकट उपयोगाकरिता रामहरि हे सांकेतिक नाव ठरविले. परंतु सर्व थरावरची मंडळी या संघटनेत येण्यासाठी तिचा दृष्टिकोन व्यापक करावा लागला. तथापि क्रांतिकारकांच्या जहाल तत्त्वनिष्ठेशी तो पूरकच होता. पुढे १ जानेवारी १९०० ला विनायक सावरकरांनी त्या संघटनेचे नाव 'मित्रमेळा' असे ठेविले.[५]

**क्रांतिसंघटनेची पार्श्वभूमी :-**

सावरकरांचा क्रांतिवाद समजून घेण्यासाठी प्रथम क्रांतिसंघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी लक्षात घेणे जरुरीचे आहे. ब्रिटिश राजनीती सर्वप्रथम कारणीभूत झाली. सन १८९३ सालच्या जून महिन्यात उत्तर प्रदेशातील अझमगड जिल्हयामध्ये कानपुरात आणि त्याच वर्षी ऑगष्ट महिन्यात मुंबईमध्ये हिंदू मुसलमानांमध्ये भयंकर दंगे झाले. त्याची झळ सन १८९४ मध्ये पुणे शहरास पोचली. 'फोडा नि झोडा' या नीच राजनीतीचा परिणाम हिंदी प्रजेवर त्या काळी फार मोठया प्रमाणावर झाला. वातावरण आधीच तप्त झाले होते. त्यात सन १८९६ साली हया दंगेधोप्यांना जोराची चालना मिळाली. मुंबई, पुणे, नाशिक येथे प्लेगचा भयंकर कहर उसळला.

प्लेगनिवारणार्थ योजिलेल्या सरकारी ससेमिऱ्यांची त्यांनी केलेल्या अत्याचारांची वर्णने 'केसरी'तून आणि इतर वृत्तापत्रात ठळक मथळयात छापून येत. किंकाळया, प्रेते पळापळ, लूटालूट, स्त्रियांवर अत्याचार या सर्वांचा अतिरेक झाला. ग्रंथिज्वराने पिडलेली माणसे हुडकून काढण्यासाठी सोजिरे घर फोडित दिसेल ते

जाळीत. देव्हाऱ्यातील देवदेखील फेकून देत. निवारक टोळयांचा धिंगाणा जनतेस असहय झाला.[६]

**किशोर मंडाळाची स्थापना :-**

बालवयातच 'मित्रमेळया'तील थोरल्या बंधूचे राजकीय खेळ चिरंजीव नारायणाच्या बालमनावर चांगलेच बसून राहिले होते. थोरल्या बंधूच्या चालीवर आपणही मर्दुमकी गाजवावी, असे लहानपणीच त्यांना वाटले. थोडे मोठे झाल्यावर नारायणराव सावरकरांनी पूर्व सिध्दता म्हणून छोटया मुलांचे एक मित्र मंडळ जमविले. गणेश नि विनायक मित्रमेळा तर नारायणरावांचे किशोर मंडळ स्थापन झाले. वडील बंधूचा आदर्श सदैव त्यांचे समोर असे, त्यांचेच अनुकरण किशोर मंडळाने केले. 'मित्रमेळया'मध्ये ज्याप्रमाणे विनायकराव सावरकरांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचे वर्तुळ निर्माण झाले, त्याचप्रमाणे नारायणाच्या 'किशोर मंडळा'तील कार्यकर्ते निर्माण झाले.

गणेश सावरकरांनी स्थापन केलेल्या 'मित्रसमाज' हया विदयार्थी संघटनेचे कार्य चालू असताना त्यांतही अधिक सावधपणा असावा म्हणून नारायणरावांचे किशोर मंडळ ही समवयस्क बालवीरांची एक विदयार्थी संघटना त्यात अंतर्भूत केली गेली. हेतू हाच की, मित्रसमाज काय किंवा 'मित्रमेळा' काय त्यांच्या कार्यावर सरकारची कधी वक्रदृष्टी पडली तर त्यातून वाचण्यासाठी हया संघटना नसून निव्वळ नामधारी संस्था प्रत्यक्षात हे केवळ हया संघटना नसून निव्वळ नामधारी संस्था, प्रत्यक्षात हे केवळ लहान मुलांनी विदयार्थ्यांनी चालविलेले 'किशोर मंडळ' आहे एवढेच.

ज्याप्रमाणे विनायक सावरकर 'मित्रमेळया'चे मार्गदर्शक होते. त्याप्रमाणे नारायण हे 'किशोर मंडळा'चे मार्गदर्शक नेते होते. ते फक्त त्या वेळी १३ वर्षाचे होते. लहान मुलांना नारायणरावांचा आधार वाटे. नारायणरावांचे श्री.र.वर्तक कृ ब. महाबळ, केतकर बंधू कृ.गो.द कर्वे, वैशंपायन इ. बालमित्र त्यावेळी होते. नारायणराव सावरकरांनी त्यांच्या वयाची मुले सभासद करुन घ्यावी, त्यांच्या सप्ताहिक बैठकी कराव्या, त्याने बौध्दिक विषय घेऊन व्याख्याने घ्यावीत, व्यायामाचे कसरतीचे वगैरे नियम घालून ते पाळावेत आणि लहानपणापासूनच देशभक्तीच

नव्हे, तर देशवीरत्वाचीही ज्योत पेटवावी, अशा पध्दतीने 'किशोर मंडळाचे' कार्य सुरु झाले.

गणेश सावरकरांचे 'किशोर मंडळा'ला मार्गदर्शन असे. सभासदांतील विदयाव्यासंगास लोकमान्यांचे गणपती उत्सव व शिवजयंती उत्सव यांची चालना मिळे. विनायक सावरकरांनी रचलेले सिंहगड व बाजीप्रभूवरील पोवाडे व स्वातंत्र्य शहीद कवि गोविंदाचा अफझलखानाच्या वधावरील पोवाडा, स्वातंत्र्याचा पाळाणा शिवाजी मावळे संवाद, रणाविण स्वातंत्र्य कोण मिळाले इ. त्यांची पदे त्या उत्सवप्रसंगी म्हटली जात. नारायण सावरकर व दत्तू केतकर यांचा पोवाडे गायनात प्रामुख्याने भाग असे. गोविंद कवीच्या स्वातंत्र्य गीतांनी व विनायक सावरकरांच्या पोवाडयांनी त्याकाळी सर्व महाराष्ट्र दुमदुमून गेला. खुल्या मैदानात डोंगर उतरणीवर गणेश आणि विनायक याच्या 'मित्रमेळया'तील बालमित्रांबरोबर रात्री अपरात्री लुटुपुटीच्या लढाया चालत. त्या किशोराच्या मनावर चांगल्याच ठसून राहिल्या होत्या.[७]

**किशोर मंडळाच्या लुटपुटूच्या लढाया :-**

नारायणराव सावरकरांचे बालमित्र महाबळ पुढे लिहितात, 'नाशिकला आम्ही तालमीत जात असू. तेथे रंगोपंत कुलकर्णी मधून मधून शिकविण्यात येत असत. मल्लखांब, कुस्ती, लाठी फरीदका, पट्टा हे विषय घडविण्याकडे विशेष लक्ष पुरविले जाई. म्हसरुळ रस्त्यावरील ठकरीच्या मैदानात किंवा डोंगर उतारणीवर रात्री १० नंतर आम्ही दोन संघ करुन निरनिराळया ठिकाणी आपआपले निशण रोवून ठेवून त्यांच्या रक्षणार्थ मंडळी ठेवून, दुसऱ्यांचे निशाण ताब्यात घेण्याचा प्रयत्न प्रत्येक संघाने करीत असू. बऱ्याच वेळा निशाण रक्षणाचे काम मी व बाळ यांजकडे आलेले असे. कधी कधी जोडीने हल्ला करणारे ही आम्ही असू.'

नारायणराव सावरकरांना 'किशोर मंडळ' स्थापना झाल्यापासून आपल्या मित्रांना आव्हान करण्याची कलाही चांगली अवगत झाली होती. एके वर्षी दसरा उत्सवाला नाना फडणीसावर नारायण सावरकरांनी आपला निबंध न वाचता 'किशोर मंडळा'पुढे भाषणाच्या स्वरुपात इतका उत्कृष्टपणे मांडला की, तात्यारावांनी त्यांची पाठच थोपटली, म्हणाले, 'तू उत्तम वक्ता होशील'. एकदा किशोरांच्या सभेत बोलताना नारायण सावरकर म्हणाले, 'माझ्या लाडक्या बालमित्रांनो' स्वातंत्र्यसूर्य

क्षितिजावर येऊ लागल्यामुळे तुमच्याबरोबर चिमणे बुलबुल पक्षी गाणी गात गात त्याला आता सामोरे जाऊ लागले आहेत'.[८]

**अभिनव भारत :-**

नारायणराव सावरकरांनी राजकीय क्रांतिकार्यास किशोरांच्या संघटनेतून प्रारंभ केला. विनायकरावांच्या, गणेशरावांच्या मार्गदर्शनानुसार नारायणरावांनी सवंगडयावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप बसविली होती. त्यामुळे किशोरांच्या राजकीय धार्मिक संस्कारांची आणि क्रियेची वाढ झपाटयाने होत गेली, व 'मित्रमेळया'तील वरिष्ठांच्या धोरणाला अतिशय पूरक ठरली. अधिक क्रांतिप्रवण झाली. 'मित्रमेळया'ची गुप्त शाखा म्हणून क्रांतिकारी 'अभिनव भारत' ही संघटना त्यानंतर अस्तित्वात आली. 'मित्रमेळा' व 'अभिनव भारत' अशा दोन संघटना पुढे कार्यरत झाल्या 'मित्रमेळया'तली बहुतेक मंडळी गुप्त शपथा घेऊनच संघटनेत प्रविष्ट झालेली असल्यामुळे 'अभिनव भारत' हीच एक गुप्त संघटना पुढे वृध्दिंगत होत गेली.'[९]

गणेश दामोदर सावरकर ऊर्फ बाबाराव सावरकरांचा जन्म नाशिकजवळ भगूर या गावी झाला. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे हे ज्येष्ठ बंधू, सर्वार्थाने विनायक सावरकर यांना गणेश सावरकरांची घडविले असे म्हटले म्हणजे त्यांचे कार्य समजून येते. १८९९ मध्ये 'राष्ट्रभक्त समूह', १९०० मध्ये 'मित्रमेळा' व १९०४ मध्ये 'अभिनव भारत' असे गुप्त संघटनेचे नामकरण झाले.

**वंदे् मातरम् खटला :-**

२७ सप्टे. १९०६ रोजी दसरा मिरवणुकीत 'वंदे् मातरम्' गाण्यावर सरकारने बंदी हूकूम बजावला. नशातच पोलिसांची झटापट झाली. कालिकेच्या देवालयाकडून परत येत असताना वाटेत सरकारी क्लब व अधिकाऱ्यांची निवासस्थाने असल्यामुळे कोणीही राष्ट्रीय घोषणा करु नये, असा मनाई हुकूम असतानाही नारायणराव सावरकरांनी व गणेश सावरकरांनी 'मित्रमेळया'तील सहकाऱ्यांच्या समवेत रस्त्यावर वंदे् मातरम् म्हटले.

यामध्ये १) बाबासाहेब खरे २) गणेश दा. सावरकर ३) वामनशास्त्री ४) केशवशास्त्री ५) रामचंद्र केशव दातार ६) सखाराम दादाजी गोरे ७) खुशालसिंह ८) महादेव बळवंत गाडगीळ ९) नरहर दादाजी केतकर १०) काशीनाथ नारायण केतकर ११)

नारायण दामोदर सावरकर १२) श्रीधर रघुनाथ वर्तक हे प्रमुख होते. हा खटला 'वंदे् मातरम्' खटला या नावाने चालला. तो नाशिक जिल्हयात दूर गावी चाले. खटला संपला की संध्याकाळी या खटल्यातले आरोपी गावात फिरुन स्वातंत्र्य लालसा चेतविण्याचा स्वदेशी, बहिष्काराचा प्रचार करीत असत.

मुंबईमध्ये शीव (सायन) भागात खिमजी असुरवीरजी यांच्या बंगल्यात 'अभिनव भारत' या गुप्त बैठका होत असत. वीर वामनराव जोशी, बाबासो खापर्डे, पृथ्वीराज व्यास, सदाशिवराव बल्हाळ हे हजर होते. तसेच १९०४ साली केशवराव भागवंताच्या वाडयात, तर १९०५ साली कोठूर येथे बैठक झाली. १९०७ च्या सुरत च्या काँग्रेस अधिवेशनाला वामनराव खरे, विष्णू महादेव भट हेही हजर होते. त्यांनी कलकत्याच्या अनुशिलन समिती, स्वाधीन भारत व अन्य क्रांतिकारकांच्या संघटनाशी संधान वाढविले. सुरतच्या अधिवेशनात निरनिराळया प्रांतातील क्रांतिकारकांनी भेटून विचारविनिमय केला. यात बाबू अरविंद घोष, बारींद्रकुमार तसेच मद्रासचे चिदंबरम पिल्ले हे होते.

स्वा. सावरकर १९०६ मध्ये शामजी कृष्ण वर्मा यांची शिवाजी शिष्यवृत्ती घेऊन इंग्लंडला गेले. हरि अनंत थत्ते हे त्यावेळी 'अभिनव भारत'चे नेतृत्व करत होते. कृष्णाजी गोपाळ खरे, कुंदनमल फिरोदिया मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे अध्यक्ष हे 'अभिनव भारत'च्या सदस्यांच्या निष्ठेची परीक्षा घेत असत. गणपतराव जोगळेकर व काका कालेलकर यांच्यावर रात्रीच्या वेळी वेष बदलून हल्ला करण्यास लावून परीक्षा घेतली जायची. ठिकाण असायचे फर्ग्युसन कॉलेजची टेकडी, पुणे 'अभिनव भारत'च्या सदस्यांनी (कृ.गो.खरे) बॉम्ब तयार करण्यासाठी वसई येथे जाऊन १९०९ मध्ये बॉम्बचा कारखाना सुरु केला, तर स्वतः विनायक सावरकर लंडनच्या 'इंडिया हाऊस'मध्ये संघटन करीत होते. भारतात रेल्वे, पोष्ट, हायकोर्ट, याचिकालय, टेलिफोन, हवामान, हाफकीन, कस्टम अशा प्रत्येक खात्यातून 'अभिनव भारत'चे सदस्य नोकरीत शिरुन सरकारी हालचालीवर नजर ठेवून होते. संस्थेच्या शपथबध्द सदस्यांना साप्ताहिक बैठकीत ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक, सामाजिक विषय, व्याख्यात, चर्चा, विचारविनिमय करुन दिले जात असे. 'अभिनव भारत'च्या सभासद निवडीत उच्च-नीच, जात-पात, धर्म, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद नसे. सभासद हा सुदृढ, काटक असावा. यासाठी तालीम, पोहणे, डोंगरात धावणे तर

लष्करी शिक्षणात नेमबाजी हत्यार चालविणे, शिकविले जायचे खोटी लढाई खेळली जायची.

बॉम्ब तयार करण्यात कृ.गो. खरे, रामभाऊ भाटे, गोपाळराव पाटणकर, वरुळेभर, काकासो पाटील असे आघाडीवर होते. यात गुप्तता रहावी म्हणून वसई येथून पापडी पाणजू येथे कारखाना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आला. बाबारावांच्या सांगण्यानुसार विठ्ठल बाळकृष्ण जोशी यांनी ग्वाल्हेर येथून पिस्तुले आणली. बडोदे, इंदूर हैद्राबाद, औरंगाबाद येथून फेब्रुवारी १९०९ मध्ये विनायकराव तिखे यांनी पिस्तुलांसाठी प्रयत्न केले. लंडनहून वीस पिस्तुले चतुर्भुज याने आणली. याचा हृदय परिणाम म्हणजे नाशिकचा कलेक्टर जॅक्शन याचा वध 'अभिनव भारत'च्या अनंत कान्हेरे, कृष्णा कर्वे, विनायक देशपांडे यांनी दि. २१ डिसेंबर १९०९ रोजी केला. या जॅक्शन वधाच्या खटल्यात खालीलप्रमाणे शिक्षा सुनावण्यात आल्या. फाशी - अनंत कान्हेरे २) कृष्णाजी गोपाळ (आण्णा) कर्वे ३) विनायकराव देशपांडे

गणेश सावरकरांच्या घराची झडती घेण्यात आली, तेव्हा बॉम्बच्या कृतीची पुस्तिका सरकारला मिळाली. ८ जून १९०९ गणेश सावरकरांना जन्मठेप झाली.

**२.४ जन्मठेप :-**

१) बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर - २ जन्मठेपा ५० वर्षे काळेपाणी

२) शंकर रामचंद्र सामण - २५ वर्षे जन्मठेप काळेपाणी

३) वामन नारायण जोशी - २५ वर्षे जन्मठेप काळेपाणी

४) केशव श्रीपाद चांदवडकर - १५ वर्षे

५) त्रिंबक गंगाधर मराठे - १० वर्षे

६) कृष्णाजी गोपाळ खरे - १० वर्षे

७) गोपाळ कृष्ण पाटणकर - ६ वर्षे

८) परशुराम पाटणकर - ७ वर्षे

**५ वर्षे सक्तमजुरी :-** १) विष्णु महादेव भट २) पुरुषोत्तम लक्ष्मण दांडेकर ३) सखाराम दादाजी गोरे ४) दामोदर महादेव चंद्रागे ५) गोपाळ गोविंद धारण ६) दांडेकर पुरुषोत्तम लक्ष्मण.

**३ वर्षे सक्तमजुरी :-** १) विष्णू गणेश केळकर २) अनंत विष्णू कोतकर ३) पुरुषोत्तम वामन गोखले ४) काशीनाथ विष्णू टोणपे ५) विश्वास बळवंत डावरे

**२ वर्षे सक्तमजुरी :-** १) विनायक गोविंद निळे २) सखाराम रघुनाथ काशिकर ३) बळवंत रामचंद्र बर्वे ४) जोशी दत्तात्रय पांडुरंग

**६ महिने सक्तमजुरी :-** १) विनायक वासुदेव मनोहर २) रघुनाथ चिंतामण आंबेडकर ३) सदानंद रुपचंद ४) नारायण दामोदर सावरकर

अकरा आरोपीना निर्दोष सोडण्यात आले. गणेश सावरकरांना 'वंदे् मातरम्' खटल्यात काय शिक्षा झाली?

**कवी गोविंदाच्या पदयाचे प्रकाशन :-** २८ फेब्रु. १९०९ रोजी अभियोग दाखल झाला. या खटल्यात गणेश सावरकरानां जन्मठेप, काळयापाण्याची शिक्षा झाली. एप्रिल १९०९ मध्ये त्यांना अंदमानात पोहचविण्यात आले.

धनाप्पा शिदरप्पा वाळवे यांना राजद्रोही मजकूर प्रसिध्द केला म्हणून ६ महिने शिक्षा झाली. विठ्ठल बाळकृष्ण जोशी, महादेव बळवंत गाडगीळ यांना पिस्तुल बाळगले बद्दल ६ महिने, बाळकृष्ण जनार्दन मराठे ४ महिने, त्रिंबक गोविंद देशपांडे ३२ महिने अशा शिक्षा झाल्या.

सातारा, कोल्हापूर, औंध, ग्वाल्हेर येथेही काही क्रांतिकारक पकडले गेले. त्यांना शिक्षा झाल्या, १९१० साली म.वा.हिंगे व इंगळे, औंध डॉ. बा.वि आठल्ये, सातारा यांना ५ ते ३ ॥ वर्षे शिक्षा झाल्या.'[१०]

**२.५ अभिनव भारत-क्रांतिकारकांचे स्मारक-मंदिर :-**

"परतंत्र राष्ट्र एकदा स्वातंत्र्याच्या तीर्थास जाण्याच्या निश्चयाने यात्रेला निघाले म्हणजे त्या यात्रेच्या मार्गावर त्याला अनेक टप्पे लागतात. प्रकटपणे प्रचलित राजसत्तेच्या निर्बंधाप्रमाणे जनतेला जागृत करणे, परसत्तेच्या हातून किती अन्याय होत आहेत नि किती न्याय होत नाहीत याची सतत जाणीव उत्पन्न करुन जनतेत असंतोष निर्माण करणे; असंतुष्ट झालेल्या जनतेतून, कधी कधी, उघडपणे, अन्याय्य निर्बंधाचा भंग करविणे, सरकार, त्यांचे हस्तक पोलीस, त्यांना बांधलेल्या बंदिशाळा त्याच्या संबंधीची भीती जनमानातून काढून टाकून, जनमताला निर्भय बनवीत नेणें, या सर्व प्राथमिक गोष्टी नैर्बंधिक (सनदशीर) चळवळींत समाविष्ट होतात. परंतु स्वातंत्र्यप्राप्ती हे इतके दुःसाध्य ध्येय आहे की, या नैर्बंधिक चवळवळीने जनतेत निर्माण केलेले बल हे अल्पबलांइतकेच कामी येते. त्या बलामुळे पारतंत्र्य लादणारी सत्ता दुर्बल होत नाही. तिच्या पाशवी बलाचा अहंकार यत्किंचितही कमी होत नाही.

आणि तरीही जनमनांतील असंतोषाचा अग्नी चेततच असतो. पारतंत्र्य लादणाऱ्या सत्तेविषयींची नावड, द्वेषाचे उग्र स्वरुप धारण करीत असते. अन्यायांचा, अपमानांचा विरोध करण्याची इच्छा अनावर होऊ लागते अणि तरीही संघटित शिस्त्शाली पसरलेल्या पाशवी सामर्थ्यापुढे असंघटित, बेशिस्त जनतेच्या एकेकटया शरीरांतील प्रतिकार नि बल, निष्प्रभ नि हतबल होऊन जाते.

स्वातंत्र्यतीर्थाच्या यात्रेच्या पथावरील हा पहिला टप्पा असतो. नैर्बंधिक (सनदशीर) चळवळीचे सर्व प्रकार उजळल्यावरही ती असफल होत असल्याचे पाहून परतंत्र जनतेतील तरुण ह्दये अधीर होतात. तारुण्य हे स्फूर्तीचे, साहसाचे बलाच्या आविष्काराचे पुण्यतीर्थ! अशी तरुण हृदये, ज्यावेळी स्वातंत्र्य पथावरील या नैर्बंधिक चळवळीची अवस्था एखादया एरंडाच्या गुऱ्हाळाप्रमाणे 'ना रस ना ऊस' अशी झालेली पाहतात. स्वातंत्र्याचा पुढील मार्ग रुध्द झालेला त्यांना जेव्हा दिसतो, त्यावेळी गुप्त चळवळीची कवाड, ही तरुण पिढी, गुप्त रीतीने उघडू लागते. जर सत्य जनतेला उघडपणे सांगता येत नाही. परसत्तेचे पाशवी बल मोडून काढावयास जे प्रयत्न उघडपणे करता येत नाहीत, तर स्वातंत्र्यतीर्थाला अचूकपणे नेणाऱ्या क्रांतीचे सत्य नि परसत्तेच्या पाशवी बलाला मोडून काढावयास करावयाचे यत्न अपरिहार्यपणे गुप्त रीतीने चालू होतात. परतंत्र देशाची स्वातंत्र्याकडे जाण्याची ही दुसरी संज्ञाच्या सिध्दतेची पायरी. क्रांती शिकविण्याऱ्या नि क्रांतीच्या महायात्रा करणाऱ्या 'गुप्त संस्था' निर्माण होतात. ही गुप्तता निषिध्द नाही. पापमूलक नाही. कारण की परहरणाकरिता, परवंचनेकरिता नव्हे, तर अपरिहार्य म्हणून स्वतःच्या उध्दाराकरिता संपादनाकरिता अंगीकारलेली असते आणि म्हणून ती पावनच असते.

परंतु, या पावन गुप्त संस्थेमध्ये दाखल होणे हे अति बिकट काम असते. या संस्थेच्या प्रवेश द्वारावरच सर्व तऱ्हेचे मोह, वासना, कामनींचा मोह या प्रवेशद्वारीच निपटून टाकावा लागतो. स्वकीयांचे प्रेमबंधन येथेच तोडून टाकावे लागते. उघड चळवळीमध्ये स्फुरण देणाऱ्या लोकप्रियतेच्या टाळया, फुलांच्या माळा नि कीर्तीचा हव्यास येथेच सोडून घ्यावा लागतो. निर्बंध निस्संग बनूनच क्रांतीच्या प्रत्येक उपासकाला, या गुप्त संस्थेमध्ये प्रवेश करणाऱ्या उपासकाला, आपले वैयक्तिक धैर्य, निष्ठा, साहस ही उघड चळवळीत काम करणाऱ्या पुढाऱ्यांपेक्षाही अनेक पटींनी वाढवावी लागतात. मनुष्याच्या अंगी दोन प्रकाराचे धैर्य असते. एक वैयक्तिक नि

दुसरे सामुदायिक वैयक्तिक धैर्य ते की, मनुष्य एकाकी असताना देखील, जे त्याच्या अंगी असेल ते आणि सामुदायिक धैर्य वैयक्तिक धैर्यापेक्षा अनेक पटींनी मोठे असते. एकाकी असते. एखादया साध्या शिपायाने देखील दटावताच जो मनुष्य भयभीत होतो, तोच मनुष्य सहस्त्रावधी लोकांच्या विराट सभेत प्रत्यक्ष व्हॉइसरॉयला देखील आव्हान देऊ शकतो. चरंगदल बलवान ब्रिटिश सरकारला देखील ' क्विट इंडिया ' म्हणून आज्ञा पिण्यास सज्ज होतो. परंतु गुप्तसंस्थेतील क्रांतीच्या उपासकाला सदस्य किंवा शत तर काय परंतु दशकांचासुध्दा पाठिंबा नसतो. आणि तरीही हे त्या क्रांतिदूताचे असामान्य धैर्य त्याच्या स्वतःच्या हृदयांतच उसळलेले असते. असणेपणाचा त्यात लवलेशही नसतो. आणि म्हणूनच क्रांतिदेवीच्या मंदिराप्रमाणे असणाऱ्या गुप्त संस्थेत, उपासना करण्याचे धाडस करणारे फारच अल्पसंख्य असतात. ' मनुष्याणा सहस्त्रेषु ' एखादा उपासना करण्याचा यत्न करतो नि त्या ' यततासपि सिध्दानांम थोडेच अत्तापर्यंत टिकून राहतात.[११]

इतिहासाच्या या सर्वसाधारण नियमाप्रमाणे आपल्या या प्रिय भारताच्या स्वातंत्र्ययात्रेत देखील हा भीषण भव्य क्रांती मार्ग संस्थापन करणारे क्रांतिवीर निघाले, हे आपले केवढे भाग्य. एकोणिसाव्या शतकातील अंतदशकापासून या क्रांतिकारक विचारांचा झंझावत प्रमुखतः महाराष्ट्रातील सहयाद्रीच्या पठारावर घोंगावू लागला. क्रांतिप्रिय तरुणांच्या हृदयांत दिव्य क्रांतीची स्फूर्ती जागृत झाली. हुतात्मे चाफेकर, रानडे, यांनी आत्माहुत्या दिल्या, परंतु या क्रांतीला बलिष्ठ करण्यास आवश्यक असलेल्या गुप्त संस्थेचा संघटित प्रयत्न, एकोणिसाव्या शतकाच्या अंतापर्यंत झाला नव्हता. चाफेकर, रानडयांच्या आत्माहुतीतून स्फूर्त झालेल्या चैतन्याने नाशिक जिल्हयांत भगूर या गावी एका बालतरुण हृदयांत अकस्मात एक प्रज्वलित दीप लागला. तत्क्षणी त्या बालतरुणाच्या पुण्य गृहांत गृहदेवता म्हणून नांदणाऱ्या शक्तिदेवी भवानीच्या समोर जाऊन त्या तरुणाने स्वातंत्र्य संपादनाची शपथ घेऊन स्वातंत्र्य संपादनार्थ एक 'नवरात्र' बसवली. तेव्हापासून ती नवरात्र तेथे चालू झाली. तो तरुण त्या क्रांतिविचारांचे पलिते पेटवून देशदेशांतरी नी द्विपद्विपांतरी भारतीय तरुणाची हृदये पेटवीत त्या क्रांति नवरात्रीचा प्रसार केला. भारताच्या २५ सहस्त्र चौरस मौलांचा भूभाग, स्वतंत्रता देवीच्या जयजयकाराने

उद्घोषित करुन 'विजयादशमी' चा पहिला प्रहर साजरा केला. तोच पुन्हा यज्ञ तो ध्वस्त झाला. तो पुनः प्रज्वलित होऊन संपूर्ण विजयादशमी साजरी करण्याकरिता.

ती पुण्यभूमी म्हणजे 'अभिनव भारता'च्या स्वातंत्र्यगंगेची, गंगोत्री, स्वातंत्र्यगोदेचे गंगाद्वार, जनस्थान, एक दिवस असा येईल की, स्वतंत्र भारतांतील सर्व नागरिक या पुण्यक्रांतीच्या उगमस्थानाचे दर्शन घेण्यास यात्रा करतील. स्वतंत्र भारताचा लोकनियुक्त अध्यक्ष त्या आदयक्रांतिसदनाचे दर्शन घेण्यास यात्रा करेल. स्वतंत्र भारताचा लोकनियुक्त अध्यक्ष त्या आदयक्रांतिसदनांचे दर्शन घेण्यास बध्दहस्ताने येईल नि नम्र मस्तकाने प्रणाम करील.

कै. धोंरभट विश्वामित्र्यांचे घर सांप्रत श्री महाजन यांच्याकडे आहे. त्यांच्यापासून ते १२ सहस्य रुपयांना विकत घेण्यांचे निश्चित होऊन १ सहस्त्राचा विसार भरुन सौदा झाला आहे श्री. महाराजनांनी उदारपणानेच हा सौदा मान्य केला आहे. तरी ठिकठिकाणच्या 'अभिनव भरता'च्या उपासकांनी यातील तितके अधिकात अधिक द्रव्य तातडीने 'अभिनव भारत' प्रसारक मंदिर मंडळाचे प्रमुख कार्यवपाह श्री. र. वर्तक, बी. ए., एलएल. बी. वकील हिंदुसभा कार्यालय, नाशिक, या पत्त्यावर पाठवून द्यावे. नि ११ सहस्त्र रुपये प्रथम पुरे करुन, ते विश्व मित्रांचे घर कराराप्रमाणे स्वाधीन करुन घेण्यास साहाय्य करावे. हे पावन घर एकदा आपले झाले म्हणजे मग त्यांचे भव्यमंदिर नि स्मारक योजना करण्याचे कार्य, मागाहून हळूहळू पूर्ण करता येईल, तरी आता सर्वांनी द्रव्य जमवून पाठविण्याची त्वरा करावी."

**नाशिक कट :-**

हया खटल्यांतील पुराव्यावरुन असे सिध्द होते की १९०६ च्या पूर्वी नाशिक येथे गणेश व विनायक सावरकर हयांच्या नेतृत्वाखाली एक तरुणांचे, बहुतेक ब्राम्हण तरुणांचे मंडळ स्थापन झालेले होते. 'मित्रमेळा' असे हया मंडळाचे नांव होते. दखखनमध्ये अशींच कांही मंडळे स्थापन झाल्याचा उल्लेख आलेला आहे. त्या मंडळांची वैशिष्टये नाशिकच्या 'मित्रमेळा' हया मंडळांत होती. गणपती आणि शिवाजी उत्सवासाठी प्रक्षोभक गाणी तयार करण्यात येत असत. 'मित्र मंडळा'चे सभासद ही गाणी गात मिरवणुकीने जात असत, किंवा एखाद्या देवळाच्या आवारात किंवा दुसऱ्या एखाद्या सभास्थानी जमून ही गाणी गात असत.

हया खटल्यांतील एक साक्षीदार हया मंडळाच्या सभासदांना व्यायामाचे शिक्षण देत असे, हया कामासाठी बडोद्याहून एक मुसलमान इसमही आणला होता आणि तोही हे शिक्षण देत असे. पण हया मंडळाचे काम काही एवढयावरच थांबलेले नव्हते. गणेश सावरकर आणि मंडळाचे एक गीत-लेखक आबा दरेकर हयांच्या घरी बैठकी होत आणि देशभक्त क्रांतिकारकांच्या, विशेषतः मॅझिनी, शिवाजी, व रामदास हयांच्या चरित्रांची पारायणे होत असत, आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी कोणते उपाय योजायचे हयाविषयीं चर्चा होत असे असा पुरावा आमच्यापुढे आहे आणि तो आम्ही ग्राहय मानतो. व्याख्याने, पुस्तके आणि गाणी हयांच्या द्वारा लोकजागृति करायची आणि शस्त्रे व दारुगोळा जमवून ब्रिटिशविरोधी उठावाची तयारी करायची हया मार्गांवर हया बैठकीतून भर दिला जात असे.

**फोटोचा पुरावा :-**

विनायक आणि नारायण सावरकर व महादेव भट हयांनी केलेल्या प्रक्षोभक भाषणांची उदाहरणे समोर आहेत. 'मित्र मेळा'च्या कित्येक सभासदांचा विनायक सावरकर हयांच्या बरोबर काढलेला फोटो आहे. हया फोटोतले काहीजण आरोपींमध्ये आहेत. शिवाजीची चार किंवा पांच चित्रे, 'वंदे मातरम्' असे लिहिलेला एक फळा व मुखपृष्ठावर मॅझिनी असे नांव लिहिलेले एक पुस्तक हया फोटोत ठळकपणे दिसत आहे. साक्षीदारांनी मंडळाचे मार्ग आणि उद्देश हयांचे वर्णन दिले आहे, इंडिया हाऊसचे संस्थापक शामजी कृष्ण वर्मा हयांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे सावरकर १९०६ च्या जूनच्या मध्याला इंग्लंडला जाणार असल्यामुळे हा फोटो घेण्यात आला होता. परदेशी जाईपर्यंत विनायक सावरकर हे मित्र मेळाच्या, सर्वांत जास्त कार्यमग्न सभासदांपैकी एक आणि बहुधा सर्वांत जास्त स्फूर्तिदायक सभासद होते. १९०६ च्या सुरवातीला त्यांनी पुणे व नाशिक येथे व्याख्याने दिली होती. स्वातंत्र्य भावना उद्दिपित करणे, देशाच्या परकीय राज्यकर्त्याविरुध्द द्वेष भडकवणे आणि बौध्दिक शिक्षण व व्यायाम हयांच्या योगे यशस्वी बंडाची तयारी कशी करता येईल हे सांगणे हा हया व्याख्यानांचा हेतू होता.

**२.६ अभिनव भारत :-**

विनायक सावरकर हयांच्या जाण्याच्या पूर्वी 'मित्र मेळा'चे रुपांतर अभिनव भारतमध्ये किंवा 'यंग इंडिया सोसायटी'मध्ये झाले होते किंवा त्याने हया संस्थेला

जन्म दिला होता. मॅझिनीच्या 'यंग इटॅली' हया नांवावरुन हया संस्थेचे नांव ठेवण्यात आले होते असे फिर्यादी पक्षाचे म्हणणे आहे.

युध्दासाठीं तयार होणे हा हया सभासदांचा हेतू होता. पुरावा नं. ९ ब हा १९०९ मध्ये काशीकरांकडे मिळाला होता. त्यांत मंडळाचे उद्देश सांगितलेले आहेत. साक्षीदारांनी हया बाबत जी साक्ष दिली आहे तिचा पडताळा हया पुराव्यावरुन येतो.

"लघु अभिनव भारत माला" हया नांवाची, मंडळाच्या सभासदांनी रचलेल्या गीतांची पुस्तके मुंबई व सोलापूर येथे छापण्यात आणि प्रकाशित करण्यात आली होती. ही पुस्तके जरी अतिशय प्रक्षोभक स्वरुपाची असली तरी बराच काळ खुलेपणाने विकली जात होती. हया मालेतील आधीच्या चार पुस्तकांच्या प्रकाशकाने सांगितले आहे की, १९०६ मध्ये इंग्लंडला जाण्यापूर्वी विनायक हयांनी त्याला हक्क विकले होते. त्या वर्षी सप्टेंबरमध्ये पाच हजार प्रतींची आवृत्ती प्रसिध्द करण्यात आली होती.

हया प्रकाशन मालेतील आठ व नऊ हीं पुष्पे गणेश सावरकर हयांची हांती. आणि त्यांत त्यांनी ब्रिटिशांविरुध्द युध्द करण्याची स्पष्ट चिथावणी दिली होती. हयामुळे गणेश सावरकर हयांना २८ फेब्रुवारी १९०९ रोजी अटक करण्यात आली आणि नंतर त्यांना मुंबईत ब्राउनिंग पिस्तुले ताब्यात घेण्यासंबंधी व्यवस्था केली होती. ही पिस्तुले मूळ नाशिकला जायची होती.

'अभिनव भारत' सोसायटीच्या आतल्या कार्यपध्दतीबद्दल ज्या साक्षीदारांनी माहिती सांगितली, त्या सर्वांनी सभासदांना शपथा घ्याव्या लागत असल्याचे सांगितले. हया मंडळाबाबत पोलिसांना संशय आला होता असे दिसते. पण मंडळाच्या कामाविषयी इतकी गुप्तता राखण्यात आलेली होती की, २१ डिसेंबर १९०९ रोजी जॅक्सन हयांचा खून होईपर्यंत हया मंडळाबाबत कांही कारवाई करण्यात आली नव्हती. १९०९ मध्ये गणेश सावरकर हयांना अटक झाल्यानंतर आरोपी काशीकर हयांच्याकडे काही कागदपत्रे मिळाली होती, त्यावरुन असे दिसून येते की, रशियातल्या क्रांतिकारक मंडळाच्या धर्तीवर हया मंडळाला संघटना बांधायची होती.

**कोणाची कोणाला माहिती नाही :-**

गणेश सावरकर हयांच्या घराची त्याच सुमाराला झडती घेण्यात आली असता "फॉर्स्टस् सिक्रेट सोसायटीज् ऑफ दी युरोपियन रेव्होल्यूशन १७७६-१८७६" हे

पुस्तक मिळाले होते. रशियन निहिलिस्टांच्या संघटनेची माहिती हया पुस्तकात दिलेली आहे. निरनिराळे गट कामांत भाग घेत, पण एका गटांतल्या माणसाला फक्त त्या गटांतली माणसेच तेवढी माहीत असत, अशा प्रकारची ही संघटना होती. हे लक्षात घेतले म्हणजे हया खटल्यातील तरुणांचे गट एकाच उद्दिष्टांसाठी काम करीत असले आणि त्यांना शस्त्रे एकाच ठिकाणाहून मिळाली असली तरी इतर गटांतल्या माणसांशी त्यांची ओळख देखील नव्हती हया गोष्टीची उकल होईल.

असे दिसते की, सहकाऱ्यांच्या शिक्षणासाठी मॅझिनीच्या इंग्रजी चरित्राचा उपयोग करण्यात येत असे, पण विनायक हयांना ते पुरेसे वाटत नव्हते, म्हणून इंग्लंडला जाण्याच्या सुमाराला किंवा गेल्यानंतर लवकरच विनायकांनी मॅझिनीच्या अल्पचरित्राचे मराठी रुपांतर तयार करण्याचे व त्याला त्या इटालियनाच्या राजकीय विचारसरणीची ओळख लिहिण्याचे काम हाती घेतले. इंग्लंडला पोचल्यावर हे काम पुरे करायला विनायकांनी फार वेळ घेतला नाही. प्रकाशनासाठी त्यांनी ते हिंदुस्थानात पाठवून दिले आणि गणेश सावरकर हयांच्या मार्फत ते पुण्याच्या छापखान्यातून प्रसिध्द करण्यात आले. १९०६ च्या डिसेंबर महिन्यात छपाईची ऑर्डर देण्यात आली आणि दोन हजार प्रतींची आवृत्ती १९०७ च्या एप्रिलमध्ये तयार झाली.

राजकारण धर्माच्या पातळीवर नेले पाहिजे हयावर ओळखमध्ये भर देण्यात आला आहे आणि शिवाजीच्या काळांतील महाराष्ट्राचे संत रामदास हयांच्या ठायीही मॅझिनीसारखाच पण निराळया रुपाने आध्यात्मिक आशय होता असा युक्तिवाद करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मॅझिनीने देशाच्या तरुणांवर भर दिला हे दाखवून शिक्षण व युध्द हा त्याचा कार्यक्रम विशद करुन सांगितला आहे.

युध्दाची तयारी करण्याच्या दृष्टीने असे सांगितले आहे की, जेव्हा संधी येईल तेव्हा वापरण्यासाठी शस्त्रे खरेदी करुन त्यांचा शेजारच्या देशांत साठा करुन ठेवावयाचा, देशात शस्त्रे तयार करण्यासाठी एकमेकांपासून काही अंतरावर असे बरेचसे लहान लहान पण गुप्त कारखाने उघडायचे, दुसऱ्या देशांत गुप्त मंडळांनी शस्त्रे खरेदी करायची व ती व्यापारी बोटीतून गुप्तपणे आयात करायची.

विनायकांनी "स्वदेशी" आंदोलनावर महत्त्वपूर्ण परिच्छेद लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात, "परकीय कापड, किंवा तंबाखू किंवा चहा अशा निर्जीव वस्तूंवर बहिष्कार घालून काही उपयोग नाही हे लोकांच्या लक्षात येऊ लागते. हया निर्जीव

वस्तूंवर राग काढण्यात काय अर्थ आहे? हया निर्जीव वस्तूंना आधार देणाऱ्या सजीव गोष्टींवर त्यांनी आपला खराखुरा राग काढला पाहिजे. परकीय मालावर नाही, तर परकीयांवर बहिष्कार घातला पाहिजे." तेव्हा कांही वर्षात सावरकरांच्या दख्खनांतील अनुयायांत हा स्वदेशीबाबतचा दृष्टिकोण सर्वाधारणपणे स्वीकारण्यात आला आहे, असे पुराव्यावरुन दिसते.

**मॅझिनी यशस्वी :-**

विनायकांच्या मॅझिनीला फार मोठे यश मिळाले. प्रकाशन झाल्यानंतर तीन महिन्यांच्या अवधीत प्रकाशकाकडून पहिल्या आवृत्तीच्या सर्व प्रती घेतल्या गेल्या आणि आरोपी पाटणकर हयांनी ३० डिसेंबर १९०८ ला गणेश सावरकरांना लिहिलेल्या पत्रावरुन असे दिसते की, तीन हजार प्रतीची नवी आवृत्ती काढण्याच्या विचारात होते. हे पुस्तक भडक राजकीय भाषणे करण्यासाठी वापरले जात होते हे आरोपी बर्वे हयांनी १९०७ मध्ये केलेल्या भाषणाच्या अहवालावरुन दिसून येते. मॅझिनीने स्थापन केलेल्या मंडळाप्रमाणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी गुप्त मंडळांची आवश्यकता हया भाषणांत प्रतिपादन केली होती, आणि आपले मित्र सावरकर हयांनी मराठीत लिहिलेले मॅझिनीचे चरित्र वाचण्याची बर्वे हयांनी श्रोत्यांना शिफारस केली.

आता आम्ही विनायक सावरकर हयांच्या युरोपांतील हालचालीसंबंधीच्या पुराव्याकडे वळतो. हया बाबतीतला पुरावा म्हणजे मे १९०८ ते फेब्रुवारी १९०९ पर्यंत हाय गेट येथील 'इंडिया हाउस'मध्ये आचारी म्हणून काम करीत असलेला एक इसम, १९०६ च्या ऑक्टोबरपासून लंडनमध्ये विनायक सावरकरांशी परिचित असलेला एक इंजिनियरिंगचा विद्यार्थी आणि १९०९ च्या अखेरीला लंडन येथे विनायकांशी ओळख झालेला आणखी एक इसम हयांनी दिलेले जबाब, त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील आपल्या मित्रांना विनायकांनी लिहिलेली पत्रे आणि विनायकांनी लिहिलेली किंवा त्यांच्याकडे किंवा त्यांच्या सहकाऱ्यांकडे किंवा हस्तकांकडे मिळालेली प्रकाशने.

वर उल्लेखिलेल्या लंडनच्या कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा अग्राहय मानायला आम्हाला कांही कारण दिसत नाही. इंडिया हाऊसमधील कट्टर क्रांतिकारकांच्या गटाचे विनायक पुढारी होते हे हया साक्षीदारांनी सांगितले आहे. तिथे

असताना त्यांनी हिंदुस्थानातील बंडाचा किंवा ते म्हणतात त्याप्रमाणे 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुध्दाचा इतिहास' पूर्ण केला. बंडाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी त्यांनी १९०७ च्या व १९०८ च्या मे महिन्यात लंडनमधील योग्य अशा घरात सभा भरवल्या होत्या. हया बंडात मरण पावलेल्या हिंदी माणसांच्या गौरवपर अशा "ओमार्टिअर्स" नांवाच्या प्रक्षोभक पुस्तिका आणि बंड बिल्ले म्हणून उल्लेख झालेले धातूचे बिल्ले त्यांनी हिंदुस्थानांत पाठवले. पण लिखाण आणि भाषणें एवढयावरच कांही त्यांच्या हालचाली थांबल्या नाहींत. १९०८ च्या ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये ते व 'इंडिया हाउस'मधील त्यांचे इतर सहकारी, अराजक अत्याचारासाठी वापरता येतील असे बॉम्ब आणि भयंकर स्फोटक पदार्थ तयार करण्याच्या माहितीच्या टाइप केलेल्या नकला तयार करण्यामध्ये गुंतले होते. त्यापैकी कित्येक हिंदुस्थानातील निरनिराळया ठिकाणी पाठवून देण्यात आल्या. 'यंग इंडिया' सोसायटीच्या शाखा संबंध जगभर आहेत असे विनायकांचे म्हणणे होते. हया सोसायटीच्या शपथा त्यांनी लंडनमधील साक्षीदारांपैकी दोघांकडून घेतल्या होत्या.

**पिस्तुलांचे पार्सल :-**

१९०८ मध्ये स्वैपाकी हिंदुस्थानला जाण्यासाठी लंडनहून निघाला, तेव्हा वीस ब्राउनिंग ऑटोमॅटिक पिस्तुलांचे एक पार्सल ट्रंकेतून न्यायला विनायकांनी त्याला भाग पाडले. हया पिस्तुलांसाठी त्यांनी काडतुसेही घ्यायला लावली होती. हे सर्व आणि एक पत्र मुंबईतील दोन पत्त्यांपैकी एकावर पोचवायला त्यांनी सांगितले होते. दुसरा एक साक्षीदार १९१० मध्ये हिंदुस्थानला जाण्यासाठी पॅरिसहून निघाला तेव्हा पंचवीस ब्राउनिंग पिस्तुलांचे असेच एक पार्सल बरोबर नेण्याविषयी विनायकांनी त्याला खूप सांगितले, आणि त्याने जेव्हा नकार दिला तेव्हा एक पिस्तुल ट्रंकेतून लपवून नेण्यास त्यांनी त्याला तयार केले. स्वैपाकी चतुर्भुज हयाच्याकडे ज्यांनी वीस ब्राउनिंग पिस्तुले दिली, ते विनायक होते, हे सिध्द करायला पुरेसा पुरावा नाही, असा युक्तिवाद मोठया परिश्रमपूर्वक करण्यात आला आहे, विनायकाच्या दोघा जुन्या कॉलेज मित्रांपैकी कोणातरी एकाकडे मुंबईत हे पार्सल पोचते करण्यासाठी विनायकांनी 'इंडिया हाऊस'मध्ये आपल्याकडे दिले होते, हे चतुर्भुजचे सांगणे एका बाजूला आमच्यापुढे आहे. ही पिस्तुले नाशिक येथील गणेश सावरकरांच्यासाठी होती कारण ती चतुर्भुजबरोबर येत होती आणि आल्यावर ती बहुतेक भेट हयांच्या हवाली

केली जातील हे त्यांना माहीत होते हे सिध्द झाले आहे, असे आम्हाला वाटते. तेंव्हा विनायकाचे भाऊ गणेश हयांच्या उपयोगासाठी विनायकांचे जुने मित्र व संबंधित भट हयांच्या हवाली करण्यासाठी ही पिस्तुले 'इंडिया हाऊस'चे मॅनेजर विनायक हयांनी त्या इंडिया हाउसच्या नोकराकडे दिली होती अशी एक बाजू आमच्यापुढे दिली होती अशी एक बाजू आमच्यापुढे आहे. दुसऱ्या बाजूला 'इंडिया हाउस'वर पाळत ठेवीत असलेले स्कॉटलंड यार्डचे सार्जंट पार्कर हयांनी आपल्या उलट तपासणीत.'[१२]

**२.७ नारायणरावांना सहा महिने सक्तमजुरी :-**

'ब्रिटिश शासनाने बॅ. विनायकराव सावरकरांना, अधिकाऱ्यांचे खून पाडण्यासाठी शस्त्रास्त्रे पुरविल्याचा गुन्हा केल्याबद्दल मुंबई हायकोर्टात दोन खटले चालवून, २४/१२/१९१० आणि ३०/०१/१९११ साली दोन जन्मठेपेची काळेपाण्याची शिक्षा ठोठावली. इंडियन पिनल कोड १२१ अ कलमान्वये बॅ. विनायकरावांनी केलेला गुन्हा त्याच १२१ अ कलमाखाली नारायणराव सावरकरांनीही केला होता. विनायकरावांनी विलायतेतून पाठविलेले शस्त्रास्त्रांचे फॉर्म्युले व कागदपत्रे भारतात ब्रिटिशांच्या हाती लागू नये म्हणून नारायणरावांनी ती दडविली व चिथावणीचे भाषणही केले होते. शिवाय विनायकरावांना नारायणराव सावरकर थोरल्या बंधूप्रमाणे काहीही करण्यास सिध्द होते. जन्मठेपेची कठोर शिक्षा त्यांनाही होऊ शकली असती. परंतु नारायणराव सावरकरांविरुध्द सादर करण्यात आलेला पुरावा परिस्थितिजन्य निघाला. शिवाय नारायणरावांचे अल्प वय लक्षात घेऊन न्यायाधीश महोदयांनी त्यांना अंदमानात पाठविले नाही, फक्त सहा महिन्यांची सश्रम करावासाची शिक्षा दिली.

मुंबई हायकोर्टाच्या निकालाचा मूळ मसुदा इंग्रजीत होता. सरकारच्या अर्काइव्ह खात्यातल्या सन १९१० सालच्या सीक्रेट पोलीस फाईल्समध्ये आलेला मसुदा माहितीसाठी येथे दिला आहे. त्यावरुन तिसरे बंधू नारायणराव सावरकर हे, क्रांतिवीर गणेश सावरकर आणि स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव सावरकर हयांच्याइतकेच जहाल क्रांतिकारक होते, हे ब्रिटिश शासनाच्या निरीक्षणावरुन सिध्द होते.

मुंबई हायकोर्टाने बॅ. विनायकराव सावरकर आणि नारायणराव सावरकर हया राष्ट्रभक्तांवर केलेले आरोप व दिलेली सजा खालीलप्रमाणे-

'The Judgement'1 of special Tribunal in special Branch Cases of 24-12-1910 in the High Court of Judicature at Bombay.

Br. V. D. Savarkari

"We find the accused guilty of the abetment of waging war by instigation, by circulation of printed matter inciting to war, the providing of arms and the distribution of instructions for the manufacture of explosives. He is, therefore, guilty of an offence punishable under section 121 A of the Indian Penal Code. we also find him guilty of conspiring with others of the accused to overawe by criminal force as show of criminal force the Government of India and the Local Government.

"Mr. Vinayak Damodar Savarkar, the Sentence of the court upon you is that you be rigorously imprisoned for life and deported to the Andamans."

**मराठी अनुवाद १**

"चिथावणी देऊन, युध्दाला प्रोत्साहन देणाऱ्या वाङ्मयाचा वापर करुन, शस्त्रास्त्रे पुरवून आणि स्फोटक पदार्थांच्या निर्मितीबद्दलच्या सूचना करुन आरोपीने युध्दाला मदत केली हा आरोप आम्ही सिध्द समजतो. म्हणून इं. पि. कोडच्या १२१ अ कलमान्वये ज्याला शिक्षा देता येते, असा गुन्हा आरोपीने केला आहे. ज्याला गुन्हयाचे स्वरुप आहे, अशा जबरदस्तीने अगर अशा जबरदस्तीच्या देखाव्याने हिंदुस्थान सरकारला व स्थानिक सरकारला भयभीत करुन टाकण्याचा कट आरोपीने इतर आरोपींच्या सहकार्याने केला, ही गोष्टसुध्दा आम्ही सिध्द समजतो.

"विनायक दामोदर सावरकर, हे न्यायालय तुला अंदमानात हद्दपार करुन जन्मठेपाची सश्रम कारावासाची शिक्षा करीत आहे."[१३]

MR. N.D.SAVARKAR

"Narayan Savarkar's Case is of the same type. Though the evidence incriminating him is more largely circumstancial. It is satisafactorily proved from a speech, he made in May 1908, that he was a pronounced advocate of independence and in certain cases regarded political assassination as justifiable.

Narayans accidental moveing of a loose brick disclosed a hiding place. It was here that were found a number of papers and the copy of the Bomb Manual.

A Letter written by Narayan to his Vinayak in England was intercepted in the past and has been put in evidence. It is headed with an invocation to the goddess of independence, displays his entire readiness to do the bidding of his brother. There is no direct evidence that Narayan took a pistol or even handled or was concerned with arms or explosives. It is to be inferred that he conspired as did the leading members of the Abhinav Bharat, because his intimate connection with them and warm interest in their objects make it impossible to draw any other inference.

But no doubt he was dominated and misled by his elder brothers; he is still very young, not more than 20 or 21 years of age, and it may be hoped, that it is possible for him to eradicate the impression made on his mind by perilous teaching.

he also is guilty under section 121 A, but it would be cruel and unreasonable to inflict on him a severe sentence and possibly the best thing for him as for some others is that the sentence should be light.

Mr. Narayan Damodar Savarkar, the sentence of the court upon you is that you be rigorously imprisoned for (6) Six months."

Sd. B. Scott

N.G. Chandavarkar

J.J. Heaton

Honourable Judges of High Court, Bombay.

**मराठी अनुवाद**

"श्री. नारायण सावरकर अभियोग याच प्रकारचा आहे. नारायण सावरकरावर गुन्हयाचा आरोप करणारा पुरावा हा अधिक करुन परिस्थितिजन्य असला तरी तो पुरेसा ठरतो. कारण १९०८ च्या मे महिन्यात, त्याने केलेल्या एका प्रकट भाषणावरुन तो पूर्णतया सिध्द करु शकतो, की जो हिंदवी स्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कर्ता असून राजकीय हेतूने प्रेरित होऊन केलेल्या हत्येचे तो अंशतः समर्थन करतो.

आणि त्यामुळेच सावरकरांच्या घराची झडती घेताना नारायणने चुकून हलवलेल्या सुटया कौलाआडच लपविलेली बरीचशी गुप्त कागदपत्रे आणि 'बॉम्ब मॅन्युअल' आरक्षींच्या हाती लागली.

नारायणाने इंग्लंडात असणाऱ्या बंधूस विनायकास लिहिलेले पत्र पोस्टामध्ये असतानाच ताब्यात घेतले असून, आरक्षींनी पुरावा म्हणून न्यायालयात सादर केले आहे. आपल्या मातृभूमीला दास्यत्वातून सोडविण्याची तीव्र इच्छा व्यक्त करुन, देशासाठी त्याच्या बंधूची वाटेल ती आज्ञा पाळण्यास सिध्द आहे, असे तो म्हणतो. नारायणाने प्रत्यक्षात पिस्तुल वा तत्सम शस्त्र बाळगल्याचा किंवा स्फोटक वस्तू हाताळल्याचा थेट पुरावा नाही. त्याच्या विरुध्द आरोप आहे तो हाच की तो 'अभिनव भारत' चा सदस्य आहे; त्या संस्थेच्या अध्येयधोरणांची त्याला पूर्ण कल्पना आहे, उलट तळमळ आहे आणि आपल्या बंधूंच्या पावलांवर पाऊल ठेवून त्याच मार्गाने स्वबळावर चालण्याची त्याची तयारी आहे. 'अभिनव भारता'चे नेतृत्त्व करणाऱ्या अन्य सदस्यांशी त्याचे आत्मीयतेचे व निकटचे संबंध आहेत आणि अंतिम ध्येयासाठी तो उत्साहाने कळकळीने त्यांचेबरोबर कटात सामील झाला आहे. याखेरीज अन्य अधिक निष्कर्ष निघूच शकत नाही.

अजून तो कोवळया वयाचा आहे. वीस-एकवीसपेक्षा जास्त नसणार, आत्मघातकी विचारांपासून त्याला समजावून आजूनही दूर नेता येईल, मनावर झालेला परिणाम अजूनही पुसून टाकणे शक्य आहे. १२१ अ कलमाखाली तोही दोषी ठरला आहे.

नारायण दामोदर सावरकर, हे न्यायालय तुला सहा महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा करीत आहे."

स्वाक्षरी

- बी.स्कॉट

- एन्.जी.चंदावरकर

- जे.जे.हीटन

- मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती

वरील खटल्याचे स्वरुप लक्षात घेता, आपणास असे आढळून येईल की, इंडियन पिनल कोड १२१ अ कलमान्वये बॅ. विनायकराव सावरकरांनी केलेला गुन्हा, त्याच

१२१ अ.इं. पि. कोड कलमाखाली नारायणराव सावरकरांनीही केला होता. तेंव्हा जन्मठेपेची शिक्षा नारायणरावांना होऊ शकली असती. परंतु नारायणराव सावरकरांचे अल्प वय लक्षात घेऊन इंग्रज सरकारने त्यांना अंदमानात पाठविले नाही, फक्त सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा त्यांना देण्यात आली.

नारायणराव सावरकरांचे अल्प वय पाहून कोर्टाने त्यांची शिक्षा कमी केली, याचे कारण, खटल्याचे वेळी नारायणराव सावरकर २१ वर्षाचे होते. २१ वय, हे अल्प वय होऊच शकत नाही. ब्रिटिशांनी त्यांच्याहूनही लहान असलेल्या खुदीराम बोसला यापूर्वी १९०८ साली फाशी दिली होती. तेंव्हा ब्रिटिश सरकारच्या हया धूर्त धोरणामागे पुढील कारणे असण्याची दाट शक्यता आहे.

१) नाशिक कटात, नारायणराव सावरकरांच्याच वयोगटातील सर्वच आरोपींना (माफीचे साक्षीदार सोडून) मोठमोठया शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या. प्रमुख आरोपी कान्हेरे, कर्वे, देशपांडे यांना फासावर चढविले, तिघांना काळेपाणी, उरलेल्या बाकीच्या सर्वांना १०, ५, ३ वर्षांसाठी तुरुंगात डांबण्यात आले. नारायणराव सावरकर हेही नाशिक कटात सहभागी झाल्याचे सिध्द झाले होते तरी, त्यांतील सहभागाचा आवश्यक वाटणारा दुवा सरकारला सोयिस्करपणे मिळू शकला नाही. किंबहुना, मिळालेल्या दुव्याचा उपयोग सरकारने न करण्याचे धोरण अंगिकारीले असावे.

२) त्रिवर्ग चापेकरबंधूंना एकामागोमाग फाशी दिल्यानंतर उर्वरित क्रांतिकारकांच्या मनांमध्ये ब्रिटिशांविरुध्द अतिशय हिंसक तीव्र सूडभावना निर्माण झाल्याचा अनुभव होता. गुप्त क्रांतिकारक मंडळींमध्ये ब्रिटिशांनी दिलेल्या शिक्षेचा सूड घेण्याची पध्दत होती. तशा प्रकारचे प्रकरण तिन्ही सावरकरबंधूंना जन्मठेपेवर पाठवून, तशा प्रकारची हिंसक प्रतिक्रिया टाळावी, अशी शक्यता असू शकते.

३) ब्रिटिश सरकारची कुटिल सावध राजनीति लक्षात घेता ही तिसरी शक्यता पुढीलप्रमाणे वाटते. नाशिक कटात न अडकविता आलेले परंतु 'अभिनव भारत' या गुप्त संस्थेचे अनेक क्रांतिकारक त्या क्षणी मोकळे होते. नारायणराव सावरकर सहा महिन्यांनी म्हणजे कमी शिक्षा भोगून आल्यानंतर, 'अभिनव भारता'च्या क्रांतिकारक नारायणरावांशी संपर्क साधतीलच, असे

ब्रिटिशांनी गृहीत धरले. त्यांच्या क्रांतिकारक चळवळी लक्षात येण्यासाठी नारायणराव सावरकरांवर गुप्त पोलिसांचा कडक पहारा ठेवणे सरकारला सोयीचे होते आणि हयाच कारणास्तव नारायण दामोदर सावरकरांना किमान शिक्षा देण्यात आली असावी.

४) शिवाय, 'अभिनव भारता'च्या क्रांतिकार्याची प्रतिज्ञा घेतलेले, गुप्त संघटनेचे शेकडो सदस्य महाराष्ट्रात आणि देशात कार्यरत असणार आणि भविष्यात ते अचानकपणे शासनावर प्रहार करु शकतील, अशी भीतीही इंग्रज सरकारला वाटत होती. ही क्रांतिकारक मंडळी उजेडात येण्यासाठी नारायणराव सावरकरांचे तुरुंगाबाहेर असणे सरकारला आवश्यक वाटले.

तेंव्हा, नारायणराव सावरकरांचे अल्प वय म्हणजे २१, हे खोटे कारण देऊन केवळ सहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा त्यांना देण्यात आली. कारण की नारायणराव सुटून आल्यानंतर त्यांच्याभोवती गोळा होणाऱ्या क्रांतिकारकांना पकडून, 'अभिनव भारता'च्या क्रांतिसंघटनेचा संपूर्ण नायनाट करण्याचे ब्रिटिश शासनाचे धोरण असले पाहिजे आणि तसे नंतर दिसून आलेही.'[१४] थोडक्यात, बाकीच्या क्रांतिकारकांचा शोध ब्रिटिश सरकारला या मार्गाने घ्यावयाचा होता.

**कर्णावती - दिल्ली ध्वमस्फोट :-**

१९१२ हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात गाजले हे हिंदुस्थानातील राजप्रतिनिधी लॉर्ड हार्डिंजवरील इतिहास प्रसिध्द राजधानी दिल्लीतील ध्वम स्फोटाने तथापि, तत्पूर्वीच म्हणजे सन १९०९ च्या नोव्हेंबरमध्ये असाच प्रयोग कर्णावती येथे लॉर्ड मिंटोवरही झालेला होता. पण तो ध्वम त्यांनतर सहा दिवसांनी फुटला आणि त्यात एक नगरपालिका कर्मचारी घायाळ झाला. इतकेच लॉर्ड हार्डींजवरील ध्वमचा संबंध काहीसा निराळा आहे. १९११ च्या डिसेंबर महिन्यात ब्रिटिश बादशाह पंचम जॉर्ज यांचा राज्यभिषेक हिंदुस्थानात दिल्लीमध्ये थाटाने साजरा करण्याचे परकी सत्याधाऱ्यांचे घाटत होते. त्या निमिताने काही सुधारणांचे तुकडे हिंदुस्थानपुढे फेकून विरोध बोथट करण्याचाही प्रयत्न झाला त्याला आव्हान म्हणून साम्राज्यसत्तेची धुंदी उतरविण्याच्या निर्धाराने रासबिहारी बसू प्रभृतीनी हा बेत रचला. पण पंचम जॉर्ज हिंदुस्थानात आलाच नाही. आणि त्याचा प्रतिनिधी म्हणून लॉर्ड हार्डिज दिनांक २३

डिसेंबर १९१२ ला दिमाखात हत्तीवरुन मिरवत दिल्लीत प्रवेश करणार असल्याचे घोषित झाले. त्याप्रमाणेच ती मिरवणूक चांदणी चौकातून जाण्याचेही घोषित झाले होते. हिंदुस्थानातील पददलित जनता म्हणजे किस झाड की पत्ती? असे तुच्छतेने म्हणत निच्याकडे पाहातच जणू काही तोऱ्यातच हत्तीवरील हौदयातून डुलत तो जात होता. तोच हौदयावर बाँबचा स्फोट झाला होता. मात्र, त्याने बळी घेतला तो हार्डीजवर छत्री धरणाऱ्या कर्मचाऱ्यांचा हार्डीज काहीसा घायाळ झाला होता. त्याची पत्नीही वाचली. त्याप्रकरणी भरलेल्या अभियोगात मास्टर अमीरचंद, भाई बालमुकुंद यांना नि अवध बिहारींना फाशी, वसंतकुमार, विश्वास यांना जन्मठेप, काळया पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. इतरांना मोठया कारावासाच्या शिक्षा झाल्या. या सर्व प्रकरणाचे सूत्रधार रासबिहारी मात्र ते शेवटपर्यंत सरकारच्या हाती सापडले नाहीत. तसेच सत्ताधाऱ्यांचा ज्यांच्यावर विशेष डोळा होता ते नारायण सावरकरही सापडले नाहीत. ते महाशाळेत नियमित होते. स्फोटाच्या दिवशीही त्यांची उपस्थिती नोंदली गेली होती. अशी साक्ष महाशाळेच्या प्राचार्यांनीच दिली होती. अन्यथा नुसत्या वासावर त्याची रवानगी काळया पाण्यावर झाली असती. मात्र हया प्रकरणी दिल्ली कटाचा जो अभियोग दिल्ली सत्र न्यायालयात दि. २९ मे १९१५ ते ऑक्टोंबर १९१५ पर्यंत चालला, त्यात लॉरेन्स गार्डनमधील ध्वमस्फोट प्रकरणाचाच काय तो सामावेश होता. लार्ड हार्डीजवरील बॉम्बस्फोटाची माहिती आरक्षकांना शेवटपर्यंत लागली नाही. नि त्याचे सूत्रधार रासबिहारी ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन जपानमध्ये पोहोचले होते. पुढे त्यानीच 'आझाद हिंद सेने'ची स्थापना करुन नंतर ती सुभाषचंद्राच्या हातात सोपविली.[१५]

**२.८ क्रांतिवीराची देशाप्रति पुष्पांजली :-**

'परमेश्वरपूज्य आणि श्री शिवराय यांच्या दिव्य स्मृतीला स्मरुन प्रतिज्ञा घेतो की, राष्ट्रस्वातंत्र्यार्थ तनमनधनाने यथाशक्ती नि यथामति मी आजन्म हृदयप्रयत्नी राहीन. इ. ही प्रतिज्ञा मी घेतली तेव्हा तिला अनुसरुन वास्तविकपणे लागलीच प्रयत्नक्षेत्रांत उडी घ्यावयास पाहिजे होती. पण प्रपंचामधील अडचणींनी उत्पन्न झालेले मानसिक अस्वास्थ आणि देश (राष्ट्र) की देव या प्रश्नामध्ये आंदोलणारे मन या दोन कारणामुळे बराच काळपर्यंत अंगी प्रयत्नशीलता येऊ शकली नाही. तथापि, अगदीच प्रयत्न पराङ्:मुखता होती असेही नाही. निरनिराळे उत्सव, मिरवणुकी आणि

इतर उत्तेजक कार्यक्रम जेव्हा जेव्हा उपस्थित होत, तेव्हा प्रयत्नांना गती मिळत असे; पण तरी प्रयत्न शैथिल्य हा त्या वेळच्या वर्तनाचा विशेष होऊन राहिला होता. १९०५ मध्ये झालेल्या बंगालच्या फाळणीच्या सुमारास हे प्रयत्न शैथिल्य कमी झाले. १९०६ त माझे धाकटे बंधू विनायकराव तात्याराव सावरकर विलायतेकडे मार्गस्थ झाले आणि त्या क्षणापासून मित्रमेळयाच्या अर्थात 'अभिनव भारता'च्या कार्याचा विडा आपणच उचलला पाहिजे, अशी तीव्र जाणीव अनपेक्षितपणे मनात उत्पन्न झाली. तेव्हापासून माझ्या अत्यल्प शक्तीने आणि मतीने मला जे जे करता येण्यासारखे होते, ते ते शक्य तेची पराकाष्टा गणित हातून घडू लागले. त्या वेळेपासून आतापर्यंत सुखात दुःखात अनुकूल-प्रतिकूल स्थितीत सुलभता, दुर्लभता न जुमानता अविश्वतपणे प्रतिज्ञा पालनाचे सेवाकार्य परमेश्वराने हातून घडवून घेतले. याकाळात देश (राष्ट्र) वा देव याचा निर्णय मनात लागून घेतला होता. आणि संसारिक आपत्तिशी झगडता मन निर्ढावून याची व्यग्रता आणि अस्वस्थता प्रतिज्ञा पालनात अडथळा उत्पन्न करु शकणार नाही, इतकी निर्बल होऊन बसली होती. याप्रमाणे राष्ट्रसेवेच्या कर्तव्यपालनाचे समाधान १९०८ पर्यंत घेता आले. १९०९ पासून पुढे राजकीय आपत्तीच्या वावटीत सापडून अंदमानी फेरीत फेकला गेल्यावर १९२२ मध्ये मृत्यूच्या दाढेत मान अडकल्यामुळे कारावासांतून मुक्त झालो. सुटकेनंतर रोग मुक्तीचा अशंतः लाभ मिळून आतापर्यंत शारीरिक, मानसिक, बौध्दिक ज्या मार्गांनी राष्ट्रसेवेची धडपड करता आली त्या मार्गांनी ती यथाशक्य तेवढी केली. आता मात्र शारीरिक, मानसिक आणि काही अंशी बौध्दिक असमर्थतेने मला ग्रासले आहे. फारशी राष्ट्रसेवा घडत नव्हतीच, पण राष्ट्रसेवेच्या इच्छेने जी काही धडपड केली तीही आता अशक्य होऊन बसली आहे. यापुढे पत्रव्यवहार, सूचना, माहिती देणे इ. कोणत्याही प्रकारची हालचाल मला करता येणार नाही. इतर प्रेमळ इष्टमित्रांनीही तशी अपेक्षा फारशी करु नये. यातूनही आयुष्याची भाडेचिठ्ठी कदाचित वाढलीच तर आजपर्यंत हातून घडले तेच स्वभाव वंशतेमुळे पुढेही घडत राहील. पण तसे होईल अशी शाश्वती आता वाढत नाही.[१६] थोडक्यात, गणेश सावरकरांना तुरुंगात एवढया यातना झाल्या की, त्यांनी आपली देशाविषयीची खंड व्यक्त केली आहे.

प्रतिज्ञेचे पालन करीत असताना आपण जे करीत आहोत ते योग्य आहे, असे समाधान वाटत असे. आता त्या समाधाला निरुपायाने मुकावे लागत आहे.

कर्तव्यसेवेच्या कार्यात ज्यांच्याकडून सहाय्य मिळाले त्यांचे आभार कोणत्या शब्दात मानावे ते समजत नाही. १९२२मध्ये कारावासातून सुटताना मान मृत्यूच्या दाढेत अडकली होती. परंतु माता-पिता बंधू सुदृढ इ. आत्यंतिक ममत्वाच्या सर्व दृढ भावनांचे रसायन ज्यांच्या मनांत सिध्द आहे ते माझे धाकटे बंधू डॉ. नारायणराव अर्थात बाळाराव सावरकर तनाने, मनाने, नि धनाने रात्रंदिन झटले आणि त्यांनी मृत्यूच्या दाढेत अडकलेली माझी मान आपल्या अविरत प्रयत्नांनी सुरक्षितपणे बाहेर काढली. आयुष्यात जी देशसेवा घडली तिचे मुख्यत्वेकरुन सर्व श्रेय त्यांनाच आहे त्यांच्या ममत्वावाचून पुढेच आयुष्य म्हणजे शून्यच झाले असते. त्यांच्या प्रमाणेच इतर चार दोन व्यक्तींकडून कर्तव्यपालनाच्या माझ्या कार्यात मला अगदी निरपेक्षपणे नि अमोल साहय मिळाले. माझ्या हातून घडलेल्या अल्पशा देशसेवेचे श्रेय त्यांना आहे. त्या सहाय्यकारी व्यक्तीचे या निवेदनाच्या निमित्ताने मी प्रकट नि हार्दिक आभार मानतो. सारांशरुपाने गणेश सावरकर आपले श्रेय धाकटे बंधू नारायण सावरकर यांना देतात. त्यांच्याविषयी कृतज्ञता प्रकट करतात.

माझ्या वैयक्तिक जीवनात नि सार्वजनिक आयुष्य क्रमांत अनेक डयुटी, अनेक प्रमाद घडले असतील, अनेकांची मने दुखविली गेली असतील, मी अनेकांना विरोधही केला असेल, माझ्या जीवनातील ती अपरिहार्य दोषस्थळे होती हे जाणून त्या सर्वांनी मला क्षमा करावी.

कर्तव्य पालनाच्या कठिणपण कार्याला प्रारंभ झाल्यापासून तो आतापर्यंत राष्ट्रदेवतेच्या सेवाकार्यी जे काही करता आले त्याचा आढावा मी येथे तिच्या चरणी अर्पित आहे. राष्ट्राच्या अभ्युदयार्थ आवश्यक अशा बहुतेक क्षेत्रांत मी करता येण्यासारखे प्रयत्न यावच्छक्य केले. त्यातील फारच थोडयांना यश आल्यासारखे वाटले, पण बहुतेक प्रयत्नांत अपयशाचाच वाटा उचलावा लागला ही अपयशेच झालेल्या प्रयत्नांचा निश्चित पुरावा होत. असो, अयशस्वी प्रयत्नांची तुटकी, अपूर्ण आणि यशस्वी प्रयत्नांची अतूट नि अभंग अशी तुलशी दले या निवेदनद्वारा राष्ट्रदेवतेच्या चरणी अर्पित आहे. याही पुढे सामर्थ्य उरल्यास तेच करीन ज्यांच्या चरणांचे स्मरण करुन प्रतिज्ञा केली. त्यांचे चरणच मजकडून प्रतिज्ञापालन करुन घेण्यास कारण आहेत. आज पुढे असलेली विरामवेळाही ठरेल म्हणून आजच्या क्षणी दोन्हीही पक्षी माझा राष्ट्रदेवतेच्या चरणी वंदेमातरम प्रविष्ट असो.'[१७]

थोडक्यात, गणेश सावरकर आपल्या देशाप्रती असलेले प्रेम व्यक्त करतात तसेच आजारी असताना आपल्या देशाची सेवा करता येत नाही याचे त्यांना वाईट वाटते.

**वसईच्या संग्रामातील वीरांचे पुण्यस्मरण :-**

वसईच्या रणसंग्रामात धारातीर्थी पावलेल्या वीरांचे वसई किल्यांत बृहन्महाराष्ट्रातर्फे पुण्यस्मरण करण्यात आले. वसई विजयोत्सव दिन म्हणजे जणूकाही आर्मस्टिक डेच होय या समारंभाकरिता वसईचा किल्ला अगदी फुलून गेला होता. समारंभाला दुपारी २ वाजता सदाशिवराव केळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. परगावाहूनही बरेच पाहुणे आले होते. डॉ. सावरकर, म्हात्रे, महाबळ जोशी वगैरे मंडळी बाहेरुन मुददाम आली होती.

**ग्रंथ समर्पण विधी :-**

समारंभाचे स्वागताध्यक्ष गोविंदराव वर्तक यांनी जमलेल्या मंडळींचे स्वागत करुन विजयोत्सवाच्या दिनाचे महत्त्व निवेदन कले.

अध्यक्ष केळकर यांचे प्रास्ताविक भाषण झाल्यावर ग.गो. नाईक यांनी नवीनच प्रसिद्ध केलेल्या 'वसईच्या वनघोर रणसंग्राम' या पुस्तकाची एक प्रत केळकर यांना अर्पण केली.

**मुलामुलींचे मर्दानी खेळ :-**

यानंतर थोडा अल्पोपहार झाला. पुढचा कार्यक्रम वसई येथील मुलामुलींचा मर्दानी खेळ होता. सर्वत्र खेळ उत्तम झाले. त्यातल्या त्यात मुलीचे जांबयाच हात प्रेक्षणीय झाले. नंतर प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. म्हात्रे, महाबळ, जोशी, डॉ. सावरकर वगैरे पुढाऱ्यांची समयोचित भाषणे झाली.

**उज्ज्वल संस्कृतीचा इतिहास :-**

जोशी यांचा इतिहासांचा व्यासंग दांडगा दिसला. हिंदूची संस्कृती व ज्ञान यांची वाहवा कशी होत गेली याचे त्यांनी महत्व विषद केले आहे. जगाच्या इतिहासांतही वसईच्या रणसंग्रामाला उच्च स्थान प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदूच्या शौर्याची व युध्दकलेची ती कसोटी होती. जातिभाव विसरुन जाऊन एक जात सर्व मराठा भगव्या झेंडयाखाली एकत्र झाला होता. पारतंत्र्याची चीड त्यांना जितकी आली तितकी चीड आज आपणास आली तरी सुध्दा धर्मरक्षणाचे कार्य आपणाकडून उत्तम तऱ्हेने पार पडेल.

**जबाबदारी पार पाडा :-**

शेवटी त्यांनी सांगितले की "वीरांचे स्मरण म्हणजे कशी या नाही. हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचे अर्धवट कार्य आपल्या पूर्वजांनी आपल्यावर सोपविले आहे, ते पुरे करण्याची प्रतिज्ञा जर आपण केली, तर त्या वीरांचे पुण्यस्मरण त्यांना यथोचित रित्या साजरे केले असे होईल.'[१८]

नंतर आभार प्रदर्शन होऊन हा सभारंभ संपला.

**वसई रणसंग्रामाचे प्रकाशन :-**

त्याचप्रमाणे पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे पाठारे क्षत्रिय समाजाच्या विदयमाने सुतारआळीमध्ये वसईच्या रणसंग्रामात धारातीर्थी पावलेले मुरारजी नाईक, त्यांचे बंधू व इतर लढवय्ये यांचे स्मरण करण्यात आले. तसेच शनिवारी रात्री नाशिकचे महाबळ यांचे कीर्तन झाले. सोन्या मारुती सत्याग्रहात डॉ. सावरकरानां अटक सोन्या मारुती मंदिर सत्याग्रहात डॉ. सावरकर प्रभूतींनाअटक हिंदू महासभेचे एक प्रमुख पुढारी डॉ. नारायणराव सावरकर अहमदनगरचे डॉ. सप्तर्षी, सोलापूरचे व्ही.पी. कोठारी आणि पुण्याचे एक वडिल आणि न्यू कौन्सिलर के.व्ही केळकर सोन्या मारुती मंदिरापुढे सत्याग्रह केला. सर्वांना अटक करण्यात येऊन फरासखान्यात नेण्यात आले आणि नंतर जामिनावर सोडण्यात आले.'[१९]

**भोपटकर प्रभूतींना दंड :-**

सोन्यामारुती सत्याग्रहाबाबत बारा सत्याग्रहास प्रत्येकी २५ रु दंड करण्यात आला. दंड न दिल्यास एक आठवडा सक्त मजुरीची शिक्षा सांगण्यात आली.

शिक्षा झालेल्यात औंधचे पंडित सातवेळकर, सोलापूरचे श्री. शिवलाल गांधी, पंढरपूरचे वकील फणसाळकर व पुण्याचे इतर प्रसिध्द पुढारी होते.

**गद्रयांची तुरुंगवास :-**

मुंबईच्या 'निर्भीड' पत्राचे संपादक अनंत हरी गर्द्रे यांनी दंड देण्याचे नाकारुन तुरुंगवास पत्करिला.

दंड देण्याचे नाकारल्यावरुन शिक्षा झालेल्या १८ अरोपींपैकी १२ जणांचा दंड दुसऱ्यांनी दिल्यामुळे त्यांस सोडण्यास आले. त्यात आण्णासाहेब भोपटकर, रामभाऊ मंडलिक, डॉ. सावरकर व रामभाऊ राजवाडे होते.

विश्वासराव डावरे व दुसरे दोघे यांचा दंड भरण्यात आला. तुरुंगात असलेल्या लोकांत नाशिकचे कॉंग्रेसभक्त जानोरकर हे होते.

**दादर येथे 'वंदे् मातरम्' :-**

दादर हिंदू महासभेच्या वतीने रविवार ता. २३ जुलै रोजी रात्री वनमाळी सभागृहात 'वंदे मातरम' दिन साजरा करण्याकरिता एक प्रकट सभा भरविण्यात आली होती. सभेस अतोनात गर्दी लोटली होती. सभेचे अध्यक्षस्थान डॉ. सावरकर यांनी स्वीकारले होते. आरंभी हिंदू ध्वजगीत म्हणण्यात आले.

**बंगालमधील राजबंदी :-**

डॉ. सावरकर यांनी बंगाली राजबंदयांनी जो नुकताच अन्नत्याग आरंभिलेला होता, त्यासंबंधी एक ठराव मांडला. तो ठराव मांडताना डॉ. सावरकर म्हणाले, 'राजबंदयांचा हा प्रश्न सांप्रतच्या राजकारणात एक हृदयाचे शल्य होऊन बसले आहे. १९३५ च्या सुधारणा प्रचलित झाल्यापासून वास्तविकरीत्या कोणीही राजबंदी तुरुंगात असणे हे अन्यायाचे आहे. कारण राजबंदयांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिताच प्रयत्न केले होते. आणि म्हणून मिळाल्यावर या राजबंदीत बंदिवासात ठेवणे हे गांधीजींच्या वक्र बुध्दीने अत्यंत कठीण करुन टाकला. हिसा-अहिंसेच्या भ्रामक कल्पनेने त्यांनी अंदमानामध्ये राजबंदीनी जेव्हा पहिला अन्नत्याग केला, त्यावेळी एक नवीनच तत्त्व या प्रश्नांत घुसवून दिले आणि राजबंदींनी असे घोषित करण्याची सक्ती केली की, त्यांनी आचरलेल्या हिंसेच्या मार्गासंबंधी त्यांना पश्चाताप झाला, हे मान्य करणारांनाच मुक्ततेची संधी मिळेल, असेही गांधीजींनी सांगितले. परंतु गांधीजींचे हे करणे राजबंदीच्या मानधनत्वास अत्यंत अपायकारक होते. देश स्वातंत्र्यकरिता ज्याला जे मार्ग प्रामाणिकपणे पटले ते त्याने आचारले. राजकीय परिस्थिती पालटली. त्यामुळे मागे आक्रमिलेले क्रांतीचे मार्ग आज बदललेल्या परिस्थितीत अनावश्यक असल्याने ते आचारणार नाही, इतके म्हणणे गांधीजींनी आचरलेल्या मार्गाबद्दल प्रश्न निष्कारण गुंतागुंतीचा झाला. प्रत्यक्ष कॉंग्रेसच्या प्रधानमंडळात विराजमान असलेल्या अनेक व्यक्तींनी हयाच क्रांतिकारकासारख्या शपथा घेतलेल्या मला स्वतःला माहित आहे. परंतु त्यांच्याकडून गांधीजींनी असे क्षमापात्र प्रकटपणे लिहून घेतले नाही. मग आज जे बंदिशाळेत आहेत, त्याच्यावरच ही सक्ती का? केवळ ते अजूनही आपत्तीत आहेत. याचा अन्याय फायदा घेऊन

गांधीजींनी ही अट अनावश्यक केली. त्याचमुळे अजूनही अनेक क्रांतिकारक आज बंदीशाळेत खितपत पडलेले आहेत. तेव्हा ही स्वाभिमानास नष्ट करणारी अट अजिबात काढून टाकून बदललेल्या परिस्थितीप्रमाणे सर्व क्रांतिकारक राजबंदीना बिनशर्तपणे सन्मानाने मुक्त करणे, हेच न्याय्य आहे आणि म्हणून तुरुंगात राहिलेल्या राजबंदींना तात्काळ मुक्त करणे हे बंगाल सरकारचे आदय कर्तव्य आहे. ते त्यांनी एक क्षणाचाही विलंब न करता पार पाडावे नाही, तर जर कदाचित काही राजबंदीचे प्राण संकटांत सापडले, तर त्याचा जबाब बंगालच्या प्रधानमंडळाचा केव्हा तरी घ्यावाच लागेल, अशा निकाराच्या परिस्थितीत सर्व राजबंदींची तात्काळ मुक्तता व्हावी, ही या ठरावातील मागणी आपण एकमताने मान्य करावी. त्याचप्रमाणे राजबंदींनीही आपण अशी विनंती करु या की, त्यांनी अन्नत्यागाचा हा मार्ग सोडून दयावा व आपले मौल्यवान प्राण आपण होऊन धोक्यात घालू नयेत.

य भाषणानंतर हा ठराव एकमताने संमत झाला.

**वंदे् मातरम्ची महती :-**

डॉ. सावरकरांची राजबंधाबद्दल किती तळमळ होती, त्यांनी गांधीजींचा मार्ग अनुसंरु नये असे त्यांना वाटत होते. वंदे् मातरम् दिनासंबंधी मुख्य वक्ते पालथे शास्त्री यांनी भाषण केले. आणि वंदे् मातरम् हे गीत कोणत्याही कारणाने आपण अवमानित होऊ देता कामा नये, असे बजावले.'[२०]

यानंतर बोस यांनी भाषण करुन हिच विचारसरणी प्रकट केली. डॉ. सावरकर यांनी, वंदे् मातरम् गीताचा स्फूर्तिदायक असा गेल्या तीस वर्षांचा इतिहास सांगून म्हटले की हे गीत नष्ट करण्याकरता ब्रिटिश सरकारचे धोरण, प्रयत्न ही पूर्वीच्या देशभक्तांनी निष्फळ केले. त्याकरिता अंगावर रक्त फुटेपर्यंत वेताचे मार सोसून वंदे् मातरम् गीताला हृदयाशी कवटाळून धरले. वधस्तंभाला मिठी मारता मारता अनेक क्रांतिकारकांनी इहलोकचे शेवटचे शब्द उच्चारुन मरणाच्या दरीत उडी टाकली. अशा रीतीने आजपर्यंत अनेक देशभक्तांनी आपल्या रक्ताचे व प्राणाचे मोल देऊन वंदे् मातरम् हे राष्ट्रगीताच्या पदवीला पोचविले आहे. आज वंदे् मातरम् हे केवळ शब्दच न राहता त्यावर केलेल्या आत्माहुतीच्या संस्कारांनी तो एक राष्ट्रस्फूर्तीचा दिव्य मंत्र झाला आहे, असा हा दिव्यमंत्र कोणा मुसलधर्मांध लहरीकरिता सोडून देण्यास सांगणे म्हणजे भेकडपणच्या पापाची परमभावधि आहे. आजदेखील आज

वंद् मातरम्च्या पापाची परमाविधी आहे. वंदेमातरमच्या मंत्राने निजाम शाहीतील अत्याचारांच्या मंत्राने घनदाट अंधकारामध्येही सहस्त्रशः तरुण विदयार्थ्यांच्या अंःतकरणात स्वाभिमानाचा दिव्य प्रकाश पाडला आहे. आणि त्यांनी या गीताच्या सन्मानाकरिता अतुल स्वार्थ त्याग चालविला आहे. अशा वेळी गांधीची 'हरिजन' मध्ये एक अमंगल लेख लिहून एक मुसलमान जरी विरुध्द असला तरी हे राष्ट्रगीत गाईले जाऊ नये, असल्या तऱ्हेची भेकड विचारसरणी प्रदर्शित केलेली आहे आणि अनेक काँग्रेस सरकारांनी त्याचीच री ओढून 'वंदे मातरम्' गीताची गळेचेपी करण्याची निलाजरी पत्रके काढली आहेत. एकच मुसलमान काय परंतु सर्व अहिंदु जगत् जरी विरुध्द गेले तरीही तो विरोध पायाखाली तुडवून वंद् मातरम् हे गीत वेदांतील खुर्चीप्रमाणे अमर ठेवले पाहिजे आणि मला पूर्ण विश्वास आहे की, नवीन तेजाने उत्स्फूर्त झालेले अखिल हिंदु जगत 'वंद् मातरम्' गीताचे प्राण घोटणारे सर्व आसुरी प्रयत्न निष्फळ करुन 'वंद् मातरम्' चा हा मंत्र केवळ हिंदुस्थानातच नव्हे तर प्रसंग येईल तेंव्हा सर्व जगतांत विजयी करण्यास झटेल. अशा आशयाचे भाषण करुन वंदे मातरम् गीताचा ठराव डॉ. सावरकर यांनी मतास टाकला आणि तो एकमताने वंदे मातरम् च्या जय जयकारांत संमत झाला.

थोडक्यात, गांधीजींचे मुस्लीम प्रेम कसे होते तसेच वंदे मातरम गीताला होणरा त्यांचा विरोध डॉ. सावरकरांनी पुढे आणला आहे.

'भागानगर निःशस्त्र प्रतिकारास दादर शिबिरांतून गेलेल्या व सुटका होऊन परत आलेल्या दहा स्वयंसैनिक धर्मवीरांचा डॉ. सावरकर यांनी यथोचित गौरव करुन त्यांना पुष्पमाला अर्पण केल्या. या स्वयंसेवकांत म्हात्रे दादर शिबिरांतील लंगडे सेनापती हेही होते.

शेवटी 'वंद् मातरम्' हे समग्र गंभीर वातावरणात गाईले जाऊन वंदे मातरम् व हिंदु धर्माच्या उत्साहपूर्ण जयजयकारांत ही प्रचंड सभा विसर्जन पावली.

'लो. टिळकांनी महाराष्ट्रात सत्याग्रहाच्या मार्गाचा असा उपदेश सुरु करुन राष्ट्रसभेला नवे धोरण लावण्याचे जाहीर करताच बंगालचे पुढारी बाबू बिपिनचंद्र पाल यांनी संपूर्ण निर्भेळ स्वातंत्र्य हे आमचे ध्येय आणि सत्याग्रह किंवा निःशस्त्र प्रतिकार हे आमचे साधन, असे 'वंदे मातरम्' या पत्रातून जाहीर केले. १८ सप्टेंबर १९०६ च्या अंकात ते लिहितात.

"Our ideal is freedom, which means absence of all foreign control : it is a perfectly constitutional ideal in atrue and higher sense than the mean ingless jargon that is often times presented as such by our old school patriots because it is ingrained in the very make our being. our method is passire resistance, which means anorganised determindation to refuse to render any voluntary and honourary sevice to the government and who will clare say that this ideal and this method are not absolutely legitimate anywhere in civilisation."

अशा प्रकारे संपूर्ण स्वातंत्र्य हे साध्य व सत्याग्रह हे साधन या तत्त्वांवर राष्ट्रीय पक्षाची उभारणी करण्यात लो. टिळक गुंतले असताना गोखले विलायतेतून आपले सहकारी द्रवीड यांना पत्र लिहितात, की तुम्ही न. चि. केळकर यांची गाठ घ्या आणि त्यांच्या मार्फत श्री. टिळक यांना विनवा, की मि. मोर्ले यांच्या मार्गात अडथळे आणू नका व त्यांच्यावर आपला विश्वास नाही. असे जाहीर करु नका."[२१]

**२.९ हिंदुसभा :-**

हिंदुसभावादयांनी हिंदुजातीच्या म्हणजे हिंदुस्थानच्या उध्दाराकरता सांप्रत जो कार्यक्रम आखणे प्राप्त आहे, त्याचा सर्व हेतू हिंदुसभेचे बळ वाढविणे हाच असला पाहिजे. यादृष्टीने काही प्रमुख गोष्टींचा खाली निर्देश केला आहे.

**१) सैनिकीकरण (Militarigation)**

हा कार्यक्रम सध्या हिंदुसभेने पहिल्या प्रतीचा समजला पाहिजे; पण सैनिकीकरणाचा कार्यक्रम तरी कसा आखावयाचा नि पार पाडावयाचा याचा पुष्कळ कार्यकर्ते उलगडा देत नाही. त्याकरता खालील गोष्टी सूचक म्हणून देत आहे.

अ) प्रत्येक जिल्हा, तालुका, नि नगर अथवा ग्रामसभांनी आपापल्या कक्षेत आतापर्यंत किती सैनिक - संख्या अखिल स्पृश्यास्पृश्य हिंदूतून सैन्यात भरती झाली हा शक्य तितका अचुकपणे शोध घेऊन, नावाप्रमाणे नोंदवून हिंदुसभेच्या द्वारे हिंदु नोंदवावे. त्यामध्ये अधिकारी किती, याचीही नोंद असावी. तसेच त्यामध्ये नौकादल, विमानतळ नि भूमिदल यांचीही वर्गवारी शक्य तितकी अचुक नि पूर्णपणे ठेवावी.

आ) या सर्व सैनिकांच्या नातेवाईकांशी हिंदुसभा कार्यकर्त्यांनी ओळख करुन घेऊन, आपलेपणाचे संबंध जोडावे. त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी शक्य ते सहाय्य करावे

म्हणजे हिंदुसभा त्यांची पाठीराखी आहे, असा विश्वास त्यांच्या मनात आपोआप उत्पन्न होईल नि ते हिंदुसभेचे सहाय्यक होतील. तसेच सैन्यात गेलेल्यांची पत्रे, पैसे वगैरे येण्याजाण्यास अनेक वेळा विलंब लागतो. अथवा कधी मिळतही नाहीत. त्यावेळी त्यासंबंधी हिंदु सभा कार्यकर्त्यांनी योग्य अधिकाऱ्याच्या वतीने दाद लावण्याचा शक्यतो प्रयत्न करावा. तिथे अन्याय झाले असतील, त्याची दाद लावावी.

इ) जे सैनिक सैन्यांत गेले असतील त्यांना, शक्य तेथे दसरा, दिवाळी, संक्रांत प्रमुख सणांच्या वेळी, त्या त्या सणाला अनुरुप अशा भेटी हिंदुसभेच्या नावांनी पाठवाव्या. या लहानशा दिसणाऱ्या गोष्टींना परदेशात, लांबलांब गेलेल्या शूर बांधवांना केवढे मोठे समाधान वाटते, केवढी आपुलकी नि केवढा अभिमान उत्पन्न होतो. हे कल्पनेनेही जाणता येण्यासारखे आहे. हिंदुसभा त्या शूर हिंदूंची अशी वारंवार आठवण काढीत आहे हे त्यांनी एकदा अनुभवल्यावर तेही हिंदुसभेस सहसा कधी विसरणार नाहीत.

इ) सैन्यातील हिंदुसैनिकांना देण्याकरिता म्हणून लहान लहान आणि पूज्य गीता संत तुकारामांचे अभंग, स्वामी रामदासाचा दासबोध, मनाचे श्लोक, पांडवप्रताप, रामविजय, पोवाडे वाङ्‌मय, शिवाजीमहाराज, पेशवे, आदिकाळाच्या मराठयांची चरित्रे वगैरे पाठविणे त्यांना स्फूर्तिपद ठरेल. त्याचप्रमाणे देवदेवतांची मराठेवीरांची चित्रेही त्यांना फार आदरणीय वाटतील.[२२]

'कमीत कमी तितक्या तरी प्रकारांची हिंदुसभांनी या शूर हिंदुसैनिकांची वास्तपुस्त केली तर, त्या सहस्त्रावधी वीरांचा नि तेथे असलेल्या त्यांच्या सहस्त्रावधी नातलगांचा जिव्हाळा साहजिकपणे हिंदुसभेकडेच वळेल नि हिंदुसभेच्या सामर्थ्यात त्यामुळे अत्यंत महत्त्वाची नि परिणामकारक भर पडेल.

सैन्यामध्ये गेलेल्या हिंदुविरांची तितकी काळजी नि चिंता हिंदुसभा कार्यकर्ते वाहतात हे जसजसे हिंदुजनतेच्या अधिकाधिक प्रत्ययास येईल, तसतसे हिंदुसभेचे हिंदूना सैन्यात भरती करण्याचे प्रचारकार्य अधिकाधिक सुलभ आणि परिणामकारक होईल. त्याचप्रमाणे सैन्याशी संबंध असलेल्या सर्व सरकारी यंत्राशी हिंदुसभा कार्यकर्त्यांचा निकट संबंध वाढून त्याची शक्य ती अधिक माहिती त्यांना होईल. या योगाने ठिकठिकाणी हिंदुवर ओढवणाऱ्या संकटांना यशस्वीपणे तोंड देता येईल नि

सैनिकी अधिकारीवर्गाशी हिंदुसभा कार्यकर्त्यांचा जसजसा परिचय वाढत जाईल, तसतसे आधिकाऱ्यांवरचे नि स्थानिक संबंधातहि त्यांचे वजन वाढेल, नि त्यामुळे जनतेची अनेक गाऱ्हणी, दुःखे नि अन्याय शक्यतो दूर करण्याची संधी हिंदुसभावाल्यांना मिळून हिंदुजनतेमध्ये हिंदुसभेवरील विश्वास वाढत जाईल.

प्रत्येक हिंदुसभा शाखेने 'सैनिकीकरण' कार्यक्रमाचे प्रतिवृत्त दरमासी आपापल्या वरिष्ठ शाखेकडे नियमाने पाठवीत जावे. त्यातील अडीअडचणीही निवेदन कराव्या नि वरिष्ठ शास्त्रांनीही तत्परतेने अशा अडीअडचणींनाही कर्तव्याकरता शक्य नि अवश्य ते ते सहाय्य नि मार्गदर्शन शाळा सभांना करीत असावे. सैन्यांत गेलेल्या हिंदूची संख्या मात्र शक्य तो अचुक प्रातांच्या हिंदुसभेकडे दरमासी अवश्य पाठविण्यात यावी आणि प्रांताने दर ३ महिन्याने ही संख्या नि बाकीचा त्रोटक वृत्तांत केंद्र हिंदुसभा कार्यालयाकडे पाठवावा युध्द संपल्यावर हिंदुमहासभेने सैनिकीकरणात किती कामगिरी केली आहे.

अशा रीतीने जर हा सैनिकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला, तर त्यापासून आज कल्पना करता येणार नाही इतका लाभ होईल. महाराष्ट्रांतले हिं.स. कार्यकर्ते यावर साधकबाधक चर्चा करुन या सूचनांत अवश्य ते ते अधिक उणे करुन हा अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम यशस्वी करतील. तर हिंदुसभेचे बल वाढविण्यास ते निःसंशय कारणीभूत होईल.'[२३]

स्वातंत्र्यलढयातला सर्वात पहिला पक्ष क्रांतिकारकांचा. टिळकयुग हे क्रातिकारकांचे युग म्हणता येईल. लोकमान्य टिळकांच्या जहाल राष्ट्रीय पक्षातले ज्वलंत जहाल टिळकभक्त असे मोजकेच. त्यापैकी चापेकरबंधू आणि त्यानंतर सावरकरबंधू इंग्रज सरकारने पहिल्या महायुध्दाचे वेळी लष्कर-भरतीसाठी नवी दिल्ली येथे 'इंडियन डिफेन्स फोर्स वॉर लीग' स्थापन केली होती. युरोपातल्या महायुध्दात इंग्लंडला विजय मिळाल्यास, हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल, या आश्वासनावर लोकमान्य टिळकांनी सुशिक्षित तरुणांना सैन्यात शिरकाव करण्यास सांगितले. परंतु टिळकांचा कावा काही निराळाच असावा, असा संशय त्या वेळी इंग्रजांनी घेतला. लष्करभरती होत असताना, देश आपोआपच क्रांतिकारकांच्या मार्गाने जाईल, हे लोकमान्यांचे डावपेच वीर सावरकरबंधूंनी केंव्हाच ओळखले होते. आणि त्यामुळे गणेश, विनायक, नारायण या तिन्ही सावरकरांनी महायुध्दाच्या

पर्वणीची वाट न पाहाता, ब्रिटिश सरकारला नमविण्यासाठी चापेकरबंधूंचाच आदर्श पुढे ठेवून शस्त्रास्त्रांचा मार्ग अंगिकारला.

क्रांतिकारकांना त्या काळी शिक्षा म्हणजे जन्मठेप, नाहीतर देहान्त शासन. सावरकर पिढीजात ज्वलत् जहाल. स्वातंत्र्यदेवतेला प्रसन्न करण्यासाठी, सावरकरबंधूंनी प्रेताच्या तिरडीवर स्वतःला जिवंतपणी बांधून नेले. यज्ञकुंड पेटवले. रणकुंडाचे पौरोहित्यही त्यांनीच केले नि पेटलेल्या ज्वालातून क्रांतीचे नेते धिंग्रा, कान्हेरे, सुभाषचंद्र त्यांनीच निर्माण केले आणि त्यामुळेच भारत स्वतंत्र झाला.

हा झाला घटितांचा इतिहास, सर्वांच्या परिचयाचा आहे. तथापि, त्याचा परिपाक अद्यापि अविकसित अवस्थेतच आहे. राहुरी गावची जहागिरी असलेल्या सुखवस्तु घराण्यातल्या सावरकरबंधूंनी घरातले सोने-चांदी, भगूरची घरे, राहुरीचा इनामी गाव, मुंबई-खार येथील उद्यान बंगला, सर्वच्या सर्व राष्ट्राला वाहिले. परंतु राष्ट्राने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सावरकरांना नि त्यांच्या कुटुंबीयांना काय दिले? चिंता, विवंचना, आणि अक्षम्य उपेक्षा. सावरकरांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी काय गमावले आणि स्वातंत्र्य मिळविल्यावर काय कमावले, याची दखल आमच्या राष्ट्रीय सरकारने कधीतरी घेतली आहे का? सावरकरी घटना इतिहासात निश्चित झाल्या, तथापिक घटितांच्या परिपाकाचे साकार ज्ञान अजूनही सामान्य जनतेपर्यंत पोहोचलेले वाटत नाही.'[२४]

हिंदुस्थानावर परचक्राची भीती निर्माण झाली की, देशाच्या रक्षणासाठी राजकारण्यांना नव्या नव्या शस्त्रास्त्रांची आठवण येते. १९९८ साली भारताने पोखरणला अणुबॉम्बची चाचणी केली. त्याचे पडसाद जगभर उमटले. त्या आधी १९७४ साली याच भूगर्भात पहिला अणुस्फोट पंतप्रधान इंदिराजींनी घडवून आणला होता. त्यानेही जगाला हादरा दिला. इंदिराजींचे कौतुक झाले. वास्तविक, राजकारण्यांना सावरकरांच्या सैनिकीकरणाची, विलायतेतून पाठविलेल्या हत्यारांची, बॉम्ब फॉर्म्युलांची आठवण यायला पाहिजे होती. त्या काळी क्रांतिकारकांनीही बॉंबस्फोट घडवून आणले होते. ऐतिहासिक घटना निश्चित झाल्या, तथापि त्याचा परिपाक अविकसित अवस्थेतच राहिला आहे.

राष्ट्राच्या इतिहासात वेचीव घराणे सावरकरांचे. त्यांच्याशिवाय राष्ट्राचा इतिहास पुराच होऊ शकत नाही. पेशवाई काळापासून स्वातंत्र्याच्या अंतिम

लढयापर्यंत, सावरकर घराण्याने अलौकिक पुरुष देशाला दिले. पहिल्या बाजीरावाच्या विजयापासून दुसऱ्या बाजीरावाच्या पराजयापर्यंत, कंपनी सरकारच्या राज्यापासून स्वराज्याच्या पुनःस्थापनेपर्यंत सावरकर घराण्यातल्या अनेक नरपुंगवांनी या देशाचे रक्षण केले आहे.

विश्वनाथपंत सावरकर ऊर्फ विसाजी हरि, बळवंतराव सावरकर, रामचंद्रपंत सावरकर, परशुरामपंत सावरकर, देशभक्त गणेशपंत सावरकर, स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर आणि डॉक्टर नारायण दामोदर सावरकर, असे अनेक कर्तबगार पुरुष सावरकर घराण्याने राष्ट्राला दिले. राष्ट्राच्या इतिहासात, सावरकर घराण्याला जो मान आहे, त्या पार्श्वभूमीवर विचार केल्यास, त्या यशामागे डॉ. नारायणराव सावरकरांचाही वाटा आहे. परंतु तो अज्ञात अवस्थेतच ठेवला गेला. रियासतकारांना ठोस घटितांचाच इतिहास दिसला, सर्वंकष परिपाक विकसित करण्यात त्यांना सवड झाली नाही. परिणाम, वस्तुनिष्ठतेचे यथार्थ दर्शन सामान्य जनतेला अद्यापि झालेले नाही.

सांगलीच्या 'डॉ. सावकर-स्मृतिसंचय' (१९८६) च्या संपादिका शशिकला पटवर्धन यांनी नेमके याच मुद्दयावर बोट ठेवले आहे. त्या म्हणतात-

'स्वातंत्रतेच्या यज्ञवेदीवर सावरकरबंधू व त्यांचे कुटुंबीय यांच्या आयुष्यातील कितीतरी वर्षाच्या समिधा पडल्या. त्यापैकी स्वातंत्र्यवीर सावरकरच जनतेचे हृदयसम्राट झाले. त्यांनी सुरु केलेला यज्ञविधी पूर्णत्वास नेण्यासाठी जी अणुरेणूपासून ब्रम्हांडापर्यंत सिध्दता करावी लागते, त्या सिध्दतेत क्रांतिवर गणेश सावरकर यांचाही जसा वाटा होता, तसाच त्यांचे धाकटे बंधू डॉ. नारायणराव सावरकर यांचा फार मोठा पण अज्ञान वाटा होता. आज आमच्या पिढीला गरज आहे ती अशा चरित्रनायकाची.'

अंध गौरव भावनेच्या आहारी न जाता, समीक्षकाच्या त्रयस्थ भूमिकेतून जरी पाहिले तरी डॉ. नारायणराव सावरकरांचे जीवन त्याग, तितिक्षा, सेवा, ज्वलंत राष्ट्रभक्ती यांनी परिपूर्ण दिसेल हे प्रबोधन, वाचकांनी आणि सर्वांनीच घेऊन यथाशक्ती आपल्या हिंदु राष्ट्रास योगदान केले, तर हा ग्रंथ सार्थकी लागेल.'[२५]

## तळटिपा

१) गोडबोले अरविंद, 'सावरकर विचार दर्शन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८३, पृष्ठ - १५.

२) कानिटकर रा.प्र., 'क्रांतिच्या ज्वाला', चित्रशाळा प्रेस, प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, १९६७, पृष्ठ - १५.

३) कर्वे निर्मला, 'हरिदिनी', लाखे प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती १९८५, पृष्ठ - २४, २५.

४) बेनोडेकर विप्रदास, 'डॉ. सावरकर आठवणी', संग्राहक माधवराव सातवसे, पृष्ठ - १३, १४.

५) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर', मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००२, पृष्ठ - ५०.

६) कित्ता; पृष्ठ - ५१.

७) कित्ता; पृष्ठ - ५३, ५४.

८) कित्ता; पृष्ठ - ५६, ५७.

९) कित्ता; पृष्ठ - ६२.

१०) कित्ता; पृष्ठ - ६३.

११) 'केसरी', १ मार्च १९४६, पृष्ठ - ३,४.

१२) 'झुंजार ताश्कंद' विशेषांक, पृष्ठ - ४,५,६.

१३) जजमेंट ऑफ स्पेशल ट्रायब्युनल, २५/१२/१९१० 'पोलीस फाईल्स', हायकोर्ट ऑफ ज्युडिकेचर, मुंबई, आर्काईव्ह सरकारी खाते, मुंबई. पृष्ठ - २९.

१४) सावरकर शांताराम, 'मुंबई हायकोर्ट स्पेशल ट्रायब्युनल जजमेंटचा मराठी अनुवाद', पृष्ठ - ३७.

१५) सावरकर ना.दा.,'स्मृतिसंचय' क्रांतीवीर बाबाराव सावरकर स्मारक मंडळ, सांगली, १९८४-८५, पृष्ठ - ११.

१६) 'दैनिक अग्रणी', ९ जानेवारी १९४५, पृष्ठ - ४.

१७) कित्ता; पृष्ठ - ५.

१८) 'प्रभात', मंगळवार, १४ मे १९३५, पृष्ठ - २.

१९) कित्ता; पृष्ठ - ३.

२०) 'केसरी', शुक्रवार, २८ जुलै, १९३९, पृष्ठ - ५.

२१) जावडेकर श.द., 'आधुनिक भारत', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे - ३०, प्रथम आवृत्ती, १९३८, पृष्ठ - ३०१.

२२) 'विक्रम', शनिवार, २५ मार्च १९४४, पृष्ठ - ३, ४.

२३) कित्ता; पृष्ठ - ५.

२४) वेलकर प्रताप,'तिसरा सावरकर', उपरोक्त, पृष्ठ - २७८.

२५) कित्ता; पृष्ठ - २७९.

# प्रकरण तीसरे

# वृत्तपत्रीय कार्य

# प्रकरण तीसरे

## वृत्तपत्रीय कार्य

### ३.१ प्रस्तावना :-

मराठी वृत्तपत्रांची सुरुवात झाली आणि त्या नंतरच्या तीस वर्षाची जी वाटचाल पाहिली त्यात 'ज्ञानप्रसार' आणि 'ख्रिस्त धर्मप्रसार' व त्यांची प्रतिक्रिया म्हणून हिंदू धर्माच्या बाजूने झालेले संरक्षणात्मक प्रयत्न या दोन प्रेरणा प्रमुख होत्या. १८४० ते १८६० या वीस वर्षाच्या काळात हिंदू समाजरचनेत हजारो वर्षाच्या परंपरेने दृढत्त्व पावलेली व समाजाच्या दृष्टीने अनिष्ठ प्रथेस आळा घालण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८२९ ला 'सती' सारख्या रानटी चालींना आळा घालण्याचा कायदा पास केला. १८५० साली धर्मांतर करणाऱ्यांना वडिलार्जित संपत्तीचे भागीदार बनविणारा कायदा सर्व हिंदुस्थानात लागू करण्यात आला.

१८५३ साली रेल्वे सुरु झाली आणि जाति-भेदाच्या भिंतीला धक्के बसू लागले. १८५६ साली विधवा विवाहाचा कायदा झाला. १८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्यामुळे पाश्चात्य-विद्येच्या अभ्यासाला चालना मिळाली. शिक्षण कनिष्ठातल्या-कनिष्ठापर्यंत पोहचविण्याची तत्त्वतः व्यवस्था झाली. सामाजिक प्रश्नाचे रण हे प्रामुख्याने पांढरपेशापुरतेच मर्यादित होते. बहुजन समाज व त्यापलिकडील असलेला दलित वर्ग यांच्या सामाजिक व अन्य प्रश्नांची जाणीवही फारशी निर्माण झाल्याचे आढळत नाही. पण प्रस्थापित पांढरपेशा म्हणजे ब्राम्हणवर्गाविरुध्द बंड करुन उठणारा एक तिसरा प्रवाह बहुजन समाजातून याच काळात पुढे आला. हा प्रवाह महात्मा जोतिबा फुले यांनी प्रवर्तित केला. सत्यशोधक समाजाचा ब्राम्हण वर्गाविरुध्द बंड करुन उठणारा हा प्रवाह होता. या प्रवाहाद्वारा समाजातल्या फार मोठया उपेक्षित वर्गाची वेदना बोलकी झाली. सुधारणावाद्यांपैकी काहींनी या प्रवाहाकडे सहानुभूतीने पाहिले. पण त्यापलीकडे काही प्रत्यक्ष कृती करण्याइतपत त्यांची दृष्टी गेली नाही. नव्या इंग्रजी शिक्षणाचा लाभ ठेवणारा पांढरपेशा म्हणजे प्रामुख्याने ब्राम्हणवर्गच होता. महात्मा जोतिबा फुले यांनी चालना दिलेल्या सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीचा वृत्तपत्रांच्या क्षेत्रात उठलेल्या पडसादांची आवर्जून दखल घेतली पाहिजे.

पुण्यात 'केसरी' आणि 'काळ' ही पत्रे जोमात चालू होती व त्यांची लोकप्रियताही भरपूर होती. 'काळा'तील तेजस्वी लेखांनी तरुणवर्ग भारुन गेला होता व 'केसरी'लाही मागे टाकेल अशी एक वेळ परिस्थिती होती. ह.ना. हापटे यांचे 'करमणूक' पत्र पुण्यात चालू होते. आणि जुन्या 'ज्ञानप्रकाश'चा जोम संपलेला नव्हता. पुण्यात अशी पत्रे चालू असता, विशेषतः 'केसरी' व 'काळ' ऐन जोमात असताना त्याच परंपरेशी नाते सांगणारे 'भाला' पत्र काढण्याचे धाडस दाखवून आपल्या स्वतंत्र वैशिष्टयाने त्यालाही लोकांत स्थान मिळवून देण्याचे कर्तृत्व भास्कर बळवंत भोपटकर यांनी दाखविले. त्या काळाचा विचार करताना, 'भाला' पत्र आणि 'भालाकार' म्हणून ख्यातनाम झालेले भा.ब. भोपटकर यांचेही स्मरण केल्याखेरीज पुढे जाता येणार नाही.

क्रांती आणि बॉंब यांचा जसा निकटचा संबंध आहे, त्याचप्रमाणे वृत्तपत्रे आणि क्रांती यांचा संबंध अविभाज्य आहे. वृत्तपत्रातील प्रचारामुळे क्रांतिकारकांना स्फूर्ति मिळते, तर देशात असंतोष पेटवून क्रांतीची भूमिका निर्माण केल्याबद्दल वृत्तपत्रांना दडपशाहीचा लाभ होतो. हिंदुस्थनात ज्या-ज्या वेळी वृत्तपत्रावर दडपशाही झाली आहे, त्या-त्या वेळी देशात क्रांतिकृत्ये घडून आली आहेत, असे दिसून येईल, त्याचप्रमाणे वृत्तपत्रांनी जे जे प्रामाणिकपणे लिहिले, त्याबद्दल त्यांनाही शासनसंस्थेने आपले रौद्रस्वरुप दाखविल्याशिवाय सोडले नाही. जनतेच्या मनात राजद्रोहाची बीजे रुजविण्याचे कार्य वृत्तपत्रेच करतात. अशा भावनेने सरकार वृत्तपत्रावर अधिक वक्रदृष्टी ठेवते. वृत्तपत्रावरील खटले यांची जणू काय एक अखंड साखळीच आहे. ही मालिका कशी सुसूत्रपणे चालू होती.

**सन १८९७ 'केसरी' (पुणे) लोकमान्य टिळकांना १८ महिने शिक्षा :-**

सन १८९९ 'गुराखी' (मुंबई) ल.ना.जोशी यांना ६ महिने शिक्षा

सन १९०० 'कालिदास' (काशी) संपादक कृ.आ. गुरुजी यांना १ वर्षे साधी केंद्र.

'भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात व राष्ट्रीय वृत्तपत्रीय सृष्टीत 'श्रध्दानंद' सप्ताहिकाला त्या काही अनन्यसाधारण स्थान मिळवून दिले. परखड विचारदर्शन हे 'श्रध्दानंद' चे प्रमुख कार्य होते. १० जानेवारी १९२७ ला प्रथम स्टॉलवर आला व १० मे १९३० ला त्याचा शेवटचा अंक निघाल्यावर तो बंद पडला. सुमारे साडेतीन वर्षाच्या अल्पकाळात 'श्रध्दानंद' ने चिरंतन कामगिरी करुन ठेवली.

त्यातील लिखाण इतके गाजले की, बहुतेक लेखांची हिंदी, सिंध्दी, पंजाबी,गुजराती इ. भाषांतून भाषांतरे झाली. बॅ. सावरकर, रत्नागिरी स्थानबध्दतेतून 'श्रध्दानंद'साठी खास लेख पाठवीत. त्यातील अव्वल दर्जाला वृत्तपत्रसृष्टीत दुसरी तोड नव्हती. 'श्रध्दानंद' च्या मागे गणेश सावरकरांचे परिश्रमही मोठया प्रमाणात कारणीभूत झाले. 'श्रध्दानंद' साप्ताहिकाला आर्थिक स्थैर्य लाभावे म्हणून गणेश सावरकरांनी शेअर्स काढून जागोजागी जाऊन त्यांची विक्री केली.'[१]

डॉ. सावरकरांचे 'श्रध्दानंद' मधील लिखाण व संपादकीय योगदान मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात जिवंत राहील, इतके ते महत्त्वपूर्ण आहे.'[२]

'सन १९२४ साली अंदमानातून मुक्तता झाल्यावर सावरकरबंधूंनी काय केले असेल, तर महात्मा गांधींच्या राष्ट्रविघातक धोरणाविरुध्द धडक मारली. गांधींनी अफगाणिस्थानच्या अमानुल्लाखानला हिंदुस्थानवर स्वारी करण्यासाठी ब्रिटिशांच्या विरुध्द पाचारण केलेले पाहून सावरकरबंधू अस्वस्थ झाले. जुना इतिहास पहाता राजा जयचंदचाच कित्ता गांधी गिरवित होते. राजा जयचंदने महमंद घोरीला हिंदुस्थानात आमंत्रण देऊन हिंदूंचे राज्य बुडविले. प्रतिस्पर्धी पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव करण्यासाठी महंमद घोरीला आमंत्रण दिले आणि तेंव्हापासून हिंदुस्थानात मुसलमानांचा शिरकाव झाला. राजा जयचंदने आपसातील स्पर्धेला बळी पडून हे कृत्य केले. त्याला भावी परिणामांची कल्पना नव्हती. परंतु गांधींना ती होती. हिंदुस्थानचे हिंदुत्व नष्ट करुन त्याला इस्लामी बनविण्याची आकांक्षा, महंमद घोरीनंतर सर्वच परकीय इस्लामी आक्रमकांनी काटेकोरपणे पाळली, हे गांधींसारख्या जाणकार नेत्याला माहीत होते. इतके असूनही म. गांधींनी अमानुल्लाखानाशी कट केला व त्याला आमंत्रण देऊन स्थानीय हिंदु-मुसलमान ऐक्याचा खोडा प्रगतिशील राष्ट्राच्या पायात कायमचा अडकवून ठेवला. सावरकरबंधूंच्या मनात संतापाची लाट उसळणे स्वाभाविक होते.'[३]

'गांधी-अमानुल्ला कटाचे कारस्थान, आर्यसमाज नेते कट्टर हिंदुत्ववादी स्वामी श्रध्दानंद यांनी सर्वप्रथम 'लिबरेटर' या अंकात उघडकीला आणले. 'हिंदूंचे शुध्दीकरण' करण्याची चळवळ स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानच्या कारागृहात सुरु केली होती, त्याच धर्तीवर स्वामी श्रध्दानंदांनीही इतर धर्मात गेलेल्या पुनश्च

हिंदुधर्मात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न उत्तर प्रदेशात चालू केले होते. सावरकरांची सुटका झाली आणि हया कार्याला वेग आला.

१९२५ साली स्वामी श्रध्दानंदांनी हजारो मलकानी रजपुतांना इस्लाम धर्मातून परत हिंदु धर्मात दाखल करुन घेतले. ते पाहून एका मुसलमान माथेफिरुने दिल्ली येथे स्वामी श्रध्दानंदांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्यावर हल्ला केला. स्वामी खाटेवर विश्रांती घेत पडलेले असताना बेसावधपणे त्यांचेवर पिस्तुलातून लागोपाठ पाच गोळया झाडल्या व त्यांचा खून केला. (२३/१२/१९२६) एकीकडे परकीय, मुसलमान सत्तेशी कारस्थाने करीत गांधीजींनी दुसरीकडे स्वधर्मातील हिंदु जनतेला पाठिंबा देण्याऐवजी स्वामीजींचा खून पाडणाऱ्या अब्दुल रशीदच्या कृत्याचा निषेध न करता 'भाई रशीद' म्हणून त्याला चुचकारिले, हे गांधीचे कृत्य स्वधर्माची, स्वराष्ट्राची, धूळधाण करणारे होते. त्यामुळे साऱ्या देशभर संतापाची लाट उसळली.

स्वामीजींचे खरे स्मारक, त्यांचे कार्य चालू ठेवण्यानेच होणार म्हणून, कार्य नेटाने चालू राहावे यासाठी, सावरकरबंधूंनी 'श्रध्दानंद' नावाचे वृत्तपत्र चालू केले. ओजस्वी विचारांचे, हिंदुत्वनिष्ठ लेखकांमुळे वृत्तपत्रसृष्टीत अद्वितीय ठरलेल्या 'श्रध्दानंद' या प्रचारपत्राचे संपादन डॉ. नारायणराव सावरकरांनी साडेतीन वर्षे सांभाळले.'[४]

**३.२ आदर्श वृत्तपत्र 'श्रध्दानंद' :-**

श्रीस्वामी 'श्रध्दानंद' यांचे वृत्तपत्रीय स्मारक म्हणून सावरकरबंधूंनी 'श्रध्दानंद' दैनिक व पुढे साप्ताहिक म्हणून चालू ठेवले हेते. त्यातील लिखाणाने, भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात व राष्ट्रीय वृत्तपत्रीयसृष्टीत 'श्रध्दानंद' साप्ताहिकाला त्या काळी अनन्यसाधारण स्थान मिळवून दिले. परखड विचारप्रदर्शन हे 'श्रध्दानंद' चे प्रमुख कार्य होते. 'श्रध्दानंद' १० जानेवारी १९२७ ला प्रथम स्टॉलवर आला व १० मे १९३० ला त्याचा शेवटचा अंक निघाल्यावर तो बंद पडला. सुमारे साडेतीन वर्षाच्या अल्पकाळात 'श्रध्दानंद' ने चिरंतन कामगिरी करुन ठेवली. त्यातील लिखाण इतके गाजले की बहुतेक लेखांची हिंदी, सिंधी, पंजाबी, गुजराती इ. भाषांतून भाषांतरे झाली. बॅ. सावरकर, रत्नागिरी स्थानबध्दतेतून 'श्रध्दानंद' साठी खास लेख पाठवित. त्यातील अव्वल दर्जाच्या वृत्तपत्रसृष्टीत दुसरी तोड नव्हती. 'श्रध्दानंद' च्या मागे गणेश सावरकरांचे परिश्रमही मोठया प्रमाणात कारणीभूत झाले. 'श्रध्दानंद'

साप्ताहिकाला आर्थिक स्थैर्य लाभावे म्हणून गणेश सावरकरांनी शेअर्स काढून जागोजागी जाऊन त्यांची विक्री केली.'[५]

**सावरकरबंधूंचे अद्वितीय लेख :-**

क्रांतिवीर गणेश सावरकरांची लेखमाला, 'युध्दाचे वारे नि हिंदुस्तान' हयाच 'श्रध्दानंद' मध्ये प्रकाशित झाली होती आणि ती सर्वत्र गाजली. 'एकटे हिंदुही स्वराज्य मिळवू शकतील'. 'जो दर्शनाने बाटतो तो देवच नव्हे' 'जळत्या चितेतील ठिणग्या' 'मुसलमान हो, तुम्हाला हवे तर या, आमच्यावर उपकार करण्यासाठी नको', 'संख्याबळ हे एक बळच आहे'. तसेच 'शुध्दिसंटनेची चळवळ', 'भाषाशुध्दी', 'सोलापुरी', 'गरमागरम चिवडा' वगैरे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे लेख हयाच 'श्रध्दानंद'त झळकले. दिनांक, आकाशवाणी, चित्रपट हे सारे शब्द विनायक सावरकरांच्या 'श्रध्दानंद' मधल्या भाषाशुध्दी चळवळीमुळे रुढ झाले. संपादक डॉ सावरकरांचा, 'दुसऱ्यांच्या सिंहासनाची उठाठेव करना, तुमचे सिहासन कोठे आहे, हा ज्वलंत लेख, तर 'उपरोध नि वक्रोक्ती' यांच्या समवेत राष्ट्रीय पुरुषार्थीला आव्हान' वगैरे लेखांनी 'श्रध्दानंद' हा हिंदुत्वाचा अमोल सेवक होता. नागपूर, कानपूर निजामस्थान, जंजीरा, काश्मीर इत्यादी ठिकाणी मुसलमानांच्या दंग्याधोप्यावर पहारा ठेवणारा तो जागल्या होता.

'स्वराज्यासाठीच संघटन हवे' डॉ. सावरकरांचा तो अग्रलेख 'श्री छत्रपतींचा त्रिशत सांवत्सरिक जन्मोत्सव दि. ३ मे १९२७ रोजी आला. 'श्रध्दानंद'चे संपादक डॉ. नारायणराव सावरकर त्या त्रिशत महोत्सव समितीचे सरचिटणीस होते. परंतु प्रत्यक्ष महोत्सव प्रसंगी, श्रीशिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषाच्या मिरवणुकीला तत्कालीन इंग्रज सरकारने मानहानिकारक जाचक अटी घातल्या. डॉ. सावरकरांचे पित्त खवळले. श्रीशिवाजी महाराजांच्या त्रिशत जन्मोत्सवसारख्या कार्यक्रमावर इंग्रज सरकारची वक्रदृष्टी व अल्पसंख्याकांशी नरमाईचे धोरण पाहून 'श्रध्दानंद'ने दिनांक २५ मे १९२७ ला कडक भाषेत अग्रलेख खरडला. सरकारी धोरणावर सडकून टीका केली व अल्पसंख्याकांचे वाभाडे काढले. डॉ. सावरकर 'श्रध्दानंद'त लिहितात.

''ज्यांत स्वत्व अबाधित राहू शकते ते स्वराज्य' 'ज्यांत आम्हास प्राणापलीकडे प्रिय असलेले आमचे स्वत्व, आमचे हिंदुत्व आम्हांस सोडावे लागते किंवा त्याच्या सन्मानाचा ध्वज अहिंदूचे, पायावर नमवावा लागतो, ते आम्हा हिंदुचे स्व-राज्यच

नाही! ते मुसलमानी राज्यच होय. आमच्या स्वत्वाप्रमाणे मुसलमानांसही न्याय अधिकार मिळून त्यांचे स्वत्वही न्याय्य स्वत्त्व ज्यांत राखले जाईल, अशा स्वराज्यास आम्ही आपली निष्ठा अर्पण करु किंबहुना संघटनाचे हेच ध्येय आहे'.[६] थोडक्यात, डॉ. सावरकरांनी विनायक सावरकरांची हिंदुत्वाची व्याख्या 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हे या लेखातून दाखविले.

**३.३ 'श्रध्दानंद' मधील डॉ. सावरकरांचे तेजस्वी विचार :-**

बुध्दिबळ व शरीरबळ हया दोहोंचा योग्य मिलाफ झाल्याशिवाय कोणत्याही समाजाचे, कोणत्याही धर्माचे, संस्कृतीचे, परंपरेचे व अब्रूचे संरक्षण होणे शक्य नाही. हिंदुधर्मावर समाजावर अन्य धर्माकडून वारंवार हल्ले होत आहेत. अशा स्थितीत प्रत्येक हिंदूने जागोजागी व्यायामशाळा स्थापन करुन आपले सामर्थ्य वाढविण्याचे कसोशीने प्रयत्न करावे. विशेषतः हिंदु तरुणांनी ठिकठिकाणी आपले संघ स्थापन करुन हिंदुसमाजाचे व हिंदु धर्माचे संरक्षण करण्यास सिध्द व्हावे. ८४ कोटी योनीनंतर मनुष्य जन्म लाभतो, हयावर तुमचा विश्वास असेल तर तुम्हासही राष्ट्र, देश, समाज हयांचे ऋण फेडले पाहिजे. पतित झालेली राष्ट्रे उदयास आणण्याकरता सामने करावे लागतात. शक्तीची तुलना होते, तेव्हा उन्नती होते. धर्मजालासुध्दा स्वराज्य मिळविण्याकरता अठरा अक्षौहिणींची आहुती देऊन शक्तीची चुणूक दाखवावी लागली. ही चुणूक दाखविल्याविना निःश्रेयस प्राप्त होत नसते हे विसरु नका. आलेल्या गुंड लोकांच्या आपत्तीचे निरसन हया शक्तीनेच होणार आहे. ज्याच्या मनगटात जोर आहे, त्याला मान आहे. मुसलमानी संकटांशी व परकीय सत्तेशी तोंड कसे देणार.

गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी मजकूर छापून लोकांचे रंजन डॉ. सावरकर करीत नसत. डॉ. ना. दा. सावरकरांचे 'श्रध्दानंद'मधील अग्रलेख ओजस्वी विचारांचे, ऐतिहासिक दाखल्यांनी भरलेले, काव्यमय भाषेत लिहिलेले असत. राजकारणात वावरुनही डॉ. सावरकरांचे साहित्य दर्जेदार होते. काव्यमय भाषेबरोबर प्राचिन इतिहासाचे ज्ञान, पुरातन संस्कृतीची माहिती, त्यात दिलखुलास विखुरलेली असे. एवढे असूनही त्यांनी केलेल्या साहित्य-सेवेची सविस्तर माहिती तितकीशी उपलब्ध नाही. त्यांनी पाच पुस्तके लिहिली. 'जाईचा मंडप', 'मरण की लग्न', 'समाजरहस्य' या तीन कादंबऱ्या व हिंदुत्त्व आणि हिंदुपतपातशाही या दोन ग्रंथाचे मराठी अनुवाद

केले. आज त्यांच्या तिन्ही कादंबऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये उपलब्ध आहे. विनायक सावरकरांच्या आत्मचरित्रामुळे क्रांतिवीर बाबाराव सावरकरांच्या चरित्रमुळे 'श्रध्दानंदा'तील उपलब्ध अंकामुळेच डॉ. सावरकरांचे कार्य अंशतः प्रकाशझोतात येऊ शकले, आणि वालचंद कोठारी यांच्या साहित्य सेवेची माहिती मिळू शकली.[७]

क्रांतिवीर बाबाराव सावरकर चरित्रकार द. न. गोखले, डॉ. सावरकरांच्या संपादकीय लेखनाविषयी लिहितात "मराठी वृत्तपत्रसृष्टीत 'श्रध्दानंदा'च्या साऱ्या कामगिरीला दुसरी तोड नव्हती', खरोखर डॉ. सावरकरांनी त्यावेळी आपली लेखणी गाजविली आणि घुमविली. 'श्रध्दानंद' महाराष्ट्राला सांगणारा तो भाट होता. नागपूर, कानपूर, निजाम संस्थान, जंजिरा, काश्मीर इत्यादी ठिकाणी मुसलमानांच्या दंग्याधोप्यांवर पहारा देणारा तो जागल्या होता. 'श्रध्दानंद' हा हिंदुत्वाचा अमोल सेवक होता, त्याने 'आसिंधु', 'सिंधुपर्यंता' इत्यादी हिंदूची व्याख्या पुकारली, प्रचारली, कुंडलिनी-कृपाणांकित अखिल हिंदुध्वजाची कल्पना प्रथम हिंदुस्थानला सांगितली. नेपाळी आंदोलनाचे रणशिंग प्रथम फुंकले आणि ते आंदोलन जवळ-जवळ यशस्वी करीत आणले. गांधीच्या अहिंसावादावर नि हिंदु-मुसलमान ऐक्याच्या खुळावर सतत ठोके देणारा तो घनघावच होता, प्रत्याघाताचे धैर्य हिंदूंत नाही, असे समजू नका', ज्यात स्वत्व रहाते तेच स्वराज्य. आततायी बळाचा बळाने प्रतिकार करणे हा अत्याचार नव्हे, तो सदाचार आहे', 'पाहिजे तर शस्त्राधारी म्हणा, पण अत्याचारी नव्हे', इत्यादी लेखांनी गांधीवादाचे कंबरडेच मोडून ठेवले. श्रध्दानंदने गांधीच्या राजकीय विचारावर प्रहार केला.

'श्रध्दानंद' केवळ अहिंसेला भ्याड म्हणून थांबला नाही, तर त्याने क्रांतिविचारांच्या सतत झडपण्याने हिंदूंच्या प्रतिकारशक्तीचा निखारा फुलवत ठेवला. काकोरीचे क्रांतिकारक वि.ग पिंगळे, भुसावळचे क्रांतिकारक, प. श्यामजी कृष्णवर्मा, सेनापती अवारी, आंध्रवीर रामराजू, भंगतसिंग दत्त नि त्यांचे सहकारी इत्यादी कित्येक क्रांतिवरांची चरित्रे 'श्रध्दानंदा'ने प्रसिध्द केली. 'जुळत्या चितेतील ठिणग्या' हे सदर केवळ क्रांतिकारकांची चरित्रे सांगण्यासाठीच काढलेले होते.

'श्रध्दानंदांच्या या साऱ्या कामगिरीला मराठी वृत्तसृष्टीत दुसरी तोड नव्हती. 'श्रध्दानंदा'ने थोडयाच काळात इतका पल्ला गाठला की, त्याची हिंदी आवृत्तिसुध्दा एप्रिल १९२८ मध्ये निघायला लागून काही काळपर्यंत चालली! 'श्रध्दानंदा'तील

बहुतेक लेखांची भाषांतरे सिंधी, पंजाबी, हिंदी, गुरखाली इत्यादी भाषांमधून झाली. या भाषांतरामुळे 'श्रध्दानंदा' च्या तुतारीचे पडसाद थेट नेपाळी पहाडान आणि काश्मीरच्या नंदनवनात उमटले. खरोखर गाजवली त्यावेळी डॉक्टर सावरकरांनी लेखणी आणि घुमवली हिंदुत्वाची साद घरोघर!"

डॉ. सावरकरांचे ' श्रध्दानंद' मधील लिखाण व संपादकीय योगदान मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात जिवंत राहील, इतके ते महत्त्वपूर्ण आहे.'[८]

एक संपादकीय नमुना

म्हण - शिवेन!स्वीकारीन !!

अमर्षशून्येत जनस्थ जन्तुना |

न जानहार्देन विव्दिषादरः ||

'आपल्या जातीच्या, राष्ट्राच्या आणि धर्माच्या गौरवासाठी आणि कल्याणसाठी झटत असता हुतात्मा श्रध्दानंद मारिले गेले. केवळ आपण हिंदूंसाठी मारिले गेले.त्या आम्हांस त्यांच्या मृत्यूचा सूड जर घेता आला नाही, तर आमच्यासाठी आमचे पुढरीपण स्वीकारुन झुंजण्यास पुन्हा कोणी तरी सिध्द होईल काय, ज्या सेनेने पुढाऱ्यांच्या पुढे तर राहोच, पण मागोमाग जाण्यासही भिणारे आणि जो'एकही बाण न सुटला नाही. अदयापि झळकला सदसि' तोच वीरांच्या पहिल्या ललकारीसरशीच शेपटया घालून पळ काढणारे भेकडच भेकड भरलेले असतात, त्या सेनेचे आधिपत्य स्वीकारण्यास कोणता सेनानी सिध्द होणार आहे, सिंहगडावर शत्रूच्या वारासरशी विव्हळ होऊन पडलेल्या तानाजीस पहाताच, जेव्हा मराठी सैन्य धैर्य सुटून उधळून जाते की काय, असे दिसले, तेव्हा त्याचा प्रत्यक्ष भाऊ सूर्याजी त्यांस थोपवून म्हणाला की, 'जाता कोठे? हा तुमचा बाप येथे मरुन पडला आहे ना" त्यासरशी ते सैन्य उलटले व तानाजीचा सूड घेतला गेला. पराजयाचा विजय झाला, गडाचा सिंहगड झाला! म्हणूनच आपण पडलो तरी आपले कार्य चालविणारे शेकडो वीर आपल्या रक्ताची शपथ घेऊन पुढे होतील, आपला सूड उगवतील आणि आपल्या शत्रूस आपणांस मारल्याची प्रौढी सांगण्याची छातीदेखील होऊ नये, असा वचपा काढून आपले कार्य सिध्दीस नेतील, अशी निश्चिती महाराष्ट्र मंडळात ज्यांच्या हदयात उत्पन्न झाली आणि एकासारखे एक आधीच आणि तो विजयदुर्ग आपल्या राष्ट्रास चढता यावा म्हणूनच वाटेवरील प्रयत्नांच्या खिंडीतच आपले कर्तव्यासाठी

प्रावत्याग करुन गेले. आपल्यावर झालेल्या आततायी आघाताचा प्रतिकार केलाच पाहिजेत, हाच आमचा रामदासीय बाणा आहे.

हिंदू लोकांमध्ये जे जे कोणी श्रध्दानंद मेले असताही हसत खेळत बसले असतील, तळमळत नसतील, संसाराच्या घरकोंबडेपणात गुंतले असतील, त्यांस आम्ही त्याच सूर्याजीच्या शब्दांत सांगतो, " अरे करतोस काय, हा आपला बाप येथे मरुन पडला आहे ना ! ऊठ !! प्रथम त्याचा सूड उगविलाच पाहिजे, सूड.

श्रध्दानंद तुझ्यासाठी मेले हे हिंदुमाला, तू हाडाचा हिंदु असशील तर त्यांचा सूड उगविलाच पाहिजे आणि तो केवळ इच्छामात्रे करुन उगविता येण्यासारखा आहे.[९] थोडक्यात, आपल्या पुढील पीढीला प्रेरणा देता येईल अशा शूर वीरांचे त्यांनी कौतुक केले आहे.

म्हण की जो माझा हात मी कुत्र्याचे पाठीवर प्रेमाने फिरवतो, तो माझा हात मी मातृप्रमाणे माझ्या अस्पृश्य गणल्या गेलेल्या हिंदुधर्मीयांचे - माझ्या रक्ताच्या, राष्ट्राच्या भावांचे पाठीवरुन फिरवीन, म्हण शिवेन, की अस्पृश्यता मेली आणि तुझ्यापुरता तू श्रध्दानंदाचा अर्धा सूड उगविलास.

निश्चय कर मी शुध्दीकृत हिंदूस ममत्वाने "तू माझा म्हणून त्याला म्हणेन. म्हण स्वीकारीन ! ही शुध्दी दृढमूल झाली आणि तू तुझ्यापुरता तरी श्रध्दानंदांचा पुरता सूड उगविलास.

तरी श्रध्दानंदाच्या रक्ताची शपथ आहे, हे हिंदुमाला आता 'आज ' तू हे दोन्ही शब्द मनःपूर्वक उच्चार की , " शिवेन, आणि स्वीकारीन, या दोन शब्दांच्या मनः पूर्वक उच्चारासरशी श्रध्दानंदाचा आत्मा संतुष्ट होईल आणि इतक्याने शत्रूंचा जितका भयंकर सूड उगविला जाईल तितका दुसऱ्या कोणत्याही संतप्त कृत्याने होणार नाही.

इतके महान कर्तव्य इतके स्वस्त कधीही झाले नव्हते. म्हणून इतके तरी कर, हे सर्वस्वी तुझ्या हातचे आहे, म्हण शिवेन! व स्वीकारीन.[१०] थोडक्यात, जातिभेद करु नका, दलितांना जवळ करा, त्यांना मायेने जवळ करा, यातच आपल्या देशाचे ऐक्य व हित आहे.

**लोकमान्यांचे पुण्यस्मरण :-**

" संकटे येति जो गहन | तो चढे त्यासि अवसान ||

गेला पंधरवडा लोकमान्याच्या पुण्यस्मरणाने सर्व हिंदुस्थान व विशेषतः महाराष्ट्र यांमध्ये सारखा गाजत आहे. प्रत्येक राष्ट्रामध्ये विशेषतः त्या राष्ट्राच्या आपत्तीच्या काली असले राष्ट्रपिते निर्माण होत असतात व त्यांच्याच कर्तृत्वाने पतित राष्ट्रांचा उध्दार होत असतो. त्यावेळी सबंध हिंदुस्थानभर ब्रिटिश सत्तेचा जिकडे तिकडे जयजयकार चालला होता व पारतंत्र्याच्या शृंखलांची लाज न वाटता ते जणू एक अभिमान स्पद लेणेच आहे, अशा डौलाने त्या शृंखलांचा आवाज आणि त्यांचे प्रदर्शन सर्व जगासमोर करण्यात सर्व राष्ट्र चूर झाले होते, ब्रिटिश लोक हे परके आहेत. आणि त्यांची सत्ता हे पारतंत्र्य आहे ही जाणीव तर राहोच, परंतु ब्रिटिश लोक हे देवदूत आहेत. आणि केवल कृपाल परमेश्वराच्या संकेताने व आज्ञेने त्यांच्या थंड देशातून एवढे मोठे सात समुद्र ओलांडून हया उष्ण कटिबंधात हया मागासलेल्या हिंदुस्थान देशाला उन्नत करण्याकरता इकडे आले आहेत, असे मानणारांचा मनु ज्या वेळी सुरु होता, त्या वेळी लोकमान्यांची कामगिरी सुरु झाली. प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी या खुळचट कल्पनेला आपल्या अमोघ लेखनाने तिलांजलि दिली होती. आणि तरीही सरकारविरुध्द झगडा तर दूरच राहो, परंतु सरकारने अमके कृत्य वाईट केले, एवढे म्हणण्याससुध्दा त्या वेळचे लोकाग्रही दचकन असत. अशा वेळेस लोकमान्यांनी आपला दिव्य संदेश सांगण्यास सुरुवात केली. ब्रिटिश लोक हे परके आहेत. त्यांची आपल्या 'केसरी' च्या प्रबल गर्जनेने सर्व महराष्ट्रभर गर्जविला, यांतच त्यांच्या असामान्यतेचे व देशपितेपणाचे मूळ आहे आणि राष्ट्राच्या मनोवृत्तीत ही क्रांती घडवित असताही त्यांनी राष्ट्राच्या क्रियेत स्वतःच्या उदाहरणाने परकी सत्तेच्या अन्यायी कृत्यांना विरोध करण्याची व झगडा सुरु ठेवण्याची परंपरा उत्पन्न केली. यांमध्येच त्यांचे लोकमान्यत्वाचे बीज आहे. राष्ट्रामध्ये सर्वत्र बाळ गंगाधर भरले असताना लोकमान्यांनी बाळ गंगाधराने तेजस्वीपणे अचारण केले. राष्ट्रामध्ये इंग्रजी शिक्षणाने गाडयाघोडे संपादन करुन सुखलोलुपतेचे लाजिरवाणे जिणे जगण्याची गर्दी उडाली असता लोकमान्यांनी या गाडीघोडयाच्या स्वार्थी महत्त्वाकांक्षेला काडी पेटवून आग लावून दिली आणि देशाकरता बैरागीवृत्ती अंगिकारली यांतच त्यांची समयज्ञाता आहे."[११]

'परतंत्र देशामध्ये एखादया गुणाचाही पूर्ण विकास करावयास किती कठिण असते आणि तरीही लोकमान्यांनी या अनेक असामान्य गुणांचा परिपोष आपल्या

अंगी पूर्णतेला नेला, हया हतभाग्य देशाचे केवढे महद्‌भाग्य होय! ज्यांच्या सूक्ष्म बुध्दीने वेदांतल्या एका ॠचेवरुन आर्याचे मूलस्थान गाठण्यापर्यंत भरारी मारली. ज्यांच्या देशभक्तीने बंदिशाला ही तपाचरणच्या पवित्र जागा झाल्या, त्या लोकमान्यांना जन्म देण्याचे महद्‌भाग्य हे महाराष्ट्रा तुला लाभले आहे. तेव्हा त्यांच्या स्मरणाने आज तू पवित्र हो व त्यांचे आचरण करण्याचा निश्चय कर, नुसती पूर्वजांची कीर्ती सांगणे हे मंदबुध्दीचे लक्षण आहे. त्याहून करावे विशेष तरी म्हणजेच लोकमान्यांच्या पुण्यस्मरणाच्या कालांत त्याच्या प्रत्येक शिष्याने आणि भक्ताने त्याहून काही तरी विशेष करण्याची आणि पुरुषार्थ गाजविण्याची महनीय आकांक्षा मनामध्ये धरली पाहिजे. सांप्रत ज्या गोष्टीची राष्ट्राच्या उध्दाराला आवश्यकता आहे, त्या गोष्टी तन, मन, धन अर्पण करुन सिध्द करण्यास बध्दपरिकर झाले पाहिजे. लोकमान्यांना मोठमोठया गोष्टी नुसत्या बोलण्याचा तिरस्कार वाटत असे. काही तरी कृती करा असा त्यांचा प्रत्येक तरुणाला उपदेश असे, तोच उपदेश आपण सर्वानी हृदयाला लावून घेतला पाहिजे. आजचे राजकारण आज आपल्या विसंघटितपणामुळे नडून बसलेले आहे. शक्तीदेवीचा अपमान झाल्याकारणामुळे हल्लीच्या या धकाधकीच्या परिस्थितीमध्ये 'कोण पुसे' या अशक्ताला? अशी मानहानीची परिस्थिती येऊन ठेपली आहे. राजकीय आखाडयांत मुसलमान लोक धर्मवेडाने पिसाट बनून हिंदुस्थान देश गाळून पिण्यास सिध्द झालेले आहेत. हिंदुस्थानातल्या प्रमुख हिंदु संस्कृतीच्या गळयाला नख लावण्याचा त्यांचा अट्टाहास चाललेला आहे आणि त्यामुळे हिंदुस्तानातील एक घरांतला आणि एक बाहेरचा, असे दोन शत्रू उत्पन्न झाले आहेत. या दोन्ही शत्रूंना पराजित करण्यास उपाय म्हणजेच बहुसंख्याक हिंदूनी संघटित होणे व सामर्थ्य संपादित करणे व हे कार्य म्हणजेच हिंदुसंघटन करणे होय व हिंदुसंघटन करणे म्हणजेच हल्लीच्या राजकरणात कुचंबत पडलेली कुंडी फोडणे होय. तेव्हा लोकमान्याच्या परंपरेप्रमाणे निर्भय अंतःकरणाने भगीरथ प्रयत्नाने, संकटाने निराश न होता सहस्रपट वेगाने प्रयत्नशील बनणे, हे लोकमान्यांचे खरे पुण्यस्मरण आहे. 'संकटे येति जो गहना | तो चढे त्यासि अवसाना||

हे पुण्यस्मरण एका दिवसाने तडीस जाण्यासारखे नाही तर प्रत्येक दिवस हे पुण्यस्मरण आपण केले पाहिजे, आचरिले पाहिजे. म्हणजेच लोकमान्याच्या

आत्म्याला त्यांनी आजवर केलेल्या उपदेशाचे काही तरी सार्थक झाले असे वाटेल. "श्रीमध्दयवद्वोतेचे रहस्य मी अस्थनी प्रकट केले नाही" असे समाधान त्यांच्या मनाला प्राप्त होईल, तेव्हा हे समाधान त्यांना देण्याकरिता आणि त्यांना व आपणांला वैदय असलेल्या या हिंदु जातीचा व हिंदुदशेचा उध्दार करण्याकरिता सर्व महाराष्ट्राचे आज बध्दप्रतिज्ञ झाले पाहिजे. म्हणजेच आजचा पुण्यदिन आपल्याला लाभकारक होईल.'[१२] थोडक्यात, लो. टिळकांपासून प्रेरणा घेऊन त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालणे हे देशहिताचे होय असे या लेखाचे महत्त्व आहे.

" नागपुरातील हिंदु जागा झाला."

तेव्हा धर्म न रुचला,
त्यजिला मानूनिया जसा कुचला |
आतांचि बरा सुचला ||..........मोरोपंत

'गेल्या आठवडयात नागपूर नगरांत हिंदु - मुसलमानांचा एक भयंकर दंगा झाला. आजपर्यंत हिंदुस्थानच्या दुर्दैवाने हिंदु-मुसलमानाचे दंगे अनेक ठिकाणी झाले आणि त्यामधील कारणे आणि कार्य ही एका विकसित पध्दतीवर घडून येत होती. प्रथम मुसलमानांनी काही तरी निमित्ताने कुरापत काढावी, असंघटित हिंदूवर अचानकपणे आक्रमण करावे, हिंदुची डोकी देवालये भ्रष्ट करावी, गोहत्या कराव्या, निरपाध हिंदुवर स्त्रीपुरुष, लहानथोर न पाहता अमानुष अत्याचार करावे, हिंदुमधील काही काही व्यक्तींनी असामान्य धाडसाने आणि बोरतेने मुसलमानांच्या गुंडगिरीचा प्रतिकार करावा. परंतु हिंदुसमाज या नात्याने असंघटितपणामुळे संघटित मुसलमान समाजापुढे त्यांस हार खावी लागावी आणि कोणत्याही व्यक्तीच्या अथवा जातीच्या स्वाभिमानाला व पौरुषाला न साजेल, अशा दोन वाणीने माहि माम् महिमाम्' म्हणून परकीय म्हणूनच निष्प्रेमी सत्तेपुढे संरक्षणाची याचना करावी. असाच जणू काय परिपाठ पडून गेलेला होता. या देखाव्याने हिंदु जातीतीले स्वाभिमानी पुढाऱ्यांच्या अंतःकरणावर घाव पडून ती विव्हल झाली. आणि आत्मरक्षणार्थ त्यांनी शुध्दीसंघटनाची ही कामधेनु, हिंदु जातीला प्राप्त करुन घेण्याकरिता आवाज उठवला. हिंदु-मुसलमानांच्या झगडयांचा हा पूर्वरंग सुरु झाला की, त्याचे परिवर्तन उत्तररंगात होते हे सिध्दच आहे. एखादयाने विषवृक्षांची बीजे भूमीत पेरण्याचा पूर्वरंग सुरु झाला की, त्याचे परिवर्तन उत्तररंगात होते हे सिध्दच आहे. एखादयाने

विषवृक्षांची बीजे भूमीत पेरण्याचा पूर्वरंग केला की, त्या बीजापासून उत्पन्न होणाऱ्या वृक्षाला विषकलाचाच उत्तररंग हटकून ठेवलेला असतो, हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. पेरले तेच उगवावे, केले तसेच भरावे, दिले तसेच घ्यावे, हा सृष्टीचा अनुल्लंघनीय न्याय आहे. एवढयाकरिता कोणत्याही व्यक्तीने, जातीने अथवा राष्ट्राने काय पेरावे, काय करावे व काय घ्यावे, याबद्दल फार काळजीपूर्वक ते पेरतांनाच, ते करतांनाच, ते देतानाच विचार केला पाहिजे. जगामध्ये आपल्याला जर प्रेम हवे असेल, न्याय हवा असेल, समता हवी असेल, तर आपण जगामध्ये प्रेम दिले पाहिजे. न्याय केला पाहिजे. समताच राखली पाहिजे. ज्या द्वेष करुन, अन्याय अत्याचार करुन कुणालाही त्याने कितीही जंगजंग पछाडले, कितीही कुटिल कारस्थाने केली, तरी या जगामध्ये प्रेम, न्याय, समता ही प्राप्त होणार नाहीत.'[१३] या लेखातून त्यांनी हिंदु-मुस्लिम प्रश्नावर प्रकाश टाकला आहे.

परंतु दुःखाची आणि हिंदी राजकारणाच्या दुर्भाग्याची गोष्ट ही की, मुसलमान आणि सरकार या दोन्हीही पक्षांनी अजूनही हया सत्यगोष्टीचे मनन आणि आचरण केलेले नाही. याचा परिणाम आम्ही अनुभवल्याप्रमाणे इतिहासाने कथन केल्याप्रमाणे व सृष्टीच्या अपरिहार्य नियमांप्रमाणे, हळूहळू मूर्त स्थितीत येऊ पहात आहे. हिंदु जाति काही मेलेली नाही किंवा मरुंही घातलेली नाही आणि म्हणून तिच्याही शांतीला आणि सहनशीलतेला काही सीमा आहेत.

मुसलमानांच्या अन्याय गुंडगिरीने आणि भेकड अत्याचाराने नागपुरातील हिंदुजनतेची सहनशीलतेची आणि शांतीची सीमा पार नष्ट झाली आणि हिंदू मग प्रतिकाराचे उग्र रुप धारण केले आणि हिंदुंच्या प्रतिकारक्षमतेची ही केवळ अल्पमात्र प्रसंग अनुभवास येतो. मोठमोठया बातमीमधला मुसलमानी समाज अगदी भयचकित झाला आणि अनेकांनी नागपुरांतून बायकामुलांसह पळ काढून अन्य ठिकाणी आश्रय घेतला. काही ठिकाणी तर जणू काय ते वेढयांत सापडल्याप्रमाणे हैराण झाले व पोलिसांच्या संरक्षणाखाली काही कुटुंबे कोतवालीत आश्रय घेती झाली. अशा रीतीने मुसलमानांनी पेरलेल्या विषवृक्षाला ही अशी विषारी फळे आली![१४]

कानपूर येथील घायाळांची वगैरे संख्या पाहता तेथेही मुसलमानांना विषारी फळे चाखावी लागली, असे स्पष्ट दिसते. तळेगाव दाभाडयालाही मुसलमानांना अत्यंत दुःखदायक अशी परिस्थिती प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे सोलापूर,

अहमदाबाद वगैरे ठिकाणीही झालेल्या दंग्यात मुसलमानांना काही पूर्वीप्रमाणे कोपरानेच खणता आले नाही. इतकेच नव्हे परंतु ते कोपर हिंदूच्या संघटनशक्तीचा प्रचंड विजय झालेल्या प्रतिकाराच्या खडकावर खरचटले गेले आहे. त्याचप्रमाणे कुऱ्हाडलाही हिंदुंच्या संघटनशक्तीचा प्रचंड विजय झाल्याची वार्ता नुकतीच आमच्या तेथील वार्ताहराकडून आमच्यासमोर येऊन थडकली आहे. परंतु जागेच्या अभावाने ती प्रसिध्द करणे पुढील अंकावर आम्हाला टाकावे लागत आहे.[१५]

या घटनावरुन एक बोध सूर्यप्रकाश इतका स्पष्ट होत आहे. अत्यंत जिबट आणि चिवट असलेली हिंदु जाती जोपर्यंत आणि जेथे जेथे असंघटित आणि असावध होती, तोपर्यंत आणि तेथे तेथे तिची मुसलमानांतील अत्याचारी गुंडांकडून अवमानता केली गेली, परंतु ज्या क्षणी आणि जेथे जेथे ती अल्पमात्र का होईना संघटित आणि सावध झाली, त्या क्षणी आणि तेथे तेथे तिने आत्मरक्षणाचे पवित्र कार्य आपल्या पराक्रमी पूर्वजांना साजेल, अशा रीतीने घडवून आणले व सिध्द केले की हिंदु जाति जिवंत आहे. ती मरणाच्या पंथाला तर लागली नाहीच नाही, परंतु हल्लीच्या जराजर्जर निस्सत्व झालेल्या देहाला टाकून ती एखादया महान भुजंगाप्रमाणे जुनी पुराणी कात टाकून देऊन एका नूतन तेजोमय आणि पराक्रमशाली दिव्य आयुष्यात पदार्पण करीत आहे.[१६] मुसलमानांच्या प्रतिकाराला प्रत्युत्तर कसे दयायचे हे या लेखावरुन दिसते.

**पर्वतीवरील सत्याग्रह :-**

'गेल्या कार्तिकी एकादशीस अस्पृश्य पर्वतीवरील देवळांत शिरतील हया भीतीने देवालयाच्या विश्वस्त मंडळाने देवळाचे दरवाजे बंद केले होते. एकादशीस देव कोंडला जाऊन आपणांस देवदर्शन मिळणार नाही म्हणून धर्ममार्तंड कुरकुर करु लागले. हया विश्वस्त मंडळाने व काही धर्ममार्तंड सनातन्यांनी कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट यांची भेट घेतली. हया दोघांच्याही भेटीत काहीच निश्चित ठरले नाही. अस्पृश्यांचे पुढारी राजभोज म्हणाले की, शेवटचा उपाय म्हणून मग आम्ही पार्वतीच्या पायऱ्यांशी अन्नत्यागाचा सत्याग्रह करु. ता. १२ दिवशी दुपारी तीन स्वयंसेवक सत्याग्रह करण्याकरिता गेले असता त्यांना दरवाजे बंद असल्याचे आढळून आल्यावर ते परतले.

एकादशीला कदाचित अस्पृश्य येतील व पुष्कळ धर्ममार्तंडही जमतील आणि कदाचित मारामारी होतील, हया भीतीने कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट डे.पो. सुपरिटेंन्डंट, पोलिस सिटी इन्स्पेक्टर व २० पोलीस ठेवण्यात आले होते. देवळाची दारे बंद असल्यामुळे पुष्कळांना नुसते दाराचे दर्शन घेऊन जाणे भाग पडले. विश्वस्त मंडळाच्या मागणीवरुन सरकारने ठेवलेल्या पोलिसांना असे स्पष्ट बजावण्यात आले आहे की, पायऱ्यांवर बसणाऱ्यांस हात लावू नये. त्यामुळे विश्वस्त मंडळाने हिंदु रखवालदार ठेवले. सत्याग्रही लोक पायऱ्यांवर बसण्याचा प्रयत्न करु लागताच त्यांच्याशी दंगल करुन त्यांस उठवून लावण्यात आले.[१७] थोडक्यात, अस्पृश्य समाजातील लोकांनाही देवाचे दर्शन व्हावे, ही या लेखामागची भूमिका आहे.

**हिंदु महासभेच्या वतीने सामुदायिक प्रार्थना :-**

'गिरगाव हिंदु महासभेच्या विद्यमाने ता. १३ दिवशी म्हणजे कार्तिक एकादशीच्या पवित्र दिनी मुंबईच्या जिना हॉलमध्ये रात्री ९ वाजता हा नवीन उपक्रम करण्यात आला. हया समारंभास सर्व ज्ञातीचे हिंदु बंधु पूर्वस्पृश्यासहित व काही हिंदुभगिनीही एकत्र जमली होती. प्रार्थनाकार महाराष्ट्राचे सुपरिचित असे शा.सं. महादेवशास्त्री दिवेकर हे नियोजित केले गेले होते. डॉ. सावरकर, डॉ. सुरतकर, डॉ. उदगांवकर, श्री. नवरे, श्री. निफाडकर वगैरे हिंदुसभेची मंडळी उपस्थित होती. हया प्रसंगी व्याख्याने व्हावयाची नसल्यामुळे डॉ. सावरकरांनी वे.शा.सं. दिवेकर शास्त्र्यांची तात्पुरती ओळख करुन दिल्यावर शास्त्री बुवांनी थोडक्यात पण मुद्देसुदपणे 'सहनावतु' या प्रार्थना मंत्राचे महत्त्व वैदिक कालापासून जनसमाजात कसे प्रचलित आहे, त्यांचे सुंदर विवेचन केले. नंतर 'अपिचेतसुदराचारी भजवे माम्' वगैरे तीन श्लोकांचे पठण सर्वांनी उभे राहून केले. तेंव्हा तेथे जमलेल्या आब्राम्हण चांडाळ जातिविशिष्ट अशा सर्व हिंदुबांधवांत एक प्रकारची एकतानता कशी जमू शकते, त्यांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. एक ध्येययुक्त प्रार्थना समान धर्मीयांनी देवमंदिरात करण्याचा मंगल प्रसंग, पुराणमतवाद्याकडून केंव्हा मिळेल, तेव्हा गिरगाव महासभेच्या शाखेने हा नवीन उपक्रम घडून आणला व तरुण जनांत धर्मप्रेम, उद्दीपित करण्याचे श्रेय घेतले, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. नंतर शास्त्रीबुवांस अस्पृश्य पुढारी श्री. साकाटे हयांनी बुक्का लावणे, हार घालणे व खिरापत वाटणे वगेरे प्रकार झाल्यावर 'हिंदुधर्माच्या जयजयकारांत प्रार्थना कार्य समाप्त झाले. भक्तिरसयुक्त

अभंगाचे भजन होऊन हा सर्व समारंभ आटोपण्यातआला.[१८] थोडक्यात सर्व हिंदू समाजातील लोक एकत्र येऊन त्यांनी एकजुटीची ताकद दाखवून दिली.

### ३.४ अखिल महाराष्ट्र हिंदु तरुण परिषद :-

(ता. २० एप्रिल दिवशी अकोला येथे भरलेल्या अखिल महाराष्ट्र हिंदु तरुण परिषदेत त्या परिषदेचे अध्यक्ष डॉ. ना. दा. सावरकर यांनी केलेले भाषण)

प्रिय हिंदु भगिनी बंधूंनो,

'आज हिंदु तरुण परिषद बोलावून एका नीवन उपक्रमाला सुरुवात करुन देशांतील निरनिराळया चळवळींना विशिष्ट असे वळण देण्याचा निर्धार दाखविल्याबद्दल पहिल्या प्रथम मला आपले अभिनंदन केले पाहिजे. देशातील सध्याच्या गोंधळलेल्या परिस्थितीत आपले ध्येय साधण्याकरता तुम्ही जो मार्ग स्वीकारणार आहात तो मार्ग निश्चित करण्यासाठी तुझी आज हिंदु तरुण परिषद बोलावून मोठे उत्तरदायित्व घेतले आहे. आपला देश ज्याप्रमाणे पारतंत्र्यात आहे, त्याचप्रमाणे इतर अनेक देश पारतंत्र्यात आहेत; पण इतर परतंत्र देशापेक्षा आपले देशावर अधिक मोठे संकट आहे. परतंत्र असणे हे कित्येक वेळा अपरिहार्य असते. प्रत्येक देशाला स्वतंत्र व परतंत्र होण्याचे प्रसंग येत असतात. रहाटगाडग्याप्रमाणे स्वतंत्रता व पारतंत्र्यही प्रत्येक देशांस केंव्हाना केंव्हा येऊन जाते. आज हिंदुस्थान परतंत्र आहे. पण ही गोष्ट जगविरहित आहे, असे समजू नका. हिंदुस्थान परतंत्र आहे. म्हणून हिंदी लोक लायक नाहीत, ते स्वराज्यास अपात्र आहेत असे समजू नका. जगात स्वातंत्र्याचा व पारतंत्र्याचा फेरा प्रत्येक देशावर येऊन गेला आहे व तो केव्हांना केंव्हा तरी येणार, हा काळाचा प्रश्न आहे. हा क्रांति-उत्क्रांतीचा प्रश्न आहे. कोणतीही एक जात परतंत्र आहे. म्हणून तिला अपात्र व अयोग्य मानणे ईष्ट नाही. केवळ परतंत्र हीच एक गोष्ट असती तर तीबद्दल तितकी भयंकर जबाबदारी वाटली नसती. इतर परतंत्र देशासारखी व परतंत्र जातीसारखी हिंदुस्थानची व हिंदुंची स्थिती नाही. इतर देशांच्या व हिंदुस्थानच्या पारतंत्र्यामध्ये मोठा फरक आहे व त्यामुळे हिंदुस्थान देशांतीत तरुणांवर फार मोठे उत्तरदायित्त्व येत आहे. हा फरक म्हणजे इतर देशास फक्त परकीयांबरोबरच लढावे लागत आहे. तर आपणांस परकीय व इतर अंतर्गत स्वार्थी समाजाबरोबर लढावे लागत आहे. हा अंतर्गत झगडा आपण यशस्वी रीतीने लढू न शकलो, तर राष्ट्रीय स्वातंत्र्याचा झगडा यशस्वी होणे कठीण आहे. तो

सर्वांला स्वातंत्र्याला विरोधी झाला आहे. त्याची सुटका करुन चालणार नाही. भारतीय युध्दाचे वेळी ऐन पराक्रमाचे प्रसंगी कर्णाची शल्येगिरी जशी घातक झाली, त्याचप्रमाणे मुसलमानांनी स्वार्थाच्या दृष्टीने जातीच्या कल्याणाच्या दृष्टीने केलेला लक्षभेद घातक होत आहे. हा लक्षभेद न होता तर हिंदु तरुणांच्या संघटनेची जरुरी भासली नसती. या चळवळीवर ती जातिविषयक व अपायकारक आहे, असा आक्षेप देण्यात येतो. घटकाभर जादा करता हा एक आक्षेप खरा आहे, असे गृहीत धरु. पण प्रश्न हा आहे की, सर्व जातीपैकी कोणत्या जातीने ही चळवळ प्रथम सुरु केली हा ध्वनी प्रथम कोणी काढला? हिंदुसभेचे आयुष्य आज किती आहे.[१९]

हिंदुसंघटनांची चळवळ अशाच प्रकारची आहे, पण तिला राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली नावे ठेवण्यात येतात. पण मुस्लीम लिगच्या वेळी मात्र कोणी मायेचा पूत जिनांना अराष्ट्रीय म्हणाला नाही. त्यांचे कारण स्पष्ट आहे. याचे कारण हेच की ते पडले लोकमान्य टिळकांचे सरसेनापती व सरकारच्या डोळयांत अक्षयी खुपणारे डॉ. मुंजे यांनी हिंदुसंघटनेची चळवळ केली, तर ते अराष्ट्रीय ठरणार व मग राष्ट्रीय कोण तर खादीचे समुद्रांतील दोन चार शिंतोडे अंगावर घेणारा स्वदेशी. फक्त कणापासून बोलणारा व सुलभतेची आधी दोन चार महिन्यांची शिक्षा भोगणारा देशभक्त! याचे म्हणणे की मुसलमानांना बोलू नका.'[२०]

मुसलमानांचे स्वराज्य म्हणजे मुस्लीम राज्य आहे. हिंदुची सर्वतोपरी हानि करणारा नेहरु रिपोर्ट पण त्यांत मुस्लीम राज्य नाही म्हणून त्यांना तो अमान्य आहे. तेंव्हा डोळे उघडून परिस्थिती पहा, तुम्ही डोळे मिटले म्हणून मांजर दूध पिण्याचे सोडीत नाही हे विसरु नका व त्याप्रमाणे आपले धोरण ठरवा. हिंदु तरुणांनो संघटित व्हा, बलवान व्हा, म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ती करणे सुलभ होईल. त्याला ३३ कोटी लोकांची एकी नको. भगवान मॅझिनीने सांगितले आहे की, आम्ही फक्त ७५ लोकच होतो. पण आम्ही सर्व देशाची सिंहासने हादरुन सोडली. कोणत्याही चळवळीत शेकडा ९९% लोक पडले नाहीत. निर्जीव, जिला, नांगी, तडाखा नाही तो एकी निरुपयोगी होय. मुंबईत कसाईखान्यात हजारो मेंढराची एकी दिसून येते. एका बरोबर सर्वजण खड्डयात पडण्यास तयार असतात, पण त्या एकीचा काय उपयोग होतो? असली शेळयामेंढयांची एकी काय करणार? तीत नांगी टोकदार व धक्का जोरदार पाहिजे. असले तेज प्राप्त करुन घेतले तर तुमचा भविष्यकाळ तुमच्याजवळ येईल.

तुम्ही समर्थ व्हाल तर मुस्लीम आपण होऊन एकी करावयास तुमचे जवळ येतील. मुस्लीम स्वार्थी आहे, शक्ति दिसली, तडाखा दिसला की, तो जी हुजुर करा. हे खरे की खोटे. ते डॉ. मुंज्यांना विचारा, अकोल्याचे लोकांना विचारा, जी एकी, महात्म्याच्या पुण्याईने, साधूच्या आशीर्वादाने, पंजाब विकल्याने किंवा सिंध फोडल्याने साधली नाही, ती तुमच्या बलाने साधणार आहे. तेंव्हा हे वळ प्राप्त करुन घेण्याचा निर्धार करा. पर्जनाच्या रुपाने मेघ व इंद्रराय तुम्हास आशीर्वाद देत आहेत. पर्जन्य पाडून तुमच्या या निर्धाराच्या बिजास, अंकुर फोडण्याचे इंद्रराजाने ठरविले आहे. तरी तुमच्यांत शौर्याची जोपासना होणे, तेज उत्पन्न होवो व त्या अंकुराना या पर्जनाने भरारी येवो, अशी इच्छा प्रदर्शित करुन मी आपले भाषण संपवितो![२१] थोडक्यात, संगठन जर झाले नाही तर भारताला स्वातंत्र्य मिळणे कठीण होईल असे त्यांच्या भाषणातून दिसून येते.

**खरा राष्ट्रीय कोण?**

आज सर्व हिंदुस्थानमधील हिंदु तरुणांमध्ये व काही अपवादात्मक मुसलमान तरुणांमध्ये नितांत राष्ट्रीय वृत्तीची लाट उसळली आहे, ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय आहे. कारण कोणत्याही पतित व परतंत्र राष्ट्राचा उध्दार तेथील तरुणांना जेव्हा राष्ट्रकार्यावाचून अन्य ध्यास नसतो 'तुजवांचुनि रुज्जना । अन्न गोड लागेना । नयनी झोप येईना । झुरती चित्तिने ।' अशी या वेळी देशातील सर्व सज्जन तरुणाची अवस्था होते त्यावेळी देशाच्या दास्यशृंखला पटकन तोडून टाकण्याचे आचाट साहसी कर्म त्यांचे हातून पार पडते. तेंव्हा ही आनंदाचीच गोष्ट आहे की, सांप्रत तरुण वर्गाला राष्ट्रीय वृत्तीच पसंत पडते व कोणतीही अराष्ट्रीय गोष्ट त्यांना नकोशी होते.[२२]

परंतु तरुणांनो 'खरी राष्ट्रीय वृत्ती कोणती, याची विवेचना फार काळजीपवूर्वक केली पाहिजे, नाही तर उतावळीने, अज्ञानाने, वरवरच्या नामसादृश्याने अनेक वेळी खऱ्या राष्ट्रीय गोष्टींचा धिक्कार व पूर्ण अराष्ट्रीय गोष्टीचा स्वीकार, अशी घातक दुरवस्था प्राप्त होते व त्यामुळे राष्ट्रीय हिताला धक्का बसतो. आज सबंध देशामध्ये हिंदु-मुसलमान या दोन जातींच्या झगडयाचा वणवा पेटल्यामुळे व तो राष्ट्रघातक असल्यामुळे कोणत्या संस्था, पुढारी व चळवळी राष्ट्रीय आहेत व कोणत्या राष्ट्रीय नाहीत हे यथावत् जाणल्याशिवाय जर आपण

नामसादृश्यावर भुलून एकाचा अस्वीकार किंवा स्वीकार करु लागलो, तर ते राष्ट्रहितविघातक होईल, आज मुसलमानांनी अनेक जातिविशिष्ट संस्था काढून त्याद्वारे आपण केवळ मुसलमान म्हणून निरनिराळे अधिकार राष्ट्रीय सभेत व सरकारच्या द्वारी दोन्ही बाजूंनी मागण्याचा सपाटा चालविला आहे. 'जमियत उलू अलेमा', 'खिलाफत', 'मुस्लिम लीग' इत्यादी संस्था मुसलमानांच्या अधिक अधिकारांकरिता आकाशपाताळ एक करीत आहेत. हिंदुमधील केवळ 'हिंदु महासभाच' यांत सनातनी आर्य समाजाची, शिख वगैरेचा आम्ही अंतर्भाव करतो. हिंदुच्या राजकारणांतील आकांक्षा व मत दिग्दर्शन करते.[२३]

ज्या राष्ट्रांत अनेक जातीचा व त्यांच्या संस्कृतीचा निवास एक होत असतो, त्या राष्ट्रात प्रत्येक जातीने आपापल्या संस्कृतिच्या शिकवणीप्रमणे आपली उन्नती करुन सबल व वैभवशाली बनणे हे ध्येय न्याय्य असते व ज्या उन्नतीच्या ध्येयाने एक जाती स्वतःच्या उन्नतीकरता झटत असते. तसल्याच तऱ्हेने आपल्या शेजारी असलेल्या इतर जातीनांही त्यांच्या त्यांच्या जातीची उन्नती करण्याचा अधिकार आहे, हे तत्त्व मान्य करणे हेच खऱ्या न्यायाचे व गुण्यागोविंदाने नांदण्याचे मुख्य साधन असते. हे साधन स्वीकारुन जर सर्व जातींनी आपआपली उन्नती करण्याचा प्रयत्न केला, तर त्यामुळे अखिल राष्ट्राला अपाय न होता उपायच होत असतो. जातीविशिष्ट संस्था आणि तिची चळवळ ही राष्ट्रहितघातक आणि म्हणूनच अराष्ट्रीय ठरते. अशा आक्रमक जातिविशिष्ट चळवळींना पायबंद घालणे हे केवळ न्याय्यच नव्हे तर अवश्य काही ठरते.[२४]

वर दिग्दर्शित केलेल्या कोणाच्याही अराष्ट्रीय चळवळीने ज्या कोणत्या दुसऱ्या जातीचे अस्तित्व संकटात सापडत असेल, त्या जातीने आत्मरक्षणार्थ अन्य जातीचे, अन्याय्य व अराष्ट्रीय असे आक्रमण नष्ट करण्याकरता जर एखादी जातिविशिष्ट संरक्षक चळवळ चालविली तर अर्थात जरी अशी चळवळ नामसादृश्यामुळे जातिविशिष्ट वाटली तरी विचारांनी ती न्याय्य, इतकेच नव्हे तर राष्ट्रीयच चळवळ आहे, असे मानणे क्रमप्राप्त आहे. कारण राष्ट्रातील एका जातीचा ऱ्हास हा अंशाने राष्ट्राचाच ऱ्हास होय म्हणून तो थांबविण्यास केलेले प्रयत्न आणि संघटन हे न्याय्य आवश्यक आणि राष्ट्रीयच ठरते.

आज सर्व देशामध्ये हिंदुमुसलमानांच्या झगडयांत प्रत्येक ठिकाणी हिंदु-मुसलमानाचे धोरण आक्रमक स्वरुपाचे आहे. आपली लोकसंख्या सर्व भल्याबुऱ्या उपायाने वाढविण्याचा चंग अनेक मुल्लामौलवींनी बांधलेला आहे. हिंदु देवालये आणि मूर्ती यांचा विध्वंस करणे, शांततायुक्त मिरवणुकीवर घाला घालणे, हिंदु पुढाऱ्यांची हत्या करणे, हिंदु स्त्रिया आणि अभ्रके यांना पळविण्याचे, बाटवण्याचे पध्दतशीर प्रयत्न अनेक ठिकाणी चालू ठेवणे, हया दंडेलशाहीच्या गोष्टी मुसलमान समाज अन्याय्यपणे आचारीत असता, त्यापासून आपले संरक्षण करण्याचा यत्न करणे, हे कोणता न्यायप्रिय मनुष्य अन्याय्य आणि अराष्ट्रीय म्हणेल? त्याचप्रमाणे राष्ट्रीय सभेत व सर्वपक्ष परिषदेत आम्ही मुसलमान म्हणूनच आम्हाला प्रामाणाधिक प्रतिनिधित्व दया, आम्ही मुसलमान म्हणूनच आम्हाला राखीव जागा ठेवा, ज्या भागात आम्ही अल्पसंख्यांक तेथे केवळ आम्ही मुसलमान म्हणूनच आम्हाला अधिक प्रतिनिधित्व दया. ज्या भागांत आम्ही बहुसंख्यांक त्याही भागांत आम्ही मुसलमान म्हणून इतर अल्पसंख्यांकानाही अधिक प्रतिनिधित्व देऊ नका. दिल्लीच्या केंद्र विधिमंडळात आम्ही केवळ मुसलमान म्हणून आम्हाला प्रमाणापेक्षा अधिक असे प्रतिनिधित्व दया.[२५]

'आम्ही मुसलमान सांगतो, म्हणूनच केवळ सिंध प्रांत विभक्त करा, या आणि असल्या हजारो मागण्या आज मुसलमानांच्या सर्व सनदशीर संस्था ज्या प्रमाणात कमी-अधिक प्रमाणाने करीत आहेत. जी संस्था ज्या प्रमाणात अशा अन्यायी मागण्या अधिक करीत आहे, ती संस्था त्या प्रमाणात अधिक राष्ट्रहितघातक ठरते. या दृष्टीने मुसलमानांच्या सर्व संस्थाचा विचार केल्यास 'मुस्लीम लीग' ही त्यांची संस्था सर्वात कमी राष्ट्रविघातक अर्थातच अधिक राष्ट्रीयत्वाकडे झुकलेली आढळून येईल. हिंदु महासभा ही एक राष्ट्रीयच काम आपल्या जातिविशिष्ट संस्थेतून करीत आहे, असे कोणाही विचारवंताला समजल्यावाचून राहणार नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सभेच्या मंडपात अथवा राजद्वारी कोठेही हिंदु महासभेने 'आम्ही हिंदू म्हणून आम्हाला हे दया' असे म्हटले नाही. हिंदूहित विघातक मागण्यांना विरोध केला. मुसलमानांना ते केवळ मुसलमान म्हणून तुम्ही काहीही देऊ नका हेच तिने अट्टाहासाने राष्ट्रीय सभेत आणि सर्वपक्षीय परिषदेत तिने प्रतिपादन केले. हे कसे अराष्ट्रीय हे कसे राष्ट्रघातक? उलट राष्ट्रीय सभेनेच अनेक वेळेला केवळ मुसलमान म्हणून त्यांना

संतुष्ट करण्याचा एकीच्या नावाचा मोह धरुन प्रयत्न केलेला आहे. राष्ट्रीय सभेच्या या अराष्ट्रीय कृत्याला जी जातीविशिष्ट हिंदुसभा निकाराचा विरोध करते, ती कशी अराष्ट्रीय? ती कशी अनिष्ट?

एकच आमच्या तरुणांनी अविचाराने आपला गैरसमज करुन घेऊ नये. हिंदुसभेच्या चळवळी जोपर्यंत अराष्ट्रीय होणार नाहीत, तोपर्यंत त्यांस अथवा त्यांच्या पुढाऱ्यांस विरोध करु नये. तारतम्यबुध्दीने अराष्ट्रीय कोण राष्ट्रीय कोण, हे निरखून पहावे. केवळ एकाच श्लोकांत आल्याने 'श्वा युवा मघवा' एकच मानू नयेत, हीच आमची त्यांना सावधानतेची सूचना आहे. दृढ विश्वास आहे की, हिंदुमातेच्या प्रेमाने स्फुरित झालेले आमचे तरुण असली विघातक कृति पुनरावृत्ती होऊ देणार नाहीत.[२६] थोडक्यात, हिंदू-मुसलमान या प्रश्नावर त्यांनी भाष्य केले, कोणताही समाज राष्ट्रहिताला प्राधान्य देणारा असेल तर देशाची प्रगती होऊ शकेल, आणि जातीला प्राधान्य देणारा असेल तर समाजात दंगल होऊ शकते.

**३.५ येता त्रिशत सांवत्सरिक शिवोत्सव :-**

"झाले बहु, होतील बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा!"

'वाचकहो चला, पुण्यवंतांच्या पुण्य कथा भागिरथीत सुस्नान होऊन आपण शुध्द होऊया. कारण प्रभु शिवरायांचा जन्मदिनोत्सव जवळ जवळ येऊ लागला आहे व त्या उत्सवाच्या मंगलप्रसंगी आपल्याही पारतंत्र्य पातकाने अमंगळ झालेली मने शिवकथेच्या पुण्यभागीरथीमध्ये जर न्हाऊन, धुवून काढली नाहीत, तर त्या उत्सवाच्या वेळेला वा अमंगळ मनांनी त्या महत्कार्याला अपशकून व्हावयाचा म्हणून स्वतःच्या सामर्थ्याबद्दल आवश्यक झालेली निराश अंतःकरणे पूर्वजांच्या पराक्रम स्मृतीने पुन्हा सतेज करुया.

सोळावे शतक अखिल हिंदुस्थानला अत्यंत लाजीरवाणे गेले. सबंध हिंदुस्थानभर अविधांच्या परकीय सत्तेचा धुमाकूळ अप्रतिहतत्त्वाने चालला होता व परकीय सत्तेच्या असुरी सामर्थ्यापुढे सर्व हिंदू जाति व सर्व हिंदु देश सरसहा चिरडला जात होता. यवनांच्या नित्य नव्या टोळधाडी लुटालूट करण्याच्या मिषाने सर्व मध्य आशियातील व पश्चिम आशियातील अपंग भिकारी, लुटमार जाळपोळ करणाऱ्या काही लोकांच्या टोळयांना एकत्र करुन हिंदुस्थानमध्ये पंजाब रक्तबंबाळ होऊन रक्ताच्या पुरामधे बुडून गेला होता. राजपुताच्या मधील सर्व रजपूत, पराक्रमाची

सीमा करुन या देशाधर्माच्या परकीय शत्रूंना थोपवून धरण्याकरिता आपल्या पौरुषाची व पराक्रमांची सीमा करीत होते. परंतु मुसलमानांच्या या नीत्य नव्या उसळत्या लोंढयापुढे तेही पराभूत होऊन हतबल झाले होते. राजा संगाने केलेला भीषण संग्राम निष्फळ ठरुन हिंदुध्वज तेथे उन्मळून पडला व मानधन प्रतापसिंहाचा सिंह पराक्रमही घायाळ होऊन रानावनाचा आश्रय करुन राहिला. इकडे रामदेवराव यादवाच्या तेजस्वी वंशजांनी समुद्र किनाऱ्याला वसवलेली चंपावती, महिकावतीची छोटी परंतु स्वतंत्र हिंदु राज्ये याच सुमारास धुळीला मिळाली व तुंगभद्रेच्या तीरी अडीच शतके पर्यंत हिंदुसंस्कृती व हिंदुधर्म ज्याच्या पराक्रमाने जिवंत राहिला होता ते प्रभु माधवाचार्य व वीरश्वर हक्क आणि बुक्क यांनी प्रस्थापिलेले विजयनगरचे प्रबळ साम्राज्य, तालिकोटच्या घणघोर समरात यवनांच्या पाच बादशाहीशी प्राणपणाने झुंज खेळता-खेळता रामराजाच्या रक्तप्रवाहात कोसळून पडून नष्ट झाले.'[२७]

अशा रीतीने अखिल हिंदुस्थानात परकीय सत्तेचा समुद्र सर्वत्र पसरला होता व त्यामध्ये हिंदु जाति, हिंदु संस्कृति, यांची नौका सर्व दिशानिदिशा धुंद होऊन क्षणाक्षणाला रसातळाला नेणारे हेलकावे खात होती. हिंदुस्थान, दुसरा इराण, दुसरा बलुचिस्थान, दुसरा अफगाणिस्थान होणार म्हणून हिंदुस्थानच्या अशुभ देवतांची तामसी घुबडे स्थलास्थलातून अमंगळ ध्वनि काढीत होती. साधु त्रस्त झाले होते. तीर्थक्षेत्रे भ्रष्ट केली गेली होती. अयोध्येचा राम व काशीचा विश्वेश्वर यांची अवज्ञा होऊन ते स्थानभ्रष्ट झाले होते. चंद्रगुप्त विक्रमादित्यांच्या काळचे आनंदवनभुवन आज उच्छिन्न झाले होते. हिंदुमात्र पददलित होत होता. जिकडे तिकडे निराज्ञ भयाण मृत्युसमयाची निराशा पसरली होती व काशीत रोम, ग्रीस, इजिप्त यांच्यासारख्या अवदानांच्या अक्षपाने पुष्ट झालेला व लाल चावलेला तो सर्वभक्षक काळ, या अशा आसन्मरण झालेल्या हिंदुस्थानला मटकत गिळून टाकण्याकरता स्मशानात गिधड जसे, अरण्यात हिंस्र व्याघ्र जसा, समुद्रात भीषण दाढांचा काळमासा जसा, तसा क्रूर आनंदाने जिभल्या चाटीत टपून बसलेला होता.[२८]

अशा वेळा एक दिव्य पुरुष जन्माला आला. त्याच्या तेजाने अंधकारमय झालेल्या हिंदुंच्या आशांच्या दिशा झपकन उजळल्या, हिमालयाच्या बर्फाच्या शिखरावरुन प्रभात काळाचा प्रसन्न वारा खाली पसरला व खालच्या गंगा-यमुनांचे देशवीरांच्या रक्ताने लाल झालेले पाणी निवळू लागले. सहयाद्रीवरची आजवर

गारठून गेलेली वनश्री पुनः पल्लवित झाली. कारण महाराष्ट्र ऊठऱ्या आनंदाचे मंगळ परिवर्तनाचे कारण कथन करताना, तू ऊठा नम्रतेने मस्तक नमव व अभिवंदनेला सिध्द हो, बघ या परिवर्तनाचे कारण सांगताना, तुझ्या त्या वीरवराचा निर्देश करावयाचा आहे. सहयाद्री ऊठ, तुझ्या गडगडाच्या शिरांना नम्र करुन वृक्षावृक्षाच्या चौऱ्या अबदागिरी हाताने घे, शाहिराच्या वीर काव्या ऊठ, डफावर सप्त पाताळ भेदून जाईल, अशी आवेशाची थाप देण्याकरता हात उचल, आकश भेदून जाईल अशी ललकारी ठोकण्याकरता तुझी मर्दानी तान सज्ज कर. निजलेल्या मराठी भाल्या, तुझा प्रबळकाळचा चकाकणारा पात्याचा डोळा उघडझाप करुन स्वच्छ कर, कारण आसन्मरण झालेल्या हिंद देशाला पुन्हा नवजीवन कसे प्राप्त झाले हे कथन करताना, तुझ्या सम्राटाचे श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आम्ही उच्चारणार आहोत, तेंव्हा अखिल महाराष्ट्रा, खडबडून जागा हो व या प्रसंगी प्रभूस अभिवंदना कर.

होय, १६ व्या शतकाच्या नितांत निराशेच्या काळी सर्व हिंदुसंस्कृति व सर्व हिंदु जाती यांना वाचविण्याकरिता एक महापुरुष जन्माला आला व महाराष्ट्रा, ते देवांनीही हेवा करण्यासारखे दिव्य भाग्य तुला लाभले, सोळाव्या शतकात जवळ जवळ मरणदशेला पोचलेल्या हिंद देशाचे पुनरुध्दाराचे प्रचंड कार्य, श्रीशिवप्रभूने सतराव्या शतकाच्या आरंभाला हाती धरले.

हे कार्य काही लहान सहान नव्हते. जेथे राजा संग, प्रतापसिंह हे यशस्वी होऊ शकले नाहीत व जिथे तीन शतकांचे साम्राज्यही त्याच्या लक्षावधि सैन्यानिशी व कुबेरालाहि अप्राप्य असणाऱ्या संपत्तीनिशी मातीत मिसळून गेले ते कार्य करण्यास एक तेरा चौदा वर्षाचे तरुण पोर पाच पंचवीस मावळयांच्या सहाय्यावर भूमि, खणता सापडलेल्या एका मोहरांच्या हंडाभर द्रव्याने सिध्द झाले. इतिहास, असले दृश्य यापूर्वी तू अन्य स्थळी कुठे पहिले होतेस का? आणि याहूनहि परम आश्चर्याची गोष्ट की, हयाच अर्भकाने एका प्रबल वृध्द सम्राटाला पराजित केले. हयाच पाच पंचवीस मावळयांच्या सेनेने लक्ष लक्ष सेना समरासमंरातून नाचविणाऱ्या शक्तीला अंती आहत केले, याच एक हंडाभर द्रव्यानिधीने अखेर रायगडाच्या कोरडया पहारावर मोहोरामाणकांचा पाऊस पाडून रत्नखचित सुवर्ण सिंहासन उभे केले. परंतु महाराष्ट्रीयांनी अखिल हिंदुनो म्हणून असे मानू नका की, हे अद्‌भुत कोणत्या तरी किमयेने जादू टोण्याने मंत्राक्षताच्या प्रोक्षपाने किंवा 'फू' करुन उडविलेल्या चेटुकाच्या

मातीफुकीने घडून आले. हे घडून आणावयास खडतर प्रयत्न भागीरथाप्रमाणे करावे लागले. आयुष्याचा क्षण क्षण व द्रव्याचा कण कण या कामी वेचावा लागला. शरिराला पुष्ट करुन त्या मध्ये साठविलेल्या रक्ताचा बिंदू बिंदू स्वातंत्र्याच्या बाजारात त्यांचे मूल्य म्हणून मोजून दयावा लागला. रानावनातल्या इवल्याशा काटामोडीपासून तो अविधांच्या प्रखर तरवारीच्या हमरातुमरीच्या घावापर्यंत सर्व आघात घ्यावे दयावे लागले. कडयाच्या टोकावरुन खोल दरीत मरणाची भेट घेण्यापासून तो तोफेच्या गोळयांचे आकाशामधून झालेल्या उड्डाणात मरण शोधीत व मारण पेरीत प्राणांचे चेंडू झेलावे लागले. तपश्चर्या, प्राणप्रणाची तपश्चर्या ज्यावेळी प्रभु शिवरायांनी केली व त्या वेळच्या पिढीला करावयाला लावली, त्यावेळी हे सर्व हिंदुस्थान व्यापून उरलेले हिंदु संस्कृतीचे भयाण मरण संकट निवारिता आले. शक्तीने, युक्तीने, बुध्दीने सर्व बाजूंनी ज्यावेळी 'योग कर्मसुकौशलम्' या निष्ठेने कर्म योग साधला गेला, त्यावेळी हे अद्‌भुत अभावित साध्य झाले 'असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी' हया आळशी नारायणाच्या ऐटी गडबडगुंडयाने ते साध्य झाले नाही. आकाश अक्षरशः हिंदुस्थानच्या भाग्यरथीचा उदय होणारे हिंदु जातीचे आकाश फाटले होते, त्याला ठिगळच दिले नव्हे, तर त्याचे पुनर्घटन शिवरायांनी केले. स्वातंत्र्यगान बायरन प्रमाणे मुक्त कंठाने गाणारा, हिंदुस्थानचा स्वातंत्र्य भाट भूषण कवीने म्हटल्याप्रमाणे जर शिवराय न होते तर

काशिजीकी कला जाती । मथुरा मशीद होती ।।

अशी स्थिती झाली असती. ती प्राणसंकटवेला ज्यांनी टाळली, त्या शिवरायांची थोरवी किती वर्णावी, कुठवर वर्णावी, कशी वर्णावी, असे शेवटी म्हणावे की,

झाले बहु, होतील बहु, आहेतहि बहु परंतु यासम हा!

परंतु महाराष्ट्राच्या व हिंद देशाच्या भाग्यवान संतांनो, तुम्ही काय हे स्तुतिस्तोत्र नुसते म्हणूनच स्वस्थ बसणार? नाही तुम्हाला आज स्वस्थ बसण्याचा अधिकार नाही कारण जे संकट शिवकाल, तेच प्राणसंकट, काल देशपरिस्थितीच्या फरकाने आजही या हिंद भूमीवर ओढवले आहे. आजहि ती परतंत्र आहे. आजहि तिचे सिंहासन छत्रचामर विजयध्वज मोडून धुळीला मिळाले आहे. आजही तिचे आकाश फाटले आहे. तिची जाति प्राण संकटात सापडली आहे. तिची संस्कृति अवमानिली जात आहे. आजहि पाशवी शक्तिने तिला दलित केले आहे.

म्हणून हिंद संतांना तुझे आद्य कर्तव्य हे आहे की, तू शिवरायाप्रमाणे प्रयत्नशील हो. "शिवरायांचे आठवावे रुप। शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी।।'[२९]

शिवराय ही राष्ट्रीय विभूति आहे. शिवरायांनी मुसलमानांशी ते केवळ मुसलमान म्हणूनच झगडा केला नाही तर ते त्यावेळी परकीय सत्ताधारी होते म्हणून झगडा केला. परंतु आजच्या मुसलमान, ख्रिस्ती लोकांना त्यामुळे शिवरायांच्या उत्सवापासून दूर राहणे काही संयुक्तिक होणार नाही. ते आत्मघातकीपणाचे होईल. वाशिंग्टन इंग्लंडचा एकेकाळी शत्रू होता, म्हणून आजहि काही इंग्लिश लोक त्याला शत्रु मानीत नाही. त्याचा उत्सवहि करतात. मॉझिनीने आस्त्रियनांशी एका काली तुमुल युध्द केले. म्हणून अस्त्रियन लोक काही आजहि त्यास शत्रु मानीत नाहीत. थोर पुरुष हे एकदा इतिहासात विलीन झाले म्हणजे ते विभूतिमताला पोचतात व त्यांची विभूति पूजा साऱ्या जगभर पसरते. त्यांचे कार्य तात्विक असते, तात्पुरते नसते. ते सर्व जातीय, सर्व देशीय, सर्व भौमिक असते व म्हणून त्यांचे वैर म्हणजे तात्कालिक असते. एकदा तो काळ गेला म्हणजे सर्व मानव जाति त्यांची उपासक बनते व ते सर्वांना सम लेखतात. म्हणून शिवरायांचा उत्सव सर्व जातींनी, हिदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन या सर्वांनी करावा. थाटामाटाने साजरा करावा. कारण सांप्रतच्या हिंदुभूच्या पारतंत्र्याचे पाश तोडण्यास जी स्फूर्ति पाहिजे ती शिवचरित्राच्या चिंतनाने येणारी आहे. देश काल परिस्थितीच्या फरकाने आजचे निर्जिव, निष्क्रिय जीवन, संजीवनीने जिवंत करण्याचे महत्कार्य असल्या विभूति पूजनाने होत असते. म्हणून हा त्रिशत सांवत्सरिक उत्सव धडाक्याने सर्व हिंदु भूमीवर गाजला पाहिजे. आणि हिंदु जाति, तू तर हा उत्सव जातिकर्तव्य, धर्मकर्तव्य, राष्ट्रकर्तव्य म्हणून पाळला पाहिजे, कारण तू आज जी आहेस ती हा तुझा बाप शिवाजी झाला म्हणून आहेत. तेंव्हा हया बापास आठीव, आळी एकाग्रतेने तन्मय हो, व प्रार्थना कर की, शिव प्रभो, आम्हालाहि तानाजी बाजीसारखे बनण्यास स्फूर्ती दे !आणि महाराष्ट्रा तू तर तर हा उत्सव प्राणांचे झोले करुन त्यावरुन शिवरायांच्या मिरवणुकी काढून साजरा कर! तुझ्या रक्ताचा, तुझ्या सर्व पिंडाचा नैवद्य त्यांना दाखवून तू साजरा कर! तुझी सर्व बुध्दि व तुझी सर्व शक्ति त्यांच्यापुढे तांबूल तुल्य अर्पून तू हा उत्सव साजरा कर! व प्रार्थना कर की, शिवप्रभो हे सर्व तिला दिले त्या भूमातेला दिले की जिला तुम्हीही हे सर्व

अपर्ण केले होते. प्रभो, आम्हालाही त्या आत्मार्पणापासून ते तुम्हाला प्राप्त झाले ते स्वातंत्र्याचे महद्‌भाग्य प्राप्त होवो. तरुणांने, म्हणा हा महामंत्र शिवरायांचा हा उत्सव नगरोनगरी व घरोघरी साजरा करीन करीन म्हणा व एक क्षणहि न गमविता कामास लागा. क्षणाक्षणाचा व्यय व कणाकणाचा त्याग हया मातृभूमीच्या स्थंडिलावर करा. संतत नियत, कुशल कर्माचरणाने हे कर्तव्य स्थंडिल धगधग पेटू द्या व प्रसंगच आला तर शेवटची आहुति, शेवटचा महाभोग, या साडेतीन हात देहाचा देऊन, ती विजयादेवी, हिंदभूमीच्या अभ्युदयाकरता हस्तगत करा.

आज जर तुम्ही हे असे प्रत्यक्ष कृतीचे तोरणागड, सिंहगड उभे केलेत तर निश्चित समजा, निष्ठा ठेवा की, तो विजयाचा व स्वातंत्र्याचा रायगड अखेर याच पिढीत याच देही याच डोळा भूमातेच्या पायी लोळण घेईल.'[३०]

थोडक्यात, शिवाजी महाराजांपासून हिंदूंनी प्रेरणा घ्यावी व इंग्रजांना धूळ चारुन हिंदुस्थान स्वतंत्र करावा, तसेच इतिहास पुरुषांची जयंती साजरी केली तर सर्व लोक एकत्र येतात. त्याच्यात विचारांची देवाण-घेवाण होते, सारा समाज एकत्र येतो हे या लेखातून दाखवायचे आहे.

**३.६ नेपाळची जागृती :-**

गेल्या तीन वर्षामध्ये नेपाळच्या आपल्या विस्तृत देशबांधवाविषयी आपल्या नेपाळतर हिंदू प्रांतात जशी प्रभावाची जाणीव बळावत चालली आहे. त्याचप्रमाणे आणि आंशिकतः त्या आपल्या जाणिवेच्या आणि नेपाळविषयक जागृतीच्या मुळेच आपल्या नेपाळी बंधूतही आखिल हिंदू समाजाविषयी उत्कट सहानुभूती आणि ममत्त्व उत्पन्न होत चालले आहे. हिंदु संघटनांच्या डिंडिमाले प्रतिध्वनि नेपाळातील थोर पुढाऱ्यांच्या आणि विचारी लोकांच्या मनात आणि कृत्यात अधिकाधिक स्पष्टपणे उठत आहेत. तीन वर्षापूर्वी हिंदुस्थानात इतस्ततः पसरलेल्या आपल्या लक्षावधि गुरखा बंधूस इतर हिंदुसमाजाचे सुख दुःखाशी आपले सुख दुःख आणि हिंदुच्या भवितव्याशी आपणही हिंदुच असल्याने आपलेही भवितव्य अगदी अविच्छेदपणे निगडित झालेले आहे. ही भावना जवळ जवळ नव्हतीच असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे हिंदमध्ये ते आपले नेपाळी बंधू उदासिनपणे राहात असत. आपल्यातील अनेक उत्थोभक चळवळीतही ते आपणाशी समवेदना अनुभवित नसत. आपल्या अखिल हिंदु जगताच्या आशा आणि आकांक्षा ते एखाद्या तटस्थ

परकी समाजाप्रमाणे निर्मल वृत्तीने पाहात. इतकेच नव्हे तर त्यांच्या त्यांच्यातही राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले संघटनात्मक प्रयत्न करण्याची कोणी खटपट करीत नसे.

परंतु गेली दोन तीन वर्षे हिंदु समाजाचा नेपाळ हा एक अविच्छेद भाग असून अखिल हिंदू जगतात त्या आपल्या नेपाळी हिंदूस त्यांचे स्वातंत्र्य त्यांनी अजून स्वपराक्रमाने अबाधित राखिलेले असल्यामुळे, अग्रपूजेचा मान मिळाला पाहिजे, अशा प्रवृत्तीने प्रेरित झालेली नेपाळविषयक चळवळ जी चालत आली, तीमुळे आपल्याला नेपाळेतर हिंदुस नेपाळचे महत्त्व कळून येत चालले आहे. इतकेच नसूनही नेपाळी हिंदुसही त्यांचे स्वतःचे महत्त्व पूर्वी कधिही कळले नव्हते. तसे स्पष्टपणे कळून येत आहे. आपल्या समदुःखाशी तेहि समरस होऊ पाहत आहेत. आपल्या आशा हळूहळू त्यांच्याहि हृदयात उगवू लागल्या आहेत. आपल्या अग्रपूजेचा मान स्वीकारीत असता त्या अग्रपूजेने ध्वनित केलेले आपणा सर्व हिंदुचे प्रमुखत्व पावणाऱ्याच्या शिरावर, आपण सर्व हिंदूंच्या त्या महान ध्येयासाठी झटण्याचे उत्तरदायित्त्वही प्रमुखपणे त्यास जाणवू लागत आहे. हे हिंदु आपण हिंदु हा हिंदुस्थान आपल्या हिंदुची पितृभूमी आणि पुण्याभूमि, हयाच्या प्रीत्यर्थ प्राणपणाने झटणे हे हया आपल्या नेपाळी हिंदुप्रमाणेच आपलेहि परम कर्तव्य आहे. किंबहुना नेपालेतर हिंदु आणि नेपाली हिंदु हे भेदही केवळ राजकीय परिस्थितीच्या तात्कालिक योग्यायोग्यतेने पडले आहेत. ते स्वाभाविक नाहीत. जसा जसा महाराष्ट्र तसाच नेपाळ हया आसिंधुसिंधु हिंदुभूमीचा एक प्रांत हया हिंदुस्थान देशाचा एक प्रदेश हया हिंदुराष्ट्राचा एकवेळ एक नागरिक मात्र आहे. अशी राष्ट्रैक्याची भावना अशी हिंदुत्त्वाची उत्कट समवेदना नेपाळातील अनेक विचारी पुरुषांच्या हृदयात संचरु लागली आहे. आणि हिंदुसंघटनांच्या महनीय ध्वजाखाली ते आपणा सर्व हिंदुंबरोबरच सुखदुःखाचे समान वाटेकरी होऊन हिंदु जगताच्या महान आकांक्षा सफल करण्यासाठी प्रकटपणे सम्मिलित होऊ पाहात आहेत.[३१]

हया नवीन आशेचा उदय आणि हया नवीन कार्याची जाणीव उत्पन्न होताच आजवर दृष्टीस न पडलेली जागृती नेपाळी समाजात दिसून येऊ लागली. महान ध्येयाचे दर्शनासारखीच राष्ट्रीय माणसात महान शक्ति संचरु लागतात. नेपाळात राष्ट्रीय जागृतीची ही प्रादुर्भूत होणारी चिन्हे कोणती आहेत. त्यांच्यात काय उलाढाली

चालल्या आहेत आणि हिंदुसंघटनेच्या दृष्टीने त्यांचा काय उपयोग आहे हे आपणा सर्वांस विदित असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपल्या चळवळीचे प्रतिध्वनि त्यांच्यात उत्पन्न करण्याचीहि तितकीच आवश्यकता आहे. हया दोन्ही उणिवा भरुन काढावयाच्या असतील, तर परस्परांच्या विचारांशी संलग्न असणारी आणि आचारास संलग्न करणारी वृत्तपत्रे त्यांच्यात आणि आपल्यात निघाली पाहिजेत. एवढयासाठीच गेल्या ३ वर्षाच्या प्रयत्नांचा परिणाम होत असता गुरखा जातीतच नव्हे, तर उभ्या नेपाली जनतेत अशा प्रकारच्या वृत्तपत्रांची रुचित उत्पन्न झाली आहे, हे ऐकून कोणाहि हिंदुस आनंद वाटेल. स्वतःचे महत्त्व त्यास कळू लागल्यापासून त्यांच्यातील प्रमुख मंडळींनी ब्रिटिश हिंदुस्थानात विस्कटलेल्या जवळ जवळ दहा लक्ष नेपाळी हिंदुस संघटित करण्याचे प्रयत्न करण्याचे ठरवून कलकत्ता आणि डेहराडून येथे संघ स्थापन केले असून, डेहराडूनच्या संघाने तर चांगलीच चळवळ चालविली आहे. त्यांच्या द्वारा दोन उत्तम प्रकारे चालविलेली पत्रे प्रसिध्द होऊ लागली असून, त्यापैकी इंग्रजी पत्राचे नाव Hymolayan Times असे असून हे नेपाळी भाषेत प्रसिध्द होणाऱ्या पत्राचे नाव गुरखा समाचार हे आहे.[३२]

नेपाळी समाजात ऐक्य निर्माण व्हावयाचे असल्यास वृत्तपत्र निघणे व ते सर्वांपर्यंत पोहोचणे त्यातील विचार समाजात रुजविणे हे गरजेचे आहे, असे या लेखावरुन वाटते.'

**३.७ बंगाली राजकीय बंदी :-**

जाचा अशा या मृगराज बाला।
घाला चला बंदित पावकाला।।
याच्यापुढे घ्याल उपायनाला
कारागृहाचे भय काय त्याला।। १।। कवि गोविंद

कोणताहि देश दैवदुर्विलासाने एकदा परतंत्र झाला म्हणजे नेहमीच जेते लोक आपल्या विजयाच्या उन्मादात जित राष्ट्रातील तेजस्वी पुरुषांना कारागृहाची वाट दाखवित असतात. पूर्वी ज्या वेळी राजशासनाच्या कल्पना भिन्न होत्या तेंव्हा जित लोकांना जेते लोक आपल्या विजयी रथांना बांधून मिरवित जात असत व अशा रीतीने सर्व जित लोकांना तुम्ही दास झालात, आम्ही तुम्हाला दास केले, दासांनो,

आत आमच्याकरिता राबा, अशा ललकाऱ्या देत उघड उघड रीतीने पूर्वीचे जेते लोक पराभूत लोकांना वागवित असत.

ही रीति रानटी जरी, दिसली व असली तरी ती सरळ तरी आहे. या रीतीने जित लोकांना आपल्या लाजिरवाण्या जिण्याची जाणीव क्षणाक्षणाला जिवंत रहात असे व कधी तरी असा काळ येत असे की, असे लज्जेचे जिणे जगण्यापेक्षा मारिता मारिता मरावे ही निर्वाणाची स्फूर्ती त्यांच्या हृदयात जागृत होऊन ते पारतंत्र्याची श्रृंखला तोडून टाकण्यास सज्ज होत व तो प्रयत्न करता करता श्रृंखला तोडून टाकण्यास सज्ज होत व तो प्रयत्न करता करता श्रृंखला तरी तुटत अथवा लाजिरवाण्या जिण्याचा बंध तरी सुटून जाऊन होतो वा प्रास्थसि स्वर्ग जिला वा भोक्ष्य से महिम या प्रमाणे कोणतीतरी एक तड परंतु ती मानाची, माणुसकीची, वीरपणाची एक तड लागत असे.

परंतु जग असे सुधारत चालले तसे हे सरळ देवघेवीचे वर्तन पालटून तेथे दांभिकपणा वाढत जाऊ लागला व मानभावीपणाची गुळचट भाषणे सुरु झाली, पारतंत्र्याच्याच श्रृंखला, परंतु त्या सोन्याने मढविलेल्या व पारतंत्र्याचीच कारागारे परंतु ती लता वेलींच्या दाट छायेत शोभायमान केलेली म्हणून सकृद्दर्शनी तीच गोंडस दिसावीत. स्वतंत्रपणाच्या सुट्ट्या पायांपेक्षा, सोन्याच्या श्रृंखलांनी जखडलेले पाय अधिक दर्शनीय मानवते व स्वतंत्रपणाच्या रानावनातील उजाड झोपडीपेक्षा, लता, वृक्षांनी सजवलेली बंदिशाळा अधिक मोहक व्हावी, असे विपरीत प्रकार कुटिल राजनीतीच्या राजवटीत राजरोसपणे सुरु झाले.

ब्रिटिश लोक या असल्या राजनीतीत अग्रगण्य असल्याने त्यांनी दास केलेल्या हिंदुस्थानातही दांभिक राजवटी मोठया गजराने सुरु केली व हिंदुस्थानचेच कल्याणकरता व तेथे शांतता प्रस्थापित करुन लोकांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्वतंत्रता, शिकवण्याकरता आम्ही आलो, असा बहाणा केला व त्यामुळे साधे भोळे लोक फसले जाऊन इंग्रज लोकांची दास्याची सोनेरी श्रृंखला पूर्वीच्या ओबड धोबड स्वातंत्र्यापेक्षा अधिक पथ्यकर व हितकर मानण्यात आली. दासवृत्तीचे मरणप्राय जिणेच लोभालोभाने कवटाळण्यात येऊ लागले.

परंतु हा दांभिकपणाचा देखावा व सोन्याच्या रंगाच्या आत लपलेले घोर बंधन हे हिंदुस्थानातल्या काही चाणाक्ष लोकांनी जाणले व त्यांनी त्याचे अविष्करण

करण्याचे पवित्र कर्तव्य सुरु करुन सर्व हिंदुस्थानला ऊदास-तुजित, असे समजावून देण्यास आरंभ केला व तेंव्हापासून हिंदुस्थानातील आधुनिक सत्ताधारी व राजबंदी यांच्यामधला झगडा सुरु झाला.[३३]

हिंदुस्थानातल्या तेजस्वी व देशभक्त पुरुषांनी हिंदी लोकांना त्यांची खरी लिन दशा समजावून देण्याचा प्रयत्न करताच लोकांची चित्ते चलित होऊ लागली व मृतावस्थेची शांतता नष्ट होऊन तेथे जिवंतपणाची चळवळ सुरु झाली. ते पाहून ब्रिटिश राजसत्तेने सार्वजनिक शांतता भंग पावते. म्हणून आरोळा ठोकून असल्या तेजस्वी पुरुषांना भराभर बंदिगृहात खेचण्यास सुरुवात केली व तेंव्हापासून हा राजकीय बंदिजनांचा लढा उत्पन्न झाला.

रोमन लोकांप्रमाणे व कार्येज मधील जेत्यांप्रमाणे जर उघड उघड विजेत्यांच्या वैभवाकरिता तुला बंदिजन केला, असे सांगून हिंदी लोकांना ब्रिटिश लोकांनी बंदीत घातले असते, तर मग त्यांचे गाऱ्हाणे हे अशा रीतीने करण्याचे कारण नव्हते. मग त्यातून मुक्त होण्यास बेडीवर प्रचंड आघात व तो घालता घालता ती तुटली, तर मुक्तता किंवा न तुटली तर मरण असाच त्याचा परिणाम लाविला गेला असता. परंतु आज प्रलंबित राज्यकर्ते लोकांच्या हिताकरता, लोकांच्याच स्वास्थ्याकरता, व लोकांमध्ये विधि-नियम (Law and Order) रहावे म्हणून हया लोकांना आम्ही बंदिस्त घालतो. देशपार करतो, फासावर चढवितो असे घोषित करीत आहोत व म्हणूनच हया दांभिक राजनीतीचे अविष्करण अशा रीतीने करणे अगत्याचे झाले आहे.

हल्लीचे राज्यकर्ते आपणास सुधारलेले म्हणवितात म्हणूनच असा प्रश्न उपस्थित होतो की, इतर सुधारलेल्या जगात असेच का बंगाल्याप्रमाणे चौकशीवाचून शेकडो लोक बंदीत घालतात? कुणाहि मनुष्याची चौकशी न्यायालयात उघड उघड करुन त्याच्याविरुध्द असलेला सर्व पुरावा सिध्द करुन त्याला स्वसंरक्षण करण्याची पूर्ण संधि देऊन मग अपराध सिध्द झाला, तर त्यास अपराधी ठरविता येते व शिक्षा देता येते. इतकेच नव्हे, तर जर आरोपीच्या विरुध्द पुराव्यात आरोपींच्या अपराधाबद्दल साधारण संशय उत्पन्न झाला, तर त्या संशयाचा फायदा आरोपीला मिळावा, असे शास्त्र आहे. न्यायदेवतेचा काटेकोरपणा त्यांच्याहि पुढे जाऊन असे

तत्त्व मान्य झाले आहे की, संशयाने शंभर अपराधी सुटले तरी चालतील, परंतु एकहि निरपराधी मनुष्य शिक्षा न पावावा.[३४]

सुधारलेल्या जगात अशा रीतीने न्यायदान करण्यात येते, परंतु बंगालमध्ये जे आज १५० तरुण देशभक्त बंदिगृहात खितपत पडले आहेत, त्यांना कसे पकडले? त्यांना कसे बंदीत डांबून ठेवले? त्यांच्याविरुध्द उघड चौकशी न्यायालयात झाली का नाही? त्यांच्याविरुध्द पुरावा सिध्द करुन दाखविला का नाही? त्यांना त्यांच्या आरोपाविरुध्द संरक्षण करण्यास संधी दिली का नाही? तर मग तुम्ही काय केले? संशयाचा लाभ बंगाली देशभक्तांना तर दिला नाहीच, परंतु संशयाचा लाभ स्वतःस करुन घेऊन केवळ संशय येताच या सर्व बंगाली देशभक्तास बंदिशाळा दाखवून न्यायाचा व सुधारणेच्या डौलाचा यांनी घात केला. काय, ही सुधारणा काय? व तुम्ही सुधारलेले सरकार काय? त्यापेक्षा स्पष्टपणे म्हणा की आम्ही पूर्वीचे रोमन लोक, आम्ही कालचे रशियाचे झार, आम्ही आजचे बल हाच कायदा समजणारे आफ्रिकी रानटी लोक.

दुसरे एक असेच झगझगीत कारण सरकार पुढे करीत असते. ते कारण म्हणजे सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्याकरिता हया उत्पाती लोकांना आम्ही डांबून बंदीत घातले, असे यांचे म्हणणे आता सार्वजनिक शांतता व सुरक्षितात ही कोणती हे ठरविण्याचा अधिकार अर्थातच जे जन या देशात आज विद्यमान आहेत, त्याच सर्वजनांचा इतर जनांचा नाही. मग या देशांतील विद्यमान असलेल्या सर्वजनांनी, आमची सर्वांची (सार्वजनिक) शांतता भंग पावते आहे. म्हणून हे इंग्रज सरकार हो तुम्ही या तरुण बंगाली दीडशे देशभक्तांना आमच्यातून उचला व बंदिस्त कोंडा, नाही तर आमची शांतता ठार मरत आहे. अशा तऱ्हेची काही लेखी किंवा निदान तोंडी तरी विनंती तुम्हाकडे केली आहे का? सर्व जनांनी तर राहोच परंतु काही जनांनी तरी? अर्थात, तुमचे पोलीस दलातले तुमच्याच भाकरीचे मिंधे झालले काही कुऱ्हाडीचे दांडे सोडून इतर कुणीतरी तुमच्याकडे अशी याचना केली आहे काय? नाही इतकेच नव्हे तर आज सर्व देशातील सर्वजण अशिक्षितांपासून तो सुशिक्षित पंडित मोतीलाल नेहरुंपर्यंत एक आवाजाने तुम्हास बजावीत आहेत की, हया देशभक्तांना हया पुण्यपावनांना मुक्त करा. धरलेत हा अपराध केलात. आता तरी मुक्त करा व गतापराधाचे प्रायश्चित घ्या. जर हया देशातले सर्वजण असे सांगत

असताही तुम्ही कठोरपणे व शक्तीच्या गर्वाने यांना सोडीत नाही व म्हणून जिकडे तिकडे आज शांतताभंग होत आहे. बंगालमधल्या अनेक घरातील सुकुमार स्त्रिया विरहाने रडत आहेत, अनेक अल्हाड मुले बाबा खाऊ आणावयास गेले आहेत, सकाळ झाली, दुपार गेली, संध्याकाळा मावळली आणि तरीही बाबा परत आले नाहीत म्हणून रडून रडून श्रमतांनाच झोपी जात आहेत व दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा बाबा आहे का? म्हणून आकांत करुन उठत आहेत. अनेक वृध्द माता पितरे आपल्या अपत्याकरता टाहो फोडीत आहेत. हा सर्व आकांत कुणी तुडविला व त्यामुळे खरा शांतताभंग कुणी केला, त्यापेक्षा स्पष्टपणे म्हणा की, आम्ही पूर्वीचे रोमन लोक, आम्ही कालचे रशियाचे झार, आम्ही आजचे बल हाच कायदा समजणारे आफ्रिदी रानटी लोक.'[३५]

तिसरा आरोप सरकार पक्षियांकडून या बंदिवानावर आणला जातो. तो म्हणजे हे लोक रशियाच्या बोल्डोव्हिक्स लोकांशी संधान बांधतात. त्यांच्याजवळून पैसे घेतात व या देशात उत्पत करतात. जर हे खरेच इतक्या लांबच्या रशियाशी संधान बांधीत असले, तर तुमचे चित्रगुप्ताचे खातेही फार लांबवर पसरले आहे. मग तुम्हाला त्यांच्याविरुध्द निःसंशय पुरावा कसा मिळविता येत नाही? एवढे समुद्र, एवढे पर्वत एवढाली परके राष्ट्रे, या सप्तकोटातून हया परतंत्र देशाच्या लोकांना रशियाशी कसा संबंध तुमच्या अत्यंत चाणाक्ष व तीक्ष्ण दृष्टितूनही राखता येतो, हे समजणे कठीण आहे. चीनसारखा स्वतंत्र देश, रशियाइतका त्यांच्याजवळ, तुम्ही इतके दूर व तरीहि चीन व रशिया यांच्या संबंधांचे सर्व पुरावे तुम्हाजवळ सिध्द आहेत, म्हणून तुम्ही जगात प्रसिध्द करता व तुमच्या गलेतल्या हया बंगाली लोकांचा रशियाशी असलेला संबंध उघड रीतीने तुम्ही सिध्द करु शकत नाही हे कसे? का हे दीडशे तरुण बंगाली देशभक्त तुमच्या सर्व चित्रगुप्त खात्यापेक्षाहि अधिक बुध्दिमान व कर्तृत्वशाली आहेत? जर असतील तर मग त्यांना तुरुंगात कशाला ठेवता? त्यांच्याच स्वाधीन तुमचे चित्रगुप्तांचे सर्व खाते का नाही करीत? त्यांच्यावर विश्वास टाकावा, त्यांच्या हातात त्यांच्या देशातील सत्ता द्यावी, यापेक्षा त्यांचे तरी अधिक काय म्हणणे आहे?[३६]

यापेक्षा आणखी एका दृष्टीने विचार करणे अवश्य आहे. या दीडशे लोकांना ज्या वेळी पकडले त्या वेळी बंगाल्यातील परिस्थिती अगदी क्रांतिस्वरुप बनली होती

का? हे पकडल्याबरोबर ती परिस्थिती आज अगदी प्लासीच्या लढाईनंतर जी नितांत शांतता होती तशी झाली आहे का? जर झाली असेल तर मग या दीडशे तरुणांची बंदी एकेपरी न्याय करेल. परंतु याबद्दल प्रत्यक्ष गृहमंत्री सर अलेक्झांडरच असे म्हणतात की, सध्या धड शांतताहि नाही व अशांतताहि नाही. उघड अत्याचार बंद असले तरी अशांततेचा अग्नि आतल्या आत घुमत आहे. असे जर आहे तर मग या दीडशे लोकांना बंदीत घालून काय केलत? हे मुक्त होते तेंव्हा काही १८५७ च्या प्रमाणे क्रांती घडत नव्हती व आता बध्द आहेत, तर १७५७ प्रमाणे नितांत शांतता नांदत नाही, तर मग तुम्ही यांना का पकडले व अजुनही का सोडीत नाही.

परंतु हा सर्व युक्तिवाद एकीकडे ठेवून आपण जर राष्ट्राच्या मानसशास्त्राकडे (Psychology) थोडे पाहिले, तर आपल्यास काय आढळून येते? हे सर्व देशभक्त सुशिक्षित, ज्ञात, सज्जन, धनवान, कुणी कवी, कुणी वक्ते, कुणी लेखक, कुणी तपी असे आहेत. तरुण वय विपुल धन, प्रभूत विद्या, अनुरक्त रमणी ही बुध्दाच्या वज्रकठोर असंग बुध्दीच्या वृत्तीने पाणी सोडावे व वणवण भटकत फिरुन एका प्रबल राजसत्तेशी झगडण्यास सिध्द व्हावे, ही गोष्ट काही सामान्य आहे का? उगीच करमणुकीकरता उगीच उत्पातप्रियतेकरता, उगीच चंगीभंगीपणाकरता का कुणी हे दिव्य करण्यास सिध्द होतो? काटयाच्या मार्गावरुन जाता जाता पायातून वाहणाऱ्या रक्तांच्या धारांचे क्लेश उगीच का कुणी हसतमुखाने सहन करतो? नाही हे दिव्य उगीच आचरिता येत नाही. हे दिव्य केवळ सुडाच्या राक्षसी वृत्तीने उत्पाताच्या आसुरी लालसेने किंवा कुणाच्यातरी सैतानी द्वेषाने प्रेरित होऊन आचरिता येत नाही. हे दिव्य कोणत्या तरी दिव्य भव्य उत्तुंग ध्येयावर अढळ प्रेम जडल्यानेच केवळ आचरिता येते. बुध्दाप्रमाणे धर्म मोक्षावर, देवावर किंवा देशावर अढळ, अतुल, अनंत प्रेम जडल्यानेच हे दिव्य आचरिता येते. द्वेषाच्या क्षुद्र वृत्तीने हे साधता येत नाही.[३७]

हे दीडशे व आजपर्यंत झालेल्या, आज इतरत्र असलेल्या व पुढे होणाऱ्या देशभक्तांचे प्रयत्न हे काही इंग्रजांच्या द्वेषाने होत नाहीत. कुणाहि इंग्रजाला व्यक्तिगत अपघात झाला, तर हे सर्व देशभक्त भूतदयेने तरलहृदय होऊन दुःखी होतील, द्वेष हा यांचा मुख्य विचारच नव्हे. तर यांच्या मनात या भूमातेवर अलोट प्रेम असते व ते यांना हे सतीचे वाण घ्यावयास लावते. ही सुजला, सुफला, ही मलयजसुशीलता

आर्यभूमि, माझी जननी, ही रामाची कर्तव्यभूमि, ही श्रीकृष्णाची गीताभूमि, माझी मातृभूमि आहे आणि ती परतंत्र, ती पददलित, ती अवमानित झाली आहे. हे दृश्य त्यांच्या हृदयाला शल्याप्रमाणे बोचते. व मग त्या भूमीला दुःखमुक्त करण्याकरिता, त्या मातृभूमीला पुन्हा वैभवशाली करण्याकरिता ते आपल्या प्राणांची पर्वा सोडतात. स्वजनांचा मोह, रमणींचे प्रेम, अपत्यांचा स्नेह, ही सर्व बंधने ते तोडतात व निर्भय बनून हे सतीचे वाण ते हातावर घेतात.

तेव्हा त्यांना जर हे ध्येय साध्य होण्यासारखी परिस्थिती राजसत्तेने निर्माण करुन दिली, तर त्याच्यापासून कुणालाच भिण्याचे कारण नको. त्यांना बंदिशाळेत डांबावयास नको, त्यांना परागंदा करावयास नको, त्यांना फासावर चढवावयास नको, काही नको. त्यांना हया देशमातेला, स्वाधीन, स्वायत्त, वैभवसंपन्न करण्यास अवसर द्या. म्हणजे ते मऊ मेणाहून किंवा मृदूनि कुसुमादिपि असलेले आढळतील, ते हिनानलया हिनांची सेवा करुन त्यांची उन्नति करण्यास सिध्द होतील व स्वतः उपाशी राहूनहि क्षुधिताला अन्न देतील, परंतु ज्या वेळा मातृभूमीच्या उन्नतीचा सर्व मार्ग कठोरपणे अडविला जातो. ज्या वेळा जन्मसिध्द अधिकार सत्तामदाने पायाखाली तुडविलेले जात असलेले दृष्टीस पडतात, ज्यावेळी सर्व सरळ प्रयत्न तुच्छ लेखले जातात, त्यावेळी मात्र हे असले देशभक्त, कठीण वज्रास भेटू ऐसे वज्रादपि कठोराणी असे बनतात व मग मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या दिव्य ध्येयाकरिता जिवाचे रान करुन आयुष्याचेही हवन, हसन हसत देशमातेच्या स्थाडिला करण्यास सदासर्वदा सिध्द असतात व एकदा असा एक देशवीर जरी हुतात्मा झाला तरी मग ती परंपरा सुरु होते. एका देशवीराच्या वृत्ती अनेकांच्या हृदयात वीज लवावी तशा चमकून प्रविष्ठ होतात व ही परंपरा मग पिढीपिढीतून भागीरथीच्या प्रवाहाप्रमाणे अखंड, अथांग होत जाते व सर्व प्रतिकारांना विफल करीत ध्येय गाठते. म्हणून ही देशवीरांची मानसवृत्ति (Psychology) लक्षात घेऊन न्यायाला स्मरुन सुधारलेल्या विसाव्या शतकातले आपण, म्हणून बंगाल व हिंदुस्थान सरकारने या सर्व देशभक्तांना त्वरित मुक्त करावे हेच युक्त आहे. या दीडशे राजबंदींची शरीर स्वास्थ्याची परिस्थितीहि अत्यंत चिंताजनक आहे. या लोकांपैकी ११० जणांची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यावरुन ते अनेकजण रोगांनी पछाडले आहेत असे बाहेर आले आहे. हिवताप, पोटदुखी, कपाळदुखी, संधिवात इत्यादि रोगांनी

त्यांच्यावर घाला घातला आहे. श्री. जीवनलाल चटर्जी यांना क्षय लागला आहे. अमूल्य चंद्र मुखर्जी यांना पकडल्याला दोन वर्षे झाली व बऱ्हाणपूरमधील बंदिशाळेत त्यांची स्थापना झाली. त्यांना अपचनाचे, दातांचे वगैरे रोग होऊन हा केवळ २२ वर्षाचा तरुण हया कोवळया वयात रोगांनी जर्जर झाला आहे. त्याचप्रमाणे अजितकुमार गुप्त हे खुलना येथे असून त्यांना भयंकर पोटदुखी लागली आहे. असे कुठवर सांगावे? प्रसिध्द सुभाषचंद्र बोस यांच्या अत्यंत चिंताजनक प्रकृतीमुळे त्यांना रंगूनला आणले आहे हे तर प्रसिध्दच आहे.[३८]

तेंव्हा केवळ संशयाच्या बळावर, एकपक्षी पुराव्यावर, विनाचौकशीने अन्यायी कायद्याच्या आधारावर हे अनेक देशभक्त, देशवीर बंगाली बंदी जे कारागृहात टाकले, त्यांना त्वरित मुक्त करणे हेच सरकारचे आद्यकर्तव्य ठरते व लोकांचे स्पष्ट कर्तव्य म्हणजे सारखी घोषणा वृत्तपत्रातून, संस्थामधून, सभामधून, नगरानगराच्या वतीने ही मागणी आपण निकराने केली पाहिजे. कारण हे देशभक्त आपण बाहेर चैनीत असता, हसत खेळत असता, तिकडे कारागारात नाना व्याधींनी व्यथित होत, कष्ट भोगीत देशसेवेची तपश्चर्या आचरीत आहेत. तेंव्हा सार्वत्रिक व सार्वजनिक ही चळवळ सुरु ठेवावी व अंतःकरणातून निदान दिवसातून एकदा तरी त्यांच्या आयुशरोग्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करावी एवढेही आपल्या हातून होणार नाही काय?[३९] वरील लेखामधून १०५ बंगाली रेडिवानांची व्यथा डॉ. सावरकरांनी मांडली आहे. इंग्रज सरकारने त्यांची लवकर मुक्तता करावी. त्यांची योग्य अशी काळजी घ्यावी, असे ते म्हणतात. विनाकारण अडकवलेल्या देशभक्तांची मुक्ताता करावी त्यांच्यासाठी गावोगावी सभा घ्याव्या, आंदोलन करुन त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करावे ही डॉ. सावरकरांची भूमिका होय.

### ३.८ हिंदु महासभेची स्पष्टोक्ति :-

यंदाच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाला सर्वच बाजूंनी विशेष महत्त्व आले होते. पाटलीपुत्र नगरसारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थानी या वेळच्या हिंदुसभेचे अधिवेशन भरल्याने हिंदु होते कोण व आहेत कोण? हया तुलनात्मक प्रश्नाचे प्रत्येक हिंदु हृदयास पाटलीपुत्र नगरातील प्रत्येक वाट, प्रत्येक वृक्ष, त्या वृक्षावरुन वाहणारी वायूची प्रत्येक लहर व मातीचा प्रत्येक कण हे मर्मभेदी वाणीने हरकावीत असतील व सम्राट चंद्रगुप्ताच्या दिव्य शौर्याची व रिपुबलदर्पणाची आठवण आहे का? अशी

पृच्छा करीत असतील! याच नगरीतून चंद्रगुप्ताची अखंड विजयी सैन्ये निघून त्यांनी ग्रीक, ग्रीथिमन वगेरे परकीय लोकांना ठिकठिकाणी पराजित करुन हिंदु साम्राज्याची विजयी पताका अफगाणिस्थानपासून तो लंकेपर्यंत अप्रतिहत केल्याने मिरवित नेली होती. तेच पाटलीपुत्र हल्लीचे पाटणा नगर या अधिवेशनाला लाभले होते. तेथील सर्व प्रमुख हिंदु पुढारी या अधिवेशनात मिळाले होते व तेथील हिंदु तरुण अधिवेशनाची निरनिराळी कार्ये अहमहमिकेने पार पाडीत होते. पाचशे स्वयंसेवकांचे एक संघटित दल सज्ज होऊन अधिवेशनाचे रक्षण कार्य करीत होते. या सर्व प्रसंगाला साजतील असेच अध्यक्ष यंदाच्या परिषदेला लाभले होते. डॉ. मुंजाबारखा शिवाई बाण्याचा व तरीहि मुत्सद्दी डोक्याचा धीरगंभीर पुढारी या वर्षी अध्यक्षस्थानी विराजमान झाला होता. सर्व पाटणानगराने अत्यंत अभिमानाने डॉ. मुंजे यांचे स्वागत केले व त्याची एक मैल लांबीचे एक प्रचंड मिरवणूक काढली. हया मिरवणुकीतून वीस हत्तीचे दल, आपल्या भव्य शडा दंडांना हलवीत डोलवीत राजगतीने चालले होते व अध्यक्षांवर मार्गावरच्या दोन्ही बाजूंनी फुलांचा वर्षाव होत होता. अखिल हिंदुमात्र या मिरवणुकीस लोटला होता व हिंदुत्वाचा आजवर निद्रास असलेला व म्हणूनच अवमानित झालेला सिंह, आता शनैःशनैः कसा जागृत होऊ लागला आहे, याचे प्रत्यंतर अत्यंत निराशावादी हिंदुला देखील पटवीत होता.[४०]

या अधिवेशनाला हिंदुंचे पुष्कळ पुढारी उपस्थित होते. राजा नरेंद्रनाथ, लाला लजपतराय, बाबू राजेंद्र प्रसाद, गौरीशंकर मिश्र, राजा महेंद्रप्रसाद, एस.सिंह, देवकी प्रसाद सिंह, शिवपद गुप्त, पं. जगत नारायण, स्वामी सत्यदेव वगैरे प्रमुख पुढारी तेथे जमले होते. प्रातःसमरणीय पंडित मदनमोहन मालवीय हे हरिद्वारच्या कुंभमेळयात गुंतले असल्याने जरी प्रथमच्या दिवशी त्यांना येता आले नाही तरी मागाहून ते आले. परदेशात असलेल्या हिंदुंचे देखील लक्ष हळूहळू या हिंदु संघटनांकडे वेधले जात आहे हे ग्लासगो येथे स्थापन झालेल्या हिंदुसभेने सिध्द केले आहे. तेथील शाखेचे कार्यवाह पी.राय. चौधरी यांनी एक तार पाठवून सभेचे यश चिंतिले व श्रध्दानंद निधिला फुल ना फुलाची पाकळी म्हणून पन्नास रुपये पाठविले. याखेरीज इतरहि ठायी ठायींच्या हिंदु पुढाऱ्यांनी विद्युतसंदेशांनी हिंदुसभेचे मांगल्य व यश चिंतिले होते.

स्वागत सभेचे अध्यक्ष कुमार गंगानंदसिंह यांनी सुमचित शब्दात सर्वांचे स्वागत केल्यावर डॉ. मुंजे हे योग्य रीतीने अध्यक्ष निवडले गेले व त्यांनी आपल्या खणखणीत व निर्भिड भाषणाने हल्लीची हिंदुंची वृत्ती सत्यपणाने सर्वांसमोर मांडली.

डॉ. मुंजे यांचे भाषण समग्र जरी अद्याप हाती आले नाही तरी जे भाषण हाती आले आहे, त्यावरुन त्यांनी मनात एक बाहेर एक असे घातकी धोरण स्वीकारले नाही, एवढेच मात्र सिध्द होते. व आजच्या काळाला हे स्पष्ट बोलणेच अवश्य होते. काही लोकांची अशी समजूत झालेली दिसते की हिंदुमुसलमानांची एकी गुळचट भाषणे करुन मुसलमानांचा जेथे जेथे संबंध येईल तेथे तेथे सर्वदोष हिंदुवर घेऊन व मुसलमानांची वृथा स्तृति करुन आपणास साधता येईल, परंतु ही गोष्ट सर्वथैव चुकीची आहे व या पध्दतीने हिंदुंची वचनांतर होतेच होते. परंतु मुसलमान देखील लाडाने बिघडलेल्या मुलाप्रमाणे शेफारुन जाऊन आत्मनाश करुन घेण्याच्या पधाला लागले आहेत. हिंदुस्थान आज परतंत्र असल्याने त्यास स्वतंत्र करणे हे आद्य कर्तव्य सर्वांचेच आहे. ते हिंदुंचे आहे व मुसलमानांचे नाही असे थोडेच आहे. परंतु आजपर्यंत हिंदु पुढाऱ्याने अनेकदा अथवा सर्वदाच मुसलमानांची नेहमी अन्याय्य रीतिनाहि मनधरणी करुन, त्याचे दोष न बोलता, त्याच्या अराष्ट्रीय वृत्तिचेहि चोचले करुन त्यांना असे भासविले आहे की, जणू काय स्वराज्य जे मिळणार ते हिंदूंनीच मिळवायचे आहे. मुसलमानांचा त्याच्याशी काहीही संबंध नाही व म्हणून स्वराज्याचे सर्व लढे हिंदुंनी लढावे, राज्य क्रांतीचे प्रयत्न करता हिंदूंनी काळे पाणी भोगावे, फासावर लटकावे, तुरुंगात जावे, सरकारशी असहकारिता करावी. व मुसलमानांनी मात्र, हिंदु हे असे देशाच्या लढयात गुंतलेले पाहून हसन निझामीच्या पध्दतशीर कटाची जाळी विणीत बसून कहंदु जातीला शक्य तिकी गिळंकृत करण्याची करणी करावी व ही कुटिल कारस्थाने उघडकीस आली, तरी मुसलमानभाईला दोष देऊ नये व फार फार तर मुक्तता स्वीकारावी असे भेकड, अन्याय्य, पक्षपती व अंनएव, असत्य धोरण मोठमोठया धुरंधरांनी चालविले होते व त्यायोगे मुसलमान हम करेसो कायदा हयाच वृत्तीने हिंदुस्थानात वावरत होते.[४१]

परंतु ही मिथ्या कल्पना सोडून देण्याचा काळ आता प्राप्त झाला आहे व ठिकठिकाणी ही जाणीव उत्पन्न होऊन हिंदु लोक संघटनांच्या आकाशवाणीने जागे होत आहेत. सर शंकरन नायर यांच्यासारख्या देशभक्ताने जणू वैतागाने जाऊन

'कौन्सिल ऑफ स्टेट' मध्ये अशी सूचना आणली की, संयुक्त मतदारपध्दती मुसलमानांनी मान्य केल्यावाचून कोणत्याच सुधारणा पुढे देऊ नये. सर शंकर नायरना ही वृत्ति का उत्पन्न झाली? त्यांचे काय स्वराज्यावर प्रेम नाही? ज्यांनी जनरल अथरने हिंदुस्थानच्या मानाला अमृतसरमध्ये धुळीत मिळविले म्हणून संतप्त होऊन हिंदुस्थानाची तेजस्वी वृत्ति, स्वार्थाला लाथ मारुन दाखविली व डायरला निर्भिड भाषेने काळोखाला चोराची उपमा दिली, त्याच देशाच्या गौरवाकरिता स्वार्थावर लाथ मारणाऱ्या शंकर नायरांना ही बुध्दि का व्हावी याचे उत्तर कशात सापडेल? याचे उत्तर मलबारमधील हत्त्याकांडात सापडेल. कोहाटमधील दंग्याच्या भेसूरपणात सापडेल, याचे उत्तर श्रध्दानंदाच्या भयंकर रक्तस्त्रावात सापडेल. मुसलमानांनी या अत्याचाराला जर आळा घातला असता, तर आजही आग इतकी भयंकर भडकलीच नसती. व म्हणून डॉ. मुंजांनी योग्य वेळी योग्य शब्दात हिंदुंनी काय करावे हे निर्भिडपणे सांगितले, याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

त्यांनी सांगितले की, मुसलमानांना त्यांच्या हल्लीच्या मनोवृत्तीत खुशाल गढून जाऊ द्या व त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करा. (Leave the Muslims severely alone) व तुम्ही जर तुम्हाला स्वतंत्र हिंदु अस्तित्त्व कायम ठेवावयाचे असेल तर, जर तुम्हाला भ्याडपणाचे व ऐटी-चैनीचे जिणे जगून मुसलमानमय व्हावयाचे नसेल तर, एकतानपणाने शुध्दिसंघटनेलाच वाहून घ्यावयास पाहिजे. डॉ. मुंजे यांनी दुसरे एक महत्सल या भाषणात सांगितले आहे व ते म्हणजे हिंदुसंघटन यशस्वी करणे म्हणजेच स्वराज्याची वाट मोकळी करणे आहे. कारण हिंदुस्थानातील बहुसंख्यांक बावीस कोटी लोक जर नेमके दुबळे, भेकड व प्रतिकाशक्तीहीन राहिले तर स्वराज्य मिळेल कसे व तगेल कसे? तेंव्हा हिंदुसंघटन म्हणजे काही केवळ मुसलमानांच्याच विरुध्द चालले आहे असे नाही. हिंदुसंघटन हिंदु जातीला जिवंत राहण्याइतकी सबल, संघटित व प्रतिकारक्षम करण्याकरता चाललेले आहे. भगवान सहस्त्ररश्मी जो उगवत असतो तो काय काळोखाच्या द्वेषाने उगवत असतो? तो जगाला जीवन देण्याला, जगाला तेज देण्याला, जगाला मार्ग दर्शविण्याला उगवत असतो. काळोखाचे शत्रुत्व त्याच्या गावीही नसते. सूर्य उगवू लागला म्हणजे आपोआपच विनाप्रयत्न काळोख नष्ट होतो. ही गोष्ट वेगळी परंतु म्हणून जर कुणी म्हणू लागला की, काळोख नष्ट करण्याकरताच सूर्य उगवतो तर ते जितके अन्यथा व

अज्ञानमूलक आहे. तितकेच हिंदुसंघटन, मुसलमानांच्या द्वेषाने केले जाते हे म्हणणेहि आहे. हिंदुसंघटन हे हिंदु जातीच्या संस्कृतिला पुनरुत्थित करण्याकरिता उदित झाले आहे व म्हणूनच डॉ. मुंजे आग्रहाने सांगतात की, स्वराज्य संपादनाची पात्रता व सिध्दता देखील हिंदुसंघटनेनेच घडून येईल.

आता हिंदु जातीचे हे उत्थान मुसलमानात किंवा दुसऱ्या अल्पसंख्यांकांना नाशकारकार होऊ नये हे म्हणणे अगदी न्याय आहे व हिंदु जातिनेहि या बद्दल सर्वांना स्पष्टपणे निर्वाळा देणे आवश्य आहे व त्याप्रमाणे डॉ. मुंजे यांनी हिंदुमहासभेच्या अत्यंत अधिकारी व्यासपीठावरुन असा निर्वाळा दिला हे योग्यच झाले. डॉ. मुंज्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की हिंदु आपल्या सबळ बहुमताच्या शक्तीवर कोणत्याही तऱ्हेचा व कोणत्याहि स्वरुपाचा अन्याय अल्पसंख्यांकावर करणार नाही. (That there was no reason for any fear of teindus exercising the tyranny of the majority in any shape or manner)
व या महत्त्वपूर्ण आश्वासनावर मुसलमानांनी का विश्वास ठेवू नये? विश्वास ठेवणे हे जर पूर्वीच्या अनुभवावर अवलंबून असेल तर हिंदु जातीचे आजपर्यंतचे चरित्र एवढे उदात्त आहे की, त्यांच्या वचनावर प्रत्यक्ष शत्रुंनी सुध्दा विश्वास टाकावा.[४२]

पूर्वीचे पृथ्वीराज चव्हाण, महाराणा प्रतापसिंह, वगैरेंचे ऐतिहासिक पुरावे, वचनांचे धड कोण व वचन व्याभिचारी कोण हे ठरविण्याकरिता न दिले तरी सुध्दा ब्रिटिश सत्ता सुरु झाल्यापासून देखील, हिंदुंच्या उदारशीलत्त्वाचे प्रत्यंतर देता येईल. आजपर्यंत जी अनन्वित क्रूरपणाची कृत्ये घडली ती कोणत्या ठिकाणी घडली गेली? जिथे हिंदुंची बहुसंख्या आहे, तिथे हिंदूंनी का कधी असली कृत्ये अल्पसंख्यांक मुसलमानांवर वा ख्रिस्ती लोकांवर जुलूम करण्याकरिता केली? मलबारपासून तो परवांच्या लारखान्याच्या राक्षसी अत्याचारापर्यंत ही कृत्ये कुठे घडली? कुणी केली? सबंध महाराष्ट्रात, मध्य प्रांतात, आंध्र प्रदेशात, मद्रास प्रांतात एक तरी कोहाट, एक तरी गुलबर्गा, एकतरी कारखाना, हिंदुंनी ते अत्यंत बहुसंख्यांक असताना केला काय? मग ही हत्याकांडाची रणधुमाळी कुठे उसळली आहे? व हिंदुमुसलमानांचे वैर अत्यंत तीव्र कोठे आहे? तर ते मुसलमान जेथे बहुसंख्यांक आहेत, अशा पंजाब वायव्य प्रांत, सिंध बंगाल येथे आहे. कोहाट सारखे अत्याचार कुठे घडले? तर तेहि मुसलमान बहुसंख्यांक आहेत तेथे बंगाल दुसरा पंजाब करीन अशी घोर प्रतिज्ञा

करुन अब्दुल रहिमने बहुतेक बंगाल पेटला गेलेला पाहिला तो हि कुठे? तर तोहि बहुसंख्यांक मुसलमान प्रांतात. संतापाच्या आधीन होऊन असुरी हत्येला मुसलमानातला आजपर्यंत एकतरी, प. लेखराम, स्वामी श्रध्दानंद, जानराव देशमुख बळी पडले आहेत का? तर नाही हिंदु हा सहिष्णु, परोपकारी, उदार व वचनाचा घड आहे हे त्याचे सद्‌गुण इतके अतिरेकाला पोचले आहेत की, अनेक वेळी तेच त्याच्या नाशाला कारणीभूत झालेले आहेत. आणि तरीही तो अजून तसाच आहे. मग डॉ. मुंज्यांच्या मुखाने हिंदु महासभेच्या व्यासपीठावरुन हिंदुंनी मुसलमानांना जो हा निर्वाळा दिला आहे. हिंदु बहुसंख्यांक अल्पसंख्यांकांवर जोर जुलूम करणार नाहीत म्हणून जे आश्वासन दिले आहे, त्यावर ज्यांची अंतःकरणे शुध्द आहेत त्या मुसलमानांना पूर्ण विश्वास ठेवण्यास काय प्रत्यवाय आहे? वास्तविक, खलिफाशी खिलापतीशी व कुस्तुनियांशी हिंदूंचा लवमात्र संबंध नसता त्यांनी हिंदु-मुसलमानकी जयचा कल्लोळ केला. खिलाफतीचे देव्हारे माजविले. द्रव्य दिले. प्रत्यक्ष हिंदुंच्या एका शंकराचार्यांनी मुसलमानांबरोबर कारागृह अंगिकारले. मुसलमानांना संघटना कशी करावी हे स्वतः अनेक ठिकाणी खिलाफत मंडळे काढून, कुठे कार्यवाह होऊन, कुठे अध्यक्ष होऊन शिकविले व इतके करुनही खिलाफतीचा चट्टामट्टा होताच, गरज सरताच त्याबरोबर असावध हिंदुंच्या पाठीवर हसत निजामीच्या गुप्त जाळयाचे पाश टाकण्यात आले आणि तरीही जे हिंदु अजुनही युध्द झाले नव्हते, त्या हिंदुंच्या या गंभीर वचनावर मुसलमानांनी का विश्वास ठेवू नये?

आणखी असे की, पारशी लोकांचे उदाहरण हे सर्व अल्पमतसंख्यांकांना पूर्ण आश्वासक असे आहे. ज्या वेळेला फक्त एक नौकाभर पारशी गुजरातमधील किनाऱ्यावर एका हिंदु राज्यात येऊन उतरले त्यावेळी त्यांना आश्वासन देऊन हिंदुंनी त्यांना जेथे वसतिस्थान दिले व त्या दिवसापासून तो आजपर्यंत अपत्यनिर्विशेष भावाने त्यांना वाढवले. त्याची अत्यल्प संख्याही मोठया सुखाने येथे लालित पालित झाली. यावरुन काय सिध्द होते? यावरुन हेच सिध्द होते की जर अल्पसंख्यांक, कृतघ्नपणा कपटनीती न करता हिंदुंची गुण्यागोविंदाने व निष्कपटपणाने वागेल तर हिंदूही त्यांच्याशी सख्ख्या भावाप्रमाणे वागतील हा आमच्या शीलाचा चालता चालता बोलता जिवंत पडताळा असताना डॉ. मुंजे यांनी हिंदुसभेच्या व्यासपीठावरुन मुसलमानांना दिलेले आश्वासन त्यांनी का विश्वासार्ह मानू नये?[४३]

आणखी एक प्रत्यंतर पाहिजे असेल तर प्रसिध्द देशभक्त व कार्यकर्ते श्री. बी.एफ. भरुचा यांनी नुकतेच बाँबे कॉनिकल मध्ये प्रसिध्द केलेले फार विचारपूर्ण पत्र पहावे. ते एका त्रयस्थानी लिहिले म्हणून तो पुरावा फार विचारणीय आहे. त्यांनी मुसलमान अल्पसंख्यांक असूनही त्यांनी सरकारशी मिळून बहुसंख्यांकांची कशी व किती हानि केली आहे. याचे माप त्यांच्या पदरात उदाहरणांनी घातले आहे. करन्सी बील, मिळाचा कट, बँकेचा खटला हया व इतरही आपत्ती हया अल्पसंख्यांक मुसलमानांनीच सरकारशी सहमत करुन बहुसंख्यांकांवर लादल्या आहेत, हे भरुयायांनी त्यांच्या विशिष्ट पध्दतीच्या प्रश्नोत्तरांनी सिध्द केलेले आहे. असे असता उलट मुसलमानांनीच हिंदुबद्दल अविश्वास दाखवावा, याला कुणी थोडे तरी मोल देईल का?

आणि या अभिवचनावर जर मुसलमानांनी विश्वास न दाखविला तर काय करावे हेही डॉ. मुंज्यांनी तितक्याच स्पष्ट शब्दात सांगितले आहे ते म्हणतात की, जर मुसलमानांचा याने संतोष न झाला व त्यांनी हिंदुंशी मिळून एक मुखाने, पुढे येणाऱ्या सुधरणा मंडळापुढे, अधिक राज्य सुधारणेबद्दल मागणी न केली, तर हिंदुंनी आपल्या मागण्या स्पष्टपणे पुढे मांडाव्या व मुसलमानांना जे योग्य दिसेल ते करण्यास व त्यांना जे पाहिजे ते सरकारकडून घेण्यास मोकळे सोडावे (The Hindus should put forward their own demands leaving the Muslims free to try their best of get what they wanted from the govt.)[४४]

अशा रीतीने निर्भीड, कदाचित जरा कटु, परंतु अंती हितकर असे सत्य डॉ. मुंजे यांनी निवेदन केले. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे अस्पृशांच्या उध्दाराचा होय. डॉ. मुंजे हे केवळ डॉक्टरीचाच अभ्यास केलेले आहेत असा पुष्कळांचा गैरसमज आहे. परंतु डॉ. मुंजे हे स्वतः संस्कृतज्ज्ञ असून त्यांनी धर्मशास्त्राचे फार अध्ययन केले आहे. इतकेच नव्हे तर हिंदुधर्मशास्त्रावर ते एक मोठा ग्रंथ सर्व संस्कृत भाषेमध्ये आज बरेच दिवसापासून लिहित आहेत. त्यांनी ज्यावेळी शास्त्रातले आधार वाचून दाखवून अस्पृश्यतेला हिंदु धर्म शास्त्रात आधार नाही, हे ती केवळ एक रुढी आहे, असे सिध्द केले. त्यावेळी त्यांचे ते संस्कृत ग्रंथाच्या अध्ययनातील नैपुण्य पाहून सभागृह चकित झाले. त्यांनी अस्पृश्यता कशी व का आली याचे मोठे विचारणीय विवेचन केले आहे, तेही वाचकांनी आवश्य लक्षात ठेवण्यासारखे आहे. अस्पृश्यता

हा धर्म नव्हे ही केवळ रुढी आहे व म्हणून दुसरी त्यांना स्पृश्य करुन घेण्याची रुढी सुरु करणे हे मुळीच गौण नाही, इतकेच नाही तर न्याय्य, आवश्यक व धर्मोध्दारक आहे. रुढी ही केंव्हा तरी प्रथम सुरु करण्यानेच रुढ होत असते व अस्पृश्यतेची रुढी जशी मागे केंव्हा तरी सुरु झाली व मग रुढ बनली तद्वतच आज आपल्या हिंदु जातीने ही स्पृश्यतेची रुढी सुरु करुन अविलंबे ती रुढ केली पाहिजे, हेच आजचे परमावश्यक कर्तव्य होऊन बसले आहे.

डॉ. मुंज्यांचे हे भाषण अर्थात पुष्कळाच्या डोक्यात खुपू लागले आहे व टाईम्सनेही याचा लाभ घेऊन दुहींची फुंकर मारण्याचा यत्न केला आहे. इतर भ्रमक विधानांबरोबरच त्याने एक खालील विधान केले आहे -

Dr. Munje is much more anxious to ses Hindism strong, than to see an end of Hindu Muslim tension.[४५]

यातील मानभावीपणाचा गर्भितार्थ स्पष्टच आहे. परंतु आम्ही तो अर्थ मान्य करुनही विचारतो की, तरी त्यात बिघडले कुठे? हिंदु मुसलमानांच्या विरोधी वृत्ति शमाव्या या उद्देशापेक्षा हिंदु जाती बलवान करणे हाच डॉ. मुंजे यांचा भावार्थ असला तरी त्यात बिघडले कुठे? कारण इतिहासाचे सूक्ष्म परीक्षण ज्यांनी केले आहे व व्यवहाराचे ज्याला ज्ञान आहे, त्याला माहित आहे की, खरी एकी दोन समबल व्यक्तींमध्ये किंवा समाजामध्येच होत असते. आज मुसलमान समाज जो फक्त हिंदुंशीच उध्दटपणा व भांडखोरपणा करीत आहे, तो हिंदु निर्बल आहे, याच भ्रामक कल्पनेने तो करीत आहे. युरोपियन किंवा पारशी समाजाशी त्यांची ही उध्दट वृत्ती ते कधी दाखवित नाहीत. याचे रहस्य काय. 'टाइम्स' कारांना कळत नाही? परंतु मग ब्रिटिश भेदनीती कशी आचरिता येईल? म्हणून स्वतःला हिंदुजातीने एकदा समर्थ बनविले म्हणजे मुसलमानाच्या विरोधी वृत्ती आपोआपच लय पावतील व स्वार्थाकरताच का होईना तो हिंदुंशी सहकार्य करण्यास सिध्द होतील. तेंव्हा यातही कुठे बिघडले नाही.

मुसलमान पुढाऱ्यांनी ज्या अटी म्हणून श्री. जीना यांच्या मुखाने निवेदन केल्या आहेत, त्याबद्दल योग्य तोच खल या अधिवेशनात होईल, अशी आशा आहे व न्याय पायावर, समतेच्या वृत्तीवर दोघांनाही स्वराज्याची सारखीच आवश्यकता आहे व पाहिजे, या तत्त्वावर जी एकी होईल ती हवीच आहे. तोपर्यंत हिंदु जातीने या

आणिबाणीच्या वेळी कोणाच्या रागालोभाची पर्वा न करता, परमेश्वरी आज्ञा, स्वतःचे कर्तव्य म्हणून हिंदुसंघटन व शुध्दि या दोन ईश्वरी चळवळी धडाक्याने चालवाव्या हाच स्फूर्तिदायक संदेश या पाटलीपुत्र नगरात भरलेल्या हिंदु महासभेच्या परिषदेने सर्व देशभर घोषित केला आहे. आशा आहे की, अखिल हिंदुमात्र या घोषणेला ऐकून जागृत होईल व आपले कर्तव्य करण्यास बध्दपरिकर होईल.[४६] हिंदुंनी सबळ व्हावे व मुसलमानांची मनोवृत्ती धार्मिकतेकडून तसेच समतेची वृत्ती त्यांच्यात जोपासावी, अशी आशा या लेखातून केली आहे. हिंदु-मुस्लीम ऐक्य व्हावे अशी आशा ते व्यक्त करतात.

**३.९ ज्यात स्वत्व राहते तेच स्वराज्य होय :-**

हिंदुसंघटनाविषयी पुष्कळ प्रामाणिक लोकदेखील ही शंका घेतात की, जातिविषयक भावना प्रबळ करविणारी ही संघटनांची चळवळ राष्ट्रीय भावनेस हानिकारक तर होणार नाही ना? हिंदु मुसलमानादिक सर्व धार्मचे आणि जातीचे लोक जोवर एकत्र होऊन राष्ट्रीय जीवन जगविण्यास किंवा त्या जीवनाचे प्राप्तीसाठी झगडत मरण्यास सिध्द झालेले नाहीत, तोवर स्वराज्य मिळणे अशक्य असल्याने मुसलमानास ज्या योगे दुःख होते अशा कोणच्याही हिंदुंची (हिंदुजातिविशिष्ट) चळवळी काढून हिंदुस्थानातील निरनिराळया जातीत वैमनस्य उत्पन्न करण्याचे प्रयत्न राष्ट्रघातकाचे होणारे आहेत. स्वराज्यासाठी ही संघटनविषयक चळवळ जोडणे हे राजनीतीचे दृष्टिनेही अत्यंत शहाणपणाचे आहे. कारण काही दिवस जर आपण मुसलमानांच्या वाटेल त्या मागण्या मान्य केल्या आणि त्यास रुचतील त्याच अटी प्रमाणे वागलो, तर हिंदुमुसलमानाची एकी साध्य होऊन स्वराज्य प्रस्थापित, करिता येईल ते महान ध्येय आपल्या राष्ट्रास इतके लाभकारक आहे की, त्याच्या प्राप्तीसाठी वाटेल त्या तडजोडीचे आणि पडेल त्या स्वार्थत्यागाचे मूल्य हे स्वस्तच होणारे आहे. तेंव्हा स्वराज्य हिंदु-मुसलमानांच्या एकीवर अवलंबून असल्याने आणि हिंदु मुसलमानांची एकी हिंदुसंघटनाने निवडण्याचा निश्चित संभव असल्याने स्वराज्यासाठी आपण हिंदुसंघटन सोडून दिले पाहिजे. राजनीतिच्या दृष्टिनेही हे आपल्या राष्ट्रास हितावह होणारे आहे.[४७]

वरील शंकेने विचलित झालेले जे लोक प्रामाणिकपणे हिंदुसंघटनावर उपर्युक्त आक्षेप आणितात, त्यास हिंदुसंघटनांचे पक्षपाती तितक्याच प्रामाणिकपणे

चटकन उत्तर देतात की, तुम्ही स्वराज्य प्राप्तीचे मार्गात येते म्हणून संघटन त्याज्य म्हणता, पण ही तुमची समजूत मुळातच लटकी आहे. आम्हास एक वेळ स्वराज्य न मिळाले तरी चालेल पण आम्हास संघटन हवे आहे. हिंदुसंघटनेचे अभिमानी पुढारी हे वारंवार लिहिताना आणि बोलताना आढळून येतात की, स्वराज्य हे हिंदुमुसलमानांच्या एकीवर अवलंबून आहे हे अगदी खरे आहे. परंतु त्या एकीसाठी ज्या हिंदुत्वविघातक अटी मुसलमान घालीत आहेत, त्या आम्ही कधीही मानणार नाही. मात्र त्यापायी आम्हास स्वराज्य आणखी हजार वर्षे न मिळाले तरी चालेल.केंव्हा केंव्हा एखादा प्रश्न असा चकवून घातलेला असतो की, त्याचे उत्तर, त्या प्रश्नातील हे त्यान यामुळेच हठकून चुकलेलेच यावे. पठाण लोकास कायमचा असाच एक प्रश्न विचारुन कसविताना आम्ही कित्येक विनोदी लोकांस पाहिले आहे. नवीन पठाण बंदिवान येताच त्यास इतर बंदिवानाप्रमाणे नाव, गाव विचारुन झटकन विचारले जाई का? तू कोण? पठाण की मुसलमान? अर्थात, तो नवागत बंदी झटकन सांगे, मी पठाण! तर मग तू मुसलमान नाहीस तर? असे विचारताच तो मनुष्य सहजच गोंधळे आणि आजूबाजूस हशा पिके. पठाणपण आणि मुसलमानपण ही परस्परविरुध्द नसल्याने, मी दोन्हीही आहे हे खरे उत्तर. त्या प्रश्नातील हेत्वाभासामुळे सहसा सुचेनासे होऊन हटकून चुकीचे उत्तर येई. मुलातही असाच एक खेळ असतोच. प्रथम त्यास दहा पाच प्रश्न तू शहाणा की वेडा, पुरुष की बायको, इत्यादी पूर्वार्धइष्ट असलेल्या उत्तरांचे विचारीत चटकन विचारिले की, तू गाढव की गध्दा, की तो चटकन सांगतो की, मी गाढव आणि गदी. चाणाक्षपणे पूर्वार्ध टाळण्याचे ध्यानात आले, तर उत्तरार्ध तरी तोंडातून निघून जातोच की, 'गाढव नाही गध्दा'!

'स्वराज्य हवे की, संघटन' हा प्रश्नही अशाच प्रकारच्या हेत्वाभासाने दूषित झालेला आहे. आणि म्हणूनच त्याचे उत्तर बहुतेक संघटनवादी लोक चटकन देऊन बसतात की, संघटन! स्वराज्य मिळाले नाही तरी चालेल पण आम्ही संघटन सोडणार नाही!' अर्थात, 'स्वराज्य हवे की संघटन' या प्रश्नातील हेत्वाभासामुळेच 'स्वराज्य नको, संघटन नव्हे,' हे चुकीचे उत्तर सहजच देण्यात येते आणि त्या उत्तरातील चुकीही अप्रिय वाटत असताही, ध्यानात येत असताही, ती टाळावी अशी

हे, ज्यांचे स्वराज्यावरही आणि संघटनावरही उत्कट प्रेत आहे अशा पुष्कळ प्रामाणिकी माणसास सहसा उमगत नाही.

परंतु 'स्वराज्य हवे की संघटन' या प्रश्नातील हेत्वाभावास स्पष्टपणे विकृत केला असतो, वरील उत्तरातील हा विचारविभ्रम सहज टाळता येतो. 'स्वराज्य हवे की संघटन' या प्रश्नाचे सरळ उतर हे आहे की, या दोहोमध्ये 'हे की ते' असला मूलतः विरोधच नाही. संघटन हे साधन आणि स्वराज्य हे साध्य आहे. 'स्वराज्य की संघटन' हा प्रश्न नसून सध्याच्या परिस्थितीत संघटन केले तरच स्वराज्य मिळणे शक्य आहे. आम्हास स्वराज्य आणि संघटन ही दोन्हीही हवी आहेत. कारण आम्हा हिंदुस अभिप्रेत असलेले स्वराज्य, हिंदु संघटनावाचून मिळणेच शक्य नाही, हे पूर्वीही काही विचारवंत देशभक्ताच्या ध्यानात आलेलेच होते. आज तर ते मध्यान्हीच्या दिवसाइतके सुस्पष्टपणे प्रत्येक हिंदुच्या प्रत्ययास येत आहे.[४८]

कारण ज्या स्वराज्याकरिता आम्ही धडपडत आहो, ज्या स्वराज्याकरिता सत्तावन्नच्या क्रांतियुध्दापासून, शेकडो, हजारो क्रांतिकारक हिंदु वीर सशक्त प्रतिकार करीत रणात मेले, फाशीवर लटकले, अंदमानात सडले, कारागारात पडले, देशोधडी लागले, ज्या स्वराज्याकरिता राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून ते असहयोगाच्या आंदोलनापर्यंत शेकडे नेमस्त आणि राष्ट्रीय हिंदु पुढारी निःशस्त्र प्रतिकार करीत आणि लोकमान्यापासून महात्माजीपर्यंत खटपटत आले. ते स्वराज्य म्हणजे या हिंदुस्थान देशाचे एकराष्ट्रीय, स्वायत्त, लोकसत्ताक आणि स्वतंत्र राज्य हेच होय.

या स्वराज्यात हिंदी नागरिक असलेल्या प्रत्येक स्त्री पुरुषाचे जातिपंथ-निर्विशेष असलेले स्वत्व राखिले जाईल. प्रत्येक धर्मास आणि जातीस तदितर धर्मास आणि जातीस आपापल्या संख्येप्रमाणे जे न्याय्य आधिकर उपभोगिता येतात, ते समानत्वे बजावतात हे स्वराज्य केवळ हिंदूचेही नसेल ते अहिंदूचेही नसेल. तर ते प्रत्येक हिंदी मनुष्याचे असेल आणि त्यात प्रत्येकास आपले न्याय सत्व न गमावता नांदता येईल.[४९]

या स्वरुपाचेच स्वराज्य तुम्हास अभिप्रेत आहे ना? मग हिंदुसंघटनांचे ध्येयही याच स्वरुपाचे स्वराज्य हे आहे, यामुळे संघटन की स्वराज्य हा प्रश्नच चुकीचा ठरत असून, स्वराज्यासाठीच संघटन हवे हेच सिध्द होत आहे.

स्वराज्याचे स्वरुप असे असले पाहिजे असे तुम्ही म्हणता ना? की त्यात हिंदु किंवा मुसलमान अशी कोणतीही धार्मिक भेदाभेदाची कल्पना न शिकता त्याचे स्वरुप केवळ हिंदीपणाचे असावे आणि त्यात मुसलमानादिक प्रत्येक धर्म, पंथ, जातिमात्राचे स्वत्व समप्रमाणाने आणि यथान्याय राखिले जावे? ठीक तर जर या स्वराज्यात प्रत्येक धर्मपंथाचे सत्त्व राखिले जाणार आहे. तर मग त्यात हिंदुधर्माचेही स्वत्व समप्रमाणाने आणि यथा न्याय राखिले गेले पाहिजे नाही काय? इतकेच नव्हे तर हिंदुस्थानातील लोक संख्येच्या दोन तृतीयांश भाग ज्या हिंदुंचा आहे, त्यांचे स्वत्व ज्या स्वराज्यात इतर अत्यल्प किंवा अल्प अशा अहिंदु समाजाच्या स्वत्वाच्या अतिरेकी मागण्यास बळी दिले जाते, ते स्वराज्यच नव्हे, तुम्ही म्हणता त्या व्याख्येप्रमाणे देखील ते स्वराज्यच नव्हे, हे मानलेच पाहिजे नाही काय? तर मग या प्रमेयावरुन दुसरे प्रमेयही आपोआपच अनुमानिले जाते की नाही की, अशा रीतीने हिंदुंचे स्वत्व इतर अहिंदु समाजाच्या अवास्तव आणि अवाच्या सवा मागण्यास आम्ही बळी देऊ देणार नाही आणि उलट पक्षी त्या आमच्या अहिंदु राष्ट्रबंधूंच्या न्याय मागण्यांचा प्रतिकार न करिता जे पंथ स्वातंत्र्याचे अधिकार आम्ही भोगू इच्छितो, तेच इतरासही उपभोगू दिल्यावाचून आम्ही राहणार नाही. म्हणून प्रतिज्ञाबध्द असलेले हिंदुसंघटन हे त्या स्वराज्याच्या विरुध्द जात नाही. इतकेच नव्हे तर त्याच्या सिध्दीसाठीच प्राणपणाने झटत आहे. संघटन स्वराज्यास हानिकारक आहे काय, हा प्रश्न हेत्वाभासाने इतका दुष्ट झालेला आहे की, संघटनावाचून स्वराज्य शक्य नाही हे उलट विधानच काय ते त्याचे यथार्थ उत्तर होऊ शकावे, कारण वर विवरण केल्याप्रमाणे ज्यात हिंदुंचे सत्त्व निदान इतरांच्या स्वत्वाइतके तरी अबाधित राहु शकेल, तेच स्वराज्य अभिप्रेत असल्याने त्याच हेतूसाठी यत्न करीत असलेले संघटन, त्याच स्वराज्याचे एक अत्यंत उपकारक साधन आहे. हे सिध्द होत आहे. संघटनांचा हेतु साध्य झाला की स्वराज्याची प्राप्ती झालीच कारण तो हेतु इतर कोणाचाही नसून स्वयमेय स्वराज्य हाच होय.[५०]

परंतु, ज्या अर्थी स्वराज्य हे ज्यात आमचे हिंदुंचे स्वत्व स्थिर आणि अभंग राहून इतर राष्ट्रीय बंधूंशी आम्हास सहनागरिकत्व भोगता येईल ते स्वराज्य होय, त्या अर्थी स्वराज्याच्या प्राप्तीसाठी मुसलमानांशी वाटेल त्या अटींवरही का होईना पण एकी करावी, या नेभळट धोरणाचा हिंदु संघटन तिरस्कार करिते. खिलाफतीसारख्या

त्यांच्या निर्भेळ धार्मिक असणाऱ्या इतकेच नव्हे, तर ज्यातील मूल तत्त्व हिंदी राष्ट्रीय भावास अत्यंत हानिकारक आहे, अशा चळवळीसही केवळ मुसलमानास प्रसन्न ठेवण्याकरिता अंगिकारिल्या जाव्या, हे हिंदुसंघटनास आत्मघातकी वाटते. ते यासाठीच, आमच्या खिलाफतीशी लढणे हे आमच्या मुसलमानी धर्माविरुध्द आहे, हे राष्ट्रीय भावास अत्यंत घातक असलेले तत्त्व त्या खिलाफतीच्या कुडाशी होते. उद्या स्वराज्यप्राप्तीनंतर हिंदुस्थानची तुर्कस्थानशी किंवा अजूनही खलिफा असलेल्या मोरोक्कोशी लढाई जुंपली, तर याच तत्त्वाने प्रस्फुरित झालेले हिंदी-मुसलमान हया तत्त्वाची हीच कटयार याच हिंदुस्थानचे पोटात खुपसून तुर्कस्थानच्या किंवा मोरोक्कोच्या पक्षास मिळून हिंदुस्थानात स्वराज्याशी बंड करुन उठण्यास सज्ज होणार. आपल्या राष्ट्रघातक आणि धर्मवेडाच्या चळवळीसही हिंदुंनी लाखो रुपये देऊन आणि शेकडो जणांना कारावासात धाडून साहय करावे का तर, म्हणे त्यायोगे मुसलमान संतुष्ट होतील, त्यामुळे एकी होई आणि त्या एकीने स्वराज्य प्राप्त करिता येईल! आज जुन्या मशिदीवरुन प्रार्थनेच्या वेळेस वाद्ये बंद करा, उद्या सदोदित बंद करा, परवा नव्या मशिदीवरुनही बंद करा आणि तेरवा गावातील बहुतेक राजमार्गावर नवीन मशीद झाल्याने वाद्ये वाजविण्याचा तुमचा धार्मिक हक्क आमुलतःच मृतप्राय होउ द्या. इतकेच नव्हे, वाद्ये ज्या अर्थी आमच्या निजामास अडथळा करितात म्हणून बंद करावयाची, त्याचप्रमाणे आणि त्याच अर्थी तुम्ही तुमच्या घरातही शंख, तास आणि घंटा मोठयाने वाजवू नका. भजने देखील संघाने करु नका, कारण आमच्या शेजारच्या घरी किंवा मशिदीत निमाज पढताना त्या गोंगाटाने चित्त व्यग्र होते! आम्हा मुसलमानांची एकी हवी, तर ही अट आहे, काल्पनिक नव्हे, तर उत्तर हिंदुस्थानात प्रत्यही अशा अटी मुसलमानांनी घातल्याविषयीच्या आणि हिंदुंच्या घरात दंडेलीने घुसून त्या पळविल्याच्या वास्तविक बातम्या येत आहेत. बंगालमध्ये तर खेडेगावातून हिंदु वस्तीस तुमच्या अमुक अमुक कन्यका मुसलमानांस देत असाल तर एकी होई, नाही तर तुम्हास लुटून कुटून नष्ट करण्यात येईल म्हणून मुसलमानांकडून उघड उघड सूचना दिल्या जात आहेत आणि त्याची भयंकर पूर्तताही कित्येक ठिकाणी झालेली असून त्या त्या हिंदु कन्यकास बळाने ओढून नेण्यात आले आणि ती हिंदूंची वस्ती मारहाणीने आणि जाळपोळ करुन त्रस्त करण्यात आली. हे 'श्रध्दानंदातून' वेळोवेळी प्रसिध्द झालेलेच आहे

आणि हा अत्याचार आम्ही काय म्हणून सोसावा, तर म्हणे त्यायोगे 'एकी' होईल आणि त्या एकीने स्वराज्य मिळेल! मलबारच्या कत्तलीविषयी आम्ही मूग गिळून गप्प बसावे, लाटखाना, बंगाल, कोहाट येथे प्रत्यही घडणाऱ्या राक्षसी दंग्यांच्या आणि धर्मवेडी आततायीपणाच्या छळाविषयी नुसत्या शब्दानेही प्रतिकार किंवा स्पष्ट निंदा न करिता हिंदु आणि मुसलमान हे दोघेही दोषी आहेत म्हणून अत्यंत असत्य आणि भ्याडपणाची विधाने करावी, का तर त्या योगे एकी होईल आणि तीमुळे स्वराज्य मिळेल! मुसलमानांनी हिंदुंना भ्रष्ट करणे हा लांचो धर्मच आहे, करु द्या त्यांना भ्रष्ट पण तुम्ही हिंदुंना मात्र शुध्दी करता कामा नये, तसेच केलेत, तर आणि तुमच्या वतीने न्यायालयात जरी तुमचा तसे करण्याचा हक्क प्रस्थापित झाला, तरीआम्ही लारखान्याप्रमाणे तुमची डोकी सडकून जाळपोळ करीत दंगे करु. ते सर्व तुम्ही हिंदुंनी एकी हवी तर सहन केले पाहिजे. आम्हास आज पाच जागा विधिमंडळात आधिक द्या, कारण आम्ही 'मुसलमान' आहोत आम्हास हिंदुहून विशिष्ट अधिकार दिले पाहिजेत, नाही तर! एकी होणार नाही. एकी नाही झाली तर स्वराज्य मिळणार नाही. त्याच्याही पुढे जाऊन, जे शब्द ऐकताच कोणाही अस्सल हिंदुंचे रक्त संतापाने भडकून जावे किंवा लज्जेने गारठून जावे. ते निर्लज्ज शब्द उच्चारण्यास न कचरता काही लोक, काही खिलाफती, हिंदु लोक असे स्पष्टपणे म्हणताना आम्ही ऐकले आहेत की, फार काय एकीसाठी' हिंदुंनी मुसलमान देखील व्हावे! आणि स्वराज्य मिळवावे![५१]

स्वराज्य अशा अटीवरच जर मिळत असेल तर त्याला आग लागो आणि स्वराज्य मिळविण्यासाठी हिंदुंनी मुसलमान देखील व्हावे म्हणून म्हणणारी ती जिव्हा झडून पडो! ज्या स्वराज्यासाठी हिंदुंना मुसलमान व्हावे लागते त्या स्वराज्याचे हिंदुसंघटन तोंड देखील पाहू इच्छित नाही. कारण हिंदुंना मुसलमान होऊनच जे मिळते किंवा ज्यात वर वर्णिलेल्या अटी हिंदुंना पाळाव्या लागल्याने, हिंदुंस मुसलमानांच्या ताटाखालील मांजरे बनून रहावे लागते, ते स्वराज्यच नव्हे, ते मुसलमानी राज्य आहे. ज्यात स्वत्व अबाधित राहू शकते ते स्वराज्य ज्यात आम्हास प्राणापलिकडे प्रिय असलेले आमचे स्वत्व, आमचे हिंदुत्व आम्हास सोडावे लागते किंवा त्याच्या सन्मानाचा ध्वज अहिंदुचे पायावर नमवावा लागतो, ते आम्हा हिंदुंचे स्वराज्यच नाही! ते मुसलमान राज्यच होय. आमच्या स्वत्वाप्रमाणे मुसलमानासही

न्याय अधिकार मिळून त्यांचे स्वत्वही न्याय स्वत्वही ज्यात राखले जाईल, अशा स्वराज्यास आम्ही आपली निष्ठा अर्पण करु. किंबहुना हिंदु संघटनांचे हेच हेच ध्येय आहे, हे पूर्वीच आम्ही सांगितले आहे. परंतु पदोपदी जातीय अपमानाने मान खाली घालावयास लावणाऱ्या वर वर्णन केलेल्या मुर्दाड आणि आततायी अटीवरच जी एकी आणि जे स्वराज्य मिळू शकते, त्याचा आम्ही हिंदु शतवार धिक्कर करितो, या मुर्दाड आणि आततायी अटी आजच्या त्यांच्या परतंत्र्य आणि पतित स्थितीतही घालण्यास जे मुसलमान कमी करीत नाहीत, ते त्या अटीप्रमाणे आम्ही वागलो तरी स्वराज्य मिळाल्यानंतर तेच मुसलमान सबळ आणि स्वतंत्र झाले असता याहूनही भयंकर अटी घालीत घालीत आणि हिंदूस दडपीत. त्या स्वराज्यास औरंगजेबी बादशाहीचेच स्वरुप देण्यास थोडेच कचरणार आहेत? मुसलमान होऊन जे मिळते तेच जर स्वराज्य म्हणावयाचे तर मग एवढा उपद्रव्याप तरी का करा? आज ख्रिश्चन होताच इंग्रजी राज्यही स्वराज्य, स्वधर्मीय राज्य, होणारे आहे.

छे! छ! अशा अटीवर मिळणारे हिंदुस्थानचे राज्यच काय, पण इंद्राचे राज्य देखील आम्हास नको आहे. हिंदु राहून आम्हास स्वतंत्रही पण व्हावयाचे आहे आणि हिंदुत्वही पण राखवयाचे आहे. ज्यात आमचे हिंदु स्वत्व राहील ते स्वराज्य!

ते हिंदुत्व आम्ही जिंकू? शिवाजी आणि प्रताप, संग आणि पृथ्वीराज यांचे जन्म जसे काही झालेच नाहीत! पानिपतला मराठयांची दोन लाख बांगडी जशी काही फुटलीच नाही! भाऊसाहेबांच्या घणाने दिल्लीचे सिंहासन जसे काही चूर्ण केले गेलेच नाही! गुरु गोविंद सिंगाने वीरतनय जसे काही भिंतीत चिणून मारले गेलेच नाहीत आणि वीर बंदाने सूड उगविलाच नाही! जसे काही मुसलमानांची होती ती प्रचंड साम्राज्ये हिंदुंच्या पराक्रमाची घोडा आपल्या टापाखाली तुडवित तुडवित त्याच्या चक्काचूर झालेल्या धुळीवर सोमेश्वरापासून अटकेपर्यंत आणि अटकेपासून काबुल नदीपर्यंत अपतिहतपणे नाचत गेलाच नाही! त्या इतिहासाचे एक पान, एक ओळ, एक आठवण तरी जोपर्यंत आमच्या रक्तात सजलेली आहे तोवर तरी हिंदु लोकांस असल्या अपमानास्पद आणि निर्लज्ज, अटी स्वीकारण्याचे कारण नाही. मुसलमानहो! एकी हवी असेल तुम्हास हवी असेल, तर या स्वत्व रक्षण ज्यात होऊ शकेल तुमचे आणि आमचे दोघांचेही त्या स्वराज्यास स्थापूया आणि एकी करु या. पण तसे नसेल तर, जा काय वाटेल ते करा, जा आम्ही हिंदु तुमच्या एकी वाचूनही

जिवंत राहू शकतो, जसा शिवाजी तुमच्या एकीवाचून जिवंत राहू शकला, आम्ही हिंदु एकटे स्वतःच्या सामर्थ्याने तुमच्याच नव्हे तर इंग्रजांच्याही पारतंत्र्यातून मुक्त होऊन स्वराज्य स्थापू शकू जसे ग्रीकांच्या हातून मुक्त होऊन चंद्रगुप्त स्थापू शकला, हुणांच्या हातून मुक्त होऊन यशोवर्मन स्थापू शकला, तो काही जिनांच्या सहानुभूतीसाठी थांबला नव्हता, हसन निजामीच्या नीच जाळयात फसला नव्हाता, मोपल्यांच्या गुंडशीस भ्याला नव्हता किंवा आपल्या कन्याका विकून एकी खरेदी करणाऱ्या शहाण्या गाढवपणास राजनीती म्हणून समजत नव्हता. त्याने ग्रीकांच्या सम्राटांच्या मुली घेतल्या, आपल्या दिल्या नाहीत? त्या चंद्रगुप्ताचे, यशोवर्म्याचे आणि भाऊंचे आम्ही हिंदु वंशज आहोत. आम्ही तसेच संघटित होऊ आणि वेळ पडली तर एकटे झुंजून, एकटे मरुन, एकटे मुक्त होऊ, स्वतंत्र होऊ! कारण आम्हा संघटनवाद्यांचा हा सिध्दांत आहे की, ज्यात स्वत्व आबाधित राहते तेच स्वराज्य इष्ट आहे आणि असे स्वराज्य, हिंदु मुसलमानांची एकी झाली नाही तर मिळणारच नाही, हा षढपणाचा महामंत्र अमुलाग्र भ्रामक आहे.[५२] थोडक्यात, डॉ. सावरकरांनी हिंदु-मुसलमान प्रश्नावर प्रकाश इतिहासातील काही उदाहरणे देऊन टाकला आहे. मुसलमान आपल्या हक्कासाठी कहीही करायला तयार होतात तसेच हिंदुंनीही आपली संघटना बळकट केली, एकी केली तर मुसलमानांशिवाय आपल्याला स्वराज्य प्राप्त करुन घेता येईल हे या लेखामागील मूळ आहे. मुसलमानांचे लाड थांबल्याशिवाय हे शक्य नाही. नाहीतर त्याचाच परिणाम आज आपण पाहतो आहोत. इसिससारख्या दहशतवादी संघटना आज निर्माण होऊ लागल्या आहेत.

**३.१० अखिल हिंदुस्थान शिवगजराने गर्जुन गेले :-**

शतलक्ष कोटिखंडी कल्पतुरुंची फुले उधळिली हो।
ती सुरभोग्ये कपिनी पौरांनी पुरवधी तुडविली हो ।।

गेला संबंध आठवडा शिवनामाच्या जय जय काराने, हिंदुभूमीने गरजून सोडला. बालबालिका, कुमार कुमारिका, वृध्द, तरुण, अखिल हिंदुमायांनी मोठया प्रेमभराने आणि भक्तिभावाने प्रांताप्रांतातून हा त्रिशतसांवत्सरिक शिवोत्सव घनचक्कर, दुमदुमून सोडला. गेल्या आठवडयात हिंदुस्थानाच्या सबंध वातावरणातून शिवनामाचा उच्चार व जयजयकार याशिवाय दुसरा कसलाही प्रतिध्वनी निघत नव्हात. सर्व प्रांतामधील वर्तमानपत्रे शिवचरित्राच्या पठणाने व पाठणाने भरुन गेली

आणि शिवाजी महाराजांनी हिुदस्थानवर किती अगणित उपकार करुन ठेवले आहेत, याची जाणीव हिंदुभूमीच्या कानाकोपऱ्यातून जागृत झाली. इतकेच काय परंतु, अगदी परवापरवापर्यंत शिवाजीचे नाव उच्चारताच भयभीत होणारे, व शिवरायांचा जयघोष करताच चिडून जाऊन शिवभक्तांना बंदिशाळा दाखविणारे सरकार देखील या हिंदुभूमीच्या स्वातंत्र्यवीरांच्या यशोगायनात राग न मानिता उलट प्रोत्साहनच देत गेले![५३]

शिवभक्तीची जाणीव हिंदुस्थानातल्या लोकांमध्ये होणे, हे साहजिकच होते, कारण आपल्या उपकारकर्त्यांबद्दल कृतज्ञता बुध्दी उत्पन्न होणे हा मनुष्याचा निसर्गः गुण आहे. आजपर्यंत शिवरायांचा उत्सव आणि त्यांची भक्ती यांचा प्रसार अखिल हिंदुस्थानात झाला नव्हता याचे कारण, आजपर्यंतचे हिंदुस्थानातील लोक कृतघ्न होते असा नव्हे, तर शिवचरित्राचे यथावत ज्ञान जनतेला झालेले नव्हते. व अर्थातच मग शिवरायांनी हिंदुस्थानवासियांवर उपकार केले, हे त्यांना कळले नव्हते आणि लोकांचे हे अज्ञान परकीय सत्तेच्या अत्यंत पथ्यावर असल्यामुळे, त्या सत्तेनेही शिवरायांबद्दलचे यथावत ज्ञान दिले नाही. इतकेच नव्हे, तर त्यांच्याबद्दलची खोटी व विपरीत तऱ्हेची माहिती त्यांनी त्यांच्या इतिहासात नमूद करुन ठेविली. शिवाजी हा चोर आणि दरोडेखोर होता, असल्या तऱ्हेची हीनपणाची माहिती त्यांना जनतेत पसरुन दिली व त्यामुळे साहजिकच सामान्य जनतेला शिवरायाच्या कामगिरीचे खरे महत्त्व कळणे अशक्य झाले. अशा रीतीने शिवरायांबद्दलची सत्यकथा जनतेजवळून चोरुन ठेवल्यामुळे आजपर्यंत हया राष्ट्रविभूतीची अवहेलना हिंदुस्थानातील जनतेकडून झाली व जे उत्सव आणि जो जयजयकार हया पूर्वीच कित्येक वर्षे हिंदुस्थानात व्हावयास पाहिजे होता, तो आजपर्यंत झाला नाही. परंतु निसर्गाचा एक नियम आहे, की सत्य हे केंव्हा तरी कुटिलतेचा पराभव करुन अखेर एक वेळ उघडकीस येतेच येते आणि त्याच प्रमाणे नवविचाराचे पहिले प्रणेते निबंधमाकालाकार, विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महादेव गोविंद रानडे यांच्या उज्ज्वल लेखणीने शिवचरित्रातल्या गुप्त ठेवले गेलेल्या सद्‌गुण रत्नांच्या खाणीवर हळूहळू प्रकाश पाडण्यास सुरुवात केली व पुढे लोकमान्य टिळकांनी तर शिवप्रभुच्या स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नांची मुक्त कंठाने स्तुती करुन ती एक राष्ट्रीय विभुती म्हणून तिचे उत्सव निदान महाराष्ट्रापुरते तरी धुमधडाक्याने सुरु केले आणि

हया राष्ट्रीय वृत्तीच्या प्रचारास स्थिरत्व यावे व इतिहासातील सत्य उघडकीस आणावे म्हणून इतिहास संशोधनाचे पहिले प्रणेते विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, यांनी अत्यंत परिश्रमाने व भगिरथांनी जशी स्वर्गात गंगा शोधून जनतेकरिता पृथ्वीतलावर आणिली त्याचप्रमाणे राजवाडे यांनी ही शिवचरित्राची गंगा शोधून, संशोधून महाराष्ट्र जनतेच्या अग्रभागी आणून ठेविली. त्या योगाने शिवचरित्राचे भव्य आणि दिव्य स्वरुप हळूहळू महाराष्ट्राच्या समोर मूर्तिमंत उभे राहिले आणि त्यामुळे आत्मवंचनेची कोटीच्या कोटी पातके शिवरायांच्या नाम गर्जनेने निरस्त होऊ लागले व महाराष्ट्राला कळू लागले की, शिवाजी हा स्वतः चोर लुटारु नव्हता, तर त्यावेळी महाराष्ट्रात आणि हिंदुस्थानात जे अनेक चोर आणि लुटारु लोक मोठया सावपणाने कुणी राज्य, तर कुणी व्यापार करीत होते. त्यांना हटकावून त्यांची चोरी व दरोडेखोरी ही बंद पाडणारा तो हया हिंदुभूमीचा एक सत्पुत्र होता. भूमीवर परकीय यवन सत्तेची आणि समुद्रावर परकीय पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज हया पाश्चिमात्य व्यापाऱ्यांच्या निमित्ताने आलेले पोटभरु आणि सत्तालोलुप यांची दरोडीखोरी आणि चाचेगिरी शिवाजी महाराज होईतोपर्यंत अप्रतिहततेने चाललेली होती आणि हे परकीय बंड बहुता दिनांचे चाललेले होते. हया दरोडेखोरांच्या आणि चाच्यांच्या बंडखोरीला हटकणारे व दटवणारे शिवाजी महाराज हे अनेक शतकांनंतर उत्पन्न झालेले हिंदभूमीचे पहिले सत्पुत्र आणि म्हणून खरे धनी होते, परंतु हया खऱ्या धन्याला आणि धनिपणाला हिंदुस्थानातील लोक आत्मवंचकतेने विसरले आहेत, असे पाहून परकीय इतिहासकारांनी उलटा शंखध्वनी करण्यास सुरुवात केली की, हिंदवासियांनो! ऐका ऐका आम्ही साव व हा तुमचा शिवाजी बंडखोर, आम्ही राजे आणि हा तुमचा शिवाजी लुटारु ..... आणि हतभागी आम्ही लोकांनी, काही दिवस ही चोरांनी उठवलेली आरोळी खरी मानिली.[५४]

अखेर व सांगितल्याप्रमाणे चोर आणि लुटारुंची कृष्णकृत्ये अज्ञानाची पटले दूर सारुन उघडकीस आली व शिवरायांना सावपणा, शिवरायांचा धनीपणा प्रकट होऊ लागला आणि त्याचबरोबर शिवराय हे एक धर्मवीर आणि राष्ट्रवीर म्हणून प्रथम महाराष्ट्रात व आता सर्व हिंदुस्थानात अग्रपूजा पावू लागले. अशा रीतीने जनतेच्या मनाचे हळूहळू परिवर्तन होत होत शिवरायांच्या चरित्राचे गगनाहूनही मोठे आणि सागराहूनही खोल असे महत्त्व प्रचितीला येऊ लागले आणि त्यामुळे आम्ही

चोराचे आणि दरोडेखोराचे वंशज नाही, तर एका देशवीराचे आणि धर्मवीराचे वंशज आहोत. ही मैदानांनाही वीरत्व देणारी भावना, अखिल हिंदुंच्या मनात स्फुरण पावू लागली, आणि त्याचाच परिणाम म्हणजे आज अखिल हिंदुस्थानभर शिवनामाचा आणि शिवयशाचा गेल्या सप्ताहात गजर झाला.

आतापर्यंत जनतेची मनोवृत्ती शिवरायांबद्दल कशी बदलत गेली, याचे सिंहावलोकन केले. आता सरकारची मनोवृत्ती कशी व का पालटत गेली याचे विवरण करणे आवश्यक आहे. एक काळ असा होता की, शिवरायाचे चरित्र तर काय, परंतु शिवरायाचे नावही इंग्रज सरकारला विषाप्रमाणे त्याज्य वाटत असे. शिवाजी महाराजांची चित्रे ठेवणे, शिवाजी महाराजांचा जयजयकार करणे म्हणजे मोठा राजद्रोह गणला जात असे. व असे करणारास सरकार मोठया तावातावाने तुरुंगात टाकण्यास एखाद्या पिसाटाप्रमाणे सिध्द होत असे आणि आज? आणि आज सरकार शिवरायांचे भव्य चित्र उघडण्याकरिता प्रत्यक्ष इंग्लंडच्या युवराजाला मोठया समारोहाने सातासमुद्रापलिकडे पाठवित आहे, आणि त्यांच्या जन्म दिवसानिमित्त किल्मिषपणे सुट्टी पुकारित आहे! हा फरक कसा झाला, हा मनु कशाने बदलला? ज्या प्रमाणे जनतेच्या संबंधात ती शिवचरित्र संबंधाने अज्ञान होती व म्हणून शिवचरित्राची महती तिला कळली नाही, परंतु त्या महतीचे ज्ञान होताच तिने शिवाजीचा जयजयकार केला हे सत्य आहे. तसेच सत्य सरकारच्याही बाबतीत आहे असे म्हणता येईल का? सरकारला आजपर्यंत खरोखरीच शिवचरित्राचे अज्ञान होते का? व केवळ याच कारणाकरिता का शिवाजी त्यांनी राजद्रोही ठरविला होता? हे जर खरे असेल तर मग अशा हया चोर व लुटारु शिवाजीच्या सिंहासनापुढे रायगडावर राज्याभिषेकाचे वेळी राजापुरीचे पैशाविषयी सूट मागण्यास व तुमच्या राज्यात व्यापाराच्या सवलती द्या, अशी भीक्षा मागण्याकरिता आपला वकील इंग्रजांनी का पाठविला होता? न्यायप्रिय इंग्रज लोक एखाद्या लुटारु आणि चोराजवळ अशी भिक्षांदेही कशा करिते झाले? का भिक्षेकऱ्यांनी केलेली ही भिक्षांदेही ज्या यजमानांजवळ ती केली होती, तो यजमान नष्ट होताच हे इंग्रज लोक पार अगदी विसरुन गेले? परंतु हे शक्य कसे होईल? जनतेला खऱ्या इतिहासाची साधने जरी उपलब्ध नव्हती तरी सरकारला तर त्याची काही वाण नव्हती ना? सतराव्या शतकातील हिंदुस्थानातल्या इंग्रजी वसाहतीतील गव्हर्नररांनी व इतर अधिकाऱ्यांनी

त्याचप्रमाणे इंग्रजी प्रवाशांनी लिहून ठेविलेले सर्व लिखाण, तर काही कोण्या तिऱ्हाईताच्या स्वाधीन झाले नव्हते ना? मग काय त्या लिखाणावरुन शिवाजी हा चोर आणि लुटारु नसून स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरिता व स्वजातीच्या स्वधर्माकरिता लढणारा एक देशवीर आणि धर्मवीर होता, हे इंग्रजांना अवगत नव्हते? इतकेच कशाला, ग्रँट डफने सातारच्या दरबारातून मराठी राज्याचे सर्व मूळ कागदपत्र हस्तगत करुन घेतले व त्याचप्रमाणे इनाम कमिशनच्या निमित्ताने मराठी साम्राज्याच्या इतिहासाचे सर्व धागे दोरे स्वाधीन करुन घेऊन महाराष्ट्राच्या इतिहासाचे जणू पंचप्राणच काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्या सर्व ऐतिहासिक कागदपत्रावरुन इंग्रज सरकारला का खरेच हे कळले नव्हते की शिवाजी हा चोर व लुटारु नव्हता, तो स्वातंत्र्यवीर, धर्मवीर होता.[५५]

परंतु हे कसे शक्य आहे? इंग्रजांसारखे धूर्त लोक, ज्या अफाट जगसमूहावर ते राज्य करीत आहेत त्यांचे यथावत ज्ञान करुन घेतल्याशिवाय कसे राहतील? अर्थात, हेच सिध्द आहे की, इंग्रजांना हे पूर्णपणे माहित होते की शिवाजी हा हिंदुस्थानचा एक मोठा थोर मनुष्य, पराक्रमी सत्तास्थापक आणि स्वराज्यदाता होता. असे असूनही प्रथम प्रथम त्यांनी शिवाजी महाराजांबद्दल फार अन्याय, अक्षम्य आणि खुनशिपणाचे धोरण स्वीकारिले होते. त्यांना वाटत असावे की, अशा कुटिल नीतीने व रीतीने शिवाजी महाराजांचे स्फूर्तिदायक चरित्र आपण महाराष्ट्राजवळून व हिंदभूमीजवळून कायमचे लपवून ठेवू शकू. तथापि, मानवी क्षुद्र इच्छेच्या व पराक्रमाच्यावर एक दिव्य शक्ति वसत असते व ती शक्ति योग्य वेळेला अशा ढोंगी लोकांची ढोंगे उघडकीस आणित असते. त्याचप्रमाणे शिवचरित्राच्या संबंधानेही गोष्ट झाली व हळूहळू परंतु निश्चिततेने शिवचरित्राचा सूर्य या सर्व प्रयत्नांच्या तिमिराला निरस्त करीत लोकांच्या मनःक्षितिजावर आरोहण करु लागला.

इतक्यात, युरोपमध्ये प्रचंड महायुध्द सुरु झाले व त्यामुळे इंग्रजांना हिंदुस्थानातल्या लोकांच्या सहानुभूतिची आवश्यकता वाटू लागली. तेंव्हा शाब्दिक गौरवांनी येथील जनतेचे समाधान करुन प्रत्यक्ष धनाची आणि जनाची सहाय्यता महायुध्द चालविण्याकरिता हिंदुस्थानकडून मिळवावी, अशा संकटकालच्या शहाणपणानी येथील जनतेला तात्पुरते संतुष्ट करण्याच्या हेतूने, ब्रिटिश सरकारने त्या वेळी जी अनेक साधने उपयोगात आणिली, त्यापैकीच लढवय्या मराठे लोकांना

खुलवून, शिवरायांच्या स्तुतीचे हे एक साधन सरकारने उपयोगात आणले. ज्या मराठयांच्या वडगावच्या जयजयकाराने मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथील इंग्रजांचे हृदयात धडकी भरली व तोंडचे पाणी पळाले, त्याच मराठयांचा जयकार करण्यास जयकार सरकारने 'कालाय तस्मै नमः' म्हणून मोठया आनंदाने लढाईच्या प्रारंभीच सुरुवात केली व 'मराठाकी जय' अशा शीर्षकांची मोठमोठाली प्रसिध्दके (जाहिराती) सर्व महाराष्ट्रभर फडकविण्यात आली! अशा रीतीने नियतीचा तडाखा.[५६]

शिवाजी महाराजांपासून प्रेरणा मिळवी, शिवाजी महाराजांचा लोकांना इतिहास माहिती व्हावा, म्हणून शिवजयंती उत्सव साजरे व्हावेत. असे डॉ. सावरकरांचे म्हणणे होते. तसेच त्यामुळे जन जागृती व्हावी, यासाठी शिवजयंती साजरी करणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटत होते.

**३.११ सिंधची विभागणी आणि बंगालची विभागणी :-**

भाषैक्य हे प्रांत विभागाचे एक गमक आहे, अनन्य गमक नव्हे.

सिंध्द प्रांतातील आपल्या हिंदु बांधवांच्या हृदयास सध्या जर कोणता हृदयरोग व्याकूळ करीत असेल तर तो, सिंधला मुंबईपासून विभक्त करुन एक स्वतंत्र प्रांत बनवावा म्हणून जो घाट मुसलमानांच्या दुराग्रहाने आणि त्यास बळी पडू पहाणाऱ्या हिंदुंनी घातलेला आहे, तो होय. हिंदुस्थान देशाचे जे प्रांत आज केलेले आहेत त्यांची रचना कोणत्याही तत्त्वावर किंवा काही सर्वसामान्य गमकावर केलेली नसून ते विभाग हिंदुस्थानातील एकंदर राज्य रचनेसारखेच अत्यंत अडाणी आणि अनैसर्गिक व्यवस्थेचे एक प्रमुख उदाहरण आहेत. देशाच्या राष्ट्रीय भावनेस, पोषक अशा दृष्टीने हे प्रांत बनविलेले नाहीत किंवा भाषा सहिश किंवा संस्कृतीसादृश किंवा फ्रेंच राज्यक्रांतीतीत राष्ट्रैक्याच्या लाटेत इतर सर्व भेदभव गाडून टाकिले जावेत म्हणून ज्या संख्येच्या आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीनेच फ्रान्सची उपांगे ठरविण्यात आली, त्या तत्त्वावरही या विभागाची रचना झालेली नाही, तर केवळ काळतालीम न्यायाने ती झालेली आहे. इंग्रज सरकारची सत्ता जशी जशी आज ज्या ज्या भूभागावर कढत गेली, त्याला भूभागाचा एकेक प्रांत आणि इलाखा बनत गेला. बंगाल, बिहार प्रथम हाती आले, कर त्यांचा एक प्रांत, पुढे अयोध्या, लखनौ मिळाले दडप त्यांना एकत्र, कर त्यांचा दुसरा प्रांत आणि दे त्यांना एक विक्षिप्त ना संयुक्त प्रांत इकडे मुंबईकरांच्या हातात. जे जे गवसत चालले त्यांचा ते मुंबईकरांच्या हातात गवसले

म्हणून आणखी एक गट करुन, गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक, सिंध, मिळून तो एक इलाखा बनून टाकिला. सध्याची प्रांतविभागणी अशा प्रकाराने कोणत्याही बौध्दिक तर्कशास्त्राच्या आधारावर उभारलेली नसून ती अगदी कुचकामाच्या न्यायाने उगवलेली आहे, ही प्रांतिक विभागणी.

इंग्रजांचे राज्याचा कसा विस्तार होत गेला, याची एक भौगोलिक जंत्री आहे. इतकेच! आजवर अनेक वेळा या अडाणी अव्यवस्थेने अनेक घोटाळे उत्पन्न होत आले. परंतु त्यामुळे ती सर्व अव्यवस्था मोडून टाकून नवी सुसंगत विभागणी करण्याचे ठायी उलट कोणची तरी तितकीच अडाणी तोंड काढून त्या अव्यवस्थेची तात्पुरती लिंपालिंपी होत आलेली आहे. पुढे बंगालच्या विभागणीने हा प्रश्न एकदा फारच प्रमुखपणे राजकीय नेत्यांच्या पुढे आला, परंतु तेंव्हाही या प्रश्नास सर्वसामान्य स्वरुप न येता बंगालपुरताच त्याचा व्याप आणि निर्वाह राहून गेला. तथापि प्रांतविभागणीची भाषा एकदा सुरु होता., ती कल्पना या नाही त्या रुपाने पुनःपुनः वर डोके काढू लागली. आंध्र प्रांत स्वतंत्र असावा अशी चळवळ प्रथम आंध्रात सुरु होऊन बंगालचे विभागणीच्या प्रश्नास सोडविताना ज्या तत्त्वावर बिहार आणि ओरिसा आणि आसाम निराळे केले गेले, त्याच तत्त्वावर आंध्रही निराळा व्हावा, अशी मागणी सुरु झाली.

ओघाओघानेच कर्नाटक, ओरिसा आणि इतर किरकोळ प्रांतातही त्याचे स्वतंत्र प्रांत असावे, अशी इच्छा प्रादुर्भूत होऊन शेवटी आज सिंधच्या विभागणी विरुध्द असणाऱ्या कित्येक सिंधी हिंदु बंधुनी तेंव्हा मागचा-पुढचा विचार न करता, सिंध प्रांतही मुंबईपासून स्वतंत्र केला जावा म्हणून चळवळ आरंभिली! भषावीर प्रांत रचना करा, अशी एकच हुल्लड चहुकडे, उठताच राष्ट्रीय सभेतही तिचा प्रतिध्वनी उठून प्रांत विभागणीचे भाषा हे एक गमक न समजता अन्यन्य गमक समजले जावे म्हणून राष्ट्रीय सभेनेही अट्टाहास धरला. पण ही मोठी चूक होती, कारण की राष्ट्रीय भावनेस पोषक अशी प्रांतरचना करावयाची, तर अनेक स्थळी भाषा हेच अनन्य गमक समजणे राष्ट्रहितास विघातक होते. ही गोष्ट अगदी उघड आहे. हिंदुस्थानात छप्पन्न भाषा आणि छपन्न दुणे एकशे बारा उपभाषा आहेत. तेंव्हा भाषावार प्रांत रचनाच करावयाची म्हटली, तर या प्रत्येक भाषाभाषीयास एकेक प्रांत तोडून द्यावा लागेल. केवळ भाषेपुरतेच पाहिले म्हणजे तामिळ आणि आंध्र आणि

कर्नाटक यांना स्वतंत्र प्रांत जर द्यावयाचे, तर मग मलयालम भाषेसही स्वतंत्र प्रांत का नसावा? एका पक्षी अगदी जिल्हयाएवढा एखादा प्रांत करावा लागेल. तर उलट पक्षी हिंदीसारखी अनेक कोटी लोक जी भाषा मातृभाषा म्हणून बोलतात, त्यांचा एका विस्तीर्ण देशाएवढा दुसरा अवजड प्रांत करावा लागेल! या अडचणीहून दुसरा अत्यंत महत्त्वाचा आक्षेप हा होय की, भाषाविभिन्नता, संस्कृतिभिन्नता, जातिभिन्नता, धर्मभिन्नता इत्यादी भिन्नत्व पाडणाऱ्या विभाजक प्रवृत्तीचे शक्य तितके उच्चाटन करीत इकरीतच आपणाला राष्ट्रैक्य स्थापना आणि राष्ट्रसंघटना करता येणारे शक्य होणारे असल्यामुळे या विभाजक प्रवृत्तीस प्रोत्साहन देण्यापेक्षा हितकारक आणि संभवनीय कक्षेपर्यंत त्यांना दाबात ठेवून त्यांचा विलय करण्यासाठीच आपणा सर्व राष्ट्रवाद्यांनी झटले पाहिजे, परंतु भाषा हेच अनन्य गमक समजून त्याच्या अनुरोधाने प्रांतविभागणी करु गेल्यास वरील राष्ट्रैक्य घातक विभाजक प्रवृत्तीपैकी अत्यंत बळकट अशा या भाषभिन्नतेच्या विघटक तत्त्वास अत्यंत प्रबळ प्रोत्साहन दिले जाते.

या दोन्हीही अडचणीस टाळावयाचे असेल तर केवळ भाषैक्य हेच प्रांत विभागणीचे तत्त्व न समजता त्यास संख्या राज्यव्यवस्थानुकूलता संस्कृतिसादृश इत्यादी अनेक तदितर गमकांनी मर्यादित केले पाहिजे. म्हणूनच प्रांतरचना करा म्हणून गर्जणारांनाही संख्याबळ मानावे लागले. एक कोटी किंवा दोन कोटी लोक जी भाषा बोलतात, त्या भाषेलाच स्वतंत्र प्रांत मागण्याचा अधिकार देण्यात यावा म्हणून काहीतरी अनुमान घेण्याची व्यवस्था राष्ट्रीय सभेलाही मानावी लागली. परंतु केवळ भाषा आणि संख्या ही दोन गमके पुरेशी नाहीत. आपणा सर्वांना प्रथमतः हे ध्यानात ठेवले पाहिजे की, आपले मुख्य ध्येय राष्ट्रविघटना नसून राष्ट्रसंघटना हे आहे. अर्थातच, आपल्या सर्व यत्नांचे धोरण प्रांतीय अभिमान, भाषीय भिन्नता इत्यादी विघटक प्रवृत्तीस शक्य तो निर्मूलन करण्याचे असले पाहिजे. कधीतरी असा सुदिन उगवावा की आसेतु हिमाचल हिंदुस्थानची एक भाषा व्हावी हे आपले राष्ट्रीय ध्येय असले पाहिजे. एकाएकी सर्व प्रांतिक भाषा माराव्यात, हे आम्हासही अभिप्रेत नाहीच नाही. तरी ही युगोयुगे भाषारिति जाति इत्यादी राष्ट्रैक्यविरोधी प्रवृत्ती अधिकच बळावत जातील आणि मागच्या इतिहासामुळे पडलेले प्रांतीय भेदभाव अधिकाधिकच तीव्रतर होत जातील, असेही कोणते कृत्य आपण करता कामा नये. परिस्थितीत हळूहळू हातात आणण्यासाठी, निरुपाय आणून काही काळ हे भेदभाव

आपण लक्षात घेऊ, त्यास योग्य तितका वावही देऊ, परंतु त्यास आपण प्रोत्साहन मात्र कधीही देता कामा नये, सध्याच्या परिस्थितीत प्रांतविभागणीचे भाषा हे एक प्रमुख गमक आहे. हे आम्हास मान्य आहे. परंतु त्यांचे कोणाच्याही प्रकारे 'अनन्य गमक' म्हणून प्रस्थ माजविणे हे राष्ट्रैक्याच्या ध्येयास हानिकारक आहे. निरनिराळया भाषाभाषीयांनी निरनिराळे राहण्याचा हट्ट धरण्यापेक्षा एकत्र राहण्यास शिकणे हेच त्याचे राष्ट्रीय कर्तव्य होय. एकत्र राहण्याची प्रवृत्ती असलेल्या दोन दोन, तीन तीन भाषा भाषीयांचा, संख्या, राज्यव्यवस्था आणि संस्कृतियास अनुकूल पडेल तेथे तेथे, एक एक प्रांत करणे अवश्य आणि संस्कृतियास अनुकूल पडेल तेथे तेथे एक एक प्रांत करणे आवश्यक आणि हितकारक आहे.

अर्थातच, ही गोष्ट परिस्थितीप्रमाणे हळूहळू शिकवावयाची आहे. पण म्हणून तिकडे दुर्लक्ष करुन चालावयाचे नाही. हा पेच सोडविण्यास, जे अनेक भाषाभाषी लोक आजपर्यंत एकेका प्रांतात किंवा इलाख्यात एकत्र रहावयास शिकले आहेत आणि शिकत आले आहेत. त्यांच्या प्रांतास विलग न करिता एकत्रच ठेवून सहज साध्य होणारा आहे. परंतु भाषावादीचे प्रस्थ माजविल्याने शेकडो वर्षे एकत्र राहात आलेल्या लोकासही फूट पाडून मरणासन्न होत चाललेले आकुंचित भाव जाणून बुजून उदिप्त केले जातात. एतदर्थ संख्या, राज्यव्यवस्था, इतिहास आणि विशेषतः लोकमत हे घटकही भाषावारीच्या घटकाप्रमाणे प्रांत विभागणीचे प्रश्नात आपण सर्वांनी विचारात घेतले पाहिजेत. जर कोणी भिन्नभाषीय लोक एकाच प्रांतात राहात आले असतील, आणि अजुनही ते एकंदरीत रहात आले असतील तर इतर सर्व दृष्टींनी आणि विशेषतः राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने तसे करणेच हितावहच असेल, तर त्यास एकाच प्रांतात संघटित होऊ द्यावे. इतकेच नव्हे तर त्यांच्या त्या कृत्याची प्रशंसा व्हावी. जर कोणी भिन्नभाषाभी, विलग होऊ इच्छितील तर त्यास शक्य तो तसे करु नका म्हणून समजावावे. इतक्यावरही जर संख्येच्या, राज्यव्यवस्थेच्या आणि संस्कृतीच्या दृष्टीने फारशी अडचण नसेल आणि एखाद्या महत्त्वाच्या भाषेचे अनुयायी आपणास स्वतंत्र प्रांत असावा, असे जवळजवळ एकमताने म्हणतच राहतील. तर मात्र त्यास भाषावारीच्या तत्त्वाने स्वतंत्र प्राप्त करु द्यावा. या धोरणाप्रमाणे पाहता आज आंध्र आणि कर्नाटक आणि क्वचित ओरिसा हे प्रांत स्वतंत्र झाल्यास काही हरकत नाही. संख्या, राज्यव्यवस्था, त्या भाषेच्या लोकांची

जवळजवळ एकमुखी मागणी आणि ज्या प्रांतातून ते अलग होऊ इच्छितात त्याचीही त्या मागणीस असणारी अविरोधिता या सर्व गोष्टी लक्षात घेता ते प्रांत स्वतंत्र झ ाल्यास काही हरकत नाही. परंतु त्याचे अनन्य कारण ते एक भाषा बोलतात हे नसून, त्याचा स्वतंत्र प्रांत केल्याने, त्यांच्यातील किंवा त्यांच्या बाहेरील कोणत्याही संस्कृतीची किंवा जनसंघाच्या हिताची किंवा राष्ट्रैक्याची त्यामुळे काही विशेष हानि होणारी नाही. हे त्या प्रांतविभागणीचे मुख्य समर्थन होय. परंतु आंध्रादिक प्रांताची स्वतंत्र रचना जरी तितकी आक्षेपार्ह नसली तरी.[५७]

सिंधची गोष्ट मात्र अगदी निराळी आहे. कारण आंध्र आणि कर्नाटक या प्रांताप्रमाणे सिंधला एकभाषाभाषी म्हणून स्वतंत्र प्रांत करावा, ही मागणी त्या लोकांनी एकमताने केलेली नसून ती इतर प्रांतातील मुसलमानांनी केलेली आहे. पूर्व बंगाल आणि पश्चिम बंगाल दोन करावेत म्हणून उद्या पंजाबी लोकांनी जर मागणी केली, तर ते जितके विक्षिप्त होईल, तितकेच मुंबईचे जिना आणि बंगालचे अब्दुल रहिम यांनी सिंधला भाषावारीच्या तत्त्वाप्रमाणे स्वतंत्र प्रांत करावा म्हणून मागणी करणे विक्षिप्तपणाचे होय. अर्थात, या मागणीच्या मागे मुसलमानांच्या मनात केवळ भाषावारीने प्रांत रचले जावेत. या वरवर सरळ दिसणाऱ्या हेतूहून दुसरेच काहीतरी कपटकारस्थान असले पाहिजे हे उघड आहे. आणि त्यांचे ते कपटकारस्थान काय ते आम्हाला उघडया पुस्तकासारखे स्पष्टपणे दिसतेही आहे. भाषावारीच्या आड दडून सिंध प्रांत स्वतंत्र करावा म्हणून जो हा डाव टाकला जात आहे, त्याच्या आड असणाऱ्या या मुसलमानी कपटासाठीच भाषावारीच्या तत्त्वास न जुमानता आम्हास सिंधला स्वतंत्र प्रांत बनविण्याच्या विरुध्द गेलेच पाहिजे. भाषेक्याकडे दृष्टि देऊन आंध्र, कर्नाटक, ओरिसा हे जर स्वतंत्र प्रांत केले जातील, तर सिंधलाही स्वतंत्र प्रांत करावा, असे म्हणून पाणिनी मुनि जसा एकसूत्रे श्वानम् युवानम् मधवानमाह तसा या तिन्ही प्रांताचा एकाच वर्गात समावेश करणे म्हणजे अगदी अप्रयोजकपणाचे होणारे आहे. सिंधची जनता, आंध्र आणि कर्नाटक या प्रांताप्रमाणे जोवर बहुतांशी एक मुखाची मागणी करीत नाहीत, तोवर आंध्र आणि कर्नाटक वेगळे केले म्हणूनच सिंधलाही मुंबईपासून वेगळे करण्याचा कोणासही न्याय अधिकार पोचत नाही. आंध्र आणि कर्नाटक या प्रांतात जनतेचा कोणताही महत्त्वाचा संघ, त्या विभागणीने आपल्या धार्मिक किंवा सांस्कृतिक किंवा आर्थिक हिताहितास विरोध येतो, असे

यथार्थ प्रतिपादन करुन त्या विभागणीचे विरुध्द प्रतिवाद करीत नाही, पण सिंधमध्ये उभी हिंदु जनता सिंधला स्वतंत्र प्रांत केल्यास आमची हिंदु संस्कृति ठार बुडालीच म्हणून समजा, असा यथार्थ प्रतिवाद एकसारखा करीत राहिली आहे. सिंधच्या विभागणीचे बुडाशी मुसलमानांचा हाच कपट हेतु आहे. अरबस्थानापासून बलुचिस्थानपर्यंत एकसारख्या सलग पसरलेल्या मुसलमानी सत्तेच्या आणि संस्कृतीच्या जबडयात सिंधलाही ढकलून राजपुतांच्या दाराशी इस्लामी अरेरावी दत्त म्हणून (तोबा तोबा) उभी ठाकू पहात आहे. जर सिंध स्वतंत्र प्रांत केला तर तेथील बहुसंख्यांक मुसलमान आपल्या पुरातन धर्मवेडाचे वेदीवर सिंधवी हिंदु संस्कृती छळाबळाने बळी देण्यात मागे पुढे पाहणार नाहीत आणि अशा रीतीने अरबस्थानपासून बलुचिस्थानपर्यंत सर्व देश गिळंकृत करुन पसरलेल्या इस्लामी सांस्कृतिक सत्तेच्या लाटेत सिंधलाही पचवून सलगपणे राजपुताळयापर्यंत निर्भेळ मुसलमानी जगत करण्याचा मुसलमानी हेतु आहे. हिंदुची ही भीती किती साधार आहे आणि सिंधला स्वतंत्र प्रांतीयता मिळताच हिंदुंची किती प्रकारांनी हानी होणारी आहे, हे आम्ही पुढे एका लेखात विशेषतः दाखविणारच आहोत. एतदर्थ या लेखात त्याचा नुसता उच्चारच करुन थांबतो. वर वर्णिलेल्या संकटात सिंधला आणि तेथील लाखो हिंदु बंधूंना केवळ भाषैक्याच्या तत्त्वाकरिता ढकलणे म्हणजे हिंदु संस्कृतिविरुध्द घोर अपराध करणे होय. आंध्र आणि कर्नाटक यांना भाषावारीचे तत्त्व लाविले म्हणजे ते सिंधची एकमुखी मागणी होईल, तर सिंधलाही लाविले जावे. इतकेच काय ते म्हणता येईल. कारण वर दाखविल्याप्रमाणे प्रांतविभागणी केवळ भाषावारीचेच अनन्य तत्त्वावर करणे अनेक प्रसंगी राष्ट्रघातकीपणाचे होणारे आहे.

आमच्या राष्ट्रीय नेत्यांनी कधीही विसरता कामा नये. सिंधमध्ये हिंदु जनता बहुतांशी जी या विभागणीचे विरुध्द आहे. तिचे हृदगत आम्ही थोडक्यात वर सांगितले आहे. सिंधचेच नव्हे तर उभ्या हिंदुस्थानातील मुसलमान लोक सिंधला मुंबई प्रांतातून फोडून काढण्यासाठी का धडपडत आहेत, हेही वर सूचित केलेलेच आहे. सिंधप्रांत एकभाषी आहे म्हणून तो मुंबईपासून स्वतंत्र करुन संघटित करावा म्हणून जे मुसलमान म्हणतात, त्यातील कपट आणखी एका विस्मृत गोष्टीने विशद होऊ शकते की, याच मुसलमानांनी एकभाषी असलेला बंगालचा स्वतंत्र प्रांत विभागून त्याचे विघटित असे दोन प्रांत करण्याची चळवळ मागे अशीच मनोभावाने

केलेली होती. मुसलमानास भाषावारीच्या दृष्टीने परस्परविरुध्द असणारी ही सिंधची विभागण्या ज्या संमत झाल्या, त्या त्यांच्यामागे पडलेल्या एका मुसलमानी वर्चस्वाच्या आकांक्षेनेच झाल्या. बंगालात भाष एक प्रांत एक होता. पण त्याची विभागणी करण्याचे कामी मुसलमानांनी सरकारचे हातात हात घालून हिंदूच्या प्रचंड चळवळीस, हातात होता तेवढा विरोध करावयास कमी केले नाही. कारण पूर्व बंगाल जर पश्चिम बंगाल्यापासून विभक्त केला असता, तर त्या प्रांतात मुसलमानांचे बहुमत होऊन त्यांच्या धर्मवेडास हिंदु सहनशीलतेवर, कुरघोडी करावयास सहज सापडते. म्हणून तेंव्हा भाषैक्याचे तत्त्वास गळयास देण्यास मुसलमान सिध्द झाले. आज सिंधमध्ये उलट स्थिती आहे. भाषैक्याचे नावाने जर का सिंध मुंबईपासून फोडता आला, तर त्यातील अत्यंत अल्पसंख्यांक हिंदूस वेळ पडली, तर लारकान्याच्या दंग्याप्रमाणे सीमेवरील रानटी जातीसी आत बोलावून इस्लामी वर्चस्वाचे दास करता येणारे आहे. म्हणून आता भाषैक्याच्या तत्त्वाचा उदोउदो चालला आहे. ही गोष्ट आमच्या हिंदु पुढाऱ्यांनी न विसरता आंध्र आणि कर्नाटक किंवा ओरिसा या प्रांताच्या वर्गात सिंधला गोवण्याची भयंकर चुकी करु नये. ज्या कारणाकरिता बंगालच्या विभागणीचा हिंदुमात्राने घोर विरोध केला, त्याच कारणाकरिता सिंधच्या विभागणीचाही विरोध केलाच पाहिजे. बंगालच्या हिंदुतील बहुमताच्या ती विभागणी प्रतिकूल होती आणि म्हणून सरकारने ती बळाने त्यांच्यावर दडपणे अन्याय्य होते, असे ज्याप्रमाणे सर्व हिंदुमात्र त्यावेळी म्हणाला, त्याचप्रमाणे सर्वत्रांनी आताही असेच म्हटले पाहिजे की, सिंधच्या हिंदुचे प्रचंड बहुमत या विभागणीस प्रतिकूल असल्याचे आणि कोणत्याही प्रांतातील हिंदूंचे किंवा मुसलमानांचे एवढे प्रचंड बहुमत इतक्या योग्य आणि या कारणांसाठी त्या प्रांताच्या विभागणीस विरुध्द असता ती विभागणी त्यावर अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय कारणावाचून लादण्याचा अधिकार सरकारास राष्ट्रीय सभेस किंवा कोणासही प्राप्त होत नसल्याने, सिंधला मुंबई इलाख्यापासून विभक्त करणे सर्वथा अनुचित होय.[५८]

सध्याच्या परिस्थितीपुरते तरी सिंधला मुंबई इलाख्यातच संयुक्त होऊन राहिले पाहिजे. पुढे मागे जेव्हा स्वतंत्र हिंदुस्थानची स्वतंत्र रचना होईल तेंव्हा सिंधला भाषा आणि संस्कृति यांनी जवळ असणाऱ्या अशा काठेवाड ते मुलतानपर्वतच्या भागात मिसळून कच्छ काठेवाडपासून तो मुलतानपर्यंत एक प्रांत करिता येईल. कारण

त्यायोगे काठेवाडातील हिंदुंची भर पडून तो प्रांत भाषा आणि संस्कृतीच्या दृष्टीने सहश असणाऱ्या लोकास समाविष्ट करुनही मुसलमानांच्या बहुसंख्येच्या आततायी भयापासून बराच मुक्त राहु शकेल. कच्छ, काठेवाड ते मुलतानपर्यंत भाषेच्या, संस्कृतीच्या आणि इतिहासाच्या दृष्टिनेही एक प्रकारचे वैशिष्टय आढळून येणारे असून विंध हा त्या भूविभागाचा एक नैसर्गिक आणि ऐतिहासिक विभाग आहेही; परंतु पुढे जरी केंव्हा हे शकले तरी ते आज शक्य नसल्याने सध्या सिंध मुंबई इलाख्यातच राहिला पाहिजे. याविषयी जाता जाता आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही की, हिंदूंचे संघटित बळ शक्य तितके वाढू न देण्याच्या ज्या सरकारी प्रवृत्तीमुळे बंगालच्या विभागणीचे वेळी सरकारने मुसलमानास सहाय्य केले, त्या प्रवृत्तीस सरकार क्वचित आताही बळी पडून आणि मुसलमानांच्या मनधरणीकरिता सिंधचा स्वतंत्र प्रांत करुन तेथील हिंदूचे जातीय जीवन संकटात घालण्यास मागे-पुढे पाहणार नाही. पण आम्ही सरकारला वेळीच चेतावणी देऊन ठेविता की जर ते अशी चूक करील, तर त्यामुळे ते हिंदुच्याच नव्हे तर इंग्रजी सत्तेच्याही हितास संकटात ढकलीत. कारण या कामी हिंदुंचे आणि सरकारचे हितानहीत एकाच धोरणावर अवलंबून आहे. सरकारी धोरण बंगल्यातील हिंदूंची शक्ति तोडण्याचे होते. म्हणून बंगालच्या विभागणीचे वेळी हिंदूस सरकारला घोर विरोध करावा लागला. परंतु सिंधमध्ये हिंदु जनता जितकी संघटित, सशक्त आणि सामर्थ्यवान होऊ शकेल, तितके ते इंग्रजांचे सरसीमेवरील राजकारणास अनुकूलच होणारे आहे. कारण इंग्रज सरकारला आम्ही हे काही सांगावयास नको की जेंव्हा अर्जुन महायुध्दाप्रमाणे लवकरच पुन्हा एखादे जागतिक महायुध्द जुंपेल आणि त्या इंग्लंड गुंतून हिंदुस्थानचे संरक्षणास युरोपीय सैन्य धाडणे अशक्य होईल, तेंव्हा रशियाच्या पाठिंब्याने अफगाणिस्थान, हिंदुस्थानावर स्वारी करण्यास सोडणार नाही. त्या देशाला समुद्रावर नाही म्हणून कराची बंदर आपल्या हातात घेण्यासाठी अफगाणिस्थान पिढयानपिढया धडपडत आहे. अशा वेळी सिंधमधील मुसलमान तिका बंड करुन उठून अफगाणिस्थानास अवश्य मिळेल. म्हणून मुसलमानांचे वर्चस्व, सिंधमध्ये जितके जितके सरकार जास्त वाढू देईल तितके इंग्रजांच्या सत्तेवर होणाऱ्या अफगाणिस्थानच्या आक्रमणास यश मिळण्याचा संभव ते अधिकाधिक दृढावीत राहील. परंतु जर सरकार सिंधमध्ये हिंदुचे सामर्थ्य, संघटन आणि वर्चस्व आबाधित

राहील असेच धोरण स्वीकारतील, तर कोणत्याही मुसलमानी आक्रमणाविरुध्द सिंधमध्ये हिंदु लोक तितक्याच निकराने आणि आधिक त्रुटीने लढताना आजही दृष्टीस पडतील की, जितक्या निकराने त्यांचे पूर्वज दाहिराचे अधिपत्याखाली पूर्वीच्या मुसलमानी स्वाऱ्यांविरुध्द लढले होते. कारण सिंधमध्ये मुसलमानी पाऊल पुढे पडू न देण्याच्या प्रश्नात हिंदुंचे आणि इंग्रजांचे हिताहित एकच आहे. यास्तव सरकारने वेळीच दूरदृष्टी ठेवून सिंधच्या विभागणीस मान न झुकविता सिंधला मुंबई प्रांतासच तोवर संलग्न करुन ठेवावे की, जोवर येथील हिंदु हिताचा आणि सामर्थ्यांचा घात न करता, सिंधला स्वतंत्र किंवा दुसऱ्या प्रांताशी संलग्न करणारी आणि सिंधच्या हिंदुंना बहुतांशी मान्य अशी दुसरी एखादी योजना करणे शक्य होत नाही![५९]

वरील लेखाचा सारांश असा आहे की, इंग्रजांनी 'फोडा आणि झोडा' या तत्त्वाचा अवलंब केला होता. भाषा जर एक असेल तर हिंदूंचे संघटन अधिक चांगल्या प्रकारे होईल आणि तो समाज बळकट होईल. नाही तर हिंदु-मुस्लिम यांच्यात सारखेच तंटे होतील. आज याचा आपल्याला वारंवार प्रत्यय येत आहे. भाषावार प्रांत रचना करण्यात इंग्रज सरकार तयार नव्हते. कारण त्यांना माहित होते की जर समाजात आपण फूट पाडली नाही तर आपल्याला या देशावर राज्य करणे शक्य होणार नाही. म्हणून तिघाही सावरकरबंधूंचा एकच ध्यास होता की, हिंदुत्त्व हे टिकले पाहिजे. त्यासाठी एक देव, एक भाषा, एक संस्कृती यावर त्यांनी भर दिल्याचे लिखाणातून दिसते.

## तळटिपा

१) गोखले द. न. क्रांतीवीर बाबाराव सावरकर, मङ्गल साहित्य प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००३, पृष्ठ - ४१.

२) सावरकर ना. दा, 'श्रध्दानंद', दि. ०५/०५/१९२७, पृष्ट - ४.

३) करंदीकर शि.ल., 'सावरकर चरित्र' सीताबाई करंदीकर (प्रकाशक) पुणे - १९४३, पृष्ठ - ७३.

४) कित्ता; पृष्ठ - ७४.

५) बेनोडेकर विप्रदास, डॉ. ना.दा. सावरकर जीवनकार्य.पृष्ठ - ४०.

६) सावरकर ना.दा., 'श्रध्दानंद' दि. ०५ मे १९२७, पृष्ठ - २.

७) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर' मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००२, पृष्ठ क्र. २३७.

८) सावरकर ना.दा., 'श्रध्दानंद' दि. ५ मे १९२७, १३ सप्टेंबर १९२८.

९) सावरकर ना.दा., संपादकीय एक नमुना, 'श्रध्दानंद' ३ फेब्रुवारी १९२७, पृष्ठ - २.

१०) कित्ता; पृष्ठ - ४.

११) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई, गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट १९२७, पृष्ठ - ४.

१२) कित्ता; पृष्ठ - ४.

१३) सावरकर ना. दा., 'श्रध्दानंद' मुंबई, गुरुवार, दि. १५ सप्टेंबर १९२७, पृष्ठ - १.

१४) कित्ता; पृष्ठ - १.

१५) कित्ता; पृष्ठ - ५.

१६) कित्ता; पृष्ठ - ५.

१७) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई, शनिवार, दिनांक १६ नोव्हेंबर १९२९, पृष्ठ - २.

१८) कित्ता; पृष्ठ - २.

१९) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई, शनिवार दिनांक ४ मे १९२९, पृष्ठ - २.

२०) कित्ता; पृष्ठ - ५.

२१) कित्ता; पृष्ठ - ५.

२२) कित्ता; पृष्ठ - ५.

२३) कित्ता; पृष्ठ - ६.

२४) कित्ता; पृष्ठ - ६.

२५) कित्ता; पृष्ठ - ६.

२६) कित्ता; पृष्ठ - ६.

२७) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई गुरुवार दि. १० फेब्रुवारी १९२७, पृष्ठ - २.

२८) कित्ता; पृष्ठ - ५.
२९) कित्ता; पृष्ठ - ५.
३०) कित्ता; पृष्ठ - ५.
३१) कित्ता; पृष्ठ - ५.
३२) कित्ता; पृष्ठ - ७.
३३) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई गुरुवार दि. २४ फेब्रुवारी १९२७,पृष्ठ - १.
३४) कित्ता; पृष्ठ - १.
३५) कित्ता; पृष्ठ - १.
३६) कित्ता; पृष्ठ - १.
३७) कित्ता; पृष्ठ - १.
३८) कित्ता; पृष्ठ - ४.
३९) कित्ता; पृष्ठ - ४.
४०) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई गुरुवार दि. २१ एप्रिल १९२७, पृष्ठ - २.
४१) कित्ता; पृष्ठ - २.
४२) कित्ता; पृष्ठ - २.
४३) कित्ता; पृष्ठ - २.
४४) कित्ता; पृष्ठ - ५.
४५) कित्ता; पृष्ठ - ५.
४६) कित्ता; पृष्ठ - ५.
४७) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई गुरुवार दि. ०५ मे १९२७, पृष्ठ - १.
४८) कित्ता; पृष्ठ - १.
४९) कित्ता; पृष्ठ - १.
५०) कित्ता; पृष्ठ - १.
५१) कित्ता; पृष्ठ - ६.
५२) कित्ता; पृष्ठ - ६.
५३) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई गुरुवार दि. १२ मे १९२७, पृष्ठ - २.
५४) कित्ता; पृष्ठ - २.
५५) कित्ता; पृष्ठ - २.
५६) कित्ता; पृष्ठ - २.
५७) सावरकर ना. दा. 'श्रध्दानंद' मुंबई गुरुवार दि. २१ जुलै १९२७, पृष्ठ - ३.
५८) कित्ता; पृष्ठ - ३.
५९) कित्ता; पृष्ठ - ६.

# प्रकरण चौथे

# राजकीय कार्य

# प्रकरण चौथे

# राजकीय कार्य

## ४.१ प्रस्तावना :-

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय जागृतीसाठी 'गणेशोत्सव' आणि 'शिवजयंती' उत्सव सुरु केले, त्या सणांना धार्मिक स्वरुप देऊन महाराष्ट्रात एका महान परंपरेला सुरुवात केली. सन १८९३ पासून गणेशोत्सव, दसरा, दासनवमी व शिवजयंती राष्ट्रीय उत्सव म्हणून महाराष्ट्रात रुढ झाले. १९१९ साली डॉ. ना.दा. सावरकर यांनी रायगडावर जाऊन शिवजयंती साजरी केली.

१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला आणि राष्ट्रीय सभेची सर्व सूत्रे गांधीजींकडे आली. देशाच्या राजकारणाला एक नवे वळण लागले. १९२० मध्ये आंदोलन झाले. मिठाच्या सतयाग्रहात डॉ.ना.दा. सावरकर यांनी भाग घेतला होता, असे तत्कालीन पोलीस फाईलमध्ये नमूद केले आहे. ३ एप्रिल १९२६ रोजी रायगडावर शिवाजी उत्सव पार पडला. यामध्येही डॉ. ना.दा. सावरकर सहभागी झाले. १९२७ साली शिवाजी महाराजांची त्रिशताब्दी रायगडावर जाऊन साजरी केली. त्यावेळी ना.दा. सावरकर आणि त्यांचे सहकारी डॉ. वेलकर यांनी पत्रक काढून शिवजन्मोत्सव कसा साजरा करावा, हे त्या पत्रकाद्वारे सांगितले.

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय उत्सवातील धोरणांचा प्रचार करण्यासाठी डॉ. सावरकरांनी नांदुरा, अमरावती, चांदा, वणी, पांढरकवडा, दारव्हा, कारंजा, अकोला, तेल्हारा, वाशीम, उमरखेड, मसुदा, पुसद या ठिकाणी दौरा केला.

गांधीजींनी असहकार, अहिंसक चळवळीने अल्पकाळात स्वराज्य प्राप्त करता येईल म्हणून आंदोलन उभारले. या चळवळीला गती देण्यासाठी डॉ. सावरकरांनी टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचा अवलंब करण्याचे कार्य केले.

## ४.२ 'लोकमान्य टिळकांचा निःशस्त्र प्रतिकार व महात्मा गांधींचा सविनय कादेभंग' :-

निःशस्त्र क्रांतिवाद, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व स्वराज्य या चतुःसूत्रीचा पुरस्कार करणारे स्वावलंबी राजकारण या देशात लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० सालापासून संपूर्ण राष्ट्राचे नेतृत्व महात्मा गांधीजींनी नवीन अहिंसक शांततामय असहकार चळवळीची दिशा जन-आंदोलनाला दिली.

महात्मा गांधींची कायदेभंगाची चळवळ लोकमान्य टिळकांच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या स्वरुपाची नव्हती. सविनय कायदेभंग व निःशस्त्र प्रतिकार या दोहोंचे बाहय स्वरुप एकच होते, तरी तत्त्वतः त्या दोहोंत मूलगामी भेद होता. शत्रूचे मन वळविणे व अडवणुकीच्या मार्गाने प्रतिपक्षाची गठडी वळवून त्यास वठणीवर आणणे हे दोन्ही उपाय भिन्न होते. तथापि, या दोन्ही गोष्टी टिळकांच्या निःशस्त्र क्रांतिवादात बसत होत्या. निःशस्त्र क्रांतिवाद व सत्याग्रह टिळकांच्या निःशस्त्र क्रांतिवादात बसत होत्या. निःशस्त्र क्रांतिवाद व सत्याग्रह यातील भेद ओळखूनही गांधींच्या अहिंसेच्या घोषणेने स्वावलंबनाची शिकवण निर्भयतेने देता येते, हे ध्यानी घेऊन लोकमान्य टिळकांच्या पश्चात त्यांचे काही अनुयायी काही काळ गांधी सत्याग्रहात सहभागी झाले.

लो. टिळकांच्या निःशस्त्र क्रांतिवादाला व सावरकरांच्या क्रांतिवादी राजकारणाला तथाकथित अहिंसावादी नैतिक बैठक देण्याचा महात्मा गांधींचा प्रयत्न 'अभिनव भारता'च्या सदस्यांना पसंत नव्हता. परंतु लोकमान्यांच्या पश्चात गांधीजींच्या चळवळीचा प्रभाव सर्वसाधारण जनतेवर पडला होता. शाळा कॉलेज, कौन्सिले, यावंर लोकांनी बहिष्कार घातला. हिंसेला थारा न देता, एका वर्षात स्वराज्य, या म. गांधींच्या काल्पनिक स्वप्नाचा प्रभाव इतर प्रांताप्रमाणे महाराष्ट्रातल्या काही प्रमुख राष्ट्रीय पुढाऱ्यांवरही पडला होता. विशेष म्हणजे टिळकांच्या शि.म. परांजपे, कृ.प. खाडिलकर, ना.दा. सावरकर, इ. सहकाऱ्यांची तर आपले पारंपरिक पोशाख, पगडया, अंगारखे टाकून खादीच्या गांधी टोप्या, डगले घालण्यापर्यंत मजल गेली होती. थोडक्यात, लोकमान्य टिळकांच्या या सहकाऱ्यांनी तूर्त महात्मा गांधीच्या चळवळीला शक्य तेवढा पाठिंबा देणे आणि त्यांच्या धोरणानुसार असहकारितेच्या चळवळीत सक्रिय भाग घेण्याचे ठरविले.'[१]

**डॉ. नारायणराव सावरकर व काँग्रेस :-**

काँग्रेस संघटनांची माहिती येथे देण्याचे विशेष कारण म्हणजे, राष्ट्रीय सेवा दल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक पथक हया दोन्ही संघटना स्थापन करण्याचे धोरण मुंबई गिरगाव काँग्रेसचे प्रमुख केंद्र होते.

काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. नारायणराव दामोदर सावरकर हे होते.

(२६/११/१९२३) हया राष्ट्रीय संघटनांची स्थापना मुंबईमध्ये सर्वप्रथम डॉ. सावरकरांनी गिरगाव येथे केली.

**४.३ डॉ. सावरकरांची भूमिका :-**

डॉ. नारायणराव सावरकरांना अशा तऱ्हेच्या स्वयंसेवक संघटना काही नवीन नव्हत्या. बालवयातच 'अभिनव भारत' या स्वातंत्र्यवीर सावरकरनिर्मित गुप्त क्रांतिकारी संघटनेची प्रतिज्ञा त्यांनी घेतली होती. ही प्रतिज्ञा डॉ. सावरकरांनी आजीवन कार्य करण्यासाठी केली होती. डॉ. सावरकरांसारख्या निष्ठावान आणि देशभक्त त्यागी व्यक्तीने ती कोणत्याही परिस्थितीत विसरणे शक्य नव्हते. तरीही तत्कालीन राजकीय परिस्थिती, जनआंदोलनाचे स्वरुप, यांचे वस्तुनिष्ठ भान ठेवून डॉ. सावरकरांनी आपली सकृत्‌दर्शनी घ्यावयाची भूमिका निश्चित केली. क्रांतिकारकांच्या हेतुपूर्तीसाठीही जनसामान्यांशी जवळीक साधणे आवश्यक होते. प्रचलित जनआंदोलनात सहभागी होऊन काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चळवळीत सामील झालेल्या कार्यकर्त्यांशी संबंध प्रस्थापित करणे आवश्यक होते. त्या चळवळीत राहूनच देशस्वातंत्र्यासाठी अंतिमतः स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सशस्त्र संघर्षाची उपयुक्तता पटवून देणे शक्य होणार होते आणि हया हेतूनेच डॉ. सावरकर हे गांधीजींच्या नेतृत्वाखाली चालू काँग्रेसच्या माध्यमातून सुरु झालेल्या सर्व चळवळीत सहभागी झाले. इतकेच नव्हे तर त्याच चळवळीत, प्रसंगी नेतृत्वही करुन सत्याग्रहातही भाग घेतला. काँग्रेसमधील सर्वसाधारण काँग्रेस कार्यकर्त्यांचा आणि कर्तृत्वाची दखल घेणाऱ्या नेत्यांचा विश्वास निर्माण केला. खरे तर, क्रांतिकारकांच्या अंतिम हेतुपूर्तीसाठीच तत्कालीन राजकीय परिस्थितीचे भान ठेवून डॉ. सावरकर काँग्रेसच्या जनआंदोलनात सकृत्‌दर्शनी सहभागी झाले होते. याच सुमारास १९२३ च्या फेब्रुवारी महिन्यात तात्याराव सावरकर रत्नागिरी तुरुंगात होते. घरच्या मंडळींच्या भेटीगाठी होण्याची शक्यता सरकारी धोरणामुळे निर्माण झाल्यामुळे, डॉ. सावरकरांनी हया संधीचा फायदा घेऊन रत्नागिरीस जाऊन बॅ. सावरकरांची भेट घेतली. प्रचलित परिस्थितीत वडील बंधूंचे गुरुतुल्य मार्गदर्शन मिळविण्यासाठीच डॉ. सावरकर रत्नागिरीस गेले. थोडक्यात, तात्याराव सावरकरांचीच धोरणे ते अवलंबीत होते. ज्येष्ठ बंधु गणेश सावरकर त्या वेळी अंदमानातून व भारतातल्या कारावासातून कायमचे निसटले होते. परंतु त्या दीर्घकालात त्यांचे शरीर रोगांनी पोखरलेले होते.

इतके असूनही त्यांची भरतवर्षभर संचार चालू ठेवला होता. हिंदुत्वाच्या अभिवृध्दीकरता गणेश सावरकर त्या वेळी अनेक थोरांशी संबंध जोडीत होते.

**पनवेल महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस :-**

दि. २ व ३ जानेवारी १९३२ ला महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे आठवे अधिवेशन पनवेल येथे लोकनायक बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. महाराष्ट्राचे धोरण काँग्रेसच्या हया लढयात काय असावे, याचा विचार करण्यासाठी हे अधिवेशन भरविण्यात आले होते. वाईट परिस्थितीतून मार्ग काढण्याचे कौशल्य आणि धमक महाराष्ट्रात आहे आणि ती परंपरा महाराष्ट्र कायम राखील व काँग्रेस कमिटीने दिलेल्या आदेशाप्रमाणे जास्तीत जास्त स्वयंसेवक महाराष्ट्र पुरवील व राष्ट्रीय लढा यशस्वी करुन दाखवील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. त्या वेळी परिषदेच्या व्यासपीठावर डॉ. नारायणराव सावरकर, न.चिं. केळकर, रामभाऊ पुंडलिक, दादासाहेब करंदीकर, ल.ब. भोपटकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नि.वि.गाडगीळ, अमरावतीचे शिवाजीराव पटवर्धन ही मंडळी प्रामुख्याने दिसत होती.

परिषद आटोपल्यावर राष्ट्रीय समस्या लक्षात घेऊन डॉ. नारायणराव सावरकरांनी वॉर्डातील स्थानिक कार्यकर्त्यांना एकत्र आणले. त्यांना आपल्या कर्तव्याची यथार्थ जाणीव करुन दिली. याचा परिणाम म्हणजे शेकडो स्वयंसेवक त्यामुळे काँग्रेसमध्ये भरती झाले.

**बॅ. महंमदअली जीना आणि डॉ. सावरकर :-**

काँग्रेस नॅशनल गार्डसचे (राष्ट्रीय सेवा दलाचे) मुंबई मुख्य कचेरीचे उद्‌घाटन बॅ. महंमदअली जीना यांच्या हस्ते, यंग मेन्स एज्युकेशनल सोसायटी, कांदेवाडी, गिरगाव येथे दि. ०९/११/१९३३ रोजी झाले. डॉ. सावरकरांच्या संघटनकौशल्यामुळे नेमून दिलेला कोटा पूर्ण करण्यास मुंबई काँग्रेसला देशात सर्वप्रथम यश मिळाले. दि. ९ रोजी भरलेल्या राष्ट्रीय सेवादलाच्या उद्‌घाटन समारंभाला दलाच्या अध्यक्षा सरोजिनी नायडू काही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यामुळे डॉ. नारायणराव सावरकरांनी बॅ. महंमदअली जीना यांना उद्‌घाटनाचे आमंत्रण दिले. त्या वेळी तसे तत्त्वशः विरोधी असलेले बॅ. जीना हया समारंभास उपस्थित राहिले. डॉ. सावरकर

ध्येयनिष्ठ होते. त्यांनी आग्रही मान दिल्यामुळेच बॅ. जीनांनी उद्घाटनाचा स्वीकार केला. गिरगाव काँग्रेसचे अध्यक्ष हया नात्याने डॉ. सावरकरांनी सभेचे संचालन केले.

**बॅरिस्टर जीना :-**

व्हाईसरॉय लॉर्ड विलिंग्डनने लोकमान्य टिळकांचा १९१८ साली केलेल्या घोर अपमानाचा बदला, त्यांचे विलिंग्डन स्मारक हाणून पाडून पुरेपूर कसा घेतला, याची जाणीव डॉ. सावरकरांनी श्रोत्यांना करुन दिली. बॅ. जीना भाषणात म्हणाले, 'राष्ट्रीय सेवा दल, राष्ट्रीय स्वयंसेवक पथक, हे पूर्वीचे इंडियन होमरुल लीग व्हॉलंटीयर्स पथक या पथकाचा मी पूर्वी अध्यक्ष होतो. माझ्या अध्यक्षतेखाली होमरुल लिग व्हॉलंटीयर्सनी राष्ट्रीय सेवा पुष्कळ केली आहे. आता 'होमरुल पथका'चे नाव बदलून 'सेवादल' ठेवण्यात आले, म्हणून मी संघटनेचा राजीनामा दिला. सद्यः परिस्थितीत काँग्रेसने अंगिकारीलेली तत्त्वे मला पटत नाहीत. अहिंसा, असहकारिता राजकारणात आल्यामुळे देशाचे दुफळी माजली आहे. इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी परिस्थितीजन्य एकमुखी मागणी असायला पाहिजे'.

**डॉ. सावरकर :-**

बॅ. जीनांच्या भाषणानंतर डॉ. नारायणराव सावरकरांचे भाषण झाले. जीनांच्या भावनांचा स्पर्श न करता, डॉ. सावरकरांनी राष्ट्रीय सेवादल व राष्ट्रीय स्वयंसेवक पथक या संघटनांचे महत्त्व जमलेल्या सभासदांना विशद करुन सांगितले आणि हया संघटना काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. दिल्ली काँग्रेसने प्रांतोप्रांती राष्ट्रीय सेवादले स्थापन व्हावी म्हणून आदेश दिला होता. त्याची अंमलबजावणी सर्वत्र झाली, तथापि, सर्वप्रथम हया संघटना प्रस्थापित करण्याचे श्रेय, डॉ. नारायणराव सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या मुंबईच्या गिरगाव काँग्रेस कमिटीला मिळाले, हे महत्त्वाचे आहे. या संघटनेचे गुण उत्तरोत्तर डॉ. सावरकरांच्या कुशल मार्गदर्शनाखली वाढत गेले. अशा रीतीने संघटना स्थापन करण्याची सर्वप्रथम कार्यवाही गिरगाव काँग्रेसने केली. वरील घटनेची योग्य दखल मुंबई क्रॉनिकलच्या संपादकाने, संपादकीय स्फुटामध्ये दि. २४/११/१९३३ रोजी घेतली आहे.

**'मुंबई क्रॉनिकल' चे डॉ. सावरकरांना प्रशस्तिपत्र :-**

"I understand the Executive of Girgaum District Congress Committee as the representative of the most

intellectural and politically minded ward of this city will take the opportunity of proviing itself to be above these tactics and will win the credit of being the first (unfortunately the only) committee in the whole country to carry out the Delhi Resolution."

**मराठी अनुवाद :-**

गिरगाव विभाग कार्यकारी काँग्रेस ही मुंबईच्या विचारवंतांची, राजकीय निष्ठावंतांची प्रातिनिधिक संस्था, आपापसातील मतभेद, डावपेचांना न जुमानता, दिल्ली काँग्रेसचा आदेश अंमलात आणण्यात या देशातली पहिली, कादाचित एकमेवही ठरेल, असे मी मानतो.[२]

**डॉ. सावरकर कृतिशील आणि जातीय :-**

महाराष्ट्र राज्य सरकारच्या मुंबई येथील पोलीस फाईल्स (गुप्त अहवाल १९३२) मध्ये, काँग्रेसची चळवळ संघटित करण्यात पुढाकार घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या यादीत डॉ. ना.दा. सावरकरांचे व्यक्तिमत्त्व प्रामुख्याने आढळून आले. डॉ. नारायण दामोदर सावरकर, गिरगाव काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून अग्रभागी नोंदले आहे. कायदेभंगाच्या चळवळीत तुरुंगात असताना डॉ. सावरकरांचे बरोबर शंकरराव देव, उद्योगपति जमनालाल बजाज, क्रांतिवीर गणेशपंत सावरकर, कामगार संघटक एस.एम. झाबवाला हे सहचर कैदी होते. पोलिसांनी डॉ. सावरकर अतिशय कृतिशील व जातीय होते, असा उल्लेख केला आहे. मिठाच्या सत्याग्रहाचे वेळी त्यांना इंग्रज सरकारने ६ महिने तुरुंगात डांबले, सश्रम कारावास व २०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. परंतु डॉ. सावरकरांनी दंड भरण्यास नकार दिला. त्यामुळे आणखी दोन महिने त्यांना तुरुंगात खितपत पडावे लागले.[३]

**जिनिव्हा आंतरराष्ट्रीय परिषद आणि डॉ. सावरकर :-**

१९३३ साली युरोपात जिनिव्हा येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटना परिषदेला भारतीय शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरले. त्या शिष्टमंडळावर डॉ.ना.दा.सावरकर यांची निवड झाली, अशी नोंद पोलीस दप्तरात आहे. गिरणी कामगारांच्या मागण्यांसाठी डॉ. सावरकर, वेळोवेळी उभारलेल्या कामगार आंदोलनांमध्ये तत्परतेने भाग घेऊन कामगारांचे नेतृत्वही करीत असत. उपलब्ध

परिपत्रकात तसे उल्लेख आहेत. आणि म्हणूनच मुंबईच्या ट्रेड युनियन काँग्रेसने डॉ. नारायणराव सावरकरांची जिनिव्हा परिषदेसाठी निवड केली. त्यांनी कामगारांसाठी केलेल्या निःस्वार्थ सेवेची ही पावती होती.[४]

**४.४ डॉ. सावरकारांच्या राजकीय उलाढाली :-**

डॉ. सावरकरांनी अनेक राजकीय उलाढाली केल्या. महाराष्ट्र राजकीय परिषद, पक्षसंघटना, जातीय निवाडाविरोधी परिषदा, लोकशाही स्वराज्य पक्षाची सभासंमेलने, गोहत्याविरोधी आंदोलने, काँग्रेस सुवर्णमहोत्सवी सभा, खादी ग्रामोद्योग प्रदर्शने, तसेच मुंबई इलाखा हिंदुमहासभेचे अध्यक्ष हया नात्याने उभारलेली अनेक आंदोलने, शिवाजी पार्क, कामगार मैदानावरील निषेध सभा मोर्चे या सर्व चळवळींची नोंद आढळून आली. १९३७ साली अंदमानात अन्नसत्याग्रह करणाऱ्या राजकीय बंदयाविषयी सहानुभूती व त्यांच्या मुक्ततेची इंग्रज सरकारकडे मागणी डॉ. सावरकरांनी हिंदु महासभेचे अध्यक्ष हया नात्याने दादर शिवाजी पार्क येथे प्रकट सभा घेऊन जोरदारपणे केली होती.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या हया झगडयात सुरुवातीच्या काळात, मुसलमानांचे व इतर अल्पसंख्यांकाचे साहाय्य उघड दिसत होते. ते इंग्रज सरकारच्या डोळयांत खुपत होते. त्यांनी 'फोडा व झोडा' ही नीती त्या वेळी अंगिकारिली. हिंदु-विरुध्द मुसलमान, ब्राम्हणविरुध्द ब्राम्हणेत्तर, स्पृश्यविरुध्द अस्पृश्य अशी दंगल पेटवून दिली. राष्ट्रीय हिताचा सारासार विचार कोणत्याही पक्षाने केला नाही. इंग्रज सरकारच्या या भेदनीतीचा व अल्पसंख्यांकांविषयीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी सन १९२८ साली, मुंबई शहर व कल्याण ते विरारपर्यंत हिंदु राष्ट्रीयवादयांची एक परिषद, मुंबई येथे भरली होती. ती परिषद भरविण्यात डॉ. नारायणराव सावरकरांनी पुढाकार घेतला होता.'

**पोलीस रिपोर्ट :-**

वरील जातीय निवाडा विरोधक परिषदेत, डॉ. नारायणराव सावरकरांनी परिषदेचे प्रमुख कार्यवाह, हया नात्याने जे भाषण केले ते फारच महत्त्वाचे होते. सार्वजनिक वृत्तपत्रांमध्ये, ते तपशीलवार छापून आलेले नसले तरी, इंग्रज सरकारने आपल्या सिक्रेट पोलीस फाईल्स (गुप्त पोलीस दस्तऐवज) मध्ये त्यांच्या भाषणाचे शब्द न शब्द टिपलेले आहेत. पं. मालवीयांचे भाषण त्या मानाने सौम्य असेल असे

वाटते. कारण पोलीस खात्याला मालवीयांच्या भाषणाची तेवढी दखल घ्यावीशी वाटली नाही. ठाणे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट होम डिपार्टमेंट सेक्रेटरीला, एक्स्प्रेस लेटर (तातडीचे पत्र) म्हणून दि. २० सप्टेंबर १९३४ रोजी तातडीने जो पत्ररुपात रिपोर्ट पाठविला तो मूळ इंग्रजीतला रिपोर्ट आहे. (ठाणे १९ सप्टेंबर १९३४)

Dr. N.D. Savarkar of Bombay Spoke on Communal Award and duties of Hindus. His substance of speechis a under (Thane 19 September 1934.)

"The Theory that Swaraj cannot be obtained without Hindu-Muslim Unity is wrong. During the last 50 years, Muhammadans did nothing to achieve the goal of Swaraj. their definition of Swaraj is Muhammadan Rule only and nothing else, and they are doing best for that object Muhammadans are the shield of the Britishers and whenever there is a keen fight between Hindus and Rulers, they make use of their shield.

We hare to fight with two Bodies-Rulers and Muslims-Both are strangers to India and have the least interest for our mother country. Muhammadans want more seats in the Legislatures. The present 'Communal A ward' had made them more powerful in each and every part of India and the Hindus have to contest against them.

In jails, Muhammadan wardens are appointed to harass Hindu Prisoners. Number of Hindu girls and women are kidnapped by Muhammadans. The Nizam, the Nawab of Bhopal and Shaukatalli hare taken a vow to convert a core of Hindus to Islam. Then want to join Karachi to Kashmir and to establish Muhammadan Rule under Eurpoens. We have to contest, against. Muhammadans and Eurpoeans in attaining Swaraj."

Dr. N.D. Savarkar

16th September, 1934, Thane

Report sd - District Majistrate Thane

Copy to commissioner N.D.

**मराठी अनुवाद :-**

'जातीय निर्णय' व 'हिंदूंची कर्तव्ये' या विषयावरील डॉ. ना.दा. सावरकर यांच्या भाषणाचा गोषवारा. डॉ. सावरकर म्हणाले, 'हिंदु-मुस्लिम' ऐक्यावाचून स्वातंत्र्य-प्राप्ति होऊच शकत नाही, ही कल्पनाच चुकीची आहे. गेल्या पन्नास वर्षात, स्वराज्याच्या ध्येयपूर्तीसाठी मुसलमानांनी काहीही केले नाही. स्वराज्याची त्यांची व्याख्या म्हणजे मुस्लिमांच्या हाती सर्व सत्ता! दुसरे काहीही नाही आणि त्यांचे सारे प्रयत्न या दिशेनेच चालतात. मुस्लिम म्हणजे ब्रिटिशांची ढाल!जेव्हा जेव्हा हिंदुप्रजा ब्रिटिश साम्राज्यसत्तेशी जिवाचा कोट करुन लढते, तेव्हा तेव्हा ब्रिटिश या ढालीचा उपयोग करतात.

आपल्याला दोन आघाडीवर लढाई करावी लागणार आहे - ब्रिटिश राज्यकर्ते नि मुस्लिम, दोन्ही शत्रूच. दोघेही या देशात उपरे, परके आहेत. त्यांना आपल्या मातृभूमीविषयी काय कळकळ असणार! मुसलमानांना केवळ सत्तेसाठी विधानसभेत अधिक जागा हव्या आहेत. सध्याचा 'जातीय निवाडा' हा मुस्लिमांना अधिक बलवान बनवीत आहे. साऱ्या हिंदूंना त्यांच्याशी लढत द्यावी लागणार आहे.

अगदी कारागृहातदेखील हिंदूंना हैराण करण्यासाठी त्यांचेवर मुसलमान पहारेकरी नेमले जातात. हिंदु स्त्रिया व हिंदु मुलींना हे मुसलमान गुंड नेहमी पळवून नेतात. निजाम, भोपाळचा नबाब, शैकतअली हया तिघांनी अधिकाधिक हिंदूंना बाटवून मुस्लिम बनविण्याची प्रतिज्ञाच केली आहे. कराचीपासून काश्मीरपर्यंत सारा भूभाग युरोपियनांच्या साम्राज्यात मुस्लिम सत्तेखाली आणण्याची त्यांची मनीषा आहे. आणि म्हणूनच स्वराज्यस्थापनेसाठी आपणास मुस्लिमांशी व ब्रिटिशांशी, अशी दुहेरी लढत द्यावी लागणार आहे.'[५]

**४.५ रत्नागिरी पर्व :-**

'५० वर्षे काळे पाण्याची शिक्षा झालेल्या क्रांतिवीर सावरकरांना ६ जानेवारी १९२४ ला येरवडा कारागृहातून दोन अटींवर मुक्त करण्यात आले. हया दोन अटी अशा पाच वर्षेपर्यंत प्रकटपणे वा अप्रकटपणे राजकारणात भाग घ्यावयाचा नाही, शासनाच्या आज्ञेवाचून रत्नागिरी जिल्हयाच्या सीमेबाहेर जावयाचे नाही. अशा आशयाचे एक पत्र गृहसचिव मॉंटगोमेरी यांनी दि. ४ ला वीर सावरकरांचे बंधू डॉ. ना. दा. सावरकर यांस लिहिले. हया पत्रात वरील दोन अटी लिहिलेल्या आहेत.

हयाच पत्रात पुढे म्हटले आहे की, तुमच्या बंधूंनी हया अटी स्वीकारल्या आहेत. त्यांच्या रत्नागिरीतील निवासाची व्यवस्था करण्याची तुमची इच्छा असेल, तर हया संबंधात त्यांच्याशी चर्चा करण्याकरिता आवश्यक त्या सर्व सवलती त्यांना येरवडा कारागृहाचे अधिक्षक देतील. याच्या आदल्या दिवशी डॉ. सावरकर भेटून गेले होते. पण त्यांना सावरकरांना उदयाच सोडणार ही कल्पना देण्यात आली नव्हती. त्यामुळे डॉ. सावरकर रात्रीचे गाडीने मुंबईला गेले होते. त्यामुळे सावरकर अधिक्षकांना म्हणाले की माझ्या सुटकेची वार्ता 'केसरी' कार्यालयात जाऊन न.चिं. केळकर यांस कळवा. ते काम श्री. ढेरे करतील. अधिक्षक सावरकरांकडे पाहू लागला कारण सावरकरांचा माझ्यावरील विश्वास असा प्रकट झाल्याने अधिक्षकाला राजनिष्ठेचा संशय वाटू लागला. पण ढेरे यांनी त्याची पर्वा न करता हे काम अंगावर घेतले. ढेरेंना त्या दिवशी सुट्टी होती. ती वार्ता त्यांनी न.चिं. केळकर यांना कळविली. तसेच मुंबईला डॉ. सावरकर यांस तारेने वा दूरध्वनीने ही वार्ता कळविण्याची आणि सावरकरांना बंदिगृहातून घरी आणण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली.'[६]

विनायक सावरकर बंदिवासात असतानाच त्यांनी त्यांचे 'हिंदुत्व' हे इंग्रजी पुस्तक प्रसिध्द केले. पुढे त्याचा अनुवाद डॉ. सावरकरांनी केला. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये (१९२४) सावरकरबंधू त्र्यंबकेश्वर येथे स्वतंत्र बिऱ्हाड करुन राहत होते. तेथेही त्यांना भेटायला काही लोक येत. दि. १६ ऑक्टोबर रोजी सेनापती बापट त्र्यंबकेश्वर येथे भेटले. तेथेच सावरकरांनी दिवाळी नि भाऊबीज साजरी केली. २८, २९, ३० ला तीन दिवस डॉ. नारायण सावरकर यांची सार्वजनिक भाषणे झाली. यांच्या प्रयत्नाने तेथे काँग्रेस समितीचीही स्थापना करण्यात आली.'[७]

जानेवारी १९२५ च्या पहिल्या आठवडयात बेळगाव येथे हिंदु सभेची परिषद झाली. त्यात डॉ. मुंजे यांनी वीर सावरकरांनी केलेली हिंदुंची व्याख्या सांगितली. हिंदुसभेने संमत केलेल्या ठरावात म्हटले आहे की, हिंदुंना सर्वसाधारण राजकीय प्रश्नासंबंधाने इतर परधर्मीय जातीशी शक्य तितके बंधुभावाने वागून एकदिलाने काम करावे. अस्पृश्यांचा उध्दार करण्याचे प्रयत्न करावेत. त्यांचेसाठी शाळा बांधाव्यात. विहिरी, देवदर्शन यांचा विवाह नौकाप्रवास, युध्द आदि ठिकाणी स्पृश्यास्पृश्य भेदभाव नसावा. हया अधिवेशनाला लाला हंसराज, लाला लजपतराय, राजा नरेंद्रनाथ, सर चिंतामणी, राजा रामपालसिंग, बाबु राजेंद्र प्रसाद, डॉ. अणे, डॉ. मुंजे,

सत्यमूर्ती टी.प्रकाश, बॅ. जयकर, न.चिं. केळकर, डॉ. ना.दा. सावरकर इत्यादी उपस्थित होते. सावरकरांनी नाशिक येथील सार्वजनिक गणेशोत्सववाच्या मिरवणुकीत अस्पृश्यांना समाविष्ट करुन स्वतः त्यांच्या गणपतीपुढे भाषणे देऊन आणि महारवाडयात जाऊन महारांच्याच काय, पण महारही ज्यांच्या हातचे पाणी पीत नसत त्या मांग, भंगी यांच्यातही मिसळून सावरकरांनी त्या वर्गांना हिंदुत्वाची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला. सावरकर गिरगावला राहत असताना तेथील एक उत्साही गुरव महादेव लक्ष्मण यांनी हनुमानाच्या मंदिरात देवाची प्राणप्रतिष्ठेच्या वेळी सर्वांच्या भजनात घेण्याचीही मोकळीक देण्यात आली. त्याप्रमाणे रत्नागिरी येथील महार, चांभार यांचे भजनी मेळे या उत्सवासाठी गिरगावला आणण्यात आले. स्पृश्य समाजातील सीतारामपंत उपाध्य, आप्पासाहेब पटवर्धन, आगाशे, शास्त्री, प्रभृति मंडळीही उत्सवासाठी आली होती.

यावेळी भाषण करताना सावरकर यांनी अनेक उदाहरणे देऊन सांगितले की अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हिंदुस देवाची पूजा करण्याचा इतर हिंदुप्रमाणेच निसर्गदत्त अधिकार आहे. तो त्यास उपभोगू देणे हा खरा धर्म. त्र्यंबकेश्वर अथवा काशीविश्वेश्वर यांची देवळे नि संस्थाने फार भव्य नि श्रीमंत आहेत. तेथील प्रदक्षिणेच्या वाटेवर कुत्री, मांजरे, गाढवे फिरत असतात. सर्व व्यवहार करीत असतात. पण माणसासारखे माणूस आणि आपलेच धर्मबंधू नि आपल्याच देवाचे पूजक महार, मांग, भंगी आदि आहेत. त्यांना मग त्या वाटेवर जाण्यास मज्जाव आहे. त्यामुळे त्या मोठयानी श्रीमंत मंदिरापेक्षाही सर्व हिंदुंना जेथे प्रदक्षिणा घालता येते, ते हे छोटेसे मंदिर मला अधिक महान वाटते. याहिपुढे एक पाऊल टाकून प्रदक्षिणेचाच नव्हे, तर देवाच्या पायावर बाटेल्या त्या हिंदुस जेव्हा आपले डोके टेकण्याचा अधिकार मिळेल, तेव्हाच त्याला आपल्या धर्माविषयी, समाजाविषयी खरे ममत्व वाटू लागेल. देवाच्या मूर्ती स्थापणे हे जसे कर्तव्य तसेच त्यांचे संरक्षण करणे हेही अधिक महत्त्वाचे कर्तव्य आहे. त्यासाठी आपण आखाडे काढून समर्थ झाले पाहिजे. ब्राम्हण क्षत्रियाप्रमाणेच महारांनी मांगास नि मांगांनी डोंबास अस्पृश्य समजण्याचे सोडून दिले पाहिजे. सर्वांनीच चुकीचे नि जन्मजात उच्चनीच समजण्याची रीत सोडली पाहिजे. हया भाषणानंतर सावरकरबंधूसह सर्वांनी मिळून देवाला प्रदक्षिणा घालण्यास प्रारंभ केला. सावरकरही त्यात समाविष्ट होऊन 'हिंदूधर्म

की जय' अशा घोषणा देत होते. सर्व मंडळी भजनात तल्लीन झाली होती. ढोल नि वाजंत्री यांच्या आवाजाने आसमंत दुमदुमले होते. हा मेळावा पाहून गावातील एका चांभारास वाटले की, आपणही आपला ताशा वाजवावा. त्याप्रमाणे त्याने त्याच्या धाकटया भावाला ताशा आणण्यास सांगितले. तेंव्हा तो भाऊ म्हणाला, पण हया महार-मांगामुळे आपला ताशा विटळेल त्याचे काय? आता विटाळ कसला? तो भाऊ ताशा घेऊन त्या प्रदक्षिणेत सामील झाला. या आरोपीचे गणेश डॉ. सावरकर यांच्याशी हया मंडळीचा घनिष्ठ संबंध होता. त्या प्रकरणी डॉ. सावरकर यांच्या घराचीही झडती झाली होती.'[७]

**४.६ डॉ. सावरकरांच्या घराची झडती :-**

स्वा. सावरकरांचे शिष्य ग.द.वैशंपाय, मोघे, पृथ्वी सिंग, सुखदेव आणि दुर्गादेवी यांनी स्वा. सावरकरांचे विचार कृतीत उतरविण्याचा निश्चय केला. त्यांनी दि. ९ ऑक्टोबर १९३० ला रात्री लॅमिंग्टन पथ पोलिस स्टेशनचे इंग्रज अधिकारी टेलर यांना मारण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे स्वामी बुध्दोदेव, नि शारदा या नावाने वावरणारे पृथ्वीसिंग, सुखदेव, नि दुर्गादेवी यांना तिचा ४ वर्षाचा मुलगा हरी या मोटारीतून जाऊन दुपारचे श्री केली त्यांचे घर पाहून ठेवले होते. पण दुसऱ्या दिवशी काही अडचणीमळे ते केलीच्या घरापर्यंत पोहचू शकले नाही. तेंव्हा एखादया तरी इंग्रज अधिकाऱ्याला ठार मारण्याचा निर्धार केलेली ही क्रांतिकारक तुकडी मोटारीतून अनेक पोलीस ठाणी हिंडली, पण त्यांना कोठेच इंग्रज अधिकारी सापडला नाही. शेवटी लॅमिंडटन रोड ठाण्यावर त्यांनी टेलरला मोटारीतून उतरताना पाहिले नि त्याच्यावर गोळी झाडली. तेवढयात टेलरची बायको पुढे झाली. दुर्गा देवीने तिच्यावर गोळी झाडण्यास नकार दिला. बुध्दिमान नि स्वामी यांच्या पिस्तुलातील गोळया संपल्या, तेंव्हा ही मंडळी पुढे निसटली. त्यापूर्वी त्यांनी टेलरच्या मोटारचे टायर फोडले होते. त्यामुळे त्यांचा पाठलाग होऊ शकला नाही.[८]

**'निवडणुकी व हिंदुचे कर्तव्य' :-**

'आगामी निवडणुकी व हिंदुचे कर्तव्य' या विषयावर शिवाजी मंदिरात डॉ. ना. दा. सावरकर यांचे ल.ब. भोपटकर यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. त्यावेळी लो. स्व. पक्षाची बरीचशी मंडळी हजर असून हजारापर्यंत स्त्री पुरुषांचा जमाव होता. डॉ. सावरकर आपल्या भाषणात म्हणाले, आजच्या विषयाचे नाव ऐकल्यावर लोक

आम्हाला जात्यंध म्हणतील. त्यांच्या मते, ही निवडणूक हिंदुस्थानाची सर्व राष्ट्राची असतांना मुसलमान, ख्रिश्चन व इतर ज्या समाजातसुध्दा सर्वांचे कर्तव्य काय, हे सांगावयास पाहिजे. ते न सांगता ते ज्या अर्थी एकटया हिंदुचे कर्तव्य सांगताहेत त्या अर्थी ते जात्यंध आहेत.'[९]

हिंदुचे कर्तव्य सांगावयाचे पहिले कारण म्हणजे प्रत्येक समाजाला धर्माकरता राष्ट्रीय कार्य करण्याचा व आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. हे लोकशाहीचे मुख्य तत्त्व आहे. त्याप्रमाणे आमचे हिंदुचे कर्तव्य काय? हे लोक सांगण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे. दुसरे म्हणजे असे की बहुमताला लोकशाहीत फार मान असतो. लोकशाहीचा डोलारा बहुमतावर असतो. आणि बहुसंख्यांकाचे नावानेच राष्ट्र ओळखले जाते. राष्ट्र कोणाचे तर आमक्याचे, असे म्हटले जाते व सांगितले जाते. ते त्यातील बहुसंख्यांकावरुनच, इटली राष्ट्र कोणाचे? तर इटालियनांचे म्हणजे त्यात ऑस्ट्रियन अगर इतर लोक नाहीत असा अर्थ नाही. तीच गोष्ट इतर युरोपियन व त्याचप्रमाणे जगातील राष्ट्रांची गोष्ट जगात प्रपंच साम्राज्य स्थापण्याची आणि आकाशापर्यंत उंच सिंहासन उभे करण्याची महत्त्वकांक्षा जोपर्यंत ख्रिश्चन धर्म करीत आहे. हरतऱ्हेने आपला प्रचार व्हावा म्हणून १६०० वर्षापूर्वी महमदी धर्म जोपर्यंत जगात खटपट करीत आहे, तोपर्यंत आम्हालाही हिंदु म्हणून जगलेच पाहिजे. (टाळया) आम्ही हिंदु आहोत ही भावना जोपर्यंत आमच्या नसानसातून खेळली पाहिजे, पण सध्या झाले आहे काय? देशभक्तांना हिंदु हा शब्द उच्चारण्याची लाज वाटते. गेल्या वर्षापासून हिंदु आहोत, असे बोलणे म्हणजे आपल्या देशभक्तिला गालबोट लावण्यासारखे आहे, अशी समजूत झाली आहे. आणि ती रुढ होते की काय, असे वाटू लागले आहे. तसे वाटू देऊ नका. हिंदुस्थान हिंदुचा आहे. देश माझा आहे. त्याचे स्वातंत्र्य मला मिळविले पाहिजे, असे अभिमानाने म्हणावयास पाहिजे. देशाच्या अभिमानाने हिंदु नुसता थरारुन जायला हवा. कोळशाच्या खाणी असणाऱ्या इंग्लंड देशाचा अभिमान चिमुरडया पोरांपासून तो ६० वर्षाच्या थेरडयापर्यंत कसा असतो, हे पाहिल्यावर जेथे कशाचीही ददात नाही. जेथली संस्कृती उच्च पदाला पोचली आहे. ब्रम्हाला शोधून काढण्यापर्यंत जेथे विचार झाले आणि परमेश्वरसुध्दा मी आता सापडतो की काय म्हणून लोकांना घाबरला.

त्या लोकांचा, त्याच्या संस्कृतीचा ती संस्कृती ज्या देशांत आहे त्या संस्कृतीचा अभिमान मी का धरु नये?[१०]

संस्कृतीच्या अभिमानाचे थोतांड कशाला पसरविता, देशाचा अभिमान धरण्यासाठी काही लोक हल्ली गिल्ला करु लागले आहेत. वास्तविक, अभिमान संस्कृतीचा असतो. हल्लींचा अफगाण देश पूर्वी गांधार देश होता. तेथे आर्य संस्कृति होती. तोपर्यंत तो हिंदुस्थानात मोडला जात असे. आर्यावर्त म्हणून त्याचा अभिमानही आम्हाला वाटत असे. पण आता आर्य संस्कृती नाही. त्यामुळे तो देश स्वतंत्र असला तरी त्याबद्दल काही अभिमान आहे का? तेथली माती पूर्वीचीच, डोंगर पूर्वीचेच. नदया त्या वेळेप्रमाणेच खळबळतात, वारे तेच वाहतात. पण त्याचा आपलेपणा वाटत नाही. कारण तेथे आपली संस्कृती नाही देशाच्या मातीवर प्रेम अगर अभिमान नसतो तर संस्कृतीचा अभिमान असतो आणि हा अभिमान प्रज्वलित राहण्याला स्वातंत्र्याची जरुरी आहे. ते मिळवण्याकरिता सामर्थ्य पाहिजे. प्रीती आणि पिपासा सामर्थ्याच्या सिंहासनाखेरीज इतर कशावर बसत नाहीत. असो, संस्कृतीच देशाचे अस्तित्व दर्शविते आणि संस्कृती बदलली की देशाचे महत्त्वही बदलते.

विश्वबंधुत्वाची जाणीव जोपर्यंत अस्तित्वात येत नाही, तोपर्यंत देश बहुसंख्यांकावरुनच ओळखला जाणार आणि म्हणून हिंदुस्थानातील बहुसंख्याक हिंदुंचे आगामी निवडणुकीत काय कर्तव्य आहे हे सांगण्याचे आज योजिले आहे.[११] सुधारणा तुमच्यावर लादल्या. आतां तुम्ही काय करणार? आगामी निवडणुकीत हिंदुचा हिंदुस्थान म्हणून नाव टिकवायचे असल्यास काय करावे, हाच प्रश्न मी सांगणार आहे. हिंदुस्थानातील १५ कोटी हिंदु सामर्थ्यवान झाले, तर बाकीच्या १० कोटीचे संरक्षण आपोआप होणार आहे.

कोणीही माणूस आपल्या गुलामांना स्वातंत्र्य देत नसतो. इंग्रजही माणूस आहे तो आपल्याला स्वातंत्र्य कसले देणार? सुधारणा अपुऱ्या आहेत. इंग्रजांनी दिल्या याचाच अर्थ त्या अपुऱ्या आहेत. म्हणून त्या टाकून का दयायच्या?

जातीनिर्णय फार वाईट आहे. त्याच्यावरच नवीन सुधारणा उभारल्या आहेत. म्हणजेच सुधारणा देण्याला जातीनिर्णयाचे माप लावले आहे. पण ते मापच जर खोटे आहे, तर सुधारणा योग्य पदरांत पडणार कशा? जातिनिर्णय सुधारणांतर्गत नाही तर जातिनिर्णयांतर्गत सुधारणा असा प्रकार आहे.

परवाच शंकरराव देव म्हणाले, नवी सुधारणा म्हणजे गर्भिणी स्त्री आणि जातिनिर्णय म्हणजे तिचा गर्भ मारला पाहिजे, असे कशाला म्हणता.

गर्भिणीलाच मारुन टाकले म्हणजे झाले. कल्पनेत का होईना पण हिंसावादी हिंसा करण्याला तयार झाला. (हशा) पण तो म्हणतो आम्ही गर्भ मारणार नाही. तो गर्भ निर्माण करणाऱ्याला आधी नाहिसा करु. गर्भात काय आहे? मुलगा आहे की मुलगी आहे? हे मग पाहू. पण ही उपमा जाऊ दया. उपमेने काही प्रमेय सुटत नाही.[१२] आमच्या देशातील पुढाऱ्यांना इतिहासाचे ज्ञान कमी. त्यामुळे इंग्रजांनी राज्य कोणाकडून घेतले हे त्यांना कळत नाही, पण इंग्रज मात्र जाणून आहेत की, हिंदुपासून आपण राज्य घेतले आणि तेच आपणाकडून हळूहळू घेत आहेत. ५० वर्षात इतकी परिस्थिती बदलण्याला हिंदुच कारणीभूत आहेत, हे ते जाणून आहेत. पण या गोष्टीला प्रसिध्दी देणार कोण आणि कशी देणार आणि मिळणार कशी? कारण हे काही काव्य गायन नाही. हल्लीच्या काळी त्वरित प्रसिध्दी मिळवण्याला साधन म्हणजे काव्य गायक हनुवटीवर बोट ठेवून काव्यगायन करणारांची प्रसिध्दी झपाटयाने होते.

इंग्रज फार धूर्त आहेत. आपापसांतील या गोष्टीचा फायदा ते बरोबर घेतात. आमचे आण्णासाहेब भोपटकर इंग्लंडवर गव्हर्नर असते, तर आज वेल्पमध्ये होणाऱ्या होमरुल चळवळीचा त्यांनी असाच फायदा घेतला असता. सरकारला अडकावण्याची कोंडी ज्या ज्या वेळी राष्ट्रीय पुढाऱ्यांनी केली, त्या त्या वेळी ती फोडण्याचे काम मुसलमानांनीच केले. त्यामुळे इंग्लंडने हिंदुंना दिलेला शाप व मुसलमानांना दिलेला वर म्हणजे जातीय निर्णय होय.

असा जातीनिर्णय नाहींसा करणे हे पहिले काम आहे, आणि ते केले पाहिजे. या वृत्तीचे जे उमेदवार असतील त्यांना आपली मते म्हणजे लोकशाही स्वराज्य पक्षाच्या व हिंदुमहासभेच्या पक्षाच्या उमेदवाराला दिली पाहिजेत.

मोठमोठया म्हणणाऱ्या पुढाऱ्यांना जी स्वातंत्र्याची तळमळ आहे तितकीच एकरतिमात्रही कमी नसलेली तळमळ आम्हालाही आहे. स्वातंत्र्याकरिता आमचे रक्तही सांडले आहे. तेव्हा स्वातंत्र्य स्वातंत्र्य म्हणून आम्हाला शिकविण्याचा प्रयत्न करु नका आणि स्वराज्याचा नावाच्या जादूने भोळया मतदारांना भुलवू नका.[१३]

आज सर्वांपुढे मोठा प्रश्न कोणता पडत असेल, तर तो अन्नपाण्याचा. आम्ही तुमच्या पोटभर अन्नासाठी आणि अंगभर वस्त्रासाठी चळवळ करु, असे आश्वासन दिले जाते. पण पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र हेच जर तुमचे ध्येय असेल, तर स्वातंत्र्याचे ध्येय कसे पुढे ठेवा आणि त्या स्वातंत्र्याच्या मार्गातील काटा जातीय निर्णय काढून टाका.

अहो, एक जागा मुसलमानाना मिळाली म्हणून काय झाले, असे राजकारणी चतुर म्हणतात पण एक जागा जास्त देणे म्हणजे हिंदुची संख्या ५० हजारांनी कमी करुन मुसलमानांची ५० हजारांनी वाढविणे म्हणजे राजकीयदृष्टया ५० हजार हिंदुची कत्तलच नाही का? या निर्णयाने २५ टक्के मुसलमान २३ टक्के हक्क मिळवून बसले आणि ७५ टक्के हिंदु ४२ टक्के हक्क घेणार.

मुसलमानांची वृत्ती परकीय आहे म्हणून त्याच्या मदतीची अपेक्षा फोल आहे. ही मूल आहे. हा चक्रव्यूह आहे. हा चक्रव्यूह निर्माण करणारे आम्हास वन्दी आहेत. आम्ही त्यांना महात्मा म्हणतो, पण त्यांनी हिमालयास अगर टागोराशेजारी बसावे. कोणाच्याही साहाय्याशिवाय स्वातंत्र्य मिळवू आणि इंतरांचे रक्षण करु.

इंग्रजांच्या मदतीशिवाय राजकारणात पाऊल टाकणे शक्य नाही, असे म्हणणाऱ्या मवाळांना आपण हसत होतो. मुसलमानांना आपण हसत होतो. मुसलमानांच्या मदतीशिवाय आम्हाला स्वातंत्र्य मिळणार नाही, असे म्हणणे सुध्दा हास्यस्पद आहे, ही राजकारणातली दुसरी चुकीची कल्पना आहे. तेंव्हा लक्षात ठेवा स्वतःच्या मनगटाच्या जोरावर स्वातंत्र्य मिळवणे शक्य आहे, हे ओळखून ते मिळवा आणि आपले व इतरांचे रक्षण करा.[१४] या लेखात त्यांनी हिंदु-मुसलमान या प्रश्नावर प्रकाश टाकला आहे व त्यातून त्यांनी आपले स्पष्ट विचार मांडले आहे. मुसलमानांपासून नेमका धोका लेखाद्वारे व्यक्त केला आहे.

**४.७ सभा उधळण्याचा काँग्रेसवाल्यांचा अयशस्वी प्रयत्न :-**

दगडफेक करणे हे भ्याडाचे काम आहे मर्दाचे नव्हे.

दगडफेकी प्रमाणेच राजवाडयांवर मतांची फेक करा.

सभेतच डॉ. सावरकरांचे तर्कशुध्द व स्फूर्तिदायक भाषण दारु पिऊन आलेल्या काँग्रेस गुंडांनी सभेत गोंधळ व दगडफेक केली.

डॉ. सावरकर यांचे ७ फेब्रुवारी १९३७ रोजी रात्री ९ वाजता बाळीवेस मैदानात 'लोकशाही पक्ष व निवडणुकी' या विषयावर अत्यंत सडेतोड तर्कशुध्द व परिणामकारक दीड तास भाषण झाले, सभेला चार हजार श्रोतृ समाज हजर होता. सभेचे अध्यक्षस्थान दे.भ.रामभाऊ राजवाडे यांनी स्वीकारले होते. बाळीवेस मैदानात व्याख्यानासाठी व्यासपीठ तयार करण्यात आले होते व एकंदर व्यवस्था चांगली होती.

व्याख्यानास डॉ. गोखले, डॉ. शेटे, डॉ. पाटणकर, डॉ. जगदेवराव देशमुख, डॉ. भावे, जतकर वकील, बर्वे वकील, पटवर्धन वकील, शेठ लक्ष्मीनारायण, शिवयोगी, शिरसी शेठ माणिकचंद पीरचंद, शिवबाळअप्पा देशमुख, डोंबर सिंग, बसलिंगअप्पा शेटे, महिंद्रकर, पाटील इत्यादी मंडळी प्रामुख्याने आलेली दिसत होती. डॉ. सावरकर, दे.भ. रामभाऊ राजवाडे हे सभास्थानी येताच टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. जतकर वकील यांनी भाषण करुन आजच्या सभेचे अध्यक्षस्थान दे.भ. रामभाऊ राजवाडे यांना स्वीकारण्याची विनंती केली. दे.भ.राजवाडे स्थानपन्न झाल्यावर त्यांनी प्रास्ताविक भाषण करुन डॉ. सावरकरांची थोडक्यात ओळख करुन देऊन त्यांना भाषण करण्याची विनंती केली.[१५]

डॉ. सावरकर हे भाषण करण्यास उभे राहिल्याबरोबर टाळयांच्या कडकडाटात श्रोत्यांनी पुन्हा त्यांचे स्वागत केले. डॉ. सावरकर आपल्या भाषणात म्हणाले की, सोलापूरला आल्याने मला तीर्थयात्रा केल्याचा आनंद होत आहे. राजकीय आयुष्याला सोलापूर येथूनच सुरुवात झाल्यामुळे ही माझी जन्मभूमी झालेली आहे. या निवडणुकीत २ पक्ष आहेत. एक काँग्रेस व दुसरा लोकशाही पक्ष आपण मतदार आहात विचार करा आणि विचारशक्ती जशी आपल्याला कौल देईल त्याप्रमाणे आपण मत दया. मत ही राजकीय शक्ती आहे. काँग्रेस कोणत्या तत्त्वावर मत मागत आहे व लोकशाही पक्ष कोणत्या तत्त्वावर मत मागत आहे याचा विचार करा. केवळ श्रध्दा म्हणून कोणाला मत देऊ नका आता आपण काँग्रेसचा कार्यक्रम पहा काँग्रेस म्हणते की, आम्ही घटना मोडणार, नवीन सुधारणा नष्ट करणार, मी म्हणतो की, जर ते शक्य होईल तर आम्ही देखील घटना मोडणार आहोत. घटना मोडणार या गोष्टीत काही तथ्य आहे काय? याचा विचार करा. माझ्या मते कोणत्याही गोष्टीचे निर्दलन दोन प्रकारांनी होते. सापाला नाहीसा करुन त्याला ठार

मारणे किंवा निषदंत काढून त्याचे सापपण नाहीसे करणे, या दोनच गोष्टी शक्य आहेत. पायातील पादभाषाने तरी ठार केले पाहिजे, किंवा त्याच्या विषारी नांगीचा भाग तरी नष्ट केला पाहिजे. सर्पाला ठार मारणे म्हणजे इंग्रजांना येथून पळविणे, पण ते शक्य नाही. मग आपण काय करावयाला पाहिजे, सुधरणारुपी सर्वाला आपण निषदंत काढला पाहिजे. (टाळया) सुधारणा मोडावयाची म्हटल्याने ती काँग्रेसला मोडता येणार नाही. आपल्याला माहित आहे की गेल्या ३ वर्षापूर्वी झालेल्या असेंब्ली निवडणुकीच्या वेळ काँग्रेस उमेदवार अशीच मोडतोडची भाषा बोलत होते. पण त्यांनी मोडतोडीने एकही कार्य केले नाही. एवढेच नव्हे तर सरकारी नियमाप्रमाणे आतापर्यंत ते वागत आलेले आहेत. सर्कशीतील सिंहाला ज्याप्रमाणे रिंग मास्तर आपल्या इच्छेप्रमाणे वाटेल तिकडे वळवतो, त्याप्रमाणे हे काँग्रेसचे लोक वागलेले आहेत. काँग्रेसचे लोक असे म्हणतात की, आम्ही तेथे Dead Looks करु, सरकारची अडवणूक करु, पण त्यांचा काही एक उपयोग होणार नाही. गव्हर्नर आपल्या अधिकारांत सर्व काही करील. आता निवडणुकीसाठी काम थोडेच थांबते, बिले येत आहेत, पास होत आहेत, सर्व काही व्यवस्थित चालू आहे. नवीन सुधारणेचा विषारी दात पाडून टाकावयाचा, उपटून टाकावयाचा असा लोकशाही पक्षाचा कार्यक्रम आहे.[१६]

यावेळी काँग्रेस गुंडाकडून सारखा जयजयकार करण्यात येत होता. जयजयकाराने सभा उधळली जात आहे, असे पाहून काँग्रेस गुंडांनी दगडफेक करण्यास सुरुवात केली. त्यापैकी २/३ दगड व्यासपीठावर आले पण सुदैवाने कोणाला लागले नाहीत.

डॉ. सावरकर पुढे म्हणाले, काँग्रेसवाले नेहमी म्हणतात की, तुम्ही लोकशाही पक्षाचे लोक अल्पसंख्यांक आहात, मग कशाला निवडणुकी लढवता? मी काँग्रेसवाल्यांना विचारतो की, महाराज बंगाल्यात, पंजाबांत तुम्ही अल्पसंख्यांक आहात, मग निवडणुकी कशाला लढविता, याला उत्तर नाही. आपण चुकला तर आम्ही चुकलो. आपण बरोबर तर आम्हीही बरोबर एखादया वेळेस कौन्सिलांत एका मतावर तेथील भवितव्य अवंलबून असते. याला उदाहरण मी रत्नागिरी लोकल बोर्डाचे पांडोबा नावांचे एक हरिजन आहेत. त्यांच्या एका मतावरती लोकल बोर्ड हलत आहे. आम्ही लोकशाहीचे लोक अल्पसंख्यांक असलो तरी बहुमतवाल्याना

वेसन घालू. (टाळया) मी निवडून गेलो. मी उभा नाही. पण कल्पना करावी निवडून गेलो, तर १६ ते २० वयाच्या प्रत्येक मुलाला सक्तीचे लष्करी शिक्षण देण्याचा कायदा करीन. (टाळया) प्रत्येक मनुष्यात स्वसंरक्षणाचे सामर्थ्य पाहिजे. एखादया गुंडाने तुमच्यावर हल्ला केला, तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे. तेथे 'ऑलजिब्रा' 'जोमेट्री' उपयोगी पडणार नाही. (टाळया) एखादा गवई म्हणून दाखवितो. (प्रचंड हशा व टाळया) त्याचा काहीएक उपयोग होणार नाही.[१७]

हल्ली सर्व जगात युध्द सामुग्रीचे पीक पिकू लागले आहे. हे पीक बाजारात आल्यावर युध्द होणार आणि संहार होणार. एवढयासाठी आपण शरीर कसावले पाहिजे. दुसरा कायदा असा करीन की, वयाच्या ४० वर्षापर्यंत कोणीही काव्यगायन करु नये. (हश्याच हशा) आणि लघुकथाही पण लिहू नये (प्रचंड हशा व टाळया) त्याऐवजी तुम्ही विमानविद्या शिका, नौकायन शिका, शेतकी शिक्षण घ्या. काँग्रेसचा व आमचा असा प्रामाणिक तात्त्विक विरोध आहे. म. गांधीचे एकनिष्ठ पुरस्कर्ते मद्रासचे राजाजी म्हणतात, To reject constitution is long process. त्या वेळी पुन्हा काँग्रेसवाल्यांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. तरीही सभेचे काम शांतरितीने चालू होते. शिवलाल बोरामणिकर हे व्यासपीठावर आले व त्यांनी बोलण्यास परवानगी घेतली.[१८]

सावरकरांच्या मताप्रमाणे प्रत्येक युवकाने युध्द शिक्षण, शारीरिक शिक्षण, विमानविद्येचे शिक्षण, नौकानयन म्हणजेच आरमारी शिक्षण व कृषिविषयक शिक्षण घेतले पाहिजे म्हणजे देशातून इंग्रजांना घालविणे शक्य होईल.

**डॉ. सावरकरांचा स्फूर्तिदायक संदेश :-**

देशभक्त डॉ. सावरकर हे दे.भ. रामभाऊ राजवाडे यांच्या निवडणूक प्रचाराला चालना देण्यासाठी आले. स्टेशनवर यांच्या स्वागतार्थ दे.भ. रामभाऊ राजवाडे, वि.रा. पाटील, शेठ माणिकचंद वीरचंद, शेठ शिवलाल गांधी, शेठ रावसाहेब निंबर्गीकर, दामले वकील इत्यादी लोकशाही पक्षांतील प्रमुख मंडळी व इतर ३००-४०० मंडळी हजर होती. डॉ. साहेबांना पुष्पहार घातल्यानंतर ते दे.भ. राजवाडे यांच्या घरी मुक्कामाला गेले.[१९]

सकाळी ९ वाजता शेट निंबरगीकर यांच्या दिवाणखान्यात शहारातील प्रमुख व्यापाऱ्यांनी व इतर मंडळींनी डॉ. सावरकर यांच्या बरोबर अगदी मनमोकळया

मनाने चर्चा केली. हया चर्चेला व्यापारी व इतर मंडळी मिळून २००/३०० लोकसमुदाय हजर होता. डॉ. सावरकर यांनी प्रथमतः काँग्रेस व लोकशाही पक्ष यांचा मतभेद कोणत्या प्रश्नावर झाला, काँग्रेसची मुसलमानाविषयी वृत्ती कशी आहे, जातिनिर्णयाचे बाबतीत काँग्रेसने प्रथम तशी वृत्तीधारण केली हाती व ती नंतर कशी सुधारली, त्यातही त्यांनी आपली सोडवणूक कशी करुन घेतली आहे, वगैरे गोष्टीचे अत्यंत मुद्देसुद, तर्कशुध्द विचारसरणीचे भाषण करुन लोकांची मने आकर्षून घेतली. शेठ जिवाराज गौतमचंद, व दुसरे एक मारवाडी व्यापारी सद्‌गृहस्थ या दोघांनीच प्रश्न विचारले व त्यांची डॉ. सावरकर यांनी उत्तरे दिली. जिवराज गौतम चंद यांनी विचारले की, 'काँग्रेस संस्थेत शिरुन तुम्ही आपले म्हणणे का पटवित नाही', त्यावर डॉ. सावरकर म्हणाले, काँग्रेस ही जोपर्यंत संस्था होती, तोपर्यंत तुम्ही त्यांत राहून आपले म्हणणे पटवीत होतोच, पण ज्या वेळी संस्था या शब्दाला 'न' लागून संस्थेचे संस्थान होते त्या वेळी त्यांत राहून काम करणे अशक्य होते. शिवाय काँग्रेसमध्ये सामील होताना मी जातीय चळवळ करणार नाही, वगैरे सारख्या अटी मान्य कराव्या लागतात, आमच्या सारख्या हिंदुवाल्यांना या गोष्टी कशा पाळता येतील. १९३० नंतरची ही सहा वर्षे सोडली, तर त्यापूर्वीची सतत ५ वर्षे महाराष्ट्र प्रांतिक कमेटी आमच्या ताब्यात होती. ही गोष्ट आपण विसरु नका. आम्हाला काँग्रेसमध्ये शिरता येत नाही, असा मुळीच प्रश्न नाही. परंतु मुसलमानांनी आपल्या धर्माकरिता एखादी वाईट गोष्ट करावी. पण तिला काँग्रेसने वाईट म्हणण्याचे सुध्दा नाकारावे, पण हिंदुंनी एखादी गोष्ट स्वधर्म रक्षणार्थ केली तर मात्र त्याच्यावर जातीय प्रश्न काढून तुम्ही ऐक्य बिघडविता, असा आरोप करावयाचा, हे कसे पटेल? आमच्या जातीय स्वाभिमानाने अराष्ट्रीयता काय होते हेच मला समजत नाही. उलट मुसलमानामधील अराष्ट्रीयता यामुळे निघून जाऊन तो समाज राष्ट्राला उपयुक्त व्हावा. अशीच आमची इच्छा आहे. आम्ही हिंदुत्वाबद्दल बोलताना राष्ट्रीय विसरत नाही, परंतु मुसलमान समाज आपल्या धर्माबद्दल बोलताना किंवा विचार करताना राष्ट्रीयतेला ओळखित नाही, असे असताना आम्ही अराष्ट्रीय आणि मुसलमान मात्र राष्ट्रीय, असे म्हणण्याची वेळ येऊन चुकली आहे. शिवाय शिस्तभंगाचा एक नवा बडगा अलिकडे उगारला जातो. अशा परिस्थितीत तर स्वपक्षाच्या प्रचाराने काम काँग्रेस संस्थेत राहून करणे किती अशक्य झाले आहे हे आपणास कळून येईल'[२०]

त्यानंतर एका गृहस्थानी विचारले की, जातिनिर्णय कुणी सांगितला? त्यावर शेठ शिवलाल गांधी यांनी 'मुसलमानांच्या हट्टी आणि हेकड स्वभावामुळे तो लादला गेला'. असे सांगितले. आणखी एका सद्‌गृहस्थानी जातिनिर्णय तुम्ही कसा नाहीसा करु शकता, असा प्रश्न विचारला असता डॉ. सावरकर म्हणाले, चळवळ करुन, सभा करुन, जागृति उत्पन्न करुन, परिषदा भरवून हा प्रश्न लीग ऑफ नेशनपर्यंत पोहचविणार आणि त्यात या प्रश्नाचा आम्ही निकाल लावून घेणार. यानंतर डॉ. सावरकर यांनी हा जातीनिर्णय कसा लादला गेला, हे सांगून ते म्हणाले, अल्पसंख्यांकांना ज्या सवलती मिळावयाला पाहिजेत, त्या ज्या ठिकाणी हिंदु अल्पसंख्यांक आहेत त्याही ठिकाणी मिळावयाला पाहिजे, परंतु असे झाले नाही. काही प्रांतात हिंदु अल्पसंख्यांक असताना त्यांना सवलती दिल्या गेल्या नाहीत. उलट न्याय सवलतीतूनही कमी करण्यात आल्या आहेत. परंतु त्या ठिकाणी मुसलमान अल्पसंख्यांक आहेत त्या ठिकाणी मात्र त्यांची न्याय सवलत त्यांना दिली आहेच उलट त्यांना व्होटेज देण्यात आले आहे.[२१] थोडक्यात, हिंदुंना वेगळा न्याय आणि मुसलमानांना वेगळा न्याय याचा उहापोह या लेखात आहे.

अशा तऱ्हेने विरुध्द बाजूच्या मंडळींनी प्रश्न विचारुन आपल्या शंकानिरसन करुन घेतल्या हया चर्चेच्या वेळी कोणासही आमंत्रणपत्रिका अगर मज्जाव नव्हता. उभयपक्षाचे लोक शांतचित्ताने व मनमोकळेपणाने चर्चा करुन त्यांनी ही चर्चा एक ते दीडचे सुमारास संपविली. शेवटी रावसाहेब निंबगीकर यांनी स्वतःतर्फे व जैनमहिलाश्रमतर्फे डॉ. सावरकर यांना पुष्पहार अर्पण केला. शेठ वालचंद, देवचंद व चपळगी यांनी आभार मानले.

### ४.८ 'स्वधर्म व संस्कृती रक्षणाकरिता स्वराज्य' :-

'डॉ. नारायणराव सावकर यांचे सांगलीला हिंदुमहासभेच्या राजकारणविषयी भाषण झाले. काशीकडे निघालेले कॉंग्रेसचे राजकारण तिकडे कसे जात नाही, हे त्यांनी दाखवून दिले व हिंदुमहासभेच्या कार्यक्रमाबाबत घेण्यात येणाऱ्या आक्षेपाला उत्तर देताना ते म्हणाले, हा सूरपाटयाचा डाव आहे. कोंडीत असणारे गडी कोणत्या योजनेने कोंडी फोडणार आहेत हे कधी सांगत नसतात. पाटीवाल्याचे लक्ष उजविकडे असेल, तर तुम्ही डावीकडून जाऊ, दुसऱ्या पाटीत काही गडबड होऊन मृदग्या तिकडे गेला, तर कोंडी फोडून आम्ही आणखी काही पाटया ओलांडू, ब्रम्हदेशांत

जपानने बरेच सैन्य आणले आहे. आमचा मृदग्या तिकडे गेला तर आमचा कार्यक्रम वेगळा राहील. इंग्रजांचा जय झाल्यावर जो कार्यक्रम आम्ही आखू तो जपानचा जय झाला तर कसा चालेल?[२२]

डॉ. सावरकरांनी आपल्या भाषणात सुरुवात केली. ते म्हणाले, सांगलीस येण्यास मला नेहमी आनंद वाटतो कारण अलीकडे सांगलीने हिंदुमहासभेचे कार्य करण्यात अग्रेसरत्व मिळविले आहे. हिंदुमहासभेच्या उत्साही कार्यकर्त्यांत बरेच गृहस्थ सांगलीचे आहेत. हिंदु पक्षासंबंधाने बोलताना इतर पक्षांच्या राजकारणांतील धोरणावरील थोडीशी टीका करावी लागेल. पण त्यामुळे त्या इतर पक्षांतील पुढाऱ्यांबद्दल आमच्या मनांत अनादर आहे, असे कोणीही समजू नये. त्या पुढाऱ्यांचाही त्याग मोठा आहे व त्याबद्दल कोणालाही आदरच वाटेल. फक्त त्यांच्या राजकारणाची दिशा चुकत आहे, असे आम्हाला वाटते. ही दिशा बरोबर दाखविणे म्हणजे त्या व्यक्तीबद्दल अनादर अगर द्वोष बाळगणे नव्हे.[२३]

एखादा गृहस्थ काशीस जाण्यासाठी म्हणून निघाला व तो दक्षिण दिशेने जाऊ लागला, तर ही तुझी दिशा चुकत आहे असे सांगून, त्याचे तोंड योग्य दिशेला जर कोणी फिरविले तर त्याचे मनात त्या गृहस्थाबद्दल द्वोष आहे, असे कसे म्हणता येईल? काँग्रेसचे राजकारण गेली ५० वर्षे असे चुकत आहे. निदान गेली वीस वर्षे तरी ते चुकत आहे. निदान गेली वीस वर्षे तरी ते खास चुकले आहे. प्रथम काही वर्षे काँग्रेसचा प्रचार असा होता की, चरख्यानेच स्वराज्य मिळेल. सर्वांनी चरखा फिरवला, तर त्याच्या प्रत्येक फेऱ्याला स्वराज्य तितके जवळ येईल. गावात एकदा नवा 'सिनेमा आला म्हणजे त्यातील पदे जशी लहानथोर सर्वांच्या तोंडी होतात. तसे 'चरखा चला चला के लेंगे स्वराज्य लेंगे' हे पद त्यावेळी पुष्कळांच्या तोंडी झाले होते. पुढे काही दिवसांनी तो प्रकार मागे पडून खादी वापरली तर स्वराज्य हां हां म्हणता मिळेल, असे सांगण्यात येऊ लागले. पुढे लाटही मागे पडली.

नुसत्या खादीने जर स्वराज्य मिळावयाचे असते, तर अगोदर स्वराज्य गेलेच नसते. कारण १८१८ साली जेव्हा पेशव्यांचे राज्य गेले, तेव्हा एकवारही परदेशी कापड आपल्या देशात येत नव्हते. सेनापती बापू गोखल्यांचा सर्व पोशाख स्वदेशी खादीचा होता मग यांचा पराजय का झाला? तर तो खादीमुळे झाला नाही, तर त्यांचे शस्त्रबळ कमी पडले म्हणून पराजय झाला. त्यानंतर हिंदु-मुसलमान ऐक्याशिवाय

स्वराज्य नाही हा अत्यंत घातकी प्रकार सुरु झाला. पहिल्या दोन प्रचारांबद्दल आम्हाला काही तितकेसे वाटले नाही. कारण खादी म्हणजे अस्सल स्वदेशी. तेव्हा त्याबद्दल कोणाला विशेष वाटत नव्हते. चरख्यासंबंधीही सुध्दा विशेष विरोध झाला नाही, पण ज्यांचे रक्त उकळत आहेत, अशा तरुणांनी चरखा फिरवावयाचा, हा काय प्रकार ही दिशा बरोबर दाखविणे म्हणजे त्या व्यक्तीबद्दल अनादर अगर द्वेष बाळगणे नव्हे.[२४]

हिंदु-मुसलमान ऐक्याशिवाय स्वराज्य नाही हा घातक प्रचार जेव्हा सुरु झाला व त्याचा राजकारणावरही जेव्हा परिणाम होऊ लागला, तेंव्हाच पाच सहा वर्षापूर्वी हिंदुसभेला राजकारणात पडावे लागले.

खरोखर किती चमत्कारीक प्रचार हा का मुसलमानांशिवाय हिंदुंनी स्वराज्ये मिळविली नाहीत, का राखिली नाहीत. मुसलमानांचे धर्मसंस्थापक महंमद पैगंबर यांना नुसते १३०० वर्षे झाली, तर आमच्या विक्रमाला आता २००० वर्षे होतात. मग त्याने त्यावेळी मुसलमानाशिवाय स्वराज्य नव्हे, साम्राज्यसुध्दा स्थापिले की नाही? का तो त्योवळी अशी वाट पहात बसला होता की आता लवकरच मुसलमानी धर्म अस्तित्वात येईल. मग मुसलमान समाज तयार होईल व नंतर त्यांच्या साहाय्याने मी स्वराज्य स्थापील, आजपर्यंत हजारो वर्षे जे हिंदु आम्ही या देशात बहुसंख्य राहिलो ते काय मुसलमानांच्या मदतीने? बरे या देशांत आम्ही बहुसंख्य आहो हा काय आमचा अपराध? ज्या देशात ज्यांची लोकसंख्या अधिक त्यांचाच देश समजला जातो. इंग्लंडमध्ये इंग्लिश लोक बहुसंख्य आहेत, म्हणून तो इंग्लिशाचा, जपानात जपानी बहुसंख्य म्हणून जसा जपान जपान्यांचा तसा हिंदुस्थानात हिंदु बहुसंख्य आहेत म्हणून हिंदुस्थान हिंदुंचा. असे आम्ही म्हटले तर लोक स्वत्वप्रधान आहोत, कोणाच्याही अधिकारावर आक्रमण करण्याची आमची इच्छा नाही पण तसेच आमच्या अधिकारांवरही एक सूतभरसुध्दा आम्ही आक्रमण करु देणार नाही. मुसलमानांना विरोधून शिवरायांनी येथे स्वराज्य स्थापिले व तेच पुढे सदाशिवरावभाऊंनी दिल्लीपर्यंत नेऊन दिल्लीच्या मुसलमानी तख्ताच्या ठिकऱ्या उडविल्या.

या हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी आम्ही किती अपमान सहन केले, किती स्त्रियांवरील अत्याचार सोसले? किती मिरवणुकीवर निर्बंध घालून घेतले? त्याकरिता काँग्रेसने 'वंदे-मातरम्' गीत काढले, त्यांचे पाकिस्तान केले.

आता आम्हाला दुसरा प्रश्न विचारण्यात येतो की, तुमचा कार्यक्रम काय? त्यावर 'सैनिकीकरण' हाच आमचा कार्यक्रम आहे. आमच्या तरुणांनी सैन्यात शिरावे, शस्त्रांच्या कारखान्यांत जाऊन बॉम्ब करणे, बंदुका करणे वगैरे शस्त्रास्त्रे हस्तगत करावीत, कारण जे बॉंब करण्याबद्दल कित्येकांना सातसात वर्षाच्या शिक्षा भोगाव्या लागल्या ती विद्या इंग्रज अति अडचणीत सापडल्यामुळे आम्हाला शिकण्याची संधी मिळत आहे. ती आपण अवश्य शिकला पाहिजे. आपल्या पुराणांतील गोष्ट लक्षात ठेवा. आमची पुराणे काही पुरोगामी नाहीत. ती पार्श्वगामी असतील. पण त्यातील गोष्टीवरुन पुष्कळ बोध घेण्यासारखे आहेत.[२५]

सूरपाटयाचा डाव तुम्हाला माहित आहे. त्यात काही गडी कोंडीत सापडले, तुम्ही त्या गडयांना जर विचारले की, तुम्ही यातून सुटून जाण्याचा कार्यक्रम काय ठरविला आहे? तर ते काय सांगतील. ते म्हणतील हे पाटीवाला व मृदंग्या यांच्या हालचालिवर अवलंबून राहील. पाटीवाल्यांचे लक्ष उजवीकडे असेल तर ती डावीकडून जाईन, त्यांचे लक्ष डावीकडे असेल तर मी उजवीकडून जाईल, दुसरीकडील पाटयांत काही गडबड उडून मृदंग्या जर तिकडे जाईल तर आमचा कार्यक्रम वेगळाच होईल.

तशीच वेळ आली तर एप्रिलचा कार्यक्रम उद्या फेब्रुवारीतच अमलात आणावा लागेल. कोणी सांगावे, असे आम्ही म्हटले की काही लोक म्हणतात हे लोक तुरुंगाला भितात. अशा लोकांना काय म्हणायचे, कॉंग्रेस वक्त्यांनी जन्मात कधी पाहिल्याही नसतील अशा हालअपेष्टा भोगलेले, फासावर लटकलेले, पण दैवाने फांस तुटलेले अंदमानात नाही नाही ते प्रकार सहन केलेले लोक हिंदुसभेत आहेत. आम्ही १९३०/३१ सालात तुमच्याबरोबर तुरुंगवास भोगलेले आहेत. तसेच म्हणावयाचे तर राजगोपालाचार्य अथवा मुन्शी तुरुंगात गेले नाहीत म्हणूनच ते काय देशद्रोही कॉंग्रेसद्रोही ठरतात?

तर अशा टीका कोणीही एकमेकांवर करु नयेत. परस्परांनी परस्परांबद्दल सहानुभूती टीका करावी, आपले सर्वांचे स्वातंत्र्य हेच आहे.[२६]

एकदा आपले मान्यवर पुढारी न.चि. केळकर हे कलकत्त्यास गेले असता, त्यांना काही बंगाली गृहस्थांनी जरा विनोदाने व थोडयाशा हेटाळणीने म्हटले की, तुम्ही काय मराठे लोक! तुम्ही आपले साम्राज्य घालविले, त्यावर आमच्या

प्रत्युत्पन्नमति न.चि. केळकर यांनी ताडकन उत्तर दिले होय. आम्ही मिळविले होते, आम्ही चालविले. ज्यांनी काही मिळविलेच नाही ते काय घालविणार, एकवादया दरिद्रयाने जरी मनांत आणले, तर तो एक लाख रुपये कसा उधळेल. एखादयाने दोन लाख रुपये उधाळले, असे जर मला कोणी सांगितले तर मी म्हणेन बहाद्दर आहे. दहा लाख रुपये त्याने कमावले असतील तेव्हा दोन लाख रुपये उधळले तर बिघडले काय?

स्वधर्म व स्वसंस्कृति यांचा नाश होऊन जर स्वराज्य मिळणार असेल, तर ते स्वराज्य घेऊन काय करावयाचे? स्वराज्य हे काही स्वतः सिध्द साध्य नाही, स्वधर्म व संस्कृती यांचे रक्षण करण्याचे ते साधन आहे. स्वधर्म स्वसंस्कृती यांच्या रक्षणाकरिताच स्वराज्य पाहिजे.[२७]

थोडक्यात, हिंदु-मुसलमान प्रश्न, इंग्रज अडचणीत सापडले असता हिंदु तरुणांनी सैन्यात भरती होऊन सैनिकी शिक्षण घ्यावे असे डॉ. सावरकरांचे मत होते. हिंदु-मुसलमान या दोघांनाही समान न्याय दिला गेला पाहिजे एखादी जमात अल्पसंख्य आहेत म्हणून त्यांचे लाड करणे घातक आहे. खादी, स्वराज्य, चरखा या सारख्या गोष्टींनी स्वराज्य मिळणे अशक्य आहे असे ते म्हणतात. स्वधर्म आणि संस्कृती जर टिकवायची असेल तर स्वराज्याची आवश्यकता आहे. त्यासाठी त्याच्या रक्षणाकरिताच स्वराज्याची आवश्यकता आहे.

**निवडणुकीमध्ये हिंदुसभेचे यश :-**

मुंबईत दादरला शिवाजी पटांगणात काँग्रेसनिष्ठांनी भरविलेल्या महाराष्ट्र युवक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरुन भ.प्रा. कॉ. कमिटीचे अध्यक्ष श्री. काकाराव गाडगीळ यांनी आजपर्यंतच्या काँग्रेसच्या यशाची उन्मादवायने बेभान होऊन वल्गना केली होती की नर्मदेच्या दक्षिणेस कोणत्याही निवडणुकीत हिंदुसभावाल्यांनी नितिच्या पुढाऱ्यांनी एकातरी निवडणुकीमध्ये हिंदुसभेच्या इच्छुक उमेदवाराला काँग्रेसच्या इच्छुकाविरुध्द उभे करुन निवडून आणावा, काकारावांची ही गर्जना ऐकून नर्मदेच्या दक्षिण दिशेकडेच सर्व हिंदुसभावाले नि आता यावचन्द्र दिवाकरो नर्मदेच्या दक्षिण दिशेकडचे सर्व काँग्रेसवाले निश्चितपणे नि निश्चितपणे निवडून आलेच पाहिजेच, असा समज इतरजनांचा झाला असल्यास नवल नाही.[२८]

**'काकारावांची शापवाणी' :-**

परंतु 'क्या सब सौदा नग्द है'!इस हाथ दिये उस हाथ मिले | एक महिना होतो ना होतो तोच वरिष्ठ विधिमंडळापासून निवडणुकीपर्यंतच्या अनेकविध निवडणुकी झाल्या - नर्मदेच्या या दक्षिण दिशेला झाल्या - आणि सर्व ठिकाणाचे सर्व प्रकारचे दक्षिणा त्या त्या निवडणुकीचे निर्णय गेले ३-४ दिवस वृत्तपत्रांतून वाचावयास आतुर झाले. हिंदुसभावालेच स्पेशल आपटणार, असा काँग्रेसनिष्ठा काकांरावाचा शाप होता ना. तेव्हा काँग्रेसवालेच सर्वत्र विजयी होणार, हे ठरलेलेच होते. औपचारिक रीतीने त्यांची नावे मात्र आता वाचावयाची इतकेच. आतुरतेचं कारण वर्तमानपत्रांनी तर म्हणे तसे खिळेहि जुळवून ठेविले होते आणि काँग्रेस नेते रावकाकांनी रामगडला जाण्याच्या आधीच काँग्रेसी इच्छुकांना अभिनंदनपर पत्रेहि लिहून ठेवली होती नि काँग्रेसभाट वर्तमानपत्रातून हिंदुसभेची ठवाळी करणारी लेखमालाहि संपवीत आणली होती म्हणे!

परंतु वरिष्ठ विधि-मंडळाच्या निवडणुकीमध्ये बेळगांव विभागात काँग्रेस इच्छुकांविरुध्द उभे राहिलेले नि लोकशाही स्वराज्य पक्ष हिंदुसभा यांनी पुरस्कारिलेले सुप्रसिध्द देशभक्त बेळवी हे काँग्रेस इच्छुकाला पराभूत करुन विजयी झाल्याचे अद्‌भुत वृत्त निवडणुकीच्या निर्णयात विदयुतवेगाने वृत्तपत्र जगतांतून प्रसिध्द् झाले- आणि ही घटना घडली या नर्मदेच्या दक्षिण दिशेलाच. काँग्रेसच्या इच्छुकांशी सणसणीत सामना देऊन हिंदुसभासदवादी इच्छुक यशस्वी झाला नि काँग्रेसनिष्ठ इच्छुक चारही मुंडयाचीत झाला! आणि काँग्रेसनिष्ठ काकारावांनी हिंदुसभेला शाप देऊन पुनःएक महिनाहि नाही लोटला![२९]

**बोलणे फोल झाले :-**

आता काकाराव पडले,'Even though vanguished be could argueistili या प्रकारांतले' तेव्हा ते उपहासाचे हसून-हसून डोळे मिचकावीत म्हणतील, 'अहो शहाणे, श्री. बेळवी काही हिंदुसभेचे अधिकृत Offical इच्छुक नव्हते. हिंदुसभेने त्यांचा केवळ पुरस्कार केला होता. माझी शापवाणी होती. Offical Hindusabha Candidate विरुध्द असे गर्जन, काकाराव डोळे मिचकावून 'कशी केली', असे विजयानंदाने म्हणत त्यांच्या दोबाजूला असणाऱ्या दोन गणांना जेधे नि नाशिकचे देशपांडे यांना 'टाळी घ्या' असे वाकडी गांधी टोपी

विराजणाऱ्या आपल्या मस्तकाला एका बाजूला लववीत म्हणतील, या मुळीच शंका नाही, परंतु काकारावांची ही मामाथाप त्यांच्या शापवाणीसारखीच त्यांच्या अंगावरच शेकणार, अशीच विधिघटना आहे. त्याला काय करणार, हे कारण पश्चिम कान्हदेशांत मुंबई विधिमंडळात उपनिवडणुकीकरिता एकंदर दोन जागा होत्या. त्या दोन्ही जागांकरिता काँग्रेस इच्छुक उभे राहिले होते. नि त्यापैकी एका जागेकरिता काँग्रेस इच्छुकांला विरोध करण्याकरिता अगदी अधिकृत हिंदुसभेचा इच्छुक दंड थोपटून हिंदुसभेचे प्रमाणपत्र हातात घेऊन उभा राहिला होता. काकांचा शाप हिंदुसभेच्या अधिकृत इच्छुकाला होताना मग काय झाले? काँग्रेसनिष्ठ विख्यात 'त्रणायाम् धूर्तानाम' देशपांडे, जेधे, काकारावांचा तांडा पश्चिम कान्हदेशांत निवडणूक प्रचाराला गेला होता. म्हणजे हिंदुसभेचे तत्त्वज्ञान खोडून काँग्रेसच्या तत्त्वज्ञानाची श्रेष्ठता पटवावयाला नव्हे, असे कारण या त्रयीला तर काय पण तिच्या गुरुणाम् गुरुलाहि अशक्य आहे म्हणून यांचा प्रचार म्हणजे हिंदुसभेला तिच्या पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना शिव्या देणं, ती त्यांची पोटभर निंदा करणे, या भयंकर कौशल्यासंबंधी ही महाराष्ट्रात प्रसिध्दच आहे. या त्यांच्या प्रसिध्दीला यत्किंचितही न्यून न पडेल अशा निंदा शिव्याशापांचा दौरा काकारावांनी हिंदुसभेविरुध्द पश्चिम कान्ह देशात काढला होता. नि काँग्रेस इच्छुक आता निर्भात झाले अशा डौलात हे प्रचारक परत आपल्या गोदास गेले. परंतु अंती काय झाले?[३०]

**बालेणे फोल झाले! डोलणे वाया गेले! :-**

हिंदुत्वाच्या सात्विक अभिमानावर सत्य राष्ट्रीत्त्वाच्या पायावर अधिष्ठित झालेली हिंदुसभेची हिंदुत्वनिष्ठ भूमिका हिंदु जनतेला आता हळुहळु पटू लागली आहे. ती आत्मघाती नि मुसलमान धार्जिणी काँग्रेसची भूमिका भूमिकंप व्हावा तशी दुभंग होत चालली आहे. हेच सत्य पश्चिम कान्ह देशांतील हिंदुत्वनिष्ठ हिंदुनी सिध्द करुन हिंदुसभेने अधिकृत इच्छुक रा.ब. वामनराव संपतराव पाटील यांना निर्विवाद बहुमताने एका काँग्रेसच्या इच्छुकाला दूर लोटून विजयी केले. निवडून आणले आपले प्रतिनिधित्व अर्पण केले आणि हे सर्व घडले कोणत्या भूमिखंडावर! तर काँग्रेसच्या, काकारावांनी शापित केलेल्या नर्मदेच्या या दक्षिण दिशेच्या भूमिखंडावर! काकाराव! हाय, हाय या पलीकडे त्यांचे समाधान ते काय करणार आणि काँग्रेसला अपयशाची ही लागण अगदी मुळापासूनही लागत चालली आहे हे सत्य आहे.

त्र्यंबकेश्वराच्या नगरपालिकेच्या निवडणुकीत सूर्यप्रकाशाइतके प्रतीत झाला आहे. त्र्यंबकेश्वराच्या एकंदर १६ जागांपैकी ९ जागा कनिष्ठ हिंदुमंडळाने जिंकल्या नि ७ जागा इतर इच्छुकांनी जिंकल्या.[३१] थोडक्यात, हिंदुसत्तेचा विजय त्यांनी जिकलेल्या जागा, तसेच काँग्रेसची होत असलेली धूळधाण याचा उल्लेख लेखात केला आहे.

**४.९ गांधी-काँग्रेसची चळवळ म्हणजे लहरीपणा :-**

आजची काँग्रेस ही National Congress उरली नाही. Indian National Congress या शब्दावलीतील मुख्य महत्त्वाचा शब्द National म्हणजे 'राष्ट्रीय' हा होय. 'राष्ट्रीय या शब्दांत काँग्रेसचे ध्येय आणि धोरण प्रतीत होते. हे अभिधान जोपर्यंत काँग्रेसला लागू पडत होते, तोपर्यंत तिचे राष्ट्रीय महत्त्व अबाधित होते. वाढत होते. परंतु लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर गांधीजींच्या हाती जेव्हा काँग्रेसचे सुकाणू आले. तेंव्हापासून काँग्रेसमधले राष्ट्रीयत्व विलोपू लागले आणि काँग्रेस ही गांधीच्या लहरीवर चालणारी एक संस्था होऊन बसली. गांधीच्या राजकारणाच्या बुडाशी कोणतेही नियमबध्द शास्त्र नाही. इतिहासाचा आधार नाही व तर्कशास्त्रांचे अधिष्ठान नाही. त्याचे राजकारण म्हणजे केवळ त्याची लहरी आणि याच लहरीला ते 'माझा आतला आवाज' या गोंडस नावाने संबोधतात'[३२]

**'गांधीचा आतला आवाज' :-**

वरील विधान सिध्द करणे कठीण नाही. गांधीच्या काँग्रेस राजवटीच्या आरंभापासून केवळ विहंगावलोकन केले तरी हे सिध्द होईल. अगदी पहिल्याप्रथम गांधीनी राजकारणात प्रमुख म्हणून प्रवेश केला तो खिलाफतीचे विकत श्राध्द घेऊन केला. खिलाफतीचे सोयरसुतक काय जे नसेल ते वास्तविक त्या तुर्कस्थानाला हिंदुस्थानाच्या राजकारणात उंटयाच्या पिल्लाप्रमाणे त्यांनी समाविष्ट केले. वास्तविक, या कृत्यास कोणत्याही तर्कशास्त्राचा बुध्दिवादाचा, इतिहासाचा आधार नव्हता, या इस्लामी आपत्तीचा प्रतिकार करण्याकरिता प्रथम अरबस्तान, इराण, इराक, अफगाणिस्तान या मुसलमान स्वतंत्र राष्ट्रांनीचा तलवार उपसावयास पाहिजे होती. परंतु यापैकी कुणीही त्याची फिकीर केली नाही. अंती प्रत्यक्ष तुर्कस्तानमध्येच त्या खिलाफतीचा मुद्दा पडला आणि तरीही त्यामागून कित्येक वर्षे तो मुद्दा हिंदुस्थानाच्या राजकारणाच्या खांदयावर गांधीजींनी वागविला. परदेशांतील संकटाला स्वदेशीय राजकारणात अग्रभागी ठेवून झगडा करण्याचा अव्यवहार्य

आत्मघातकीपणा आजवर कुणीही कधीही केला नव्हता. परंतु गांधीजींनी हा शहाणपणरहितपणा केला का? केवळ तशी लहर (आतला आवाज) लागली म्हणून आणि ही लहर ज्या हिंदु-मुसलमान ऐक्य तरी साधले का! छे! गांधीजींचे पहिले दोस्त अल्लीबंधु कॉंग्रेसमधून फुलून निघाले नि सर्व देशभर मुसलमान दंग्याचे पीक पिकून हिंदुंच्या हत्त्या झाल्या आणि याचाच परिपाक म्हणून त्या महान संन्याशाची स्वामी श्रध्दानंदाची हत्या झाली आणि त्यांच्या त्या पातकी मारेकऱ्याला गांधींनी 'भाई अब्दुल रशीद' अशी स्नेहाळ हृदयाने हाक मारली! का? कारण गांधींजींच्या उलटया हृदयाची तशी लहर लागली म्हणून![३३] थोडक्यात, खलिफाचा काहीही संबंध नसताना त्यांनी हिंदुस्थानातील राजकारणात हा मुद्दा उपस्थित करुन मुसलमानांचे आपण कोणीतरी लागतो हे सिध्द करण्याचा प्रयत्न केला.

हिंदु-मुसलमान ऐक्यावाचून स्वराज्य नाही, ही आरोळी ही गांधींची दुसरी लहर यालाही राजकारणशास्त्राचा, इतिहासाचा तर्काचा कसलाही आधार नाही. सर्व लोक, जाति, पंथ एक झाले तर स्वराज्य लगेच मिळेल हे लहान मुलालाही समजेल. परंतु मुसलमानांनी ऐक्य नच केले, तर स्वराज्य मिळणारच नाही. आजवर केवळ एकटया हिंदुंनीच धनाने, मनाने, बुध्दीने प्रत्यक्ष देहार्पणानेही हिंदुस्थानची जी काही आजवर प्रगती झाली ती केलेली आहे. फांशी जाणे, अंदमानमध्ये काळेपाणी भोगणे, येथील बंदशिाळेत वर्षानुवर्षे देह झिजवणे, हे सर्व ९९% हिंदुंनीच केलेले आहे. इतकेच नव्हे तर हिंदुंच्या चळवळीचा आवेश जेव्हा जेव्हा इंग्लिशांच्या बाजूने, हिंदु विरुध्द गेले आणि तरीही गांधीची आणि त्यांच्या पंथाची आत्मवंचक चर्पटपंजरी अजून सुरुच तर 'हिंदु-मुसलमानांच्या एकीवाचून स्वराज्य नाही'!

इ.स. १९२० ते १९३० पर्यंत गांधींनी 'कौन्सिलें हराम' ठरविली नि १९३० ते १९४० पर्यंत ती हलाल ठरविली. ती का प्रथम हराम झाली? नि मग १० वर्षांनी ती शुध्द होऊन हलाल होतात कशी? याला काही कारण? याला काही शास्त्र? काही नाही केवळ गांधीबादशहांची तशी लहर म्हणून![३४] गांधीजींच्या हातात कॉंग्रेसची सूत्रे आल्यानंतर त्यांनी आपल्या मताप्रमाणे राजकारण करण्याचे ठरविले.

इ.स. १९४२ ला 'चलेजाव' चा गैरमुत्सद्दीपणा अतिरेक आणि इ.स. १९४४ मध्ये 'My dear Lord Linfithgow' ची लेफ्ट शरणागतीची अतिरिक्तता आजवर कोणत्याही देशाच्या राजकारणांत कोणीही नरपुगवानी काहीही सिध्दता न

करता, व्यूह न रचता, परसत्तेच्या केंद्रस्थानांची नाकेबंदी न करता सैन्यवश करुन न घेता, चतुरंग बलवान परसत्तेला केवळ शब्दांनी 'चले जाव' असे आदेशले नसेल!

परंतु गांधीजींनी हा विक्रम केला आणि लगेच २ वर्षांनी त्याच ब्रिटिश सत्तेच्या व्हाईसरॉयाला आपला पुढारी मानून त्यांच्या दरबारातील कार्यकारी सभासदत्वाच्या (Executire memberships) पदव्या, त्या 'चलेजाव' च्या सत्तेशीच राजनिष्ठ राहण्याच्या शपथा घेऊन पत्कारण्याची दीन याचना केली.! त्या 'चलेजाव'च्या पहिल्या अतिरेकाला आणि या 'सरकार चरणारविदी मिलिंदायमान' होणाऱ्या दुसऱ्या अतिरेकाला कारण काय? काय कारण!केवळ त्या महंतवराची तशी लहर! आतला आवाज!Inner voice! गांधीजींच्या लहरीपणामुळे हिंदुंचे किती नुकसान होते याची आपणास यावरुन कल्पना येते.

**महात्म्याची लहर :-**

पूर्वी स्वयंपूर्ण खेडयाखेडयांतून ग्रामीण जीवनाला आवश्यक म्हणून बारा बलुते आणि अठरा कारखाने आवश्यक असत.त्यामध्ये कुंभार, चांभार, सुतार,कोष्टी, लोहार, शेतकरी, इत्यादी सर्व धंदेवाले येत असत. आणि त्यांतला एखादा जरी धंदा खालावला तरी ग्रामीण जीवन अव्यवस्थित होत असे. तेव्हा हे सर्वच धंदे ग्राम वा नगर जीवनाला आवश्यक असता, त्यातला विणकऱ्याचाच तेवढा धंदा उचलून त्यांतील चरखा, टकळी, सूत, वेळू, खादी इत्यादी परिवालाच केवळ ग्रामजीवनामध्येच नव्हे, तर राष्ट्रजीवनामध्येही गांधीनी अग्र महत्त्व दिले. चरख्याच्या आवाजात जर संगीत, तर कुंभाराच्या चाकांतहि ते का नसावे? लोहाराच्या भात्यांतहि ते का नसावे? सुताराच्या करवतीतही ते का नसावे? कारण कोणताही धंदेवाईक आपापल्या धंदयात एकाग्र होऊन एकदा गढून गेला, म्हणजे त्याच्या साधन संभाराच्या गतीने उत्पन्न होणारा आवाज त्याला संगीतच वाटत नाही. का वाटू नये?[३५]

हे सर्व जर खरे, तर मग चरख्याचे महत्त्व का एवढे अतिरिक्त. इतके अतिरिक्त की प्रत्यक्ष काँग्रेसच्या ध्वजावर त्याचे अधिष्ठान! परंतु या चरखा महात्म्यालाही काही संयुक्तिक कारण नाही. कारण केवळ एकच महात्म्याची लहर! अशी किती उदाहरणे दयावीत, कोठपर्यंत दयावीत आणि ते उपासपुराण? दिल्लीतील मौलाना महंमद अल्लीच्या गोदानाने सुटलेले उपास, साबरमती आश्रमशुध्दीचे

उपास, येरवडयांतील ते प्राणांतिक उपासापासून तो A ccording to capacity पर्यंतचे उपास आणि तो राजकोटचा तामसी उपास की जो मागाहून गांधीनाच हिंसक उपास वाटला! प्रथम तो हिंसक का नव्हता? गांधीची लहर-मागाहुन तो हिंसक झाला गांधीजी लहर![३६]

**यांतून प्राप्ती शून्य :-**

बरे या पंचवीस वर्षाच्या लहरी राजकारणाच्या मंथनांतून काही प्राप्ती? हो प्राप्ती झाली आहे तर! नाही कशी! यमुनेच्या कालिया डोहांतून उत्पन्न होणाऱ्या कालियाच्या गुरळाने फार फार तर गोकुळ, वृंदावनींच्या माणसांचे प्राण हरण केले. परंतु गांधीप्रणीत या चळवळीच्या डोहांतून जे गरळ गेल्या पंचवीस वर्षे बाहेर पडत आहे, त्याने शुध्द राष्ट्रीयत्वाचा गळा घोटला, लोकशाहीला एकशाहीच्या कुलूपांत कोंडून ठेवले. हिंदू जातीच्या न्याय अधिकारांचा मुसलमानाच्या पायांशी सडा पाडला. इश्वांकूंच्या राजवटीपासून अखंड असलेला हा भारत विखंड करण्यास सजलेल्या पातळी हातास हात लावला. समप्रतिनिधित्वाचा असुर निर्मन ३० कोटी हिंदूपैकी २२ कोटी हिंदूचा राजकीय खून पाडण्यास वाचादत्त झाले. बहुसंख्य हिंदूंना नृणतुल्य केले. समर विदयेला निंदय ठरविली. सर्वच शस्त्रास्त्रांना हिंसक ठरविले. हिंदुस्थान देशाची जी मूलाधारशक्ति, हिंदुशक्ति तिला अवमानातून, अवहेलून तेजोवध करुन दुर्बल केली. आणि मुसलमानांचा भस्मासुर निर्माण करुन देशाच्या राजकीय, प्रगतीचे, स्वराज्याचे भस्म करुन टाकण्याची शक्ति त्याला वरदानाने दिली. हे या गेल्या पंचवीस वर्षाच्याच चळवळीचे पर्यवसान! [३७]

**हे घ्या पुरावे :-**

कोणी म्हणतील 'हे अतिरंजित कथन आहे, तर ऐका. या पंचवीस वर्षात चळवळीचे तीन खंड पडतात. पहिला इ.स.१९३० ते ४० पर्यत 'निमकका' कायदा तोड दियाच्या चळवळीने तो निमकका कायदाहि तोडता आला नाही. परंतु जातीय निर्णयाचे लोकशाहीमारक, हिंदुहितमर्दक विषारी फल प्राप्त झाले आणि इ.स.१९४२ ते ४५ पर्यंतच्या चळवळीच्या तिसऱ्या खंडाचे काय पर्यवसात झाले. पाकस्थान समप्रतिनिधित्व व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हलचे पुढारीपण संपादन, ब्रिटिश राजनिष्ठेच्या शपथा घेऊन, ब्रिटिश सत्तेच्या भुकुटी भंगाप्रमाणे चालणऱ्या कार्यकारी मंडळांत सेवेकरीपदाचे याचनः हीच ना या पंचवीस वर्षातील तीन आंदोलनांची फलश्रुति?

मग यांत विजय कोठे? राजकीय सत्ताहरण कोठे ? परकीय ब्रिटिश सत्तेचे बलहरण कोठे?[३८] थोडक्यात, गांधीजींची धोरणे कशी चुकीची होती ती या लेखाद्वारे मांडली आहेत. याचे आज आपण परिणाम पाहत आहोत. गांधीजींचा लहरीपणा हट्टीपणा आपणच तारणहार या सर्व गोष्टींचा सोक्षमोक्ष या लेखात मांडला आहे.

**मतदारानो सावध राहा :-**

आज हे मागचे पाव शतकाचे गांधी कॉंग्रेस राजकारण जनतेच्या समोर विवेचनाचे एक महत्त्वाचे प्रयोजन आहे. आता निवडणुकी प्रतिदिनाला जवळ येत आहेत. या निवडणुकींचे महत्त्व नित्य निवडणुकींपेक्षा अधिक आहे. कारण या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या हाती पुढील राज्यघटना बनविण्याचे काम सोपविले जाणार आहे. मतदारांनो, 'तुम्ही मनधारी म्हणजे तुम्ही अंशतः असलेली सत्ता, जर विचार करुन योग्य पक्षाला अर्पण केली. तर तुमच्यापुरते तरी तुम्ही कर्तव्य योग्य पार पाडल्यासारखे होईल. म्हणून तुम्हांला गेल्या पंचवीस वर्षाच्या राजकारणाची उजळणी त्रोटकपणे म्हणून दाखविली.पंचवीस वर्षे कॉंग्रेसला आपण राजकारणात सर्व प्रकारे साहाय्य दिले. परंतु ते राजकारण यशस्वी झाले नाही आणि हेही मतदारांनी विसरु नये. की गांधी कॉंग्रेसने ज्या ज्या वेळी चुका केल्या. त्या त्या वेळी हिंदुमहासभेने कंठ शोषून जाई तो चेतावणी दिली. परंतु त्या त्या वेळी कॉंग्रेसने दुराभिमानाने अवहेलनेने दुर्लक्ष केले. आता परवाच्या ऑ. इ. कॉ क. च्या बैठकीत, सरदार पटेल नि पं. जवाहरलाल नेहरु यांनी त्या चुकांचे भयंकर परिणाम आत थोडेचे पुसटून टाकता येणार आहेत! आणि तरिहि त्यांनी प्रांतिक स्वयंनिर्णयाचे समर्थन चालविलेच आहे![३९]

म्हणून सर्व मतदारांना आग्रहाचे सांगणे की आपण आता हिंदुमहासभेला आपली अंशतः असलेली सत्ता म्हणजेच सर्व मते दया आणि तिला यावेळी संधी दया. तिचा विशुध्द लोकशाही बाणा, संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय, प्रांतिक स्वयंनिर्णयाला विरोध, अखंड हिंदुस्थानाची प्रतिज्ञा, समप्रतिनिधित्वाची अन्याय्य मागणी फेटाळण्याचा ठाम निश्चय, अल्पसंख्याकांचे न्याय्य संरक्षण पण त्याचवेळी बहुसंख्य हिंदूचेहि सर्व न्याय्य अधिकार रक्षण इत्यादी संपूर्ण लोकशाहीची तत्त्वप्रणालिका कार्यवाहीत आणण्याला बध्दपरिकर झालेल्या हिंदुमहासभेला आपण या वेळी संधी देणे हेच देशहिताचे होईल.[४०]

**४.१० हिन्दु मतदारांनो फसू नका :-**

गांधी - काँग्रेसचे स्वराज्य म्हणजे मुस्लिम राज्य! काँग्रेसचा हैदोस वाढत चालला आहे. जनू मनुष्ययोनीत पण आचरण पशुयोनीप्रमाणे. जन्म हिंन्दु जातीत पण आचरण हिंन्दुशत्रुच्या समान, वर्णाने ब्राम्हण, पण आचरणाने राक्षसासारखे असे एक गाळीव रत्न, परवा पुण्याच्या मंडईत काँग्रेसच्या वतीने, काँग्रेसच्या नावाने, काँग्रेसचे ढोलके बडविण्यास मुंबईहून नेण्यांत आले होते. त्या वेळी त्याने जे हिंदुसभेविरुध्द बोलले, त्याने प्रत्यक्ष हिंदुसभेचे यात्किंचितहि अहित झाले नाही. परंतु काँग्रेसचे राज्य झाले तर कोणत्या तऱ्हेचे लोक काँग्रेसच्या राजवटीत अधिकारपदावर अधिष्ठित होतील, हे मात्र स्पष्ट दिसून आले. लक्षात ठेवा की लोकशाहीमधील प्राणभूत असलेल्या नागरिक स्वातंत्र्याला प्राणघातक डंख करणाऱ्यांना संग्रही बाळगणाऱ्या या काँग्रेसच्या नावाने तुमच्या जवळ मते मागितली जात आहेत. धमक्या देऊन मते मागितली जात आहे! इंग्रज सरकारने देखील निवडणुकीकरता भाषण, सभा, लेखन, वगैरे नागरिक स्वातंत्र्यावरील निर्बंध उठविले, परंतु या गुंड काँग्रेसवाल्यांनी ती नागरिक स्वातंत्र्ये उन्मत्तपणे हिंदुसभावाल्या जवळून रॉयिस्टांकडून हिसकून घेण्याचा आत्मघातकी प्रयत्न चालविला आहे! त्यांच्या हातात अजून राजकीय सत्ता आली नाही तो ही उन्मत्त![४१] घरच्या म्हतारीचे काळ हे काँग्रेसवाले म्हणजे केवळ घरच्या म्हातारीचे काळ! हिंदुसभेविरुध्द मात्र हे गुंडगिरी करतात. परंतु मुस्लिम लींगचे मात्र नाव काढावयास घाबरतात. भगवा ध्वज जवळच्यास मात्र त्यांचे हात सरसावतात. परंतु मुसलमानांचा झेंडा पहातांच ते हात भ्याडासारखे जोडले जातात. हे सर्व हिंदुहितघातकी निंदय प्रकार डोळयासमोर एकीकडे चालले असतांनाच दुसरीकडे हिंदु मतदारांनो आपल्याजवळ हे लोक आपल्या मतांची याचना करीत आहेत! थोडक्यात, मुसलमानांपुढे काँग्रेसचे पुढारी हतबल होतात आणि हिंदुच हिंदुचे शत्रू होतात असे त्यांना वाटते.

**पण एवढयाने काय झाले :-**

गांधी - काँग्रेसने गेल्या पंचवीस वर्षात हिंदुवर जे अन्यायाचे डोंगर रचले आहेत, त्या मानाने ही दुष्कृत्यें काहीच नाहीत! गांधीजी नि गांधी काँग्रेसने प्रथम अशी प्रथा राजकारणात पाडली. की, स्वतःला हिंदु म्हणून ओळखणे दुसऱ्यांची हिंदु म्हणून ओळख करुन देणे, हिंदुत्वाचा न्याय्य देखील अभिमान बाळगणे हे प्रकार शुध्द

देशभक्तीला कमीपणा आणणारे आहेत. ही वृत्ती हळूहळू इतकी वाढली की, ती सर्व मान्य शिष्टाचार (फॅशन) होऊन बसली! हिंदूवर मुसलमानांनी केलेल्या अत्याचाराविरुद्ध निषेध करणे, त्या अत्याचारांचे परिमार्जन करण्याचे प्रयत्न करणे, त्या इत्यादी गोष्टी गांधीकाँग्रेस नीतीप्रमाणे देशभक्तीहीन-इतकेच नव्हे तर-स्वराज्य संपादन विरोधी गणल्या जाऊ लागल्या. मुसलमानांनी दंगे केले, खून पाडले, स्त्रियांची अपहरणे केली, तरी देखील, त्याविरुद्ध 'ब्र' ही काढणे हे स्वराज्य विरोधक निंध जातीयतेचे समजले जाऊ लागले! स्वामी श्रध्दानंदांच्या हत्त्येसंबंधी निषेध निंध जातीचतेचे समजले जाऊ लागले! स्वामी श्रध्दानंदाच्या हत्येसंबंधी निषेध नि दुःख करण्याचा ठराव, ज्यावेळी आम्ही मुंबई नगरपालिकेमध्ये मांडला, त्यावेळी या काँग्रेस जनांनी आमची कोण घृणा केली, आम्हा अदयापही आठवत- आणि कारण काय? तर मुसलमान रागवतील! आणि याच भेकड वृत्तीचा परिपाक म्हणजे 'खुनी अब्दुल' 'भाई अब दुल' बनु लागला![४२]

पद्धतशीरपणे हिंदुत्वाची गळचेपी, मोवल्यांचे बंड, कोहाटचा दंगा, बंगालमध्ये हिंदु स्त्रियांचे दिवसाढवळया अपहरण इत्यादी हिंदूवरील शतशःअन्याचांची गाऱ्हाणी काँग्रेसकडे यावयाची; कारण त्यावेळी काँग्रेसवाचून अन्य संस्थातच सर्व हिंदुस्थानची म्हणून अस्तित्वांत नव्हती. यामुळे जेव्हा हे सर्व मुस्लिमांनी अत्याचार काँग्रेस कारभारी मंडळापुढे येत, त्या वेळी कोण तुच्छतेने त्यांची वासलात लागे, हे आम्ही नित्य पाहत आणि अनुभवीत होतो.! कारण आम्ही त्यावेळी अनेक वर्षे काँग्रेसच्या कारभारी मंडळात समविष्ट झालो. महंमद शौकतअल्ली डॉ. किचलू, अन्सारी, आदि, जे कतिपय मुसलमान त्यावेळी काँग्रेसमध्ये होते. त्यांनी हासे, उपहास, तुच्छता इत्यादी प्रकारांनी हिंदूवरील या घोर अत्याचारांचे प्रश्न निपटून टाकण्याचा सतत प्रयत्न करावा. कै. तेरशीशेठ विठ्ठलभाई वल्लभभाई पटेल, सत्यमूर्ति आदि काही हिंदुत्वनिष्ठ पुढारी कधी कधी क्रोधविष्ट होत. तरीही गांधीच्या दुष्ट मोहिनीने ते थंडे पडत. अशा या हिंदुत्वघातक गांधी कॉग्रेसच्या वातावरणातहि हिंदु जातीच्या सुदैवाने तेजस्वी डॉ. मुंजे, लाला लजपतराय, पुं. मदनमोहन मालवीय, तात्याराव केळकर, तो स्वर्गस्थ हुतात्मा स्वामी श्रध्दानंद यांच्या सारखे जे हिंदु जातीचे पाठीराखे होते. ते दिवसें दिवस विटू लागले नि स्वामी श्रध्दानंदाच्या हत्येने तर त्यांनी प्रकटपणे त्यावेळेपर्यंत, केवळ धार्मिक नि सामाजिक क्षेत्रांतच काम करणाऱ्या हिंदुसभेत

प्रवेशून हिंदू जातीच्या संरक्षणार्थ नि उध्दारार्थ तिचा लढाऊ बाण्यांत कायापालट केला. हिंदुत्वघातक वातावरणात वाढली आहे. म्हणून तिच्या हातून हिंदूच्या हितांचे रक्षण होणे अशक्य आहे, त्यांतले काही काही तर इतके निस्त्रांग झाले आहेत. की उदया हिंदुस्थानांतले सर्व हिंदू मुसलमान झाले तरी त्यांना त्यांचे क्षणभरहि सुतक वाटणार नाही! राजकीय स्वराज्याच्या ध्येयांचे विचारल तर, त्यांचे परमगुरु जे गांधी त्यांनी स्पष्टपणेच एकदा लिहून टाकले आहे की, 'उदया हैद्राबादच्या निजाम, मुसलमान' गुंडांच्या नि सरसीमा पठाणांच्या साहय्याने हिंदुस्थानचा बादशहा झाला, तर त्यांनी मुळीच दुःख नाही. तेहि शंभर टक्के स्वराज्याच ( Cent Percent Home Ruke!) ते मानतील.[४३]

**काँग्रेसला मुस्लिम राज्य हेहि स्वराज्यच! :-**

आणि याच राष्ट्रीयघातक, हिंदुत्वमारक, मनोवृत्तीमुळे आम्ही आजच्या काँग्रेसला राष्ट्रीय न म्हणता आहे. जापर्यंत गांधी काँग्रेस म्हणतो, हा काँग्रेस जोपर्यंत गांधींचा दासी आहे, तोपर्यंत गांधी तिचे बादशहा सर्वाधिकारी तिच्या सदसदविवेकबुध्दीचे प्रचोदक आहेत, तोपर्यंत तिच्या हातून हिंदु हिताचे अर्थात न्याय हिंदु हितांचेही संरक्षण होणे कधीही शक्य नाही. जातीय निर्णयासारखे राष्ट्रीयता घातक पाकिस्तानाचे विषजंतुजनक आणि हिंदू-जातींचे मानभंगकारक विष तिने आपल्या दुष्कृतीने निर्माण केले आहे. याचे मनोवृत्तीमुळे, या गांधी काँग्रेसने पाकिस्तान मान्य करण्याच्या गांधी राजांच्या देशद्रोही कटाकडे दुर्लक्ष केले आहे. समप्रतिनिधित्वाचे, सर्व हिंदुस्थानवार मुसलमानी प्राधान्ये स्थापन करण्याच्या नित्य तत्त्वाचे अंगीकरण केले आहे. आणि याच आत्मघातकी मनोवृत्तीमुळे प्रातांना स्वयंनिर्णय देण्याच्या, म्हणजेच पाकिस्तान निराळया नावाने स्थापन करण्याच्या देशद्रोही कुटिल कत्ला प्रत्यक्ष आपल्या ठरावामध्ये सर्व लज्जा कोळून पिऊन मान्यता दिली आहे. आणि याच्या मुळाशी मतदार बंधुंनो हिच गांधी मनोवृत्ती आहे की, हिंदुस्थानमध्ये मुस्लिम राज्य झाले तरीहि शंभर टक्के स्वराज्यच आहे. याचमुळे पूजनीय गवे ध्वज जाळताना अथवा त्यांचे जनीय चित्र पायाखाली तुडवताना यांच्या राक्षसी हदयाला स्वत्वहत्याजाणिवेची यत्किचही कंप सुटत नाही! एखादा कट्टा मुस्लिम राज्यहि शंभर टक्के स्वराज्यच वाटत आहे![४४]

**गांधी - काँग्रेस राजवटीतील हिंदूवरचे आघात :-**

विचारी हिंदूमतदारानो, हया सर्व कहाण्या मी आधारावाचून सांगत नाही. गांधी काँग्रेस ज्यावेळी इ.स.१९३७ च्या वर्षी अल्पकालपर्यंत अधिकारावर होती, त्यावेळी तिने हिंदूंचे न्याय्य अधिकार तर रक्षण केले नाहीतच, परंतु प्रसंग आले तेंव्हा, ब्रिटिशांपेक्षाही कठोरपणाने मुस्लिम सहश्य कठोरणाने हिंदूंना अन्याय्यपणे छळले आहे. संयुक्त प्रातांमध्ये पं गोविदवल्लभ पंत यांची राजवट सुरु होती. त्या वेळी हिंदूवर झालेले काही वेचक अन्याय पहा.

१) संयुक्त यांच्या मुसलमान केवळ १४% असता सर्व क्षेत्राहून (every sphere) त्यांना काँग्रेसने शेकडा ५०% अथवा अधिक टक्के जागा दिल्या.

२) हिंदूवर ब्रिटिश राजवटीत नसलेले अन्याय्य निर्बध घालून त्यांच्या पूजा आरती इतकेच काय शंख वाजवणे देखील हिंदू देवळातून बंद केले. मोहोरममध्ये बाराबंकी नगरात शंखवादनाला, कीर्तनांलाही वगैरे बंदी केली. बांक्ष्यामध्ये हिंदूच्या लग्न मिरवणुकीनाही मोहोरममध्ये परवानगीची अट घातली.

३) गोरखपूरला एका भागांत मुसलमान नवीनच राहावयास आले. तेथे गोरखनापथांचे देऊळ होते. येथे मुसलमानांनी गोवध करण्याचा हट्ट धरला नि तो काँग्रेसने पुरा केला.

४) मुंबई प्रांत - येथील पंतप्रधानजी बाळासाहेब खेर होते, तरी खरी सत्ता मुनशींच्याच हाती होती. त्या महाशयांनी निजाम निशस्त्र प्रतिकाराच्या वेळी मुस्लिम लीग परिषद सोलापुरी होऊ दिली. परंतु आर्यसमाज परिषदेवर बंदी घातली. स्वातंत्र्यवीर सावरकरांची" काळकर्ते" परांजपे यांची प्रमुख पुस्तके ब्रिटिश सरकारने केलेल्या बंदीतच ठेवीले.

५) मद्रासला पंतप्रधान राजाजींनी निजामच्या झगडयाची पत्रकेही आक्षिप्त ठरविली.

६) मध्यप्रातांताहि असेच अन्याय हिंदूवर काँग्रेस सरकारने केले. आणि उलट मुसलमानांनी मात्र मुस्लिम प्रातांत तेथील हिंदूवर अनेक अन्याय केले तरी काँग्रेसने त्याविरुध्द ब्रहि उच्चारला नाही! आणि या सर्वाचे कारण गांधी काँग्रेसचे स्वराज्य म्हणजे मुस्लिम राज्यहि होऊ शकते.

सध्या सरदार वल्लभभाई पटेलापासून तो प्रभात फेरीतील टारग्या पोरापर्यंत जो टाहो फोडला जातो की, काँग्रेसला मत म्हणजे स्वराज्याला मत, याचा अर्थ वरील सर्व पुराव्याच्या अन्वयाप्रमाणे हाच होतो. की काँग्रेसला मत म्हणजे मुस्लिम राज्याला मत.[४५] थोडक्यात, डॉ. सावरकरांनी काँग्रेस कसे मुस्लिम धर्मिय आहे. त्यांनी म्हणजे मुस्लिमांनी कितीही हिंदूंवर अत्याचार, अन्याय केले तरी काँग्रेसने कधीही त्याविषयी आवाज उठविला नाही. थोडक्यात, मुस्लिमांचा किती मोठया प्रमाणावर अत्याचारांची यादी त्यांनी सादर केली आहे. यातून हिंदूंनी बोध घ्यावा, व काँग्रेस विरुध्द व मुस्लिम विरुध्द प्रतिकार करण्यास सज्ज व्हावे, असे नमूद केले आहे. काँग्रेसचे स्वराज्य हे खरे स्वराज्य नाही, ज्यात स्वत्त्व आहे, संस्कृती आहे, न्याय्य आहे ते खरे स्वराज्य. म्हणून काँग्रेसला हिंदूंनी मते देऊ नये, असे आवाहन डॉ. नारायण सावरकरांनी केले आहे.

## तळटिपा

१) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर', मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००२, पृष्ठ १७७, १७८.

२) मुंबई क्रॉनिकल, दि. २४ नोव्हेंबर १९३३, पृष्ठ - ३, ७.

३) सरकारी अर्काइव्ह कागदपत्रे मुंबई, पोलिस फाईल नं. २८६४/A/३१८ पृष्ठ - १२३.

४) सरकारी आर्काइव्ह कागदपत्रे, मुंबई पोलीस फाईल नं. अ८००/७५, १९३९, पृष्ठ - ३२३, ३५१.

५) सरकारी आर्काइव्ह कागदपत्रे मुंबई, पोलिस फाईल मं.अ. (८४) E-१९३४ पृष्ठ - ३७, १२५.

६) दैनिक केसरी, पुणे, ज. स. कांदीकर (संपा) "दि. १७ जानेवारी १९२४, पृष्ठ - २.

७) कित्ता; पृष्ठ - २.

८) स्वातंत्र्य नाशिक, दि. ६ नोव्हेंबर १९२४, पृष्ठ - ३.

९) दैनिक सकाळ, पुणे, २९ नोव्हेंबर १९३६, पृष्ठ - १.

१०) कित्ता; पृष्ठ - १.

११) कित्ता; पृष्ठ - १.

१२) कित्ता; पृष्ठ - ४.

१३) कित्ता; पृष्ठ - ४.

१४) कित्ता; पृष्ठ - ४.

१५) दैनिक 'समाचार सोलापूर', दि. ९ फेब्रुवारी १९३७, पृष्ठ - २.

१६) कित्ता; पृष्ठ - २.

१७) कित्ता; पृष्ठ - ५.

१८) कित्ता; पृष्ठ - ५.

१९) दैनिक 'समाचार सोलापूर' दि. ९ फेब्रुवारी १९३७, पृष्ठ - १.

२०) कित्ता; पृष्ठ - १.

२१) कित्ता; पृष्ठ - १.

२२) दैनिक केसरी, पुणे दि. २८ ऑक्टोबर १९४०, पृष्ठ - २.

२३) कित्ता; पृष्ठ - २.

२४) कित्ता; पृष्ठ - २.

२५) कित्ता; पृष्ठ - ६.

२६) कित्ता; पृष्ठ - ६.

२७) कित्ता; पृष्ठ - ६.

२८) दैनिक केसरी, पुणे, वार शुक्रवार दि. २९ मे १९४०, पृष्ठ - १.

२९) कित्ता; पृष्ठ - १.

३०) कित्ता; पृष्ठ - १.

३१) कित्ता; पृष्ठ - ५.

३२) दैनिक केसरी, पुणे, शुक्रवार १६ नोव्हेंबर १९४५, पृष्ठ - २.

३३) कित्ता; पृष्ठ - २.

३४) कित्ता; पृष्ठ - २.

३५) कित्ता; पृष्ठ - २.

३६) कित्ता; पृष्ठ - ५.

३७) कित्ता; पृष्ठ - ५.

३८) कित्ता; पृष्ठ - ५.

३९) कित्ता; पृष्ठ - ५.

४०) कित्ता; पृष्ठ - ५.

४१) दैनिक केसरी, पुणे, शुक्रवार २३ नोव्हें. १९४५, पृष्ठ - २.

४२) कित्ता; पृष्ठ - २.

४३) कित्ता; पृष्ठ - २.

४४) कित्ता; पृष्ठ - ६.

४५) कित्ता; पृष्ठ - ६.

# प्रकरण पाचवे

# सामाजिक कार्य

## प्रकरण पाचवे
## सामाजिक कार्य

**५.१ प्रस्तावना :-**

'कणखर देशभक्ती आणि उज्ज्वल कर्तृत्व या गुणांविषयी महाराष्ट्रात जे पुरुष आदर्श पावले त्यापैकी एक डॉ. नारायणराव दामोदर सावरकर, त्यांनी देशासाठी कुठलाही त्याग करण्यास मागेपुढे पाहिले नाही. ज्या काळी देशभक्ती ही सुळावरची पोळी होती, जेव्हा एक पाय तुरुंगात किंवा वधस्तंभावर ठेवूनच देशभक्तीच्या रिंगणात उतरता येत असे, जेव्हा देशभक्ती म्हणजे शुध्द हौतात्म्य होते, अशा वेळी देशभक्तीचे सतीचे वाण घेलेल्यापैकी डॉ. ना. दा. सावरकर हे एक होते.'[१]

डॉ. सावरकरांनी आपल्या थोरल्या बंधूंना आदर्श मानून, कोवळया वयातच राजकारणात उडी घेतली, त्यामुळे सुरुवातीचा काळ सोडला तर तारुण्यातील आपल्या भावंडांबरोबर, आनंदाने क्रीडा करण्याचे सुखाचे दिवस, परमेश्वराने त्यांना कधीच लाभू दिले नाहीत. दोन्ही बंधू आधी अंदमानात, त्यानंतर कारागृहात, नाहीतर अज्ञातवासात, इतके असूनही नारायणराव सावरकरांनी आपल्या बंधूंनी सुरु केलेल्या राष्ट्रकार्यात किंचितही कमीपणा आणू दिला नाही. त्यातच प्रापंचिक स्वरुपाच्या इतर अनेक अडचणींची भर पडत होती. परिणाम त्यांच्या मनावर सतत होत असे. गणेश सावरकर नि विनायक सावरकर - बंधव्दय सुटून अखेर घरी आले. परंतु बंधूंच्या सहवासात आनंद भोगण्यास डॉक्टरांचे वय तेव्हा तरुण नव्हते. तेही वयाने थकले होते. आवश्यक असलेली विश्रांती त्यांना कधीच घेता आली नाही.'[२]

'खडतर हाल अपेष्टा काढणारा देशभक्त, प्रापंचिक अडचणीत केवढे सहकार्य करु शकतो. डॉ. नारायणराव सावरकरांच्या कार्यकर्तृत्वावरुन लक्षात येते. डॉ. सावरकरांनी सार्वजनिक चळवळ भरपूर केल्या. त्यांचे वत्कृत्वही श्रेष्ठ दर्जाचे होते. सभेत, त्यांच्या वक्तृत्वकलेचा ओघ कितीही वेळ चालू राहिला तरी श्रोत्यांना त्यांचा कंटाळा येत नसे. डॉ. सावरकरांची भाषणशैली उठावदार, उत्तेजित करणारी, आव्हानात्मक होती. अलंकारिक, त्याचबरोबर वजनदार शब्दांचा भरणाही त्यात असे. वक्ता व श्रोता यामधील सुसंवाद साधला जात असे. 'संदेश'कार अच्युतराव कोल्हटकरांनी आपल्या अग्रलेखात योजिलेले शब्दप्रयोग आणि डॉ. सावरकरांच्या भाषणातली शब्दरचना यांत विलक्षण साम्य होते. तेव्हा त्यांच्या भाषाशैलीची आठवण करुन देण्यासाठी दे.भ. अच्युतराव कोल्हटकरांच्या अग्रलेखातला एक

उतारा उदाहरणादाखल येथे देत आहे. डॉ. नारायणराव सावरकर अशाच पध्दतीने श्रोत्यांना आपल्या शब्दांनी मंत्रमुग्ध करीत.'[३]

'राज्यकर्त्यांनो तुम्ही आपल्या तोफा आणा, नाहीतर बंदुका आणा, मी तुम्हास भिणार नाही. अधिकाऱ्यांनो तुरुंगाचे दरवाजे खोला, नाहीतर पायात लोखंडी बेडया घाला. पण मी तुम्हास भिणार नाही. सत्ताधाऱ्यांनो हातात चाबूक घेऊन या, नाहीतर अंधारकोठडीत लोटून दया. मी तुम्हास भिणार नाही. पाठीवर कोरडे उठू दया, काटेरी टोप डोळयावर ठेवा, हालाहाल करा, उठता बसता सव्वामणाचे पोते डोक्यावर ठेवा. पण मी तुम्हास भिणार नाही. मी स्वातंत्र्याचा शिपाई गडी आहे. जिव्हेतून शेवटचे अस्पष्ट वाक्य निघेपर्यंत मी आपल्या देशबांधवांस स्वातंत्र्याचा उपदेश करीन, पण मी तुम्हास भिणार नाही.'[४] थोडक्यात, डॉ. नारायणरावांनी हिंदूंनो निर्भिड व्हा, असा सल्ला दिला आहे.

'अगदी याच शैलीत डॉ. नारायणराव दामोदर सावरकर, श्रोतृसमुदायावर आपल्या अमोघ वत्कृत्वाने छाप पाडीत. अ आणि अरे हे शब्द जबरदस्त पध्दतीने डॉ. सावरकर आपल्या भाषणात वापरीत असत. डॉ. सावरकरांचे परमस्नेही डॉ. वेलकर यांनी डॉ. नारायणराव सावरकरांचे भाषण एकदा बोलून दाखविले होते.

'काय म्हणे, आम्ही स्वराज्याला नालायक, स्वातंत्र्याला अपात्र, अं अरे आम्ही राज्ये केली, आम्ही साम्राज्ये केली.

लोकमान्य टिळक हयात असताना, नारायणराव सावरकरांनी होमरुल लीग, टिळकांचे गणपती उत्सव, शिवाजी रायगड उत्सव, दसरा उत्सव, यांत प्रामुख्याने भाग घेतला. टिळकांच्या पश्चात स्थानिक स्वराज्य संस्था, मजुरांचे संप, अस्पृश्यता निवारण, परिषदा, श्रध्दानंद, महिलाश्रम, काँग्रेस, लोकशाही स्वराज्य पक्षाची अधिवेशने, हिंदुमहासभा, व्यायाम परिषदा, अशा अनेक चळवळीत ते जाहीर व्याख्याने देऊन सतत आघाडीवर असत.'[५]

**'सावरकर बंधू विविध प्रान्तात जन्माला आले असते तर .....**

डॉ. ना.दा. सावरकर यांच्या वत्कृत्वाचा, कर्तृत्वाचा इतिहास समकालीन पिढीला तर माहित होताच पण त्यानंतरच्या पिढीला म्हणजे प्रा. वि.घ. देशपांडे, पु.भा. भावे, म.म. बाळशास्त्री हरदास या आता दिवंगत झालेल्या पिढीलाही डॉ. सावरकरांच्या कर्तृत्वशक्तीची यथायोग्य जाणीव होती. आणि म्हणूनच कै. प्रा. वि.

घ. देशपांडे यांनी नागपुरातील स्वा.वी. सावरकर तत्त्वज्ञान प्रसार केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या एका भाषणात म्हटले की, 'श्री. बाबाराव, श्री. तात्याराव आणि डॉ. नारायणराव हे तीन जर भारतातील वेगवेगळया प्रांतात, वेगळया घराण्यात जन्माला आले असते, तर भारताला अखिल भारतीय कीर्तीचे आणि कर्तृत्वाचे तीन थोर पुढारी लाभले असते, पण नियतीने या तीन थोर व्यक्तींना एकाच प्रांतात, एकाच घराण्यात, सख्खे भाऊ म्हणून जन्माला घातले. इतकेच नव्हे तर या तिन्ही बंधूंनी एकाच ध्येय धोरणाने प्रेरित होऊन देशसेवेच्या एकाच कार्यप्रणालीत राहून कार्य केल्यामुळे त्यांचे कार्य एकजीव झाले.'

अर्थात, नेतृत्वमधले बंधू विनायक सावरकर या लोकोत्तर महापुरुषाकडे होते. विनायकरावांचे नेतृत्व स्वीकारुन नारायणराव सावरकरांनी क्रांतिकार्याची धुरा ज्येष्ठ बंधु गणेशरावांप्रमाणे उचलली. गणेशरावांनी जाणीवपूर्वक आपल्या अलौकिक धाकटया बंधूचे, विनायकरावांचे तप नेतृत्व स्वीकारीले होते. साहजिकच समजू लागल्यापासूनच ते तात्यांच्या प्रभावाखाली वाढले होते. सामाजिक चळवळीची, देशसेवेची सर्व माध्यमे डॉ. सावरकरांनी यशस्वीपणे हाताळली आणि हे प्रचंड कार्य करताना केवळ सावरकर कुटुंबाचाच संसार नव्हे, तर अनेक भूमिगत क्रांतिकारक, अडलेले नडलेले कार्यकर्ते यांचे संसार डॉ. सावरकरांनी एक राष्ट्रीय सामाजिक कर्तव्य म्हणून चालविले.'[६]

**डॉ. नारायणरावांचे कर्तृत्व :-**

डॉ. ना. दा सावरकर यांनी आत्मचरित्र लिहिले नाही, तो एक उत्कृष्ट संदर्भग्रंथ झाला असता, काळाच्या ओघात त्यांनी केलेले बरेचसे कार्य विस्मृतीत गेले. त्यामुळे उपलब्ध सरकारी दस्तऐवज, छापील आवाहन पत्रिका, संस्थाचे, परिषदांचे अहवाल वैगेरे कागदपत्रांवरुन त्यांच्या कार्याची माहिती मिळू शकली, आणि त्यामुळे तपशीलवार माहितीच्या अभावी त्यांच्या कार्याची यादीच येथे प्रकाशित करणे क्रमप्राप्त झाले. डॉ. सावरकरांच्या निवासस्थानी, औषधालयात अस्सल कागदपत्रे मिळणेच शक्य नव्हते. पोलिसांच्या धाडीपायी, त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांची केंव्हाच होळी केली होती.

डॉ. सावरकरांच्या कार्याविषयी जी काही माहिती पुस्तकात, वर्तमानपत्रात प्रकाशित झाली आहे. ती सविस्तर देऊन, त्यापुढे त्यांनी केलेल्या प्रचंड कार्याची

यादीच उपलब्ध कागदपत्रांतून, अहवालातून येथे दिनांक क्रमांकाने जोडण्यात आली आहे. डॉ. सावरकरांच्या प्रस्तुत यादीवरुन त्यांच्या महत्कार्याचे महत्त्व लक्षात येते.'[७]

**५.२ डॉ. सावरकरांची मुंबई महानगर पालिकेतील कामगिरी :-**

लो. टिळकांच्या मृत्यूनंतर म. गांधींनी राष्ट्रीय चळवळी उभारुन ब्रिटिश राजसत्तेला धक्के देण्याचे कार्य चालू ठेवले होते. डॉ. ना. दा. सावरकर त्या वेळी टिळक राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधी म्हणून महानगरपालिकेत सन १९२५ ते १९२८ चे दरम्यान सबंध गिरगाव विभागातर्फे निवडून गेले होते. राष्ट्रीय पक्षातली मंडळी त्या वेळी फारच अल्पमतात निवडून आली होती. व्ही. जे पटेल बॅ. जमनादास मेथा, वीर के. एफ नारिमन, डॉ. वेलकर पुप्पाला, सयाजीराव सीलम इ. त्यामुळे ज्या ज्या वेळी डॉ. सावरकरांचे राष्ट्रीय स्वरुपाचे ठराव महापालिका सभेपुढे आले. त्या, त्या वेळी ते पास न होता हटकून नामंजूर झाले.

**स्वामी श्रध्दानंद हत्येबदद्लचा ठराव :-**

स्वामी श्रध्दानंदांनी शेकडो परजातीतले तरुण हिंदुमर्धात आणले. त्याचा बदला, चिडून जाऊन एका क्रूर मुसलमानाने घेतला. अब्दुल रशीदने स्वामी श्रध्दानंदांना, पोटात सुरा भोकसून ठार मारले. स्वामी श्रध्दानंदांची हत्या एका मुसलमान धर्मांधाने केल्यामुळे कराचीपासून गोहत्तीपर्यंत व श्रीनगरपासून केपकामोरीनपर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण भूप्रदेशातील अनेक संस्थांनी, सभांनी निषेध प्रदर्शक ठराव मान्य केले व कित्येक पुढारी तत्संबंधी बोलूनही गेले. तरी मुंबईच्या नगरसंस्थेला त्याचे दुःख वाटले नाही. मुंबई महापालिकेने काहीतरी ठराव मान्य करावा, असा प्रयत्न चालला होता. परंतु अध्यक्षासकट (त्या काळी महापौराला अध्यक्ष म्हणत असत) अनेक सभासद ठरावास बुजत असल्यामुळे ठराव मांडून तो मान्य करुन घेण्याचे काम झाले. याचे कारण नगरपालिकेत बहुजन मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन, पठाण व इंग्रज होते. राष्ट्रीय पक्षातले हिंदु सोडले तर बाकीचे हिंदु हया विषयावर औदासीन्य बाळगणारे होते.'[८]

'सरतेशेवटी, डॉ. नारायणराव सावरकरांनी कुणाच्याही मतांची पर्वा न करता धिटाईने श्रध्दानंदांच्या हत्येसंबंधी निषेध ठराव मांडला. सभेच्या एकंदर रागरंग बघून, राजकारणाच्या वावडयाने नाजूक प्रकृतीच्या सभासदांना कसेसेच होऊ नये व कार्यभाग तर साधावा, हया दुहेरी हेतूने तिखट पणाचे कानेकोपरे झाडून, डॉ.

सावरकरांनी अगदी निर्लेप ठराव मांडला. स्वामी श्रध्दानंदांच्या चरित्रातील उज्ज्वल उदाहरणे देत असताना काही सभासदांनी व खुद्द अध्यक्षांनी भाषणात राजकारण आणू नका, म्हणून सुनावले. डॉ. मो.बा. वेलकर यांनी ठरावाला जोरदार पाठिंबा दिला. डॉ. सावरकरांच्या उत्कटपणे केलेल्या वक्तृत्वाचा महापालिकेतल्या सभासदांवर आवश्यक तो परिणाम झाला. निषेध ठराव मतांस टाकताच ३६ अनुकूल व १३ प्रतिकूल व बाकीचे तटस्थ असा ठराव मान्य झाल. हिंदुधर्माविषयी औदासीन्य दाखविणारे काही तटस्थ हिंदु, नगरसंस्थेत हिंदुंचे हित काय बघणार, ही चिंतन करण्यासारखी गोष्ट होती.[९] थोडक्यात, हिंदू लोकच हिंदूंच्या हितासाठी काहीही करणारे नव्हते या गोष्टीची डॉ. सावरकरांना जाणीव होती.

**मुंबईचे क्रॉफर्ड मार्केट (महात्मा फुले मुंबई) :-**

'सन १९२७ च्या नोव्हेंबर महिन्यात डॉ. ना. दा. सावरकरांनी मुंबईच्या सुप्रसिध्द क्रॉफर्ड मार्केटला 'डॉ. दादाभाई नवरोजी मार्केट' असे नाव देण्यात यावे, असा ठराव नगरपालिकेने मांडला. डॉ. सावरकर म्हणाले, "क्रॉकर्ड मार्केट हे नगरातील महत्त्वाचे ठिकाण आहे. आमच्या देशातील नगरे वागावे हयामधील कोणत्याही स्थानांना परकीयांची नावे देऊन ती चिरस्मरणीय करण्याचा उपक्रम जो अलीकडे पडला आहे, तो अत्यंत निंदा आहे. शिवाय क्रॉफर्ड या नावात असे काय मोठे आहे, त्यांनी लाचलुचपत घेतल्याचा गवगवा होताच सन १८९८ साली तर कमिशन नेमण्यात येऊन कामावरुन क्रॉफर्डना काढूनही टाकण्यात आले होते. दादाभाई नवरोजी हे अत्यंत थोर पुढारी होऊन गेले व त्यांचे नाव दिल्याने, हया स्थानाची प्रसिध्दी पूर्ववत स्थिर राहील.'

डॉ. सावरकरांना परकीयांच्या खुणा पुसून टाकावयाच्या असल्याने त्यांनी दादाभाई नवरोजींचे नाव सुचविले. यामुळे परकीय नावांच्या जोखडातून भारत मुक्त होईल.

नंतर नगरपालिकेतल्या युरोपयिन सभासदांना उद्देशून डॉ. सावरकर म्हणाले, "लंडनच्या नगरपालिकेने आपल्या नगरातील स्थळांना हिंदी वा परदेशीय थोर गृहस्थांची नावे दिली, तर ती त्यांना आवडतील काय?" डॉ. एम. बी. वेलकर व बमन बेहराम यांनी सावरकरांच्या ठरावाला पुष्टी दिली. ठरावावर मते घेण्यात आली असता, तो ठराव संमत झाला नाही, यांचे कारण अलीकडेच लक्षात आले. कारण

क्रॉफर्ड मार्केट नावाचा बदल भविष्यकाळात महात्मा जोतिबा फुले यांच्या नशिबी होता. महर्षी डॉ. दादाभाई नवरोजी यांच्या नशिबी नव्हता.'[१०]

'२९ मार्च १९३५ रोजी रात्री दहा वाजता पनवेल येथील श्री हनुमान मंदिर पनवेल या संस्थेचा द्वितीय वाढदिन समारंभ होता. डॉ. नारायणराव सावकर यांचे नेतृत्वाखाली सुरुवात झाली, समारंभाकरिता गावांतील बरीच मंडळी उपस्थित होती. त्यांतल्या त्यांत नानासाहेब पुराणिक, राजारामभाऊ पुराणिक, शेट आत्माराम महादेव, डॉ. फडके, ॲडव्होकेट बेडेकर, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अप्पासाहेब बेदक, शेठ रवजी भिमजी, फडके वकील, मुबईचे इ. ना. देवधर वगैरे मंडळी प्रमुख स्थानी होती. एकंदर जनसमुदाय अडीच तीन हजारांवर दिसत होता. जागेच्या अभावी कित्येक लोक झाडांवर बसले होते. त्याशिवाय शेतांतून खेडेगावांतील बरीच शेतकरी मंडळी बसलेली होती.

प्रारंभी ईशस्तवन झाल्यावर येथील ॲडव्होकेट नानासाहेब बेडेकर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावे, अशी मंदिरातर्फे त्यांना विनंती केली. त्यांच्या विनंतीस संस्थेचे अध्यक्ष रा. गो. वि. भिडे वकील यांनी अनुमोदन दिल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. नंतर संस्थेच्या संचालकांपैकी एक रा. वि. प्र. कोशे यांनी छापील अहवाल वाचून दाखविल्यावर मंदिरातील विदयार्थ्यांच्या मैदानी व मर्दानी खेळांस सुरुवात झाली.

भावी पिढी बलवान व सशक्त व्हावी, अशी डॉ. नारायणराव सावरकरांची अपेक्षा होती. त्यामुळे ते अशा कार्यक्रमाला जात.'[११]

शेवटी समारंभाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सावरकर यांनी सुमारे अर्धा तास भाषण केले. ते आपल्या भाषणांत म्हणाले, "आजच्या वयाक्ष्यानाला सुरुवात करण्यापूर्वी पहिल्या प्रथम अल्पसामुग्रीने सुरुवात करुन हया आजच्या अवस्थेत पोहोचल्याबद्दल मी प्रथम या व्यायामशाळेने आपल्या निरनिराळया ठिकाणी आपल्या शाखा उघडून व्यायाम प्रसाराचे काम इतक्या नेटाने व धडाडीने चालविले, हे या संस्थेचे एक खरोखरच अभिनंदनीय वैशिष्टय आहे. या खेडेगावांतील २०० मुलांना समूहरुपाने कवाईत करतांना पाहून शिवाजीच्या वेळच्या त्या मर्द मावळयांची मला आठवण झाली. शिक्षकांची शिटी वाजल्याबरोबर त्यापलीकडील झाडीत पटापट लाण्यांची जी टोके उभारली गेली, तो प्रसंग तानाजीच्या कोंडाण्यावरील हल्ल्याची

आठवण करुन देतो. व्यायामाच्या मागे एकमोठा अंतस्थ हेतू आहे. पण हा हेतू गुप्त मात्र नव्हे, लाठी किंवा बोधाहीथाकडे केवळ शोभेच्या दृष्टीने पाहू नका. वेळप्रसंगी आपणांस त्यांच्या आत्मसंरक्षणासाठी उपयोग केला पाहिजे. नाहीतर शारीरिक शक्तीचे सर्व प्रदर्शन निरुपयोगी आहे, हे खेळ खेळतांना अगर पहातांना आजची परिस्थिती आपण नजरेसमोर ठेवली पाहिजे. जर्मनी जसा जर्मनीचा, जपान जसा जपान्याचा, इंग्लंड जसा इंग्लिशांचा तद्वत हिंदुस्थान हिंदुचा आहे. कित्येक वर्षापासून ही भूमी हिंदूंची आहे. सध्याचा संक्रमण काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. देशांत काही प्रसंग असे येतात की, जर त्या वेळी त्या पिढीने आपली कामगिरी योग्य रीतीने बजाविली नाही. तर पुढील सर्व पिढयांस त्यामुळे दुःख भोगावे लागते. १८१८ साली असेच कार्य न बजाविल्यामुळे आम्ही आज पारतंत्र्यात पडलो.[१२]

अर्थात, सावरकरांना तरुण पिढी सशक्त व बलवान न झाल्यामुळे देशाची जी अवस्था झाली ती झाली नसती, याची खंत वाटते, त्यामुळे सर्व मैदानी खेळ, व्यायाम यावर भर दिला तर देशातील युवा वर्ग सशक्त व बलवान होईल, व देशाकडे कोणीही वाकडया नजरेने पाहू शकणार नाही. देश सशक्त होईल, नाहीतर पेशव्यांच्यावर जी परिस्थिती ओढावली ती ओढावणार नाही.'

**५.३ माता व देवता :-**

'हिंदूवर आज क्रांतीचा समय येऊन ठेपला आहे. आपण हिंदू बहुसंख्यांक असल्यामुळे अल्पसंख्यांकाचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. जगात माणसास अत्यंत प्रिय अशा दोन गोष्टी आहेत. त्या म्हणजे माता व देवता पण हिंदुस्थानात या दोहोंचा नेहमी अपमान होतो. तरी त्याबद्दल आपणास चीड येत नाही.

थोडक्यात, आपण बलवान नसल्यामुळे आपल्या आई-बहिण व देव देवता यांचा अपमान होऊ नये, यासाठी तरुण पिढीस सक्षम केले पाहिजे.

खेडेगावी व्यायामाचा प्रसार करण्याचे कार्य या महाराष्ट्रात तरी अपूर्व असे आहे आणि ध्येय या व्यायामशाळेने आपल्यापुढे ठेविले हे खरोखरच त्यांस भूषणावह आहे. खेडेगावी तरुणांचे संघ निर्माण करुन आपल्या मानांचे, देवळांचे, तसेच मशिदीचे संरक्षण करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. कोणी अत्याचार केला, तर त्याचा कान पकडून त्यास ताळयावर आणण्याची जबाबदारी आम्हा बहुसंख्यांकावर आहे व ती आम्हास टाळाता येणार नाही. पनवेलच्या हनुमान

व्यायाम मंदिराला असे वाटले पाहिजे की, पनवेलच्या मानापमानाचे संरक्षण करणे हे आपले काम आहे. स्वातंत्र्य मिळविण्याचा भार आपल्यावर आहे. नागपूर व अकोले या ठिकाणी हिंदू व मुसलमान बळाने समसमान आहेत. म्हणून एकी आहे. पण जेथे हिंदू दुर्बल आहेत तेथे अत्याचार आहे, म्हणून व्यायाम घेतांना या प्रतिज्ञेने व्यायाम घ्या की, ज्या ज्या ठिकाणी मी असेन तेथील देवतांचा व स्त्रियांचा आपण अपमान करुन देणार नाही आणि मागण्यांचा प्रभाव किती लवकर पडतो तो पहा. शक्य तितक्या लवकर हे कार्यक्षेत्र वाढवा व हुशारीने तरतरीने आपल्या शिक्षकांसारख्या शांत डोक्याने व नेटाने हे कार्य पुढे चालवा. देश बलवान व सशक्त होण्यासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे व त्यासाठी त्यांनी गावोगावी व्यायाम प्रसार करण्याचे कार्य करावे, म्हणजे आपल्या देव देवता व माता यांची विटंबना होणार नाही.'[१३]

**५.४ मुसलमानी अत्याचार आणि काँग्रेस :-**

१) मुसलमान गुंड अन्य अल्पसंख्यांक जातीवर ख्रिश्चन, पार्शी, युरोपियन, वगैरेवर अत्याचार सहसा करीत नाहीत.

२) कारण हया जातीमध्ये प्रतिकाराची नांगरी, प्रतिकार करण्यास सदैव सिध्द असते.

३) हिंदु लोक बहुसंख्य असूनही ते मुसलमानांचा प्रतिकार करीत नाहीत. म्हणून मुसलमान गुंड त्यांच्यावर अत्याचार करतात. अत्याचारांचे हे व्यसन, विनामूल्य अगदी फुकट हिंदुंवर आक्रमण करुन त्यांना पुरविता येते. म्हणूनच मुसलमान गुंड हिंदुंवर अत्याचार करण्यास धजावतात.

४) हिंदुमधली प्रतिकाराची शक्ति काही सर्व नष्ट झाली नाही. कारण, इंग्रज सरकारएवढे चतुरंग दलाने बलवान, परंतु त्यांच्याही अभ्यायांचा प्रतिकार गेल्या पन्नास वर्षे एकसारखा सौम्य मार्गांनी हिंदूंनीच केवळ केला. मर्मभेदी लेख लिहिण्यापासून तो प्रत्यक्ष प्राण देण्याघेण्यापर्यंतच्या अनेक मार्गांनी हिंदूंनीच राजसत्तेशी स्वराज्याचा झगडा इष्ट, अनिष्ट, मार्गांनी चालविला, तेंव्हा हिंदु अगदीच प्रतिकारशून्य बनला नाही.

५) परंतु याच गेल्या १०-१२ वर्षाच्या अवधीत हिंदुंनी सरकारशी सारखा निकराचा विरोध केला.

६) हिंदुंतील अबलांनीही प्रतिकाराचे बलशलित्त्व दाखविले.

७) मग याच अवधीत मुसलमानांचाच प्रतिकार त्यांनी का नाही केला? मुसलमानांशीच ते प्रतिकारहिन का बनले? कुणी त्यांना असे बनविले.[१४] आज आपण याची फळे भोगत आहोत, याची प्रचिती देशभर येत आहे. सध्या यवनी आतंकवाद सर्व जगाला डोकेदुखी बनत चालला आहे.

मुख्यतः शेवटच्या मुद्दयाचा विचार करावयाचा आहे. मुसलमानाशीच हिंदु प्रतिकारहीन का बनले? कुणी त्यांना असे बनविले, या मुख्य विषयाचा आपण विचार करु. हिंदु माणूस हा सर्व साधारणपणे स्वभावतःच स्वराज्यप्रिय असतो. त्याला स्वराज्याची मोठी लालसा लागलेली असते. म्हणूनच स्वराज्याच्या गेल्या अर्ध्या शतकाच्या निकराच्या लढयात हिंदुच अग्रेसर आहेत. इतकेच नव्हे तर तेच प्रामुख्याने सर्वस्व दान करुन हा लढा चालवीत आहेत. तेव्हा हया उपायांनी अथवा त्या साधनांनी स्वराज्य मिळेल, असे त्यांस सांगितल्यास ते मग कशाचीही पर्वा न करता ते ते उपाय त्या त्या साधनांनी शक्य तो करीत असतात. सर्वानीच काही सर्वस्वदान करता येणे शक्य नसते. परंतु बहुतेकांची असे सर्वस्वदान करण्यास सिध्द झालेल्या स्वराज्यसेवकांना सहानुभूती व नैतिक पाठिंबा असतो. हा नियमसंबंध स्वराज्याच्या झगडयांत आपणास सर्वत्र दिसून येईल. अशी हिंदूची मनोवृत्ती स्वराज्यासक्त असल्याने ज्या वेळी महात्मा गांधींनी 'एक वर्षात स्वराज्य' अशी आरोळी ठोकली, त्यावेळी हिंदुमधली बहुतेक जनता त्या भावनोद्दीपक गर्जनेने उत्तेजित झाली व एका वर्षात स्वराज्य या किमयेला साध्य करण्याला जी-जी म्हणून साधने गांधीजी या किमयाकारांनी सांगितली, ती अखिल हिंदुजनतेने पुरविण्यांत अहमहमिका लावली.

कोकोनाडाला गांधीजींनी फुंक मारुन सांगितले की, स्वराज्य हवे ना? तर मग तीन महिन्यांत १ कोटी सभासद १ कोटी रुपये व १ कोटी चरखे इतके साहित्य पैदा करा. लागलीच सर्व देशभर प्रचंड आंदोलन सुरु झाले व हिंदुंनीच बव्हंशी यावरील मागण्या जवळजवळ पूर्ण केल्या. प्रथम अशक्य वाटणाऱ्या या गोष्टी एक वर्षात स्वराज्य या मोहक कल्पनेवर मोहून जाऊन अखिल हिंदुंनी पुऱ्या पाडल्या, त्याच वेळी गांधीजींनी आणखी एक अट घातली. मागणी सांगितली व ती म्हणजे 'हिंदु

मुसलमानांच्या एकीवाचून स्वराज्य नाही' स्वराज्य प्रिय हिंदु लोक तत्क्षणी म्हणाले की, ठिक आहे, आम्ही मुसलमानांशी पूर्ण एकी करतो.[१५]

या ठिकाणी गांधीजींवर त्यांनी टीका केली आहे. गांधीजींची काही तत्त्वे त्यांना मारक वाटतात. यांची काही उदाहरणावरुन सांगितले आहे.

'परंतु दुर्दैवाने 'दोघांतली एकी' ही अशी वस्तु आहे की, ती दोघांच्याही प्रयत्नावाचून साध्य होत नाही. टाळी वाजावयास जसा एक हात पुरा नाही तशी, दोघांची एकी व्हावयास एक पक्षच सिध्द असून भागत नाही. त्याला दोन्ही पक्ष सिध्द असावे लागतात. परंतु हिंदु-मुसलमानांच्या एकीच्या संबंधात हिंदु जरी एका पायावर एकी करावयास सिध्द होते, तरी मुसलमानांना ही एकी कधीच नको होती. कारण त्यांना हिंदुस्थानच्या राज्यासंबंधी कधीच प्रेम नव्हते. इतकेच नव्हे तर हिंदुस्थानला स्वराज्य मिळणे त्यांना अनिष्टच वाटत होते. म्हणून जरी त्यांनी हजार वर्ष जवळ जवळ या हिंदुस्थानच्या अन्नावरच काढली, तरी त्या अन्नाशी कृतघ्न होऊन ते अन्न देणाऱ्या हिंदुस्थानच्या भोजनाकरता त्यांनी कधीही यत्न केला नाही. तर हिंदुचे व हिंदुस्थानचे काहीही होवो. आपल्या इस्लामीकरणाच्या कल्पनेला सुकरपणा आणि सहाय्य मिळून हे हिंदुस्थानला मुस्लेमस्थान अथवा त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे 'पाकस्थान' कधी होईल व येथे स्वराज्य म्हणजे 'मुस्लीमराज्य' कधी स्थापन होईल, याचीच विवंचना ते करीत होते व म्हणून जेव्हा जेव्हा हिंदु स्वराज्याकरता तीव्रतेने झगडून सरकारवर मात करण्याच्या बेतात असत, तेव्हा तेव्हा मुसलमान लोक सरकारला उघड उघड सामील होऊन हिंदुविरुध्द त्यांना सहाय्य करीत असत व त्यांच्या बदली केवळ मुसलमान समाजच अधिक अधिकारांची लाच स्वीकारीत. असा त्यांचा स्वार्थी डाव असल्याने त्यांना हिंदुपेक्षा सरकारशीच ऐक्य करणे अधिक लाभाचे होते व त्याप्रमाणे त्यांनी ते करुन सरकारकडून नुकतीच जातीयनिर्णयाच्या रुपाने भरपूर लाच उपटली. अशी मुसलमानांची स्वार्थी व सवद्याची मनोवृत्ती असल्याने जो जो हिंदु त्यांच्याशी एकी करण्याकरता जात तो तो ते अडेल तट्टाप्रमाणे अडून बसत. त्यांतच गांधीजींनी व त्यांच्या सावलीखाली वाढलेल्या राष्ट्रीय सभेने हिंदुंना सारखे पढविले की, हिंदु-मुसलमानांच्या एकीवाचून स्वराज्य नाही. मुसलमानांना आर्जवाने विनविले की, तुमच्या सहकार्यावाचून आमचे मुळीच चालणार नाही. स्वराज्य आम्ही मिळवू शकणार नाही. या विषयास्त असत्य व

आत्मघातकी शिकवणुकीने हिंदु मुसलमानांशी नमून, दबून वागू लागले. मुसलमान शिरजोरपणाने हिंदुंचा पदोपदी अधिक्षेप करुन अन्यय मागण्या मागून अतिक्रमण व अत्याचार करु लागले. या अतिक्रमणाचा आणि अत्याचाराचा प्रतिकार हिंदुंकडून होईनासा झाला. मुख्य कारण हे की, त्यांना गांधींनी व राष्ट्रीय सभेने सारखे पटवून ठेवले की, मुसलमानांना ते ते द्या. करतील ते ते सहन करा, कारण नाही तर मुसलमान रागावेल व एकी करणार नाही व मग स्वराज्यही मिळणार नाही. असल्या अव्यावहारिक, भाबडया आत्मघातकी शिकवणुकीने हिंदुंची मुसलमानांचा प्रतिकार करण्याची, त्यांच्या अत्याचाराची, शासन करण्याची मनःप्रवृत्तीच मुळी खुरटून गेली व त्याचा परिणाम असा झाला की, मुसलमानांनी मनप्रवृत्ती बेफाम, निर्धास्त व अरेरावीची बनून त्यांनी रोजच्या जीवनक्रमांतही हिंदुंची मानहानी करण्याची पध्दतशीर रचना केली.हिंदुंच्या मिरवणुकीवर हल्ले करणे, त्यांची मुले पळविणे, त्यांच्या स्त्रियांना भ्रष्ट करुन त्यांचे अपहरण करणे, हिंदुंचे मुसलमानीकरण करणे व अंती हिंदुंना संघटित व प्रबळ करु झटणाऱ्या हिंदु पुढाऱ्यांचे मधून मधून खून पाडणे हे प्रकार एक प्रकारच्या संघटित प्रयत्नांनी घडू लागले. मोपल्यांचे अल्लाउद्दिनी औरंगजेबी आणि हैदर टिप्पूशाही अत्याचार हिंदुवर झाले.'[१६]

हिंदू हा सहिष्णु व सहनशील आहे. त्यांचा मुसलमानांवर राग नाही पण त्यांच्या बदलत्या प्रवृत्तीबद्दल त्यांना शंका आहे. म्हणून हिंदूंनी सावध राहावे, व सशक्त व्हावे, आपल्या पायावर उभे राहावे यातच त्यांचे भले आहे.

'गांधीजींनी व त्याच्या मागून अंधत्त्वाने जाणाऱ्या राष्ट्रीय सभेने सर्व हिंदूंना असे गेले पंधरा वर्ष शिकविले की मुसलमान हे आपले बंधुत्व त्यांच्या सहाय्यावाचून स्वराज्य नाही व म्हणून त्यांनी काही अन्याय केले, आक्रमण केले तरी त्याविरुध्द 'ब्र' हि न काढणे हेच खरे देशभक्तीचे व स्वराज्य प्राप्तीचे प्रेम. याच घातक व अराष्ट्रीय शिकवणीने आज मुसलमानी अत्याचारांचा प्रतिकार करण्याची हिंदुंची शक्ति शिथिल झाली आहे. आणि त्याचा परिणाम मुसलमानांना अधिक आक्रमणशील व अत्याचारप्रवृत्त करण्यात झाला आहे. मुसलमान आज अवघ्या, अदोष्य, अप्रतिकारार्ह या गांधी नीतीप्रमाणे मनाला जात आहे. आणि म्हणून त्याने केलेल्या कोणत्याही अपराधाकडे दुर्लक्ष करण्यात कोणत्याही अत्याचाराचे पारिपस्य न करण्यात एक प्रकारे हिंदु-मुसलमान ऐक्याच्या स्थापनेला आपण सहाय्य करीत

आहो, अशी खुळी व भावडी कल्पना राष्ट्रसभावाले व गांधीजी करुन घेत आहत. याचा परिणाम एकंदर बहुसंख्यांक हिंदुंवर अपरिहार्यपणे होत आहे व म्हणून मुसलमानी अत्याचारांचा योग्य प्रतिकार त्यांच्या हातून होत नाही. त्यामुळेच मुसलमान अधिकाधिक चढेल होत आहेत. खुनामागून खून पाडीत आहेत. तेव्हा या मुसलमानी अत्याचारांचेमुळे कारण गांधीचा असत्य उपदेश व राष्ट्रीय सभावाल्यांचे त्याप्रमाणे मुसलमानांनुरंजन हेच प्रामुख्याने होय. वरील विवेचनावरुन वाचकांच्या ध्यानात येते की आज जे मुसलमानी अत्याचारी आहेत यांचे खरे उत्तरदायित्त्व गांधीचे व राष्ट्रसभेचे आहे.'[१७]

थोडक्यात, राष्ट्रीय सभा व म. गांधींजींनी मुस्लीम समाजाची बाजू उचलून धरली किंवा त्यांना प्रोत्साहन दिले. मुसलमानांनी जेवढे अपराध केले याचे धनी राष्ट्रीय सभा किंवा गांधीजी होय, असे डॉ. सावरकरांचे म्हणणे योग्य वाटते.

**५.५ हिंदुधर्म संघटन :-**

कल्याण येथे डॉ. सावरकर यांचे हिंदुधर्म - संघटन या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. पुणे येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात हिंदु समाजातून जन्मतात उच्च-नीच्चतेच्या भावनेची हकालपट्टी करण्यासंबंधीच्या ठरावाची अंमलबजावणी प्रत्येक धर्माभिमानी हिंदुने करावी व हिंदुधर्मात माजलेले सर्व भेद नाहीसे करुन हिंदुसमाज बलवान करावा, अशी कळकळीची विनंती व्याख्यात्यांनी केली '[१८]

हिंदू समाज जर बलवान करावयाचा असेल तर त्यामधील जातिभेद, वंशभेद, वर्णभेद हा नष्ट व्हावयास हवा. नाहीतर हिंदू समाज सर्व जातीत, गटात, विखुरला जाईल व त्यांच्यात दरी निर्माण होऊन त्याची शकले होतील व तो दुर्बल बनेल.

**५.६ भायखळा देऊळ प्रकरण :-**

'भायखळा मंदिर सभा प्रकरणाबाबत मुंबई कार्पोरेशनने जी कमिटी नेमली होती, तिच्या प्रसिध्द झालेल्या अहवालात जोडून हिंदु व मुस्लीम लोकमत व्यक्त करणारे ठरावही जोडण्यात आले. पण हिंदूंचे ठराव देताना पक्षपात झाला, अशी तक्रार डॉ. सावरकर यांनी मेयरकडे केली. त्यांनी त्याचा पत्र पाठवून निषेध केला.

डॉ. सावरकर आपल्या पत्रात म्हणतात, कार्पोरेशनने नेमलेल्या कमिटीच्या अहवालाला जोडून काही पत्रे व ठराव दिलेले आहेत. त्यांत बहादुरखान यांचे पत्र

सविस्तर देण्यात आलेले आहेत. पण निरनिराळे ठराव व पत्रे पाठविली. त्यांना योग्य प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. मी पाठविलेली पत्रे अजिबात गाळण्यात आलेली असून, हिंदूंच्या सभामध्ये पास झालेले ठरावही संपूर्ण देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे हिंदुसमाजाच्या खऱ्या मताची योग्य कल्पना येणे, अशक्य झाले आहे. या पक्षपाताबद्दल योग्य ती चौकशी करण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली. अशा तऱ्हेचे प्रकार पुनः न होण्याची खबरदारी घेण्यात यावी, असेही त्यांनी सूचित केले.

सहस्रबुध्दे या प्रसिध्द कार्यकर्त्याचा अली बहादुरखान यांनी अपमानकारक उल्लेख केला आहे, त्याकडेही आपले लक्ष वेधणे जरुर आहे अलीबहादुरखान आपली चूक सुधारतील.'[१९]

**हिंदु संघटनेवरील विचार :-**

वडाळा येथे श्रीविठ्ठल मंदिराच्या विस्तीर्ण पटांगणात साजरा होत असलेल्या श्रीभवानी नवरात्रेत्सवामध्ये अनंत हरि गद्रे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचे हिंदुसंघटनेवर व्याख्यान झाले. हया व्याख्यानांत डॉ. सावरकर म्हणाले,

'हिंदुसमाजाला आलेला दुबळेपणा आता धैर्याने नष्ट केला पाहिजे. आपण हिंदु लोक शौर्य, धैर्य, बुध्दिमत्ता, पावित्र्य तपश्चर्या, स्वार्थत्याग यापैकी प्रत्येकी गुणांत श्रेष्ठत्व ठरविली आहोत. आपल्या थोर पूर्वजांनी आपल्या अंगातील सद्‌गुणांनी आपल्या धर्माचे व समाजांचे नाव हजारो वर्ष गाजविलेले आहे. आज आपण सामुदायिक दृष्टीने दुबळे झालेले दिसत असलो तरी संघशक्तीचा अवलंबल्यास आपण पुनश्चः सामर्थ्यसंपन्न झाल्याशिवाय राहणार नाही. संघबलाच्या आड जातिभेद येतो म्हणून आपण आता जात तोडण्याचे कार्य आरंभिले पाहिजे. कोणीही जन्माने श्रेष्ठ नाही आणि कोणीही जन्माने कनिष्ठ नाही, ही उज्ज्वल भावना २६ कोटी हिंदूच्या अंतःकरणात दृढमूल झाली म्हणजे जातीच्या बेडया तोडावयास आपणास क्षणाचाही विलंब लागणार नाही. जन्माने नव्हे तर स्वातंत्र्याच्या शिखरावर विराजमान झालेले होते. त्यावेळी गुणकर्मावरुनच माणसाचे निरनिराळे वर्ण ओळखले जात असत. संस्कारामुळे द्विजत्व येते हे वचन सुप्रसिध्द आहे.'[२०]

'आपल्या मुंबई शहरात जे कोणी ब्राम्हण असतील त्यांतील सर्वश्रेष्ठ ब्राम्हण म्हणजे ज्ञानसंपन्न आणि विद्याविभूषित असे डॉ. आंबेडकर हेच होत. नारायणराव

कानरोळकर हे जन्माने अस्पृश्य मानले जात असले तरी गुणकर्मांनी श्रेष्ठ प्रतीचे वैश्यच आहेत. ज्या अस्पृश्य बंधूंना गेल्या दंग्याच्या वेळी कामाठीपुऱ्यांतील हिंदुच्या देवळाचे रक्षण केले. त्यांसच खरे क्षत्रिय म्हटले पाहिजे. अशा प्रकारे जन्मजात जातिभेद नष्ट करणे आणि गुणकर्माचा पूर्ण विकास करण्यास प्रत्येक हिंदुला स्वातंत्र्य देणे, म्हणजेच खरे हिंदुसंघटन करणे होय. अशा रीतीने हिंदुसंघटन झाले, तर आपले हिंदु राष्ट्र कोणाच्याही अन्यायमूलक आक्रमणास उत्तम प्रकारे प्रतिरोधच करील. थोडक्यात, पूर्वीच्या काळी जातिभेद होते. त्यात ब्राम्हण श्रेष्ठ होते, पण जो ज्ञानसंपन्न व विद्याविभूषित अशी जी व्यक्ती ती ब्राम्हण होय. त्या वेळी डॉ. बाबासाहेब हे ज्ञानसंपन्न व गुणसंपन्न होते, त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा डॉ. सावरकरांनी ब्राम्हण म्हणून उल्लेख केला. सर्वांनी गुणकर्माचा विकास केला तर जातिभेद नष्ट होतील आणि हिंदू सामर्थ्यशाली होईल. कोणत्याही अन्यायकारक व आक्रमणास थोपवून धरल्यावाचून राहणार नाही.

आजच्या परिस्थितीत जातिभेदांचे उच्चारण करुन एकाच हिंदुधर्माच्या नावाने आपण जयजयकार केला पाहिजे, हा धर्माचा जयजयकार २६ कोटीच्या हिंदु राष्ट्राला बलवान संपन्न करील, यात शंकाच नाही.'[२१]

हिंदु राष्ट्र जातिभेदामुळे दुर्बल झाले आहे. त्या जातीच्या बेडया तोडल्या तर राष्ट्र सक्षम व बलवान झाल्याशिवाय राहणार नाही, असे डॉ. सावरकर यांना वाटते.

**५.७ डॉ. सावरकर यांचा हिंदूंना संदेश :-**

'शिवजयंती उत्सवाकरिता डॉ. ना.दा. सावरकर ........ मध्ये या गावी गेले होते. तेथे आल्यावर डॉ. साहेबांनी येथील रायफल क्लबला भेट दिली. मारवाडी व्यायाशाळेत दाऊलाल सोनी वकील यांचे अध्यक्षतेखाली डॉ. सावरकर यांचे 'हैद्राबाद सत्याग्रह' या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी सभेला पुष्कळ लोक उपस्थित होते. सभेमध्ये सोनी यांनी सत्याग्रहास मदत मिळवून देण्याचे कबूल केले. शेवटी मदनलालजी यांनी डॉक्टरसाहेबांचे आभार मानून सभेचे काम संपले.'[२२]

हैद्राबाद संस्थान विलीन करण्यात तेथील मुस्लिम संस्थानिकांनी विरोध केला होता.

'गांधी मैदानावर शिवजयंतीकरिता कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्या प्रसंगी डॉ. सावरकर हे मुख्य वक्ते असल्यामुळे स्त्री पुरुषांची मोठया प्रमाणावर गर्दी जमली होती.

येथील शिवजयंती उत्सव हा हिंदुमहासभा, आर्यसमाज वाङ्‌मय उपासक मंडळ, हिंदुधर्म, भजनीमंडळ, सोशल क्लब, ललितलता नाटयसंवर्धक मंडळ, चित्रकार मंडळ या संस्थातर्फे साजरा करण्यात आला. डॉ. नारायणराव सावरकरांच्या हस्ते ध्वजाला व श्री शिवाजी महाराजांच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. डॉक्टर साहेबांनी श्री शिवाजी महाराजांचे उज्ज्वल चरित्र श्रोत्यांपुढे ठेवले व त्या चरित्रावरुन तरुणांना संदेश सांगितला की, 'आम्ही एकटे हिंदु' आमचे स्वराज्य मिळवू, स्वातंत्र्य मिळवू'. (टाळया) मुसलमानांनी शतकानुशतके या देशाचे अन्न खाल्ले आहे. त्यांची माती या मातीला मिळाली आहे. त्या निमकाला जागून जर ते मदत करु लागले तर आमची ना नाही.

पण हिंदुनी कोणाची भीक न मागता, कोणाची याचना न करिता आम्ही स्वतः आमचे स्वातंत्र्य मिळवू हा ठाम विश्वास बाळगावा. मुसलमानांच्या शिवाय स्वराज्य मिळणार नाही ही भावना आपल्या हृदयांतून काढून टाका.'[२३]

'आज आम्ही संघटित होत आहोत ते दुसऱ्यावर आक्रमण करण्याकरिता नाही, तर त्यांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याकरिता, स्वराज्य मिळविण्याकरिता. आम्हाला नष्ट करायला अनेक औरंगजेब झाले, अनेक निजाम झाले, पण त्या प्रत्येकाला एक एक शिवाजी एक एक बाजी निर्माण झाला. आज निजामच्या राज्यांतील हिंदूंना आपली धार्मिक कृत्ये करण्याला सुध्दा परवानगी नाही. ते संकटांत सापडून टाहो फोडीत आहेत. त्यांच्या हाकेला प्रतिसाद देऊन आजचा शिवउत्सव साजरा करण्यास उदयापासून येथून स्वयंसेवक पाठविण्यास सुरुवात करा. त्यांना सर्वांनी यथाशक्ती मदत करा. सत्याग्रहाला स्त्रियांनी मात्र जाऊ नये. त्यांनी अन्य मार्गांनी मदत करावी, असे डॉ. सावरकर यांनी समाजाला आवाहन केले. यावेळी वंदे मातरम् गीत होऊन सभेचे कार्य संपले. दीड दोन हजारांवर लोकसमुदाय हजर होता.'[२४]

### ५.८ हिंदु समाज जाति व राष्ट्रविघातक :-

'हिंदु धर्मातून श्रीमंत बाजीराव पेशव्यांना बहिष्कृत करावे म्हणून पुण्यातील ब्राम्हणांनी घाट घातला होता, पण दोन औतरीय ब्राम्हणांच्या दूरदर्शीपणामुळे तो प्रसंग टळला आणि हिंदु जाति एका महान संकटातून बचावली. ही कथा गेल्या अंबी 'ती तिखट तलवार कोण पेलणार' या शीर्षकाखाली द.न. गोखले यांनी रंगविली आहे, त्या कथेच्या अगदी विरुध्द अशी कथा बंगालमध्ये घडली आणि हिंदु जातीचा फार मोठा नाश झाला. एक हिंदू बाटला तर काय अनर्थ होतो याची पूर्ण कल्पना वाचकांना यावी म्हणून डॉ.ना.दा. सावरकर यांच्या लेखणीतून उतरलेली ती कथा 'राष्ट्रमीमांसा' या पुस्तकातून उद्धृत करीत आहोत.'[२५]

'बंगालमध्ये ढाक्यात एक सुवृत्त, व्यायामप्रिय, स्नानसंध्यानिष्ठ व असीम धर्मनी ब्राम्हण युवक राहात असे. नित्याप्रमाणे ब्रम्हपुत्रा नदीवरुन स्नान करुन पवित्र वस्त्र परिधान केलेला, अंगाला भस्म चर्चिलेला व तोंडाने मंत्र म्हणत घराचा मार्ग त्या वेळच्या ढाक्याच्या नबाबाच्या वाडयावरुन जाणारा होता. तो वाडयापुढून मार्गाने जात असता नबाबाच्या मुलीने आपल्या वाडयाच्या खिडकीतून त्या तरुण ब्राम्हणाची ती सुडौल सुगठित, सुंदर व तरुण अशी उघडी तून पहाताच तिने तारुण्यसुलभ आवनावश परंतु एकनिष्ठ अशा मनाने त्याला पतिरुपाने स्वीकारले व त्याच भावनावेशात आपल्या पित्याकडे येऊन तिने आपला निश्चय कळविला. नबाबाची ती लाडकी मुलगी होती, नबाबाने लागलीच तो तरुण कोण, या निश्चयपूर्वक शोध आताच लागू शकेल या कल्पनेने त्याचे मागे आपला दूत पाठवून दिला. त्याला नबाबाकडे चालण्याला सांगितले. तो तरुण त्या दूताच्या आमंत्रणावरुन मागे परतला. नबाबाने थोडक्यात विचारले, तू माझ्या मुलीशी लग्न लावले पाहिजे. असे त्याने सांगितले. तो नबाब मुसलमान हा तरुण धर्मनिष्ठ हिंदु-ब्राम्हण नबाबाची ती सूचना ऐकताच तो तरुण निश्चयाने व क्षणाचाही विलंब न लावता अशक्य. मी ब्राम्हण - मुसलमान मुलीशी विवाह कसा करु नबाब म्हणाला, 'ती म्हणून तू लग्न करीत नसल्यास तर तिला हिंदू करुन घेऊन मग तिच्याशी लग्न लावू'. अर्थात, ही गोष्ट तर सर्वथा अशक्यच. मुसलमान वा ख्रिस्ती वा कोणीही हिंन्देतर हिंदु होणे ही कल्पनाही आमच्या सनातन हिंदुत्वाला असहनीय आहे, त्याने केवढा धर्मघात होणार, त्या मुसलमान कुमारीला तो ब्राम्हण युवक हिंदु करुन घेण्याला असंमत,

लग्न लावण्याला विरुध्द. तो नबाबाने आपला, आपल्या मुलीचा, आपल्या नबाबपणाचा अपमान समजून त्या तरुणाला बंदीत टाकले. तरीही तो नबाब अदयाप पूर्ण क्रूर बनला नव्हता. त्या तरुणाच्या बापाला बोलावून आणून आपल्यापरी त्याला समजावून देण्याचा प्रयत्न त्याने केला. त्यानेही मुलीशी लग्न करण्यास नकार दिला. आता मात्र नबाबाचा पारा पूर्णांशावर गेला. त्याच्यातील सुज्जता आटून गेली व तेथे पूर्ण क्रूरतेचा उदय झाला. त्या तरुणाला आपल्या आज्ञाभंगासाठी व मुलीच्या प्रेमाच्या भंगास्तव त्याने ठार मारण्याची आज्ञा दिली.'[२६]

नबाबाची ठार मारण्याची आज्ञा झाली. ठरल्यावेळी चांडाळ त्या तरुणाला आपल्या तलवारीने मृत्युमुखी पाठवण्याला उदयुक्त झाला. या जागतिक महाबंधनांना लीलेने तोडून टाकून धर्मवीरांच्या महनीय मरणाला आपल्या परमपवित्र धर्मकल्पनासाठी आत्मबलिदानाला सहज सिध्द झाला. दिव्यप्रेमनिष्ठेने प्रेरित पण निराशाग्रस्ततेने देहभानावर नसलेली ती नबाबकन्या धापा टाकीत धावत धावत त्या मारत्या तरुणावरील त्या मारत्या चांडाळाच्या उगारल्या गेलेल्या तलवारीपुढे उभे राहून शोकाकुलतेने म्हणते, त्यांना नव्हे मला - जिच्यासाठी माझ्या प्रेमदेवाचा प्राण बळी घेतला जात आहे त्या मला मारा'. त्या दिव्य व एकनिष्ठ प्रेमाने त्या तरुणाच्या मनांतील मुसलमानी कुमारीचे चित्र त्याच्या मनोदृष्टीपुढून पूसून जाऊन दिव्य पतिव्रत्य व्रताची उपासिका, भक्तिनी त्याला तेथे दिसली. त्याने तिला मनाने हिंदु करुन घेतले. तो म्हणाला, 'मी तुझ्याशी लग्न करण्याला सिध्द आहे.' तो धर्मनिष्ठ ब्राम्हण कुमार व पतिनिष्ठ नबाबकुमारी नबाबाने कुरवाळली व ब्राम्हणकुमाराने त्या कुमारीला सदैव हिंदु करुन घेऊन लग्न करण्याला त्या नबाबाने त्या तरुणाला पूर्ण संमती दिली. पण हा विपर्यस्त धर्मकल्पनाधारी हिंदुसमाज त्या मुसलमान कुमारीला हिंदु कसा करणार. उलट त्या ब्राम्हण कुमाराला मुसलमानीत ढकलण्यास हिंदुसमाज सिध्द झाला. हिंदुसमाजात थारा देण्यास कोणीही सिध्द नाही हे पाहून त्याने श्री जगन्नाथच्या चरणी आपली कागाळी नेण्याचा व त्याचे पायाशी धरणे धरण्याचा निश्चय करुन तो जगन्नाथपुरीस गेला. चवनसंसर्गी झालेल्या त्याला देवालयात प्रवेश कुठला पण कमीतकमी जेथून श्री जगन्नाथमूर्तीचे दर्शन होईल अशा महाद्वाराजवळील स्थानावर या विवाहबध्द होऊ पाहणाऱ्या युगुलाने धरणे दिले. देव केवळ भक्तिप्रिय, यावर त्यांचा विश्वास. त्या विश्वासाच्या बळावर त्यांनी आपले भवितव्य अवलंबून

ठेवून तेथे ठाण मांडले. पण हे धर्मनिष्ठ हिंदुंना कसे मान्य व्हावयाचे? त्या देवालयांतील देवधर्म रक्षक त्या खऱ्या देवधर्मनिष्ठेच्या ब्राम्हणकुमाराला त्या यवनकुमारीसह बसणे अशक्य करुन टाकले.'[२७]

'तो ब्राम्हणकुमार तरी मनुष्यच, मनुष्याच्या निष्ठेची तार खेचली, जाण्यालासुध्दा मर्यादा असणारच. त्याचे मन विरक्त व विषण्ण झाले. हिंदुसमाज लाथा मारणार, देव उपेक्षा करणार, भक्तांची उपेक्षा देव करीत नाही असा चिरंतन अनुभव पण कदाचित हिंदुंच्या धर्मघातक कल्पनांच्या दोषासाठी त्यांना चांगले कोरडे बसावेत. म्हणूनच की काय कोण जाणे देव पावला नाही व त्या ब्राम्हणकुमाराच्या मनोवृत्तीने उलट खाल्ली. त्याच्या एकांतिक धर्मनिष्ठेचे कट्टर धर्मकंठकामध्ये रुपांतर झाले आणि श्रीजगन्नाथाचे चरणापाशी अवश्य तर प्राण ठेवण्यासाठी आलेला तो कुमार हिंदुसमाजनाशनाची व देवमूर्तीभंजनाची प्रतिज्ञा करीत उठणारा महाभयंकर काळ यवन बनून तेथून उठला. नबाबकन्येचे पाणिग्रहण तर त्याने केलेच पण तिला हिंदु करण्याचे कामी 'हिंदु जातीने अनन्वित छलपूर्वक अपयश दिल्याने चिडून स्वतःच तो तरुण मुसलमान झाला तो कट्टर हिंदु, हिंदुच्या एकांतिक मूर्खतेने कट्टर मुसलमान झाला. त्याने पुढे बंगालमध्ये हजारो हिंदुंना भ्रष्ट करुन त्यांचे मुसलमानीकरण व शेकडो देवालये व देवमूर्ती तोडून फोडून हिंदुत्त्व नाशनाचा प्रयत्नही इतक्या भयंकरपणे केला की, तो पुढे बंगालमधील मुसलमानी संख्या वाढण्याला हाच मुख्यत्त्वे कारणीभूत झाला. असल्या काळया पहाडांना निर्माण करणारा हिंदु समाज जाति व राष्ट्रविघातक ठरला.'[२८] थोडक्यात हिंदूच हिंदूचे शत्रू झाला व त्या कुमारला हिंदू करुन घेतल्यामुळे हिंदूंचा मोठया प्रमाणावर नाश झाला.

**५.९ शुध्दी चळवळ :-**

सावरकरांनी हिंदू संघटन, अस्पृश्यता निवारण, हया संबधी आपले स्पष्ट विचार लोकांपुढे मांडले. हे त्यांचे भाषण परिणामकारक होते. त्यांनी अस्पृश्य लोकांना शिक्षण देऊन आपल्यामध्ये सामावून घेण्याची कळकळीची विनंती केली. मिरज नि सांगलीची १५० ते २०० मंडळी स्वयंस्फूर्तिने जमलेली होती.[२९]

१९२५ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवडयांत बेळगांव येथे हिंदुमहासभेची परिषद झाली, त्यांत डॉ. मुंजे यांनी विनायक सावरकरांनी केलेली हिंदूची व्याख्या सांगितली. हिंदुसभेने संमत केलेल्या ठरावात म्हटले आहे की, हिंदूनी सर्वसाधारण

राजकीय प्रश्नासंबंधाने इतर परधर्मीय जातींशी शक्य तितके बंधूभावाने वागून एक दिलाने काम करावे. अस्पृश्यांचा उद्धार करण्याचे प्रयत्न करावेत. त्यांच्यासाठी शाळा बांधाव्यात. विहिरी, देवदर्शन, यात्रा, विवाह, नौकाप्रवास, युद्ध आदि ठिकाणी स्पृश्यास्पृश्य भेदभाव नसावा. हया अधिवेशनाला लाला हंसराज, लाला लजपतराय, राजा नरेंद्रनाथ, सर चिंतामणी, राजा रामपालसिंग, बाबू राजेंद्रप्रसाद, डॉ. अणे, डॉ. मुंजे, सत्यमूर्ती, टी. प्रकाश, बॅ. जयकर, न. चिं. केळकर, डॉ. ना. दा. सावरकर प्रभृति नेते उपस्थित होते.[३०]

सावरकरांच्या अस्पृश्यता निवारण्यासबंधीच्या मताचा प्रभाव त्यावेळी महाराष्ट्रात दिसू लागला होता. ११ व १२ मे १९२५ ला सातारा येथे भरलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अध्यक्ष पदावरुन बॅ. रामराव देशमुख यांनी भाषण करतांना म्हटले की, खरे पाहिले असता अस्पृश्यता निवारण करणे हे सामाजिक कर्तव्य असो वा नसो, पण राष्ट्रीयदृष्टया आज ते महत्त्वाचे कर्तव्य होऊन बसले आहे. सहा कोटी अस्पृश्यांना शाळा मोकळया नसणे, सार्वजनिक विहिरी, नळ, तळी, हौद मोकळी नसणे म्हणजे अस्पृश्यांच्या बहुसख्यांक वर्गाने सहा कोटी मनुष्यांना गुलामगिरीत ठेवणे नव्हे काय ? हिंदुस्थानातील बहुसंख्य मुसलमानांचा वर्ग स्वतःला हया देशातील समजतच नाही ! हिंदुस्थान बाहेर आपले सार सर्वस्व आहे, असे वाटून त्यांच्याशीच एकरुप होण्यात खरा आपलेपणा ते मानतात. यासाठींच हिंदुसंघटन नि शुध्दी चळवळ यांस पाठिंबा देणे आवश्यक आहे. हया परिषदेने वीर सावरकरांवरील बंधने उठवावीत, अशी मागणी करणारा प्रस्ताव संमत केला.

बॅ. रामराव देशमुख ज्या चळवळीला पाठिंबा देणे आवश्यक आहे, असे सांगत होते, ती चळवळ सावरकर स्वतः करीत होतेच. ३०-४-१९२५ ला राष्ट्रीय विद्यालयाच्या वार्षिक उत्सवासाठी ते वेंगुर्ले येथे गेले होते. विनायक सावरकरांसमवेत डॉ. सावरकर नि अप्पा पटवर्धनही होते. दि. ३१ ला तेथील स्टुडंट्स ब्रदर हूड नि स्पोर्टिंग क्लब यांच्या वतीने सावरकरांचे व्याख्यान झाले. त्यावेळी त्यांनी अस्पृश्यता निवारण, स्वदेशी नि व्यायामशाळा यांचे महत्त्व सांगितले. व्याख्यानानंतर सावरकर तेथील तरुणांना देवून महारवाडयांत गेले. तेथील लोकांना उपदेशाचे चार शब्द सांगून सावरकरांनी पुढे जाऊन मिशनऱ्यांची वस्ती नि त्यांनी चालविलेले काम पाहिले. तेथून परत आल्यावर रात्रौ रामेश्वराच्या देवळांत

हिंदुसंघटन हया विषयावर सावरकरांचे दीड तास भाषण झाले. ते म्हणाले, हिंदूजातीची सर्वांगीण उन्नती करुन तिला अखिल मानवतेच्या सेवेस योग्य नि कार्यक्षम करणे हा हिंदुसंघटनेचा उद्देश आहे. इतर धर्माचे लोक आपापली संघटना करीत असता, ते अनेक हिंदूना बाटवीत असता, कोळट, गुलबर्गा, मलबार या सारखे अत्याचार हिंदूवर होत असता आपण हात जोडून स्वस्थ बसावे हे योग्य आहे काय ? आमचे स्वस्थ बसणे, आमची सच्चाई हेच आज दुर्गुण ठरत आहेत. आपल्या समाजांतील अस्पृश्यतेसारख्या चालीरीती कशा चुकीच्या नि आत्मघातक ठरत आहेत हें दाखवून सावरकर म्हणाले, की येथील मिशनऱ्यांनी चालविलेली महारांची शाळा बंद करा. ती शाळा तुम्ही चालवा ! म्युनिसिपालीटीस ती शाळा चालविण्यास भाग पाडा !! आखाडयांची आवश्यकता सांगून ते म्हणाले कीं, येथील तरुणांनी स्वतः आखाडा काढावा, तसेच म्युनिसिपालिटीनेहि तरुणांची प्रकृति नीट रहाण्यासाठी आखाडा उघडावा. हयात भाषणांत त्यांनी स्वदेशीचेहि महत्त्व सांगितले.[३१] आखाडयामुळे युवक बलवान होतील व तरुणांमध्ये नवीन जोम निर्माण होईल, असे नारायणराव सावरकरांना वाटत होते.

दापोलीच्या धाक्रस यांच्या कनिष्ठ मुलीचा विवाह करुन द्यावयाचा होता. सावरकरांनी स्वतः पितांबर नेसून हया मुलीचे कन्यादान केले ! डॉ. ना. दा. सावरकर यांचे एक मित्र गोचडे हया शुद्धीकृत मुलीशी विवाह करण्यात सिद्ध झाले होते. हया विवाहासाठीं लागणारा व्ययहि सावरकरांनी केला. त्यांच्या कागदांत हया व्ययाचीं टिपणे आहेत. हयासाठीं त्यांनी स्वतंत्र निधीहि काढला होता. विवाहानिमित्त झालेल्या भोजनसमारंभात, सर्व जातीचे शेकडो लोक जेवून गेले. वरातींतहि अनेक लोकांनी भाग घेतला. हया विवाहाच्या दुसऱ्या दिवशी, पूर्वी मुसलमान झालेल्या एका हिंदूस शुद्ध करुन घेण्यात आले.

१९३१ मध्ये संघटन प्रचारकांपैकीं पांचलेगांवकर महाराज, 'ज्ञानदेवी' चे संपादक आठवले, लिपि सुधारक देवधर, गणेश नि डॉक्टर ना. दा. सावरकर असे काहीजण भाषाशुद्धी कट्टरपणे पाळतात नि तिचा प्रचार करतात.[३२]

दि. २१ फेब्रुवारी १९३३ मध्ये कर्मवीर शिंदे यांच्या समवेत डॉ. सावरकर, पुप्पाला, राजभोज नि मंबईची अन्य शंभर एक मंडळी होती. १९३२ मध्ये मंबईला मुसलमानांनी केलेल्या दंडेलीला धडाडीने जशास तसे उत्तर देण्यात पुप्पाला

आघाडीवर होते. महाशिवरात्रीचे दिवशी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे आणि राजभोज यांनी स्वतंत्रपणे महारवाडा, चांभारवाडा आदि भागांत फिरुन तेथील लोकांची परिस्थिती नि मनस्थिती यांची बारकाईने पहाणी केली. तेंव्हा त्यांना आढळून आले की, वीर सावरकरांनी चालविलेले जन्मजात जातीभेद निर्मूलनाचे प्रयत्न हे केवळ वरवरचे नाहीत. त्यावेळीं वीर सावरकरांनी रत्नागिरीत पायरी पायरीने अस्पृश्यता कशी नष्ट केली आहे, ते साधार सांगितले. ते पुढे म्हणाले, "आता ज्या जन्मजात जातीभेदाच्या मुळावरच सामाजिक क्रांतीची कुऱ्हाड तुम्ही तुमच्यापुरती तरी घालीत अहां, निदान रत्नागिरीच्या हिंदूत तरी शेकडा ९० वर तरुण सहभोजनांत प्रत्यक्ष भाग घेणार आहेत. म्हणून तुम्हांस अस्पृश्यतेचा हा पुतळा जाळून त्या दुष्ट रुढीचा रत्नागिरीपुरता तरी मृत्युदिन पाळण्याचा पूर्ण अधिकार आहे."

दि. १० फेब्रुवारी १९३५ ला पतितपावन मंदिरात एक सभा होऊन त्यांत जातिय निवाड्याचा निषेध करण्यात आला. निषेध पत्रकावर रत्नागिरीच्या अनेक नागरिकांच्या सहया घेण्यात आल्या. दिनांक १३ मार्चला डॉ. ना. दा. सावरकर यांचे 'जातीय निर्णयाने केलेला हिंदूंचा अपमान' हया विषयावर पतितपावन मंदिरांत ओजस्वी व्याख्यान झाले. हिंदूंनी मुसलमानांपुढे नमते न घेता ताठरपणे वागावे. मोठे आंदोलन उभारावे म्हणजे जशी बंगालची फाळणी झाली तसा जातिय निवाडा रद्द होईल.[३३]

डॉ. ना. दा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'निर्भीडाचे' संपादक आणि सावरकर निर्बंध निवारक मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते अनंदराव गद्रे यांचे भाषण झाले. हया भाषणाचे आधी स्पृश्य नि अस्पृश्य हिंदूनी मिळून वेदपठण केले आणि शेवटी मुलांचा सावरकर लिखित कविता 'हिंदू मुसलमान संवाद' हा कार्यक्रम झाला. ही कविता प्रत्येकाने अवश्य वाचावी इतकी उत्तम आहे !

धर्मांत्तर म्हणजे राष्ट्रांतर हे सावकरी सूत्र डॉ. आंबेडकरांनाहि मान्य होते. सावरकरांनी वरीलप्रमाणे मत व्यक्त केले तरीहि त्यांनी आंबेडकरांना रत्नागिरी येथे येण्याचे निमंत्रण दिले. हया पत्रात त्यांनी लिहिले की रत्नागिरीत १५० वर सहभोजने झाल्याचे आणि येथे अस्पृश्यता पुष्कळ अशी नष्ट झाल्याचे सोदाहरण सांगितले आणि ते प्रत्यक्ष पहाण्यासाठी नि पतितपावन मंदिरात एक भाषण देण्यासाठी यावे. आम्ही हिंदु, आपण हिंदु, हया पिढयान पिढया धर्मबंधुत्वाच्या स्मरणामुळे हृदयात जे

उत्कट ममत्व उत्पन्न होते, त्या ममत्वाने हे अनावृत्त प्रकट आमंत्रण धाडीत आहे. आपला माझा काहीं वैयक्तिक स्नेहही आहेच. त्या स्नेहासाठी तरी हे प्रेमपूर्वक आमंत्रण स्वीकारावे. हया पत्राखाली वि. दा. सावरकर, डॉ. शिंदे, रा. वि. चिपळूणकर विधिज्ञ आणि दत्तोपंत लिमये विधिज्ञ संपादक 'सत्यशोधक' यांच्या सहया होत्या. हे पत्र डॉ. सावरकर यांनी डॉ. आंबेडकरांना नेऊन दिले.[३४] यामधून डॉ. बाबासाहेबांविषयी ना.दा.सावरकरांना किती अभिमान होता हे दिसून येते. जातिभेद नष्ट व्हावा, व रत्नागिरी येथील सावरकर बंधूंनी त्यांना आमंत्रित केले होते.

आज आपण विविध रंगानी नि अंगानी नटून थटून दिसणारी विलोभनीय व अत्यंत आकर्षक अशी मुंबई पाहातो. भरगच्च बाजारपेठा सुंदर सजलेल्या दिसतात. मुंबईचा प्रत्येक विभाग माणसांनी फुललेला दिसतो. रस्ते गजबजलेले आणि तुफान गर्दीचे दिसतात. रहदारीचा फायदा घेण्याच्या दृष्टीने लहान-मोठे हजारो व्यापारी गर्दी करुन फुटपाथवर दुकाने थाटून बसलेले दिसतात. माणसांची नि वाहनांची अेकच गर्दी झालेली आपल्या दृष्टीस पडते. लोकांचे राहणीमानही सुधारलेले दिसते. आकाशाला गवसणी घालणाऱ्या टोलेजंग भव्य इमारती आपणाला भुरळ पाडतात. बाजारपेठा आपले डोळे दिपवून टाकतात. मुंबईच्या विविध आकर्षणांतून बाहेर जावे, असे आज कोणलाही वाटत नाही. सिनेमागृहे नि नाटयमंदिरे आपली मने खेचून घेतात. मुंबईची अनोखी शोभा सर्वांना मोहात टाकते. मुंबई शहरातील छोटया-मोठया रस्त्यांवर छोटे छोटे स्वतंत्र व्यवसाय करणारे अनेक हिंदू बांधव धडाडीने पुढे सरसावलेले पाहून मनाला अत्यंत समाधान वाटते आणि ही सर्व दृश्ये बघून समोर उभी राहते डॉ. सावरकरांची स्मितहास्य करणारी मूर्ती!

पन्नास वर्षापूर्वी आजच्यासारखी मुंबईची भरभराट झालेली नव्हती. जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी विशिष्ट भागातच जावे लागत असे. ही परिस्थिती बदलली पाहिजे; हिंदू तरुणांनी स्वतंत्र व्यवसाय करण्यास पुढे सरसावले पाहिजे अशी डॉक्टरांची विचारधारा होती. या दृष्टीने हिंदू तरुणांना प्रवृत्त करण्यासाठी डॉक्टरांनी आपल्या आयुष्यात आटोकाट प्रयत्न केले होते. अमूकच व्यवसाय करावा असे त्यांचे म्हणणे नव्हते. परधर्मियांचे वर्चस्व न राहता स्वधर्मियांचे वर्चस्व रहावे हा त्यांचा दृष्टिकोन होता. परधर्मीय लोक व्यवसायाच्या निमित्ताने हिंदूंच्या घरापर्यंत जाऊन हिंदूंची लोकसंख्या घटविण्याचे प्रयत्न करीत होते. त्यालाही आळा बसावा हा

दुसरा महत्त्वाचा दृष्टिकोन होता. डॉक्टरांचा हा दृष्टिकोन आज किती साध्य झाला आहे. तो भाग वेगळा. पण आजचे हिंदु तरुण पुढे सरसावून छोटे मोठे स्वतंत्र व्यवसाय धडाडीने करीत आहेत. ज्यांनी आयुष्यभर आपले रक्त आटविले, प्रयत्नांची शिकस्त केली, ते डॉक्टर नारायणराव सावरकर आज हयात असते तर? हिंदू तरुणांनी केलेली ही प्रगती पाहून त्यांना अत्यंत आनंद आणि समाधान वाटले असते.[३५]

डॉक्टरांनी सातत्याने आपले प्रयत्न चालू ठेवले. त्यांच्या तळमळीच्या विचारसरणीने प्रभावित होऊन ज्या तरुणांनी स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी झेप घेतली त्यांची संक्षिप्तपणे माहिती करुन देत आहे. डॉ. सावरकरांच्या स्वतंत्र व्यवसायासंबधीच्या विचारवंत मनाची कल्पकता आणि विविधता किती होती त्याचप्रमाणे प्रभावीपणे समजावून सांगण्याची हातोटी कशी होती त्याची ही जिवंत उदाहरणे म्हणता येतील.

एक हरिजन तरुण दररोज गिरगावातील औषधालयात निरनिराळया विषयांवर चर्चा करण्यासाठी येत असे. त्यांचे प्राथमिक शिक्षणसुध्दा पूर्ण झाले नव्हते, पण होता चलाख. त्याने जी आय.पी. रेल्वे वर्कशॉपमध्ये मासिक पाच रुपये वेतनावर नोकरी पत्करली. रोज संध्याकाळी भेटत असल्यामुळे त्याचा चांगलाच परिचय झाला होता. भावी जीवन भरभराटीचे जाण्यासाठी डॉक्टरांनी त्याला महत्त्वाचे मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे त्या तरुणाने फोर्ट विभागात मेडोज स्ट्रीटवर स्टार ऑफ इंडिया डेअरी फार्म या नावाने दुधाचा व्यवसाय सुरु केला. ज्याची सावली पडली तर लोक आंघोळ करीत होते, त्यांना हिंदू समाजाच्या निकट सानिध्यात आणण्याची त्यांची तळमळ होती. डॉ. सावरकर यांच्या मार्गदर्शनामुळे त्याची आर्थिक परिस्थिती उत्तम झाली. तो काँग्रेसचा उत्तम कार्यकर्ता नि नेता असला तरी हिंदुत्वनिष्ठ होता. डॉक्टरांनी केलेल्या मार्गदर्शनाची त्यांना जाणीव आहे. त्यांच्याबद्दल आदरभाव होता. तो तरुण म्हणजेच आपले चर्मकार समाजाचे पुढरी नारायणराव सदाशिव काजरोळकर होत.

नोकरी-धंद्याच्या दृष्टीने चिठ्ठी मागण्यासाठी अनेक लोक डॉक्टरांना भेटण्याकरिता येत असत. एके दिवशी सोनावणे नावाचा एक हरिजन तरुण नोकरी मागण्यासाठी आला. अगदी गयावया करुन सांगू लागला, 'साहेब, माझ्या घरची

स्थिती फार वाईट आहे. सगळी जबाबदारी माझ्यावर आहे बगा! काय सुचत नाही. काय तरी करुन गरिबासाठी नोकरीचा प्रयत्न करा साहेब, फार उपकार होतील माझ्यावर साहेब.' त्याची परिस्थिती पाहून डॉ. सावरकरांना त्याची दया आली. त्यांनी आपल्या कोटाच्या खिशातील पैशाचे पाकिट बाहेर काढले आणि दहा रुपयांची एक नोट त्याच्या हातावर ठेवली. १९३१ मध्ये दहा रुपयांना फार मोठी किंत होती. त्या तरुणाला सांगितले, "हे पैसे खर्चासाठी घेऊन जा आणि चार दिवसांनी परत येऊन भेट म्हणजे काय करायचे ते सांगेन."[३६]

चार दिवसानंतर तो तरुण परत आला. त्याच्या स्वप्नातही नसेल अशी गोष्ट डॉक्टरांनी समजावून सांगितली. तो डॉक्टरांकडे बघतच राहिला. काय उत्तर द्यावे हेच त्याला सुचेना. थोडया वेळाने तो तरुण हलक्या आवाजात म्हणाला, 'साहेब, ते मला कसे जमेल?' डॉक्टर म्हणाले, अहो सोनावणे, मला माहिती आहे तुम्ही न्हावी नाही. तुम्हाला तो धंदा येत नाही. पण तो धंदा करणे हा गुन्हा आहे का?' 'नाही साहेब, मग काय हरकत आहे? त्या धंद्यातील २-३ चांगले कारागीर बघा. त्यांच्याकडून कामे करुन घ्या. तुम्हाला कोणी न्हावी म्हणार नाही. आणि समजा कोणी म्हणाले तरी तुम्ही न्हावी व्हाल का? अशा प्रकारे डॉक्टरांनी त्याची समजूत घातली. तो जातीने न्हावी नव्हता. त्या धंद्यातील त्याला काही माहिती नव्हती. डॉ. सावरकरांच्या मार्गदर्शनाप्रमाणे त्याने प्रयत्न केले. धोबी तलाव विभागात त्याने आपले सलून थाटले. त्याची हालाखीची स्थिती जाऊन चांगली त्याची आर्थिक स्थिती सुधारली. १९३३ मध्ये पी.बाळू मुंबई नगरपालिकेच्या निवडणुकीला गिरगावातून उभे राहिले त्यावेळी त्या तरुणाने खूप मेहनत घेतली.

आजच्या तरुण पिढीला कल्पना यावी म्हणून गाद्या-उषा भरण्याचा, कापसू पिंजण्याचा धंदा पूर्णपणे मुसलमान समाजाकडे होता. ते लोक अन्य स्वधर्मियांनाच त्या धंद्यात शिकवून तरबेज करीत होते. हे डॉ. सावरकरांच्या लक्षात आल्यावर त्यांनी वेगळा पवित्रा घेऊन पावले टाकण्यास सुरुवात केली.

गिरगावातील जुवेकर नावाच्या तरुणाची मनोभूमिका तयार केली. त्याला मुसलमानाचा वेश दिला नि मुसलमान मोहल्ल्यात वेष पालटून पाठविले. कित्येक दिवस तो तरुण त्यांच्या वस्तीत फिरत होता. त्या व्यवसायातील अनेक लोकांशी त्याने मैत्री केली चांगले संबंध जोडले. त्यांच्यात मिळून मिसळून वागू लागला.

हळूहळू त्यांच्याकडून पिंजाऱ्याचा धडा शिकून घेतला. आपल्याच समाजातील हा एक तरुण समजून त्याला त्यांनी चांगली माहिती दिली. पिंजण्यासाठी लागणारी तात सोलापूरलाच मिळत होता. तिही त्याने युक्तीने मिळविली. बेमालूमपणे सर्व माहिती मिळविल्यावर आणि कापूस पिंजण्याचे काम उत्तम प्रकारे शिकून घेतल्यावर जुबेकर यांनी १९३२ मध्ये गिरगाव प्रार्थना समाजासमोर भागवताच्या खानावळीशेजारी हिंदू पिंजारी या नावाने प्रथम मुंबईत व्यवसाय सुरु केला.

त्यानंतर रत्नागिरीहून विनायक सावरकरांचे प्रेरणेने गजानन विष्णु दामले मुंबईत आले. त्यांनी दादर पाटील मारुती मंदिराजवळ १९३६ मध्ये हिंन्दू पिंजारी या नावाने आपला व्यवसाय सुरु केला. काही दिवसांनी हे महाराष्ट्राचे कापूस पिंजण्याचे प्रशिक्षण केंद्रच बनले. डॉ. नारायणराव सावरकरांनी हिंदू तरुणांना हिंदू पिंजारी होण्याचे जोरदार आवाहन केले. त्यावेळी हा स्वतंत्र व्यवसाय करण्यास किती तरी तरुण पुढे सरसावले. प्रशिक्षणासाठी आलेले बहुतेक तरुण मॅट्रिकपर्यंत शालेय शिक्षण झालेले होते. पन्नास वर्षापूर्वी मॅट्रिक माणसाला फार किंमत होती. डॉक्टरांनी आत्मीयतेने आणि अत्यंत तळमळीने मांडलेल्या विचाराने भारावून जाऊन या व्यवसायाकडे हे तरुण आकर्षित झाले होते. रामचंद्र यशवंत सातवसे, नाटळ ता. कणकवली हा तरुण प्रथम प्रशिक्षणासाठी दामल्यांकडे आला आणि शेवटपर्यंत त्यांच्याचकडे राहिला. त्यानंतर वर्ध्याचे विनायक विष्णु दातार, बहराणपूरचे कुकंद घुटी, त्र्यंबकेश्वरचे विश्वनाथ काळे, दादरमधील देसाई, पटवर्धन, मनोहर पाध्ये इत्यादी उत्साही तरुणांनी या केंद्रात प्रशिक्षण घेऊन मुंबईत आणि मुंबईबाहेरील अनेक शहरांत हिन्दू पिंजारी या नावाने व्यवसाय केला. डॉ. सावरकरांनी प्रयत्न केले नसते, तर हा व्यवसाय आपल्याकडे कधीही आला नसता.

तेंडुलकर या नावाचा एक चुणचुणीत तरुण मुलगा डॉक्टरांच्या संपर्कात आला. लालबाग विभागात गिरणीच्या कार्यालयात लिपिकाचे काम करीत असे. धडपडया स्वभावाचा असल्यामुळे तो एक दिवस डॉक्टरांकडे आला आणि फावल्या वेळात करण्यासाठी काही काम मागू लागला. डॉक्टरांनी त्याला चहापूड विकण्याचा व्यवसाय घरोघर करण्यास सांगितले. त्याला जोडकाम म्हणून हिंन्दू सभेचे सभासद करण्याचे काम कमिशनवर दिले. डॉक्टरांनी दिलेल्या कामांची जाणीव ठेवून तो हिंन्दू सभेचे कार्यही फावल्या वेळात करीत होता. छोटया व्यवसायाच्या सवयीमुळे तो

आज मोठया व्यवसायात उतरला आहे. तो हिन्दुत्वनिष्ठ आणि हिंदुसभेचा कट्टर अभिमानी आहे.[३७]

मुंबई शहरात मांसविक्रीचा धंदा अहिंदूकडे आहे. बहुसंख्य हिंदू जनतेला मिळणाऱ्या बकऱ्याच्या मांसात भेसळ केली जाते, असे वाटल्यावरुन डॉक्टर सावरकरांना हिंदू खाटीक आणण्याची कल्पना सुचली. पण ती प्रत्यक्ष कृतीत कोण आणणार? प्रामाणिकपणे खाटकाचा मांस विकण्याचा व्यवसाय करायला कोण तयार होईल? मोठा प्रश्न निर्माण झाला. कोणतेही काम एकदा करावयाचे असे ठरविले की अविश्रांत श्रम घेऊन ते यशस्वी केल्यावाचून डॉक्टर स्वस्थ बसत नसत. संबंधितांच्या समोर जोरदारपणे आपले विचार त्यांनी व्यक्त करत. खाटकाचा धंदा आपल्यापैकीच कोणीतरी सुरु केला पाहिजे, परधर्मियांची कुरघोडी चालू देता कामा नये. या प्रभावी विचारधारेने डॉक्टरांनी आपले विचार मांडले. रावबहादूर सि.के. बोले, डॉ. य.वि. परंदरे, भाऊराव पणशीकर, दत्तू पाटील इत्यादिंनी त्यांना जोरदार पाठिंबा दिला.

सर्वांच्या आग्रहावरुन दादर हिंदू महासभेचा एक पट्टीचा कार्यकर्ता दत्तू गावकर हा तरुण शुध्द मांसाचा व्यवसाय करण्यास सिध्द झाला. तो विचाराने तयार झाला असला तरी प्रत्यक्ष आचारात आणण्यासाठी त्याने कोल्हापूरहून एक तरुण खाटीक मुंबईत आणला आणि बाळराम पाटील वाडी दादर मुंबई २८ येथे हिंदू मटणवाला म्हणून १९३७ मध्ये आपला व्यवसाय सुरु केला. आपले नातेवाईक, आपले गाववाले काय म्हणतील याचा विचार करायला त्याला अवधीच मिळाला नाही. चाळीस वर्षांपूर्वीचा आपला समाज लक्षात घ्या. त्या काळात अशा गोष्टी करणे वाईट समजले जात होते, याची सर्वांना कल्पना आहे. गावकरानी बेधडकपणे आपला धंदा सुरु केला. त्यांच्या व्यक्तिमत्वामुळे आप्तेष्टांकडून कोणत्याही प्रकारे त्रास अथवा विरोध झाला नाही. त्यांनी आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती केली. वरळी, चेंबूर इत्यादी ठिकाणी त्यांच्या शाखा आहेत. गावकरशेठ या नावाने ते आज परिचित आहेत.

वर्ध्याचा एक तरुण विनायक विष्णु दातार मॅट्रिक झाल्यावर नशीब आजमावण्यासाठी मुंबईत आला. फार गरीब स्वभावाचा होता तो. त्याला एक मावशी होती, ती सातारा जिल्हयातील लिंब गावी रहात होती. अन्य कोणीही

नातेवाईक त्याला नव्हते. डॉक्टरांनी त्यांची आपल्या औषधालयातच राहण्याची व्यवस्था केली. आणि आपल्या स्वभावाप्रमाणे त्याचे मन स्वतंत्र धंद्याकडे वळविले. त्याला भाजीचा व्यवसाय करण्याचा सल्ला दिला. त्याने तो व्यवसाय मोठया आनंदाने पोर्तुगीज चर्चजवळ बराच काळ केला. पहाटे चार वाजता भायखळयाला जाऊन भाजी खरेदी करुन आणावी लागत असे. १९३५ पासून १९४० पर्यंत हा व्यवसाय मोठया चिकाटीने केला.

इ.स. १९४० मध्ये दुसरे महायुध्द ऐन रंगात आले होते. हिंदू तरुणांनी सैन्यात जावे असा जोरदार प्रचार डॉ. सावरकर करीत होते. त्यांचा परिणाम होऊन तो तरुण (वि.वि. दातर) सैन्यात भरती झाला आणि महायुध्दाच्या आघाडीवर गेला. युध्द संपल्यावर त्याला सरकारी धान्याच्या कोठारात लिपिकाची नोकरी मिळाली.

मनोहर पाध्ये हा अत्यंत चंचल स्वभावाचा तरुण १९३८ साली मुंबईत आला. स्वभाववैचित्र्यामुळे त्याला कुठेही नोकरी मिळाली नाही. सबंध दिवस भटकपंची करणे, रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांची थट्टा मस्करी करणे यात तो पटाईत. दररोज एकतरी मारामारी केल्यावाचून त्याला चैनच पडत नसे म्हटले तरी चालेल. अशा वागण्यामुळे दररोज संध्याकाळी त्याला जवळच्या पोलीस ठाण्यात हजेरी द्यावी लागत होती. डॉक्टरांच्या योग्य मार्गदर्शनाने गाद्या-उशाचा धंदा त्याने सुरु केला. हल्ली तो सुगंधी तेलाचा स्वतंत्र व्यवसाय करतो. त्याचा स्वभाव आता बदलला आहे. त्याच्या वागण्यातील दोष नाहीसा झाला. त्याच्या हया परिवर्तनामुळे तो आज आपल्या गावाचा सरपंच म्हणून काम करतो.

दादर विभागातील दूध व मिठाईचे सुप्रसिध्द व्यापारी भाऊराव पणशीकर सर्वांना सुपरिचीत आहेत. त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व वाखारण्यासारखे होते. भरपूर परिश्रम आणि मेहनत करण्याची तयारी होती. त्यामुळे सार्वजनिक कार्यात ते अग्रेसर होते. १९३२ मध्ये भाऊराव डॉ. नारायणराव सावरकरांच्या निकट संबंधी आले. एखादा माणूस डॉक्टरांचे सान्निध्यात राहिला म्हणजे सहसा दूर जापणे कठीण होते. त्यांनी मांडलेले विचार त्याला लोहचुंबकासारखा खेचून घेत. भाऊरावांचे तसेच झाले. सात आठ वर्षे भाऊराव खांद्याला खांदा लावून धडाडीने सार्वजनिक कार्य करीत होते. डॉक्टरांनी सोपविलेले काम ते अगदी जिद्दीने करीत होते. पण डॉक्टरांनी मांडलेल्या विचाराने भाऊराव एकदम दचकले. काय उत्तर द्यावे हेच त्यांना सुचेना.

भाऊरावांनी थोडयाच कालावधीत सेनापती बापट मार्गावरील विजयनगरचे पाच मजले भाडयाने घेऊन टोलेजंग भोजनालय सुरु केली आणि प्रवाशांची राहण्याची उत्तम व्यवस्था केले. हिंदू महासभेची अखिल भारतीय बैठक याच जागेत झाली होती. गिरगाव, फोर्ट विभाग वगळला तर दादरमधील हे एक मोठे आकर्षणच होते. चाळीस वर्षापूर्वी हिंदू महासभेच्या दादर शाखेने केलेले ते मोठे धाडस होते. डॉक्टर सावरकर यांच्या व्यवसायविषयक कल्पनेचे प्रतीक होते. फाळके हे गृहस्थ शरीरप्रकृतीने किरकोळ पण मानाने खंबीर, राष्ट्रीयवृत्तीचे. १९३० मध्ये ते डॉक्टरांच्या संपर्कात आले. त्यांनी मुंबईतील रस्तोरस्ती सकाळ-संध्याकाळ फिरुन खडया आवाजात फटके म्हणून अनेक वर्षे लोकजागृती केली. कोणत्या माणसाजवळ कोणता गुण आहे हे डॉ. सावरकर ओळखत, त्यानुसार ते मार्गदर्शन करत असत.

१९३४-३५ चा कालावधी होता, तो कडक उन्हाळा जाणवत होता. आंबट दही, ताक बऱ्याच प्रमाणावर रोज फुकट जाते त्याचा काय उपयोग करता येईल यावर विचारविनिमय चालू होता. डॉक्टरांनी चटकन सांगून टाकले, 'आंबट दही-ताक फेकून का देता? त्यात साखर घालून त्याचे पेय करुन पहा.' काकानी ताकात भरपूर साखर घातली, रंग येण्यासाठी थोडी हळदपूड टाकली, स्वाद येण्यासाठी वेलदोडयाची पूड टाकली. बर्फामुळे त्याची लज्जा फारच वाढली. ते पेय फारच लोकप्रिय झाले. अशा प्रकारे पियुषचा जन्म झाला.

डॉक्टर नारायणराव सावरकरांच्या सानिध्यात माधवराव सातवसे या नावाचे गृहस्थ होते. राष्ट्रीय विचारांचा प्रभाव मा. सातवसे यांच्यावर पडला. आठ नऊ माणसांच्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर होती. मिळणाऱ्या थोडया वेतनावर ते चालविणे फारच जिकिरीचे होते. डॉक्टरांच्या स्वतंत्र व्यवसायविषयक विचारांचा त्यांना उपयोग झाला. त्यांच्या विचारांच्या संस्काराने प्रभावीत होऊन त्यांनी आवश्यक ते छोटे व्यवसाय निवडले. एका मित्राच्या सहकार्याने गिरगावात स्टेशनरी कटलरी वस्तूंचे दुकान सुरु केले. सकाळी मोकळया वेळात दादर भागात वर्तमानपत्रे स्वतंत्रपणे टाकू लागलो. औषधालयातच साबूवडया, दंतमंजनच्या बाटल्या यांची विक्री सुरु केली. विमा एजन्सी घेऊन काम करु लागलो. पुस्तकांची एजन्सी घेतली. कारखान्यात सरबते तयार करण्यास शिकून थोडे फार पैसे मिळविले. हिंदुसभेचे सभासद नोंदवून थोडे पैसे जमा केले. वनस्पती तुपाच्या कारखान्यात रात्रपाळी करुन

पैशांची भर घातली. दुचाकीवर धार लावण्याचे चक्र बसवून घेतले आणि काही दिवस घरोघर जाऊन चाकू-सुऱ्यांना धार लावण्याचे काम त्यांनी केले. नोकरी सांभाळून ही सर्व कामे ते करीत होते. सामाजिक कार्यातही भाग घेत होते. डॉक्टरांच्या सानिध्याचा हा अमूल्य ठेवा आहे, असे त्यांना वाटते.

विश्वनाथ चौधरी हा उत्तर हिंदुस्तानी तरुण १९४१ साली डॉक्टरांच्या संपर्कात आला. त्याला मोडकी-तोडकी मराठी भाषा येत होती. डॉक्टरांना भेटण्यावाचून त्याला चैन पडत नसे. व्यवसायविषयक विचार कानावर आदळून तो चांगलाच तयार झाला. त्याने प्रथम दादर भागात दुधाचे दुकान सुरु केले. दहिसरला मोठा गोठा आहे. अनेक गायी, म्हैशी स्वतःच्या मालकीच्या आहेत. त्या व्यतिरिक्त घाऊक गवत विकण्याचाही व्यवसाय करतो. त्याचा धंदा फारच छान चालला आहे.

'डॉ. नारायणराव सावरकरांनी गृहस्थाश्रमात राहून संन्यास आश्रमासारखे आपले जीवन व्यतित केले. स्वतःच्या कुटुंबाकडे त्यांना पुरेसे लक्ष देता आले नाही, पण हिंदू समाजातील कोसळणारी अनेक गरीब कुटुंबे त्यांनी सावरली हे त्यांचे वैशिष्टय आहे. डॉक्टरांचा दृष्टिकोन किती विशाल होता याची आजच्या तरुण पिढीला कल्पना यावी, त्यांच्या कार्याचा परिचय व्हावा व त्यांच्या महत्त्वपूर्ण विचारांचे दर्शन घडावे या दृष्टीने लिहिण्याचा प्रयत्न आहे.[३९]

डॉ. ना.दा. सावरकर सार्वजनिक उत्सव, अस्पृश्यता निवारण, शुध्दीचळवळ, गोवर्धन संस्था, अनेक परिषदा, कामगार सभा, झुणकाभाकर आंदोलने, अशा अनेक सामाजिक चळवळीत, कार्यकारी सभासद, कार्यवाह, उपाध्यक्ष, अध्यक्ष राहून अत्यंत आस्थापूर्वक, निःस्वार्थपणे कामे केली थोरल्या बंधूंच्या क्रांतिकार्याला तर डॉक्टरांनी सर्वस्वी वाहून घेतले होते. त्यांनी खडतर आयुष्य उपभोगले, अंदमानातल्या बंधूंच्या अटकेमुळे त्यांचे अर्धेअधिक आयुष्य सरकारांच्या क्रूर दडपशाहीमुळे अनंत काळज्या, संकटे आणि अटकेत संपले. डॉ. सावरकरांच्या घरावर पोलिसांच्या सतत धाडी येत. त्यामुळे गुप्त पत्रे त्यांना नाहीशी करावी लागली. परिणाम, डॉ. सावरकरांच्या गुप्त कार्याविषयीची माहिती अपूर्णावस्थेतच राहिली. जे काही उजेडात होते तेवढेच प्रकाशित होऊ शकले. त्यामुळे बहुतांशी त्यांच्या सामाजिक चळवळींचा भाग त्यात जास्त दिसून येतो. यावरुन त्यांच्या सामाजिक कार्याचा झपाटा आपणास दिसून येतो.

## तळटीपा

१) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर', मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००२, पृष्ठ १९५.

२) कित्ता; पृष्ठ - १९५.

३) कित्ता; पृष्ठ - १९६.

४) कित्ता; पृष्ठ - १९६.

५) कित्ता; पृष्ठ - १९६, १९७.

६) कित्ता; पृष्ठ - १९७, १९८.

७) कित्ता; पृष्ठ - १९८.

८) कित्ता; पृष्ठ - १९८, १९९.

९) कित्ता; पृष्ठ - १९९.

१०) कित्ता; पृष्ठ - २००.

११) 'नवशक्ति', मुंबई, दि. २ मे १९३५, पृष्ठ - २.

१२) कित्ता; पृष्ठ - २.

१३) कित्ता; पृष्ठ - २.

१४) 'प्रवासी' मुंबई, दि. २२ मे १९३५, पृष्ठ - २.

१५) कित्ता; पृष्ठ - २.

१६) कित्ता; पृष्ठ - ५.

१७) कित्ता; पृष्ठ - ५.

१८) 'लोकमान्य', मुंबई, रविवार दि. ८ मार्च १९३६, पृष्ठ - २.

१९) 'स्वराज्य', मुंबई, दि. १ जुलै १९३६, पृष्ठ - ३.

२०) 'लोकमान्य', मुंबई, दि. ८ ऑक्टोबर १९३६, पृष्ठ - ५.

२१) कित्ता; पृष्ठ - ५.

२२) 'दैनिक त्रिकाळ' नगर, दि. ११ मार्च १९३९, पृष्ठ - २.

२३) कित्ता; पृष्ठ - २.

२४) कित्ता; पृष्ठ - २.

२५) 'विक्रम ऐतिहासिक कथा' मुंबई, दि. २२ जुलै १९४४, पृष्ठ - ५.

२६) कित्ता; पृष्ठ - ५.

२७)	कित्ता; पृष्ठ - ५.

२८)	कित्ता; पृष्ठ - ६.

२९)	सावरकर बाळ 'हिंदुसमाज संरक्षक वि. दा. सावरकर (रत्नागिरी पर्व) वीर सावरकर प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती १९७२, पृष्ठ - ४७.

३०)	कित्ता; पृष्ठ - ८३.

३१)	कित्ता; पृष्ठ - ९५.

३२)	कित्ता; पृष्ठ - १३८, २५३.

३३)	कित्ता; पृष्ठ - ३४१, ३४२.

३४)	कित्ता; पृष्ठ - ३५९, ३६०.

३५)	जुवेकर अरविंद, (प्रकाशक) 'स्मृतिसंचय ना. दा. सावरकर' क्रांतिवीर बाबाराव सावरकर स्मारक मंडळ सांगली, डिसेंबर १९८६, पृष्ठ - १५.

३६)	कित्ता; पृष्ठ - १७.

३७)	कित्ता; पृष्ठ - १८.

३८)	कित्ता; पृष्ठ - १९.

३९)	कित्ता; पृष्ठ - १९, २०.

# प्रकरण सहावे

# साहित्यिक कार्य

## प्रकरण ६ वे

## साहित्यिक कार्य

### ६.१ प्रस्तावना :-

'डॉ. नारायणराव सावरकर उत्तम वक्ते, तसेच उत्तम लेखक, उत्तम पत्रकार व उत्तम इतिहासकारही होते. गदयाप्रमाणेच काव्यप्रांतातही त्यांच्या लेखणीने लीलया विहार केला आहे. त्यांनी केलेली साहित्यसेवा त्यांच्या विद्यार्थीदशेपासून सुरु होते. कलकत्त्यात वैद्यकीय शिक्षण घेत असताना, नारायणरावांनी विनायक सावरकरांचे 'कमला' खंडकाव्य प्रथम छापले. तसेच 'इंदिरा की मदिरा' हे नाटक लिहिले. पण ते अप्रकाशित राहिले. त्याचवेळी 'जाईचा मंडप', 'समाजरहस्य' या दोन कादंबऱ्या, परीक्षेचे शुल्क भरण्यासाठी द्रव्याची आवश्यकता होती म्हणून लिहिल्या. वैद्यकीय व्यवसाय सांभाळून त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'हिंदुत्व' आणि 'हिंदुपदपादशाही' या दोन इंग्रजी ग्रंथांचे मराठीत अनुवाद करुन ते प्रकाशित केले.'[१]

डॉ. सावरकरांनी 'सेनापति तात्या टोपे' यांचे चरित्र लिहिले व 'मरण की लग्न' ही कादंबरी त्यानंतर लिहिली. तात्या टोपे यांचे चरित्र लिहिताना त्यांनी चरित्रलेखकाची सर्व अवधाने पाळली आहेत. कलकत्त्यात असताना लिहिलेली 'जाईचा मंडप' ही कादंबरी त्यांनी 'जाती-हृदय' हया टोपननावाने प्रसिध्द केली. एका शिकत असणाऱ्या विद्यार्थ्याने ती लिहिली आहे, हे आज खरे वाटत नाही. कारण लेखकाची भाषा एका कसलेल्या लेखकाची प्रौढ व कमावलेली वाटते. शिवाय 'संदेश', 'केसरी', 'बळवंत', 'संजय', 'महाराष्ट्र', 'नवाकाळ', 'प्रभात', 'मुंबई क्रॉनिकल' इ. श्रेष्ठ दर्जाच्या वृत्तपत्रांतून डॉ. नारायणराव सावरकरांनी स्फुट लेखन बरेच केले.[२]

डॉ. सावरकरांच्या लेखनात व्यासंग पदोपदी जाणवतो. सावरकरांचे मराठीवर प्रभुत्व होते. देशबंधु बॅरिस्टर चित्तरंजन यांचे व्यक्तिचित्र, त्यांनी पु.बा. कुलकर्णीकृत देशबंधूंच्या चरित्राला दिलेल्या प्रभावी प्रस्तावनेतून उभे केलेले नजरेत भरते. कमावलेल्या कलमदानातून देशबंधु दासांचे यथार्थ दर्शन घडते. जिज्ञासूंनी मराठीच्या अभ्यासकांनी सावरकरांची शब्दसंपन्न प्रस्तावना जरुन वाचली पाहिजे.

स्वातंत्र्यवीरांचे स्मरण करुन देणारी सावरकरांच्या कुळाचारास शोभेल अशी भाषाशैली व शुध्द मराठी भाषा डॉ. नारायणराव सावरकरांची होती. टिळक आणि

गांधी यांच्या विचारसणीतील भेद, डॉ. सावरकरांनी किती साध्या शब्दांत समर्पक उदाहरणे देऊन स्पष्ट केली आहे.

डॉ. सावरकरांच्या लेखणीने कथा-कादंबरी, काव्यलेखन, स्फुटलेखन, संशोधन, समीक्षण, संपादन हया सर्व क्षेत्रात रस घेतला आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही राष्ट्रीय ध्येयनिष्ठेला तडा न देता त्यांनी वाङ्:मयसंचार केला. 'हिंदूंचा विश्वविजयी इतिहासा'वरील त्यांचे लेखन, मराठी वाङ्:मयात त्यातील मूलभूत संशोधनाने ऐतिहासिक झाले आहे. अक्षय कुमार मुजुमदार यांनी लिहिलेला 'हिंदू जातीचा प्राचीन इतिहास' आधारभूत घेऊन डॉ. नारायणराव सावरकरांनी 'हिंदूंचा विश्वविजयी इतिहास' तयार केला.[३]

'नारायणराव सावरकर व विनायकराव सावरकर दोघेही प्रतिभावान साहित्यिक दोघांची Wave Length एकच होती. गुण डॉ. सावरकरांमध्ये उपजत होते. त्यांनी ते कष्टपूर्वक संपादिले, बुध्दी, प्रतिभा हया ईश्वरी देणग्याखेरीज, नारायणरावांना गात्या गळयाची ईश्वरी देणगीही मिळाली होती. विनायक सावरकर, स्वातंत्र्यशाही गोविंद, राष्ट्रीय शाहीर आनंदराव टेकाडे यांनी रचिलेले देशभक्तीपर पोवाडे 'अभिनव भारता'च्या ध्येयधोरणांचा प्रकट विचार करण्यासाठी गायली जात असत. पोवाडे गायनासाठी 'अभिनव भारताने' स्थापिलेल्या मेळयात प्रमुख गायक नारायणराव सावरकर होते. साभिनिवेश व सुरेल गायन नारायणराव सावरकर, श्रीधर वर्तक, कृष्णाजी महाबळ इ. मित्रांसह मंचावरुन मोठया उत्साहाने खडया सुरात करीत. डॉ. सावरकर स्वतः उत्तम गायक असल्यामुळे त्यांच्या गळयातून वीररस भरभरुन वाही.[४]

डॉ. सावरकरांच्या जीवनाचे वैशिष्टय हेच की, त्यांचे संबंध आयुष्य आपत्ती, दुःख, दैन्य यामध्ये गेले. डॉ. नारायणराव सावरकरांना स्वदेशकल्याणाच्या शब्दपंक्ती स्फुरत असत. ते स्वतः प्रतिभासंपन्न कवीही होते. आपली कविता डॉ. सावरकर 'वसंत' हया टोपण नावाने प्रसिध्द करीत.

डॉ. नारायणराव सावरकरांच्या मनाचा पिंड विनायक सावरकर हयांच्या स्वभावाच्या मुशीतून घडल्यामुळे, त्यांचे विचारही थोरल्या बंधूंसारखे ज्वलंत-जहाल असेच होते. त्यांचे साहित्यही ज्वलंत होते. गदयाप्रमाणेच काव्यप्रांतातही त्यांच्या लेखणीने लीलया विहार केला आहे. आपल्या तिन्ही बंधूंच्या कार्यासंबंधी ते

म्हणतात, 'आम्ही तिघे हरी, भारतभूच्या कडेवरी.....' विनायक सावरकरांच्या मार्सेलिसच्या उडीवरचे त्यांचे काव्यही प्रेरक आहे.'[५]

'हिंदूंचा विश्वविजयी इतिहास' या नावाने पहिला लेखांक इ.स. १९४० जुलैमध्ये 'झारापकर' मासिकामध्ये प्रसिध्द झाला. त्याच्याआधी १ ते २ वर्षापासून, आपल्या या भारताने एकेकाळी सर्व जगावर हिंदुंचे सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीयही अधिराज्य कसे गाजविले होते, या संबंधीचा त्यांचा अभ्यास सुरु झाला होता. हिंदु जातीने एकेकाळी सर्व जगाला आपल्या तत्त्वज्ञानाने, शास्त्रज्ञानाने, बुध्दिवैभवाने नि पराक्रमाने दिपविले होते नि त्यावेळचे बहुतेक ज्ञातजग हिंदुस्थानला गुरुस्थानी मानीत होते. गुप्तरुपाने चाललेली पाकस्थानी चळवळ, राजकारणामध्ये मोठी निकराची परिस्थिती उत्पन्न करीत आहे. या स्वयंभू हिंदुस्थानाच्या अखंडत्त्वावर, घाला घालण्याकरिता चहुबाजूंनी अमंगळ प्रयत्न वेगात सुरु होते. अशा वेळी, या सर्व प्रयत्नांनी विफल करण्यास्तव सज्ज होण्याला, जो प्रथम दुर्दान्त आत्मविश्वास लागतो, तो आत्मविश्वास हा बृहत्तर हिंदुस्थानचा इतिहास वाचून दशगुणित होईल, असाच हा आपल्या हिंदुपूर्वजांचा इतिहास स्फूर्तिप्रद आहे. हया मूळस्वयंभू हिंदुस्थानचा भंग अथवा खंड करण्याची गोष्ट तर दूरच, परंतु याची बृहत्तर हिंदुस्थान पुन्हा एकदा कसा करता येईल, अशी भव्य महत्त्वकांक्षा, तेजस्वी हिंदतरुणांच्या ह्रदयात उत्पन्न व्हावी, इतका हा आपल्या हिंदू पूर्वजांचा इतिहास अद्‌भुत आहे, तेजस्वी आहे. आत्मविश्वास नि आत्माभिमान निर्माण करणारा आहे. आणि तरीही या लेखमालेत, हे केवळ 'ताकापुरतेच रामायण' सांगणे शक्य झाले आहे.[७]

हिंदुंच्या त्या 'विश्वविजयी इतिहासा'चे समग्र दर्शन व्हावयास, ज्यावेळी हिंदुस्थान स्वतंत्र होईल, सुव्यवस्थित होईल, स्वतःच्या सर्व तऱ्हेच्या दळभारांच्या सामर्थ्याने जगाला आदरणीय होईल, त्या वेळी त्यावेळचे ते समर्थ हिंदुस्थानचे हिंदुसरकार, अनेक संशोधक आशियाभर पाठवील. हिंदु महासागर, प्रशांत महासागर, असंख्य लहान मोठी द्वीपे नि द्विपकल्पे, जेव्हा ते संशोधक संशोधितील तेव्हा आणि तेव्हाच तो पूर्वकालीन हिंदूंचा दिग्विजयी इतिहास पूर्णपणे लिहिला जाईल. तोपर्यंत, निदान असा दिग्विजय आपल्या पूर्वजांनी केला होता, हे सत्य तरी आपल्या तरुण पिढीला कळले पाहिजे.[८]

भूतकाली आपले राष्ट्र केवढे मोठे होते. याच्या मोजमापाची केवळ कल्पना जरी आली तरी भावी मोठेपणाची रुपरेषा त्यावरुन त्याप्रमाणात आखता येते. परक्यांनी लिहिलेल्या ते जोभंगकारी इतिहासानी, परकीयांनी केलेल्या निंदेने केवळ दोषच आणि तेही अतिशयोक्तपणे आजवर दाखविले गेल्याने, हिंदु युवकांची मनोवृत्ती पराभूतपणाची बनण्याची संभवनीयता साहजिकच उत्पन्न होते. ती घातक वृत्ती नष्ट करण्यास अंशतः का होईना ही लेखमाला कारणीभूत झाली. तर ती लिहिण्याचे, त्या प्रमाणात सार्थक झाले असे वाटेल. या पुस्तकात पूर्व दिग्विजयच प्रामुख्याने वर्णिला आहे.

या इतिहासातील जवळ जवळ १३-१४ लेखांक 'झारापकर' मासिकामध्ये महिन्याला प्रसिध्द झाले. तिच्या आधाराने तात्कालिक उत्तेय नि विवेचन केले गेले आहे. महायुध्दाचा ओघ अजून वाहत आहे. म्हणून त्या त्या वेळच्या घटनेप्रमाणे केलेले विवेचन, आज पालटेल आणि हे महायुध्द अजुनही संपलेले नाही. त्या अर्थी उद्या कितीतरी विवेचन नवे करावे लागणार आहे. जोपर्यंत हे महायुध्द संपून त्यांतून निर्माण झालेल्या घटनांना निश्चित स्वरुप प्राप्त झाले नाही, तोपर्यंत त्यासंबंधी कोणतेही विवेचन निश्चितपणे करता येणार नाही. म्हणून निरनिराळया वेळी लिहिलेल्या मासिक लेखांतील ती ती विवेचने सांप्रत हे पुस्तक प्रसिध्दितांना बदललेली नाहीत. हेतु हा, की त्या त्या वेळच्च्या महायुध्दाच्या अवस्थेतून निर्माण झालेली जनमनांतील आंदोलने यशवंतपणे आज आणि पुढेही दिसून यावीत.[१]

त्याचप्रमाणे मासिकांतून खंडशः प्रसिध्द होत असल्यामुळे वाचकांना मागील संदर्भ आठवून देण्याकरता अनेक ठिकाणी अपरिहार्यपणे पुनरावृत्ति झालेली आढळून येते. संबंध पुस्तक संकलित करताना, ती सुधारता आलीही असती परंतु, प्रतयक्ष इतिहासाचीच पुनरावृत्ती सृष्टीत वारंवार घड असता इतिहास लेखनांतही ती काही वेळा घडली, तर विशेष काही बिघडेल असे नाही, असे वाटून लेखकांच्या त्या त्या वेळच्या घडणीस तसेच राहू दिले आहे. एका गोष्टीचा उल्लेख करणे अवश्यक वाटते. काही सामान्य आणि शिष्ट आक्षेप भुवया वर चढवून म्हणतील की, परंतु हा इतिहास प्रचारकी थाटाने लिहिला आहे. इत्यादी, परंतु ते आधीच सांगतात की, हा इतिहास याचवेळी सांगण्याचा मुख्य उद्देशच हा आहे की, त्याच्या वाचनाने हिंदु तरुणांमधील न्यूनगंड नष्ट होऊन त्यांच्या हृदयांत भव्य महत्त्वाकांक्षा उत्पन्न व्हाव्यात,

हिंदुतरुण आपल्या विश्वविजयी आणि अगाध शौर्यशाली पूर्वजांनी गाजविलेल्या विजय मालिकांनी, चेतून जावेत. त्यांची आत्मविस्मृति विलयाला जावी, त्यांच्या कर्तृत्वांत जगज्जेतृत्वाची बीजे समाविष्ट आहेत, हे त्यांना कळावे. थोडक्यात, आपला गौरवशाली इतिहासातून तरुणांनी प्रेरणा घ्यावी हा त्यामागील हेतु होता. ते सिंहाचेच छावे आहेत हे आत्मरुपदर्शन त्यांना, या मोहावरणघातिना इतिहासाने, भूतकालाच्या दर्पणांत दिसावे, म्हणूनच हा इतिहास लेखनाचा यत्न केला आहे. हाच जर 'प्रचारी थाट', काही सामान्य शिष्ट आक्षेपकांना वाटला, तर त्यांत आम्हाला संतोषच वाटेल. परंतु 'प्रचारकी थाट' यामध्ये असत्य विधाने अतिशियोक्तिपूर्ण कथन, असा आक्षेप गर्भित असेल तर मात्र, तो आक्षेप सर्वत्र निराधार आहे. असे आम्ही या आक्षेपकांना आधीच सांगून ठेवतो. कोणतीही सत्य घटना अतिशयोक्त केली नाही. मात्र, प्रत्येक सत्य घटना सांगताना ती निःसत्वपणे न सांगता, सजीव, स्फुरणदायी होईल अशीच सांगण्याचा यत्न केला आहे. पूर्वजांनी घडविलेले पराक्रमी इतिहास हे स्फूर्तिचे झरे आहेत आणि म्हणून ते निरभिमान, निरावेश, निःसत्त्वपणे सांगण्यापेक्षा, सावेश, स्वाभिमान आणि परिणामकारकपणे सांगण्यानेच ती अभिवांच्छनीय स्फूर्ती, वाचकांच्या हृदयात उत्स्फूर्त होत असते आणि म्हणूनच आम्ही हेतुतः ही निवेदन पध्दती अंगिकारली आहे.[१०]

'रामाने रावणास मारले;' या एका वाक्यांतच रामायणाचा मुख्य इतिहास कथन करता आला असता. परंतु, आद्यकवि भगवान वाल्मिकींनी ती कथा सांगण्याकरता एक रामायण रचले आणि त्या रामायणाच्या पठणाने, श्रवणाने आणि मननाने, या भारतांत वारंवार, प्रादुर्भूत झालेल्या रावणांस रसातळी गाडण्यास, राणा प्रताप, छत्रसाल, शिवाजी महाराज, गुरुगोविंद सिंह, यांच्या सारख्या हिंदुजातीतील नरश्रेष्ठांस ते दिव्य रामचरित्र आचरण्यास समर्थ केले. इतका महिमा, देवतुल्य पूर्वजांचे इतिहास स्फूर्तिदायक पध्दतीने कथन करण्याचा आहे. आणि तोच मार्ग आम्ही या 'हिंदूंच्या विश्वविजयी' इतिहासाचे अल्पदर्शन करविताना हेतुतः अवलंबिला आहे.

अंती हा स्वयंभू हिंदुस्थान, अखंड, अभंग राखण्यात नि स्वतंत्र करण्यात, सांप्रतची पिढी यशस्वी होवो नि भावी पिढी पुन्हा एकदा तो बृहत्तर भारत निर्माण

करण्यास बध्द परिकर होवो, अशी या मातृभू आणि पुण्यभू असलेल्या हिंदुस्थानच्या भाग्य देवतांची प्रार्थना करुन हे कथन पुरे करतो.'[११]

**६.२ टिळक आणि गांधी :-**

वि.दा.सावरकरांचे स्मरण करुन देणारी, सावरकरांच्या कुळाचारास शोभेल अशी भाषाशैली व शुध्द मराठी भाषा डॉ. नारायणराव सावरकरांची होती. टिळक आणि गांधी यांच्या विचारसरणीतील भेद, डॉ. सावरकरांनी किती साध्या शब्दांत समर्पक उदाहरणे देऊन कसा स्पष्ट केला आहे तो पाहा! नारायणराव सावरकर लिहितात, 'गांधी तत्त्वज्ञान म्हणजे एकांतिकचे आचरण होय. गांधीजींचे ब्रीद वाक्य म्हणजे, 'शठं प्रति सत्यम्' हे आहे, हे प्रसिध्दच आहे. लोकमान्यांचे ब्रीदवाक्य म्हणजे 'शठं प्रति शठयम्' आहे. आता सृजनालाही सत्य व शठालाही सत्य, हे एकांतिकतेचे आचरण होय. झाली तरी अनेक उदाहरणे देता येतील. अहिंसेचे हया गाईला मारायचे नाही. वाघालाही मारायचे नाही, सैतानालाही मारायचे नाही, या एकांतिक आचरणाने काय होईल? वाघ जगेल, गाय मरेल, सैतान (आनतायी) जगेल, संत मरेल.[१२]

डॉ. सावरकरांच्या लेखणीने कथा-कादंबरी, काव्यलेखन, स्फुटलेखन, संशोधन, समीक्षण, संपादन हया सर्व क्षेत्रात रस घेतला आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही राष्ट्रीय ध्येयनिष्ठेला तडा न देता त्यांनी वाङ्‌मयसंचार केला. 'हिंदुंचा विश्वविजयी' इतिहासावरील त्यांचे लेखन मराठी वाङ्‌मयात त्यातील मूलभूत संशोधनाने ऐतिहासिक झाले आहे. अक्षयकुमार मुजुमदार यांनी लिहिलेला 'हिंदूजातीचा प्राचीन इतिहास' आधारभूत घेऊन डॉ. नारायणरावांनी 'हिंदूचा विश्वविजयी इतिहास' तयार केला.

१० फेब्रुवारी १९०८ साली मुंबईच्या, फाटक यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या 'विहारी' साप्ताहिकमध्ये नारायणराव सावरकरांचा, चितोडगडावर मोगलांनी केलेल्या क्रूर हल्ल्याच्या संदर्भात स्फुरलेला 'पहिला जोहार' हा लेख आणि विनायकरावांची चितोडगडाच्या जळत्या ज्वालेत, म्लेच्छांच्या हल्ल्यामुळे अभागी रजपूत अवलांची पडलेली आहुति, ही कविता, हया दोन्ही वाङ्‌मयकृति त्याच अंकात एकाच वेळी प्रकाशित झाल्या होत्या. दोघा बंधूंना एकच विषय एकाच वेळी ते दोघे भिन्न स्थळी असतानाही कसा काय स्फुरला, याचे आजही आश्चर्य वाटते.[१३]

नारायणराव सावरकरांना लेखासाठी जो विषय नाशिक येथील त्यांच्या वास्तव्यात स्फुरला, त्याच विषयावर काव्यरचना करण्याची प्रेरणा विनायक सावरकरांना विलायतेच्या प्रवासात निघाले, तेव्हा प्रवासात सुवेझ कालवा लागला. त्यात त्यांची बोट शिरल्यावर त्यांना वर तारांकित नभांगण व खाली शांत जलाशय हे दृश्य दिसले. ते नयनमनोहर दृश्य पहाताच विनायकरावांना एक रम्य कविता स्फुरली. इंग्लिश कवि शेलेच्या 'स्कायलार्क मध्ये जो कल्पानाविलास आहे, तशाच तऱ्हेचा कल्पकतेचा स्वच्छंद विलास त्यांनी आपल्या कवितेत बहारला. प्रवासात स्फुरलेली ही कविता विनायकरावांनी आपले बंधू नारायणराव यांचेकडे 'विहारी' साप्ताहिकामध्ये प्रसिध्दीसाठी धाडली. त्यामुळे दोन्ही साहित्यकृति भिन्न स्थळांवरुन येऊनही 'विहारी' साप्ताहिकाच्या कार्यालयात एकाच वेळी पोहोचल्या आणि प्रकाशित झाल्या, दोघा सावरकर बंधुंची Mental Wave Length एकच असावी.[१४]

**कल्पनाविलासात विलक्षण साम्य :-**

नारायणराव सावरकरांनी, चितोडच्या पतिव्रतांनी केलेल्या जोहाराचे वर्णन करताना, कल्पना खेळविली ती अशा प्रकारे, 'इतक्यात अल्लाउद्दिनाने' जेथे येऊन सती पध्दतीचा शोध चालविला तोच चितेतून रक्ताची एक चिळकांडी अतिशय उंच उडाली व लगेच एक तारका रक्तवर्ण दिसू लागली, तेंव्हा सर्व म्हणाले की, ही चिळकांडी त्या महाभाग पद्मिनीच्या रक्ताची आहे. ते रक्त मंगल आहे, ते या तारकावर उडाले म्हणून लोक तेव्हापासून त्या तारकेस मंगलाची तारका असे नामाभिधान देतात.

विनायकराव सावरकरांचा कल्पनाविलास पहा. त्यांनी रचिलेल्या कवितेतल्या चौथ्या टप्प्यात जी कल्पना खेळविली तिचे नारायणरावांनी व्यक्त केलेल्या कल्पनेशी विलक्षण साम्य आहे. हे वाचकांच्या सहज लक्षात येईल.[१५]

'नरकपतीचा हल्ला झाला चितोंड नगराला देवांनाहि स्वर्गी जर्लादने वर्दी घ्यायला।।

सिध्दाग्नितुनी फक्कन ज्वाळालोळ नभी उठती।।

चितोड गडवासिनी देवि तो त्यावरी आरुढणी।।

ज्वालारुढा देवि दुरुनि त्या चमकति ते जोबळे।।

तया सितारे म्हणूनी ज्योतिची भले भले चकले।।

नारायणराव दामोदर सावरकर व विनायकराव दामोदर सावरकर दोघेही प्रतिभावान साहित्यिक, दोघांची Wave Length एकच होती.

लेखनकला, वक्तृत्व, संघटन कौशल्य,स्वार्थत्याग हे गुण डॉ. सावरकरांमध्ये उपजत होते. त्यांनी ते कण्टपूर्णक संपादिले. बुध्दि, प्रतिभा हया ईश्वरी देणग्यांखेरीज, नारायणरावांना गात्या गळयाची ईश्वरी देणगीही मिळाली होती. विनायक सावरकर, स्वातंत्र्य शाहीर गोविंद, राष्ट्रीय शाहीर, आनंदराव टेकाडे यांनी रचिलेले देशभक्तपर पोवाडे 'अभिनव भारता'च्या ध्येयधोरणांचा प्रकट प्रचार करण्यासाठी गायली जात असत. पोवाडे गायनासाठी 'अभिनव भारताने' स्थापिलेल्या मेळयात प्रमुख गायक नारायणराव सावरकर होते. साभिनिवेश व सुरेल गायन नारायणराव सावरकर, श्रीधर वर्तक,कृष्णाजी महाबळ इ. मित्रांसह मंचावरुन मोठया उत्साहाने खडया सुरात करीत. डॉ. सावरकर स्वतः उत्तम गायक असल्यामुळे त्यांच्या गळयातून वीररस भरभरुन वाही.[१६]

'कवि गोंविदाचा स्वातंत्र्य छंद' हा स्वातंत्र्यशाहीर गोविंद त्र्यंबक दरेकर यांच्यावर लिहिलेला लेख, डॉ सावरकरांनी 'दै. महाराष्ट्र', नागपूर मध्ये दि. २३ मार्च १९४१ रोजी लिहिला. डॉक्टरांनी स्वा. शा. गोविंदाचे कौतुक करताना वापरलेली भाषा पहा, कवि गोविंदांच्या सहजस्फूर्तीच्या कारंज्यातून उडालेले प्रबळ मनोभावांचे फवारे किती दबत, आडवळणे घेऊन गनिमीकाव्याने जनमनाच्या शेतांमधून फिरवावे लागत. हे पाहिले म्हणजे त्यांच्या जिवंत काव्यशक्तीची श्रेणी अधिकच उच्च ठरते. शतभत्यांच्या एकत्र केलेल्या पात्यांनीही हे ह्रदय भेदन होणार नाही. ते हदयभेदनसामर्थ्य, गोविंदांनी चरणेतील एकेका शब्दांमध्ये ओतले आहे."

कवि गोविंदांचे चरण

" घेच खड्ग मग छंद | कर भूमाता वंद्या||

अमुच्या स्तोंदिना | होऊं दे तुझी स्नान संध्या||"

स्वदेशहित कशाला आहे, त्यासाठी ते काव्यलेखन करत असत.'[१७] त्यांच्या काव्यातून देशभक्तीची प्रेरणा मिळते.

### ६.३ कवि गोविंदाग्रजांची स्मृति :-

विसाव्या शतकांतील आरंभ कालापासून मराठी भाषेमध्ये जे काव्य निर्माण झाले, त्यामध्ये कवि गोविंदाग्रजांच्या काव्याला संस्कृत भाषेमध्ये कालिदासांच्या काव्याला जे स्थान आहे, तेच स्थान दयावे लागेल असे वाटते . त्यामध्ये फारसा मतभेद होईल, असे वाटत नाही. गोविंदाग्रजांची नवनवोन्मेषशालिनी काव्यशक्ति उभ्या महाराष्ट्रात काही नाही तरी एक तपापर्यंत विद्युल्लतेखाली चमकत होती. तिच्या प्रत्येक चमकी सरसी काही तरी नवी अद्‌भुत कल्पना हृदयगमभावना विकारांना विकेल अथवा प्रबल करणारी घटना निर्माण होऊन रसिकांची हृदये चमकून उठत असत. त्यांच्या समग्र काव्यखाणीतून अशी चमकदार रत्ने, माणके विपुलतेने विखुरली आहेत. या छोटयाशा स्मृतिलेखांत, कोणत्या तरी एकाच चमकदार रत्नाचे तेजोवलय दाखवावे, असे जरी म्हटले तरी त्यांच्या त्या श्रीमंत काव्यभांडारांत शिवतांचा मनाला विभ्रम पडतो, की कोणाचे कवितारत्न घेऊ. प्रीतीच्या पहिल्या 'चुंबना'ची एका निमिषांतली 'स्वैरस उनमद मानसी भरल्यामुळे प्रियकरणीच्या कपाळावर रंगविलेली ती गुलाबी लाली पहावी, आणि ज्या अजोड सुखाकरता.[१८]

'निशिदिनी। वाटते मनी। पुन्हा जन्मुनी मरण सोसावे।

मरण सोसावे।'

अशी ती अमर कविता वाचकांपुढे वानगीकरता मांडावी

'गाणे मंजुळ 'ते' झुळझुळते।

तुझिया बाळया भवते'।

असा 'घुंगुरवाळा' उचलून त्याचे ते हृदयी खळबळलेले, काव्य गाणे, का तो राजहंस आवाहन, रसिकाची हृदये शोकरसाने हेलावून सोडावीत, किंवा ती संतुष्ट हृदयासहि एकच आस उतरविणारी कन्हयाची 'तिळभरही' मान नुरविषारी' मुरली ऐकवावी, कोणती कविता वर्णावी, कोणती न वर्णावी, याच विवंचनेने 'कवयोप्यत्र मोहिता, होतील.[१९]

आणि तरीही या स्मृतिलेखांकरिता, कवि गोविंदाग्रजांच्या काव्यभांडारातून एखादेतरी काव्यरत्न वेचून काढणे आवश्यक त्याच्या काव्यशक्तीची किमया इतकी अपूर्व होती की, दगड-धोंडयांना त्यांनी काव्यमंत्र उच्चारुन देवत्व दयावे-मृतांस

सजीव करावे, ओसाड स्थलांत नंदनवन फुलवावे. याच त्यांच्या दिव्यशक्तीतून 'प्रेम आणि मरण' ही अमर कविता निर्माण झाली. ही एकच कविता जरी वाचली, तरी त्यांची विशाल कल्पनाशक्ति, शुद्र वस्तूनाही केवढे विशालत्व देऊ शकत होती, याचे प्रत्यंतर पटेल. या कवितेचा वर्ण्यविषय, 'कुठल्याशा जागे' मध्ये मैदान मोकळे एक पसरले होते, त्यामधील एका काळी हरितपर्णांनी बहरलेला, परंतु आता पर्णहीन झालेला असा एक थोरला वृक्ष आहे. सामान्य लोकांना हा बळलेला शुष्क थोरला वृक्ष पाहून फारतर असे वाटेल की, याला तोडून टाकला तर, जळण्याकरता कितीतरी सर्पण प्राप्त होईल, परंतु कवि गोविंदाग्रजांना त्याने पाने झडलेल्या भीषण फांदया पसरलेल्या रुक्ष, जुनाट वृक्षाच्या खोडामध्ये, एका एकनिष्ठ प्रेमोपासकाची केवढी उदात्त कथा वाचता आली. हा वृक्ष ज्यावेळी बहरलेला होता, तेव्हा त्याच्याभोवती 'झुडपेच खुरट इवलाली' असेलेले 'गुडघाभर' सारे जग पसरलेले होते. त्याचप्रमाणे 'मातीत पसरलेल्या आणि माजलेल्या कितीक वेली' त्या वृक्षराजाकरता तळमळत होत्या, परंतु त्या थोरवृक्षाला त्यांची दादही नव्हती. तो एकटाच उंच वाटत होत, आकाशाकडे त्याची दृष्टी खिळली होती पर्ण राजांनी तो बहरुन समृध्द झाला होता. परंतु त्याच्या 'कर्माचे विधान' काही निराळेच असलेले कवीच्या दृष्टीला आले, कोणत्या कुणास ठाऊक मुहूर्तावर ढगांनी आकाश व्याप्त झाले. दशदिशांत काळोख दाटला. झंजावात पिसाटासारखा आकाशात थैमान घालू लागला.

खुरटलेल्या झुडपांतील वेष्टिलेला, त्या भोवती पसरलेल्या त्या गुडघाभर जगातून तो थोर वृक्ष त्या आकाशातील या प्रचंड घटना गंभीरपणे न्याहाळीत होता. तोच दोन प्रचंड मेघखंडांच्या टकरीने विद्युल्लता चमकली, त्या थोर वृक्षाच्या त्या गुडघाभर जगांत, मातीत पसरत माजलेल्या कितीतरी लता आजवर त्याच्याकरता सारख्या तळमळत असतानाही त्याने त्यांची दादही घेतली नव्हती, परंतु आज मेघांनी भरलेल्या नि काळोखाने भयाण बनवलेल्या त्या नभोमंडळात जेव्हा आग ओकणारी ती विद्युल्लता चमकली, तेव्हा त्या थोर वृक्षराजाच्या हृदयांतील आजवर बंद असलेली प्रेमाची दारे उघडली गेली नि त्या भव्यभिषण विद्युल्लतेवर त्या थोर वृक्षाचे प्रेम जडले, परंतु दुसऱ्याच निभिषांत ती विद्युल्लता गुप्त झाली तरी गगनांतील ती चंचल बाला त्याच्या हृदयावर ठसा बसवून 'जिव्हारी घोर घाव घालती झाली, तिच्या प्राप्तीकरता या थोर वृक्षराजाने घोर तपस्येला आरंभ केला. पूर्वीच्या महान

तपस्याप्रमाणे त्या वृक्षाने अन्नपाणी वर्ज्य केले, कविही त्याची घोर तपस्या खालीलप्रमाणे वर्णन करताना

।।मुसळधार पाऊस पडला।।

।।तरि कधी टवटवी त्याला येईना।।

त्याचप्रमाणे तो वृक्ष किती एकाग्रपणे ही तपस्या करीत होता.'[२०]

।।जरि वारा करि थैमान।

।।तरि हले न त्याचे पान एकही।।

अशा रीतीने त्या वृक्षाने हा कडक हटयोग जेव्हा यशस्वी केला, तेव्हा पूर्वीच्या काळाप्रमाणे इंद्राच्या इंद्रपदाला थरकाप सुटला, ऋषिगण आश्रयेक दाटला, ध्रुवबाळाला मत्सर वाटला. या सिध्दीच्या आधीच्या वृक्षाभोवतीची ती दोडवितीची दुनिया त्याला हंसली. 'कुणि दयाही त्यावर करती परंतु एकंदर जगास तो अवजड गोणी प्रमाणेच भासला. इथेच कविने एक फार सुंदर तत्त्व गोवले आहे.

अशा त्या वृक्षाच्या अपार तपश्चर्येनंतर चारी सिध्दी त्याच्यापुढे वरब्रुहि म्हणून उभ्या राहिल्या कुणि त्याला कल्पवृक्षत्त्वाचे थोरपण देऊ केले, कुणी प्रलयांच्या वटवृक्षाचे रक्षण अर्पण केले. परंतु तपस्येतून भानावर आलेला तो वृक्षराज, ही सर्व वरदाने तुच्छ करुन एकच रिदान मागता झाला आणि ते हे की 'भेटवी मजला। जीविच्या जीवाची बाला, एकदा ही भयानक मागणी ऐकूण सर्व सिध्दी स्तंभित झाल्या नि म्हणाल्या.'[२१]

'ही अशी। शुध्दराक्षसी काय मागसी' परंतु पडतापडता हि तो 'एकदा हंसला' आणि हर्षाच्या येऊनि लहरी। फडफडुनि पाने सारी। हांसली।

एका वैराण जागेत, एका जुनाट वृक्षाचे खोड अकस्मात वीज पडून जळून गेले. या अत्यंत रुक्ष अशा घटनेवर कवि गोविंदाग्रजांनी आपल्या विशाल कल्पनेच्या विनानांत बसून केवढी ही भव्य, भीषण प्रेमकहाणी, कवितेच्या दिव्य दृष्टीने पाहिली आणि किती हृदयगमतेने ती रम्य शब्दसृष्टीत उतरविली. यांतच कवि गोविंदाग्रजाचे अलौकिकत्व आहे. श्रीयुत गोविंदाग्रज हे विनोदांतील 'प्रवीण' असतील परंतु मुख्यत्वेकरुन 'कवि' म्हणूनच ते अधिक काळपर्यंत मराठी वाडयांत हनुमंतासारखे चिरंजीवित होतील, यांत शंका नाही.

संपादक महाशयांनी अनुशिलेली लेखनमर्यादा मला वाटते संपत आली. तेव्हा आतापर्यंत कृतज्ञ शब्दावलींनी सजविलेली ही लहानशी स्मृतिमाला शेवटच्या पूर्णविरामाची गाठ मारुन येथे संपवावी हेच उचित.[२२]

**६.४ 'मरण की लग्न' :-**

ही एक ऐतिहासिक कादंबरी असून, डॉ. सावरकर यांच्या सरावलेल्या लेखणीतून निर्माण झाली आहे. हया कादंबरीचा काल इ.स. १८५७ सालच्या आधीचा सुमारे चार पाच वर्षाचा आहे. अठराशे सत्तावन्न साली उत्तर हिंदुस्थानात, जो प्रचंड विठ्ठल कंपनी सरकारच्या प्रस्थापित राज्यसत्तेविरुध्द घडून आला. त्याच्या पूर्वी त्या विटलवाची पूर्वतयारी कसकशी होत होती, कित्येक लोकांची मने गेलेल्या स्वराज्याबद्दल कशी तळमळत होती. परसत्तेच्या सार्वत्रिक फिरणाऱ्या वरवंटयाखाली धर्म संस्कृति यांचा सुधारणेच्या नावाखाली हळूहळू ऱ्हास होत असलेला पाहून तो थांबविण्यासाठी ते परकीयांचे राज्य उलथून पाडण्यासाठी काही लोकांच्या मनात कसकसे विचार चाललेले होते आणि ते विचार अंमलात आणण्यासाठी गुप्तरुपाने कोणत्या रितीने प्रयत्न केले जात होते, यांचे काहीसे दिग्दर्शन या कादंबरीत केलेले आहे. या कादंबरीत वावरणाऱ्या पात्रांपैकी नानासाहेब तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि जगदीश पूरची राजकन्या रुपराणी या पाच परिचित नावाखेरीज बाकीची पात्रे आणि त्यांच्याभोवती निर्माण केलेले कथानक ही सर्वच काल्पनिक आहे. आम्ही वर या कादंबरीला ऐतिहासिक न म्हणता ऐतिहासिक म्हणविणारी असे म्हटले, तर ते वावगे होणार नाही.[२३]

'मरण की लग्न' या कादंबरीमध्ये नारायणराव सावरकरांनी, स्वदेशाला ग्लानि आली आहे, असे पाहून भगवान श्रीकृष्णाचा धावा केला आणि त्यांच्या प्रतिभासंपन्न लेखणीतून ओजस्वी काव्यपंक्ति प्रकटल्या त्या अशा

धाव धतू धाव वनमाळी। त्वरित या काळी
दशा झाली। भारत भू छळिली।। १।।
दुष्ट हे माजले फार। घेई अवतार।
ब्रीद हे राखी। संत हे रक्षि आणखी।।२।।
ती स्वातंत्र्याची गीता। शिकविण्या आता।
शिघ्र येई। भूमी ही विकल होई।।३।।

कथानकाची एकंदर घडण कै. हरिभाऊंच्या 'उषःकाल' कादंबरीच्या वळणासारखी आहे. पण उषःकालमध्ये ज्याप्रमाणे शिवकालीन समाज स्थितीचे, म्हणजे तत्कालीन राज्यकर्त्यांनी जितलोकांवर केलेल्या अन्यायांचे आणि अत्याचारांचे व त्यामुळे जितांच्या भावना त्या दु:स्थितीतून बाहेर पडण्यासाठी शिवशिवत होत्या, त्यांचे जसे चित्र, रेखाटले आहे, तशा प्रकारचे चित्र म्हणजे १८५७ चे बंड होण्याला समाजाची मनोवृत्ति कशी बेफाम झाली हाती व ती तशी होण्याला तत्कालीन सत्ताधाऱ्यांचे कोणकोणते अत्याचार कारणीभूत होत होते, यांचे चित्र या कादंबरीत पाहावयास मिळत नाही. एवढा मोठा विलंब होण्याचा तत्कालीन कारण जरी शुद्र असले तरी त्याच्यामागे लोकांच्या मनोवृत्ति ज्वालाग्राही कोणत्या कारणांनी झाल्या त्या कारणांचे चित्रण यथायोग्य रेखाटले न गेल्यामुळे सर्व कादंबरी वाचूनही ही एवढी मेहनत डॉ. नारायणरावांनी कशा करता केली हा प्रश्न उत्पन्न होतो.[२४]

कादंबरीचे मुख्य कथासूत्र असे आहे की, मराठयांच्या शेवटच्या लढाईत मराठयांचा मुख्य सेनापति बापु गोखले रणांगणावर लढाईत जखमी होऊन पडला, त्यावेळी त्याने आपल्या एका सरदाराला शेवटाचा म्हणून संदेश सांगितला की, आता मराठयांचे साम्राज्य गेल्यासारखेच आहे आणि सध्याच्या हया परिस्थितीत ते कोणी राखील, असा वीर पुरुषही दिसत नाही. तरी जर तू जिवंत राहिलास आणि स्वराज्यासाठी तळमळणारे नव्या पिढीत तुला कोणी आढळले, तर त्यांचे एकत्रीकरण करुन त्यांना स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रवृत्त केले.

आपल्या सेनापतीचा तो संदेश त्या सरदाराने प्राणापलिकडे जतन करुन त्याने आपले वास्तव्य बहुशः अरण्यात गुजारमान केले आणि तेथून त्यांचे आपल्याला पाहिजे तसा पुरुष तात्या टोपे होते, हा त्यावेळी नानासाहेबांच्या खास मित्रांपैकी एक होता. त्याजवळ त्या गोसावी वेषधारी सरदारांनी आपले रहस्य प्रकट केले. त्या तात्या टोपेकडून ते नानासाहेबांस कळले व पुढे या तिघांनी आणखी काही आपल्या सारख्याच विचाराचे लोक जमवून जंगलात एका गुप्त जागी देवीपुढे देश स्वतंत्र करण्याच्या शपथा घेतल्या. येथपर्यंतचा कथाभाग या पहिल्या भागात असून पुढे प्रत्यक्ष झालेल्या कार्याचा म्हणून दुसरा भाग वर उल्लेखिलेल्या गुप्तकटांत राणी लक्ष्मीबाईंचाही समावेश कादंबरीकर्त्यांनी केला आहे व ही गुप्तकटाची जागा काशीच्या आसपास असल्याचे सांगितले आहे. हा भाग कितपत इतिहासाला धरुन

आहे, याबद्दल शंका वाटते. पुढील भागात शिपायांचे युध्द व सत्तावन्न सालातील अनेक रोमहर्ष प्रसंग आहेत, त्या रोमांचकारी भयानक इतिहासाची पार्श्वभूमी म्हणून हा भाग आहे.

कादंबरीतील भाषा प्रौढ आणि उपमा दृष्टांतादिकांनी युक्त अशी साधलेली आहे. पण त्या प्रौढ भाषा लिहिण्याच्या मोहात सामान्य मनुष्याच्या आणि स्त्रियांच्याही तोंडी जाड जाड आणि संस्कृत मिश्रित वाक्यरचना घातलेली वाचायला लागले म्हणजे जरा विरसच होतो.

आपणासमोर बोलणारी कादंबरीतील पात्रे नसून कादंबरीकारच बोलत आहे, असा भास होतो. अशा प्रसंगी कादंबरीकार मध्ये का लुडबुड करतो,असे वाटून एकप्रकारची चीड उत्पन्न होते. कादंबरीतील पात्रांचे स्वभाव विशेष त्यांच्या भाषणांवरुन, त्याच्या कृतीवरुन परस्परच वाचकांना कळणे कलेच्या दृष्टीने उत्कृष्ट समजले जाते. कादंबरीकाराने फक्त प्रसंग तेवढा सांगायचा. बाकीचे कार्य पात्रांचे, स्वभाव कादंबरीकाराने आपल्या स्वतःच्या मनोवृत्तीप्रमाणे चांगले अगर वाईट सांगत सुटणे, हे कलेच्या दृष्टीने गौण आहे. याचा विचार प्रस्तुत कादंबरीच्या लेखकांनी पुढील भागाचे वेळी करावा म्हणून ही सूचना केली आहे.

हल्लीच्या प्रणयकथांच्या उचंबळत्या काळात देशप्रेमाच्या कथानकावर कादंबरी लिहून डॉ. सावरकर यांनी आपल्या परीने भाषेची आणि देशाची योग्य सेवा केली, असेच ही कादंबरी वाचून म्हणावेसे वाटते.[२५]

**६.५ सेनापती तात्या टोपे :-**

ही एक तेजस्वी युध्दकथा आहे आणि ती कोणत्याही कादंबरीपेक्षा अधिक अद्‌भुत, आकर्षक व रोमांचकारक आहे. १८५७ सालच्या क्रांतियुध्दांतील सेनापतीचे चरित्र आणि ते रंगविण्याला डॉ. सावरकर यांची लाभलेली लेखणी यांच्या संयोगामुळे प्रस्तुत पुस्तक वीरश्रीने उत्स्फूर्त झाले आहे. १८५७ च्या क्रांतियुध्दाचे पर्यालोचन किंवा मंगल पांडवाच्या पहिल्या गोळीचे वर्णन अशा प्रसंगांचे लेखकाने केलेले वर्णन चैतन्योत्पादक आहे. पेशवाईचा अस्त होण्यापूर्वी चार वर्ष म्हणजे १८१४ साली चरित्र नायकाचा जन्म होऊन त्याचे बालपण ब्रम्हावर्तास नानासाहेब, बाळासाहेब व रावसाहेब पेशवे आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या सानिध्यांत गेले. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई या चार धर्मवीरांप्रमाणे हा रणवीरांचा मेळा

अपूर्व होय, यांत शंका नाही. त्या मेळयाला साजेसे समरचमत्कार करुन व मालेसनसारख्या शत्रुपक्षीय इतिहासकारांकडूनही प्रशंसा मिळवून तात्या टोपे यांनी आपले नाव भारतीय स्वातंत्र्यकथेत अमर करुन ठेवले आहे. मानसिंगाच्या फितुरीमुळे ते १८५९ साली इंग्रजांच्या हाती लागले, तेव्हा शत्रूचा सेनापती या नात्याने माझ्याशी तुम्ही सन्मानाचे वर्तन ठेवावयास पाहिजे, असे त्यांनी आपल्या धीरोवृत्त निवेदनांत निर्भयपणे सांगितले. पण ता. १८ एप्रिल १८५९ रोजी इंग्रजांनी त्यांस फासावर लटकाविले ही चित्त थरारविणारी कथा वाचनीय आहे.[२६]

'सत्तावन्न सालच्या स्वातंत्र्ययुध्दातील विख्यात सेनापती तात्या टोपे यांचे हे स्फूर्तिदायक चरित्र डॉ. ना.दा. सावरकर यांनी लिहिले असून ते भारत प्रकाशन ग्रंथमालेचे प्रथम पुष्प म्हणून प्रसिध्द झाले आहे. सत्तावन्न सालच्या युध्दाचे नाव सहज जरी कानांवरुन गेले तरी सुध्दा त्याच्या विषयी कितीतरी रोमांचकारी कुतुहल मनात जागृत होते. त्या युध्दात ज्यांनी हिरिरिने भाग घेतला व देशाकरिता धारातीर्थी कंठस्नान केले त्या वीराप्रणीची स्वतंत्र चरित्रे प्रकाशित झाली नसल्यास त्यांत काय आश्चर्य म्हणावयाचे.[२७]

सन १८५७ सालच्या बंडाच्या पुरस्कर्र्थापैकी एक म्हणून तात्या टोपे यांचे नाव इतिहासात सुप्रसिध्द आहे. मनुष्यास कोणत्याही कार्यात यश आले म्हणजे त्याचे प्रयत्न सार्थकी लागतात व त्यांचे नाव सर्वजण मोठया कौतुकाने व गौरवबुध्दीने घेतात. तात्या टोपे यांच्या प्रारब्धांत असा धन्यवाद मिळविण्याचे भाग्य नव्हते. पेशवाई पुनश्चः स्थापन करण्याबद्दल त्यांचे प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे त्यांच्या पदरी अदूरदर्शित्वाचा व अविवेकाचा दोष आला असला तरी धैर्यशील किंवा वीर्यशाली पुरुष म्हणून त्यांचे चरित्र केव्हाही वाचनीयच ठरणार. सामान्य कारकुनापासून हा गृहस्थ सेनापतीच्या उच्च दर्जापर्यंत चढला व दोन वर्षापर्यंत बंडाच्या धामधुमीत त्याने आपल्या अंगचे कर्तृत्व अनेक प्रसंगी व अनेक प्रकारे दाखविले. कोणाचे वीरपुरुषोचित कर्तृत्व यशस्वी होते किंवा निष्फळ होते, पण इतिहासाला या सर्व प्रयत्नांची नोंद करुन ठेवावी लागते. इतकेच नव्हे तर प्रयत्नांत एखादयाला यश लाभले नाही, तरी त्याच्या शौर्यास उचित असा त्याचा गौरवही करावा लागतो. प्रस्तुत चरित्र याच न्यायाने वाचकांना जवळ करावेसे वाटेल. चरित्राचे कर्ते डॉ. ना.दा. सावरकर यांनी सुमारे शंभर पानांत तात्या टोपे यांचा

वृत्तांन्त सुसंगतरीतीने दिला आहे. हा वृत्तांन्त वाचताना बंडातील मुख्यमुख्य प्रसंगांशी व उलाढालीशीही वाचकांना परिचय होतो आहे.[२८]

विनायक सावरकरांनी मूळ इंग्रजीत लिहिलेल्या 'हिंदुत्व' आणि 'हिंदुपदपादशाही' या महत्त्वाच्या ग्रंथांचा अनुवाद डॉ. नारायणराव सावरकरांनी केला. सतत कार्यमग्न असलेल्या डॉ. नारायणरावांना वयाच्या साठाव्या वर्षी दै. 'प्रभात' पुणे साठी लेख लिहित असतानाच अर्धांगवायुचा झटका येऊन ते बेशुध्द झ ाले त्यातच त्यांचे दि. १९ ऑक्टोबर १९४९ ला निधन झाले.

ज्याच्या योगाने मनुष्यजातीला नवीन जीवन व स्फूर्ती मिळते अशा तऱ्हेच्या नावांपैकीच 'हिंदुत्व' हे एक नाव आहे व त्याचे मुख्य लक्षण आणि वैशिष्टय काय आहे, याबद्दल येथे चर्चा करण्याचा मानस आहे. या नावांभोवती ज्या कल्पना आणि जी ध्येये, ज्या पध्दती आणि ज्या संस्कृति, जे विचार आणि जे विकार केंद्रीभूत झाले आहेत ते इतके अनेकविध आणि विपुल, इतके प्रभावशाली आणि इतके सुक्ष्म, इतके चकविणारे तरी इतके स्पष्ट आहेत की, त्यामुळे हिंदुत्व या शब्दाची व्याख्या करण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात. जास्त जरी नसला तरी, चाळीस शतकांचा काळ, हया शब्दाला आज तो जसा आहे तशा तऱ्हेचा घडवावयास लागलेला आहे. कवि आणि तत्त्ववेत्ते, स्मृतिकार आणि स्मार्त वीर, आणि इतिहासलेखक हया सर्वांनी हा शब्द आहे, आबाधित रहावा म्हणून याच्यावर विचार केला आहे. याच्याकरिता ते लढाया लढले आणि याच्याकरिता मेलेसुध्दा आहेत. आणि हे नाव कधी परस्परविरोधी, कधी एकनिष्ठ कधी सहकारी अशा आपल्या अखिल जातीच्या अनेक कृत्यांचा निष्कर्षच नाही काय? हिंदुत्व या शब्दाचा 'हिंदुधर्म' या सापेक्ष नावांशी घोटाळा करुन धार्मिक किंवा आत्मिक इतिहास समजतात तसा नाही, तर हा इतिहास सर्वांगीण आहे. 'हिंदुधर्म' हा शब्द फक्त 'हिंदुत्व' या पासून उत्पन्न झालेला अंशात्मक व एक देश दाखविणारा शब्द आहे. 'हिंदुत्व' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केल्यावाचून 'हिंदुधर्म' याचा अर्थ अबोध्य व अनिश्चित राहातो. या दोन शब्दांमधील अंतर न समजल्यामुळे हया आपल्या हिंदु संस्कृतीचा अमूल्य ठेवा ज्यांच्या मालकीचा आहे, अशा सजातीय निरनिराळया जातीजातीमध्ये पुष्कळ गैरसमज व परस्पर अविश्वास उत्पन्न झालेला आहे. या दोन शब्दांमधील अर्थामध्ये तत्त्वतः काय फरक आहे. हे जसजसे आमचे विवेचन विस्तृत होईल तसतसे अधिक स्पष्ट होईल.

आता येथे फक्त इतके सांगितले म्हणजे पुरे की, 'हिंदुत्व' याचा अर्थ काही 'हिंदुधर्म' या शब्दार्थाशी पुष्कळ लोक समजतात तसा समान नाही.[२९]

धर्म या शब्दाने सामान्यतः कोणत्यातरी अध्यात्मिक वा धार्मिक पंथाच्या वा मताच्या नियमांचा अथवा सिध्दांताचा संग्रह असा अर्थ घेतला जातो. भाषेची पध्दती जर आमच्या वाटेत आली नसती तर 'हिंदुपणा' हाच शब्द 'हिंदुधर्म' या शब्दापेक्षा हिंदुत्वाशी अधिक जवळ म्हणून आम्ही योजला असता. 'हिंदुत्व' या शब्दामध्ये आमच्या हिंदुजातीच्या अस्तित्वाची प्रत्येक क्रिया व प्रत्येक विचार यांच्या सर्व शाखा समाविष्ट होतात. आणि म्हूणन 'हिंदुत्व' या शब्दाचे यथार्थ आकलन करता यावे म्हणून आपल्याला प्रथम 'हिंदु' या शब्दाचा अर्थ समजून घेतला पाहिजे आणि मनुष्य जातीमधल्या लक्षावधी लोकांच्या अंतःकरणावर हया शब्दाने आपली एवढी छाप कशी पाडली आणि त्यांच्यातले शुरांतले शूर व उत्तमांतले उत्तम आपला जीव यांच्यावरुन ओवाळून कसा टाकण्यास तयार झाले, याचे रहस्य जाणले पाहिजे.'[३०]

**इंदिरा कि मदिरा :-**

'या नाटकातून त्यांनी व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचे वर्णन केले आहे. तसेच परस्त्रीच्या नादी (आहारी) लागलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाचे कसे हाल होतात, सामाजिक मानहानी कशी होते याचे वर्णन केलेले आहे. थोडक्यात, व्यसनाच्या आहारी गेल्यावर कुटुंबाची हेळसांड कशी होते याचे विवेचन या नाटकात केले आहे'[३१]

अशा रितीने त्यांचे मराठी वाङ्‌मयामध्ये भर घातल्याचे दिसून येते. हे नाटक त्यांचा मृत्यू झाल्यामुळे प्रकाशित होऊ शकले नाही. थोडक्यात, व्यसनापासून व परस्त्रीपासून दूर राहावे, असा संदेश त्यांनी त्या काळात दिला आहे. एखाद्या कुटुंबाची यामुळे कशी दुर्दशा होते, याचे वर्णन त्यांनी केले आहे.

## तळटिपा

१) पटवर्धन शशिकला, (संपा) 'स्मृतिसंचय' सावरकर ना. दा., क्रांतिवीर बाबाराव सावरकर स्मारक मंडळ, सांगली १९८४, १९८५, पृष्ठ - १०, ११.

२) कित्ता; पृष्ठ - १०, ११.

३) सावरकर ना.दा., 'दैनिक केसरी', दि. २४ जानेवारी १९३३.

४) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर', मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, जाने. २००२, पृष्ठ - २३०.

५) बेनोडेकर विप्रदास वि., 'ना.दा.सावरकर जीवन व कार्य', पृष्ठ - १७८.

६) सावरकर ना.दा., 'हिंदूचा विश्वविजयी इतिहास', परचुरे पुराणिक आणि मंडळी, माधवबाग मुंबई, प्रथम आवृत्ती जुलै १९४०, पृष्ठ - ५.

७) कित्ता; पृष्ठ - ६.

८) कित्ता; पृष्ठ - ६.

९) कित्ता; पृष्ठ - ६.

१०) कित्ता; पृष्ठ - ७, ८.

११) कित्ता; पृष्ठ - ८.

१२) सावरकर ना.दा., दैनिक 'केसरी', दि. २४ जानेवारी १९३३.

१३) करंदीकर शि.ल., 'सावरकर चरित्र' सीताबाई करंदीकर (प्रकाशक) पुणे १९४३, पृष्ठ - २२८.

१४) कित्ता; पृष्ठ - २२९.

१५) कित्ता; पृष्ठ - २३०.

१६) बेनोडेकर विप्रदास वि., 'ना.दा.सावरकर जीवन व कार्य', पृष्ठ - २३०.

१७) कित्ता; पृष्ठ - २३१.

१८) कित्ता; पृष्ठ - २३२.

१९) सावरकर ना.दा., 'नवजीवन गडकरी अंक', जानेवारी १९४४, पृष्ठ - ४.

२०) कित्ता; पृष्ठ - ४.

२१) कित्ता; पृष्ठ - ५.

२२) कित्ता; पृष्ठ - ५, ६.

२३) सावरकर ना.दा., 'मरण की लग्न', न.रा.जोशी,(प्रकाशक)'मौज', ऑफिस मुंबई नं. ४, १९९३, पृष्ठ - ३.

२४) कित्ता; पृष्ठ - ४.

२५) कित्ता; पृष्ठ - ५.

२६) सावरकर ना.दा., 'सेनापती तात्या टोपे चरित्र', श्री.द.वैद्य, आर्यप्रकाशन कार्यालय, ३७५ सदाशिव पेठ, पुणे, १९४०, पृष्ठ - २०.

२७) कित्ता; पृष्ठ - ४.

२८) कित्ता; पृष्ठ - ४०.

२९) सावरकर वि.दा., 'हिंदुहृदय सम्राट', अनुवादीत मराठी भाषांतर, पृथ्वीराज प्रकाशन, नागपूर १२, पहिली आवृत्ती १८४७, पृष्ठ - ११.

३०) कित्ता; पृष्ठ - १२.

३१) इंदिरा कि मदिरा - सामाजिक नाटक (अप्रकाशित).

# प्रकरण सातवे

# उपसंहार

## प्रकरण सातवे

## उपसंहार

प्रकरण एकमध्ये संशोधनाची ओळख, उद्दिष्टे, गृहितके, व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची पध्दती, सहाय्यभूत माहिती संकलन मांडण्यात आले आहे. डॉ. ना.दा. सावरकर यांच्या वडिलांना मिळालेल्या जहागिरीपासून ते त्यांच्या विवाहापर्यंत आढावा घेतला आहे. - डॉ. नारायण दामोदर सावरकर हे सर्वात लहान होते. त्यांचा जन्म २५ मे १८८८ साली नाशिक जिल्हयातील भगूर या गावी झाला. १८९२ या वर्षी नाशिक शहरात (प्लेगची) महामारीची साथ आली नि त्यात त्यांच्या मातोश्री राधाबाईंचे निधन झाले. त्यांचे वडील दामोदरपंतांनी या तिघा बंधूंचा सांभाळ केला. तेच त्या तिघांची आई झाले. त्यांच्या घरात शेजारची मुले येत असत.

सावरकरांचे पूर्वज पेशव्यांचे सरदार असल्यामुळे पूर्वजांची शस्त्रास्त्रे, धनुष्यबाण, गंजलेल्या तलवारी घरात पडून होत्या. ती शस्त्रे घेऊन ती मुले लुटुपुटीची लढाई खेळत. शिवाजीमहाराज, झाशीची राणी, वासुदेव बळवंत फडके या ऐतिहासिक व्यक्तीमत्त्वाचा त्यांच्यावर परिणाम झाला होता. थोडक्यात, लहानपणापासून त्यांच्यावर ऐतिहासिक पुरुषांचा प्रभाव पडला होता.

१८९६ साली महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला. दि. ५ नोव्हेंबर १८९९ साली प्लेगच्या साथीत डॉ. नारायणराव सावरकरांचे वडील दामोदरपंत मृत्यू पावले. नारायणरावांनाही प्लेग झाला होता. परंतु त्यातून ते वाचले.

सावरकरबंधू नाशिक येथे शिक्षण घेत असताना विनायक सावरकरांनी 'राष्ट्रभक्तसमूह' नावाची एक गुप्त संघटना, अण्णा म्हसकर आणि रावजी पागे यांच्या सहकार्याने उभी केली. या संघटनेचे कार्य म्हणजे, लोकसंग्रह व राजकीय शिक्षणाने मनःक्रांती घडवून आणणे हे होते. पुढे या संघटनेचे नाव वि.दा. सावरकरांनी 'मित्रमेळा' असे ठेवले. या मित्रमेळयाचे लोण महाराष्ट्रभर पसरले.

नाशिकमध्ये ग.दा.सावरकरांनी, वि.दा.सावरकर व ना.दा.सावरकर यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली होती. माध्यमिक शाळेतील डॉक्टरांचे दिवस, बालपणातील शिक्षणाची सुधारलेली आवृत्ती होती. स्वदेशी चळवळ, रामदासी उत्सव, हिंदू-मुसलमानांच्या लढाया हे सर्व पाहत असत. ते खेळ आणि व्यायाम करत असत. इंग्रजी शाळेत असताना त्यांनी पुणे येथे वक्तृत्व स्पर्धेत यश मिळविले.

काळकर्ते शि.म. परांजपे यांनी त्यांची पाठ थोपटली. नाशिकलाही त्यांनी बक्षिसे मिळविली. परांजप्यांचा 'काळ' आणि मुंबईचा 'बिहारी' वर्तमानपत्रामध्ये त्यांनी लेखन केले. त्याच वयात त्यांनी शिवचरित्रावर भाषणही दिले होते. पुढे ब्रिटिश सरकारच्या रोषाने त्यांनी लिहिलेले भाषण स्नेहयाजवळ ठेवायला दिले आणि पुढे ते जाळून टाकले.

'अभिनव भारत' मध्ये काम करत असताना त्यांना सरकारच्या रोषाला बळी पडावे लागले. दसऱ्याच्या मिरवणुकीत पोलिसाला मारल्याच्या आरोपावरुन त्यांना सरकारने अटक केली.

१९०७ साली ते मॅट्रिक झाले. पुढे १९०८ मध्ये ते बडोद्याला कॉलेजमध्ये गेले. १९१५ साली त्यांचा शांताबाईंशी विवाह झाला. १९१६ साली ते दातांचे डॉक्टर झाले नि १९१७ मध्ये त्यांनी गिरगावात दवाखाना सुरु केला.

प्रकरण दोन मध्ये त्यांच्या क्रांतिकार्याचा आढावा घेतला आहे. - त्यांना 'मित्रमेळा' आणि 'अभिनव भारत' या संघटनेद्वारे क्रांतिकार्याचे बाळकडू मिळाले होते. नारायणरावांनी राजकीय क्रांतिकार्यास किशोरांच्या संघटनेतून प्रारंभ केला. गणेश, विनायक मार्गदर्शनाखाली नारायणरावांनी आपल्या मित्रांवर आपली छाप बसविली. २७ सप्टेंबर १९०६ रोजी आपल्या सहकाऱ्यांसह रस्त्यावर 'वंदे मातरम्' म्हणत चालले असता गणेश आणि पोलिसांची बाचाबाची झाली. त्यामध्ये डॉ. नारायणराव सावरकरांसमवेत अकरा जणांना पोलिसांनी अटक केली हा खटला खूप गाजला. शेवटी सर्वांची सुटका झाली.

लो. टिळकांच्या अटकेच्या निषेधार्थ डॉ. नारायण सावरकरांनी कडकडीत हरताळ बडोदा येथे घडवून आणला. १३ नोव्हेंबर १९०९ रोजी लॉर्ड मिंटोवर गुप्त क्रांतिकारकाने बाँब फेकला. पोलिसांनी नारायण दामोदर सावरकर यांना अटक केली. एका शिक्षकाच्या साक्षीने ते सुटले.

वि.दा. सावरकरांनी इंग्लंडहून पाठविलेली पिस्तुले डॉ. नारायण सावरकरांनी दडविली आणि चिथावणीखोर भाषणामुळे नारायण सावरकरांवरही राजद्रोहाचा आरोप ठेवला गेला. परंतु विनायक सावरकरांना ५० वर्षे काळया पाण्याची शिक्षा ठोठावली आणि डॉ. नारायण दामोदर सावरकर यांना सहा महिन्यांची सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. ही शिक्षा नाशिक कटाच्या संदर्भात होती.

प्रकरण तीनमध्ये वृत्तपत्रीय कार्याचा आढावा घेतला आहे. त्यांनी १९२७ साली 'श्रध्दानंद' नावाने साप्ताहिक सुरु केले आणि ते तीन वर्षे चालविले. या वृत्तपत्राला सावरकरबंधूंच्या तेजाचे एक वलय प्राप्त झाले होते. हे साप्ताहिक त्यांनी १० जानेवारी १९२७ रोजी सुरु केले. या पत्राचे संपादक डॉ. ना.दा. सावरकर होते. एका मुसलमान माथेफिरुने खून केलेल्या शुध्दी चळवळीचे पुरस्कर्ते स्वामी श्रध्दानंद यांचे नाव देणे अपरिहार्यच होते. या पत्राद्वारे त्यांनी भाषाशुध्दी, हिंदु सभेचा प्रचार, शुध्दी संघटन या गोष्टींवर भर दिला. केसरी, प्रभात, झारापकर, लोकमान्य, भाला या वृत्तपत्रातही त्यांनी लेखन केले. अल्पावधीत 'श्रध्दानंद' हे साप्ताहिक कमालीचे लोकप्रिय झाले होते व त्याचा खपही भरपूर वाढला होता.

प्रकरण चारमध्ये राजकीय कार्य विशद केले आहे. लो. टिळकांनी राष्ट्रीय जागृतीसाठी 'गणेशोत्सव' आणि 'शिवजयंती' उत्सव सुरु केले. या सणांना धार्मिक स्वरुप देऊन महाराष्ट्रात एका महान परंपरेला सुरुवात केली. (१८९३) तेव्हापासून गणेशोत्सव, दसरा, दासनवमी व शिवजयंती राष्ट्रीय उत्सव म्हणून महाराष्ट्रात रुढ झाले. १९१९ साली डॉ. ना.दा. सावरकर यांनी रायगडावर जाऊन शिवजयंती साजरी केली.

१ ऑगस्ट १९२० रोजी लो. टिळकांचा मृत्यू झाला आणि राष्ट्रीय सभेची सर्व सूत्रे गांधीजींकडे आली. देशाच्या राजकारणाला एक नवे वळण लागले. १९२० मध्ये आंदोलन झाले. मिठाच्या सत्याग्रहात डॉ. ना. दा. सावरकर यांनी भाग घेतला होता, असे तत्कालीन पोलीस फाईलमध्ये नमूद केले आहे. ३ एप्रिल १९२६ रोजी रायगडावर शिवाजी उत्सव पार पडला, यामध्येही डॉ. ना.दा. सावरकर सहभागी झाले. १९२७ साली शिवाजी महाराजांची त्रिशताब्दी रायगडावर जाऊन साजरी केली. त्यावेळी ना.दा. सावरकर आणि त्यांचे सहकारी डॉ. वेलकर यांनी पत्रक काढून शिवजन्मोत्सव कसा साजरा करावा, हे त्या पत्रकाद्वारे सांगितले. ऐतिहासिक पुरुषापासून प्रेरणा घ्यावी व आपल्या भारत देशास गुलामगिरीच्या कचाटयातून मुक्त करावे ही प्रेरणा त्या मागे होती.

लो. टिळकांच्या राष्ट्रीय उत्सवातील धोरणांचा प्रचार करण्यासाठी डॉ. सावरकरांनी नांदुरा, अमरावती, चांदा, वणी, पांढरकवडा, दारव्हा, कारंजा, अकोला, तेल्हारा, वाशीम, उमरखेड, मुसदा, पुसद या ठिकाणी दौरा केला.

गांधीजींनी असहकार, अहिंसक चळवळीने अल्पकाळात स्वराज्य प्राप्त करता येईल म्हणून आंदोलन उभारले. या चळवळीला गती देण्यासाठी डॉ. सावरकरांनी टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचा अवलंब करण्याचे कार्य केले.

१९३४ पर्यंत डॉ. सावरकर हे काँग्रेसमध्ये होते. गांधीजीची मते कशी निरुपयोगी आहेत ते त्यांनी जनतेला पटवून दिले. ३० मार्च १९२९ साली भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी हे विचार मांडले.

गांधीजींबरोबर कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. परंतु पुढे डॉ. नारायणराव सावरकरांनी काँग्रेस सोडल्यानंतर हिदु सभा या पक्षाद्वारे राजकीय कार्य सुरु केले.

प्रकरण पाचमध्ये सामाजिक कार्याची मांडणी केली आहे. १९२४ मध्ये अंदमानच्या बंदिगृहातून वि.दा. सावरकरांची सुटका झाल्यावर त्यांना रत्नागिरी येथे ठेवण्यात आले. त्यांच्यावर ब्रिटिशांची करडी नजर असे. त्यांना राजकारणात भाग घेण्यास ब्रिटिश शासनाची बंदी होती. रत्नागिरीत असताना विनायक सावरकरांच्या प्रत्येक समाजकार्याला डॉ. सावरकर साहय करत असत. सावरकरबंधूंनी रत्नागिरीत अस्पृश्यता निर्मूलन चळवळ हाती घेतली. भागोजी शेठ कीर यांनी पतित पावन मंदिर उभारण्यासाठी बरीच मदत केली. सावरकरबंधूंनी अस्पृश्योध्दाराचे कार्य त्या ठिकाणी हाती घेतले. पतित पावन मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यास सावरकरबंधूंचा वाटा मोठा होता. डॉ. सावरकरांचा शुध्दी चळवळीत देखील मोठा वाटा होता. परधर्मात गेलेल्या व्यक्तीला परत आपल्या धर्मात शुध्दीकरण चळवळीद्वारे घेतले जाई. त्या काळी टाकलेले अत्यंत धाडसी पाऊल होते.

सार्वजनिक उत्सव, अस्पृश्यता निवारण, शुध्दी चळवळ, गोवर्धन संस्था, अनेक परिषदा, कामगार सभा, झुणका-भाकर आंदोलने अशा अनेक चळवळीत भाग घेतला. या कार्यांचाही आढावा या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण सहामध्ये साहित्यिक कार्य नमूद केले आहे. डॉ. नारायणराव सावरकरांनी लिहिलेले "हिंदूंचे पुराण आणि प्राचीन इतिहास" याची काही कात्रणे त्यांचे पुत्र श्रीहर्ष सावरकर यांच्याकडे सापडली. उर्वरित अप्रकाशित लेख प्रस्तुत प्रबंध सादर करणाऱ्याकडे आहेत. त्या अप्रकाशित लेखांचा या प्रबंधात उपयोग

केला आहे. भारताबाहेरही आर्यांनी साम्राज्ये निर्माण केली, अशी लेखमाला त्यांनी 'प्रभात'मधून लिहिली.

भारताने एकेकाळी आपल्या तत्त्वज्ञानाने, शास्त्रज्ञानाने, बुध्दिवैभवाने आणि पराक्रमाने सबंध जगाला दिपविले होते. हिंदूंचे सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय अधिराज्य गाजविले होते. सुवर्णभूमी हे नाव भारताला योगायोगाने मिळालेले नाही. युरोप खंडातील व आशिया खंडातील आधुनिक राष्ट्र अकराव्या शतकापासून सागर-महासागरापासून सर्व विश्वात संचार करु लागली. तर त्यांच्या कित्येक वर्षे आधी जगाचा व्यापार भारताच्या हातात होता आणि म्हणूनच आजूबाजूच्या सगळया देशातील द्रव्याचा ओघ भारताकडे वळला आणि या देशाला सुवर्णभूमी असे नाव प्राप्त झाले. व्यापाराच्या उद्देशाने आपल्या विश्वाविजेत्या पूर्वजांनी हिंदूंच्या वसाहती चोहीकडे विस्तारुन तेथे अनेक हिंदू राज्ये नि साम्राज्ये निर्माण करुन कमीत कमी दीड सहस्र वर्षे टिकवून ठेवली होती.

भारताचा हा सुवर्णमय इतिहास आजपर्यंत अंधारात होता. तो प्रकाशात आणण्यासाठी डॉ. नारायण सावरकरांनी १९४० साली संशोधन करुन २२ लेख क्रमशः प्रसिध्द केले. डॉ. ना.दा. सावरकरांनी हे लेख 'झारापकर' मासिकामधुन प्रकाशित केले. त्यांनी त्यासाठी इंग्रजी-मराठी ऐतिहासिक ग्रंथांचे संशोधन केले. पुढे या लेखमालेचे 'हिंदुंचा विश्वविजयी इतिहास' या ग्रंथात रुपांतर झाले. या त्यांच्या ऐतिहासिक संशोधनाचा मागोवा या प्रकरणात घेतला आहे.

**निष्कर्ष**

१) डॉ. ना.दा. सावरकर यांचे क्रांतिकार्य, वृत्तपत्रीय कार्य, राजकीय, सामाजिक, साहित्यिक कार्याविषयक योगदान निश्चितच मोठे प्रेरणादायी आहे.

२) भारतीय स्वातंत्र्य लढयात नाशिक जिल्हयाचे ऐतिहासिक कार्याचे मोठे योगदान आहे.

३) डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचे उत्कट देशभक्ती, कठोर परिश्रम, निस्वार्थी देशभक्ती, त्यांच्या कार्यातून दिसून येते. देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावा, ही त्यांची तळमळ होती.

४) डॉ. नारायणराव सावरकर यांच्यावर वि.दा.सावरकर, व ग.दा. सावरकर यांच्या विचारांचा प्रभाव होता.

५) पुरातत्त्व खात्याने अनेक फायली उपलब्ध केल्यामुळे डॉ. ना.दा. सावरकर यांच्या कार्याची स्वातंत्र भारताच्या नव्या पिढीला अधिकाधिक माहिती मिळाली.

६) भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात सशस्त्र क्रांतिच्या इतिहासात सुवर्णक्षरांनी नोंद करुन ठेवावे, असे क्रांतिसंघटन कार्य गणेश, विनायक, नारायण या तिघा सावरकरबंधूंनी केल्याचे दिसून येते.

७) डॉ. ना.दा. सावरकरांचे जीवन, त्याग, तितीक्षा, सेवा ज्वलंत राष्ट्रभक्ती यांनी परिपूर्ण दिसते. शेवटपर्यंत त्यांनी आपले आयुष्य राष्ट्राला वाहून घेतले.

८) डॉ. ना.दा. सावरकर हे हिंदूत्ववादी विचारसरणीचे होते. परंतू, हिंदू महासभेच्या सक्रिय राजकारणात भाग घेऊनही अखिल भारतीय पातळीवर गेल्याचे दिसत नाही.

९) डॉ. ना.दा. सावरकरांमुळे हिंदूसभेचा प्रसार झपाटयाने वाढला, काँग्रेसपासून ते दूर गेल्याचे दिसते.

१०) डॉ. ना.दा. सावरकर कणखर देशभक्ती आणि उज्ज्वल कर्तृत्व या गुणांविषयी महाराष्ट्रात जे पुरुष आदर्श पावले त्यापैकी एक होत.

११) वऱ्हाड (मराठवाडा, विदर्भ) वगळता त्यांना इतरत्र राजकीय कार्यात यश आल्याचे दिसत नाही.

१२) समाजात एकी निर्माण व्हावी समाज एक व्हावा, तसेच एक देव, एक भाषा, एक राष्ट्र असे त्यांना वाटत असल्यामुळे डॉ. ना.दा. सावरकरांनी सार्वजनिक उत्सव, अस्पृश्यता निवारण, शुध्दीचळवळ, गोवर्धन संस्था अनेक परिषदा, कामगार सभा, झुणका-भाकर आंदोलन अशा अनेक सामाजिक चळवळीत सभासद, कार्यवाह उपाध्यक्ष, अध्यक्ष, राहून अत्यंत आस्थापूर्वक निःस्वार्थपणे काम केले.

१३) बहुजन समाजातील तरुणांना त्यांनी सर्वतोपरी सहकार्य केले आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविला.

१४) डॉ.ना.दा. सावरकर यांनी क्रांतिकार्य, वृत्तपत्रीय कार्य, राजकीय कार्य, सामाजिक कार्य, साहित्यिक कार्यात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केलेले दिसते.

१५) डॉ. ना.दा.सावरकर उत्तम वक्ते, उत्तम लेखक, उत्तम पत्रकार, व उत्तम इतिहासकारही होते. गदयाप्रमाणेच काव्य प्रातांतही त्यांच्या लेखणीने लिलया विहार केला. त्यांची साहित्य सेवा विद्यार्थी-दशेपासूनच दिसून आली.

१६) डॉ. ना.दा.सावरकरांच्या मनाचा पिंड वि.दा. सावरकर हयांच्या स्वभावाच्या मुळातून घडल्यामुळे त्यांचे विचारही थोरल्या बंधूंसारखे ज्वलंत-जहाल असेच होते. जसे विचार तसेच त्यांचे साहित्यही ज्वलंत आहे.

१७) 'श्रध्दानंद'च्या सर्व कामगिरीला मराठी वृत्तपत्रसृष्टीत दुसरी तोड नाही, डॉ. सावरकरांचे श्रध्दानंदमधील लिखाण, व संपादकीय योगदान मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात जिवंत राहील इतके महत्त्वपूर्ण आहे.

# संदर्भग्रंथ सूची

**१) अस्सल साधने -**


१) पोलीस फाईल्स, अर्काइव्ह, मुंबई, दि. २५/१२/१९१०.

२) पोलीस फाईल्स रिपोर्ट C.S.No. १/२८६८, १९३२.

३) पोलीस चौकशी, सरकारी कागदपत्रे, १९३२ अर्काइव्ह खाते.

४) मुंबई महानगरपालिका, C/१०८/१९३२-३३, म्युनिसिपल कमिशनर.

५) पोलीस रिपोर्ट, अर्काइव्ह खाते No. २८६४/A/३१८, १६ May १९३२.

६) सरकारी अर्काईव्ह मुंबई पोलिस फाईल नं. अ.८००(८४)E१९३४.

७) पोलीस फाईल्स, अर्काइव्ह मुंबई, फाईल नंबर- अ.८००/७५.१९३९.

८) पुणे पुराभिलेखागार मधील नगर जमाव रुमाल नं. १७६९ (मौजे भगूर).

९) पुणे पुराभिलेखागार मधील नगर जमाव रुमाल नं. १७७८ (मौजे राहुरी).


**अ) पुस्तके -**


१) करंदीकर, शि.ल., सावरकरांचे सहकारी, प्राप्तीस्थळ, ग.पां. परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई, १९४७.

२) केळकर, न.चि., लोकमान्य टिळक यांचे चरित्र, प्रकाशक, न.चि. केळकर, पुणे खंड १,२,३, १९२३, १९२८.

३) फडके य.दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड १ ते ४, विद्या प्रकाशन, पुणे १९९३.

४) सावरकर, ना.दा., (भाषांतरकार) 'हिंदुत्व', गणेश महादेव आणि कंपनी, मुंबई, १९२५.

५) सावरकर ना.दा. 'सेनापती तात्या टोपे', श्री. द.वैद्य (प्रकाशक) पुणे १९४०.

६) सावरकर ना.दा., 'हिंदूंचा विश्वविजयी इतिहास', परचुरे पुराणिक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई, प्रथमावृत्ती, जुलै १९४०.

७) सावरकर, ना.दा. 'स्मृतिसंचय', बाबाराव सावरकर स्मारक मंडळ, सांगली, १९८६.

८) सावरकर ना.दा. 'मरण कि लग्न', नरहर रामचंद्र जोशी,(प्रकाशक), मुंबई १९९३.

९) सावरकर, ना.दा. 'हिंदू साम्राज्याचा इतिहास' मनोरमा प्रकाशन, मुंबई, २००३.

१०) सावरकर ना.दा. 'समाजरहस्य' कादंबरी.


**अप्रकाशित :-**

१) 'इंदिरा की मदिरा' सामाजिक नाटक (अप्रकाशित)


**ब) शासकीय -**

1) Government of Maharashtra, Source Material for a History of the freedom movement in India, Vol. I & II, 1959.

2) Keer, Dhananjay, “Veer Savarkar and his times” Popular Prakashan, Bombay 1950.

3) Majumdar, Dr. R.C. (Editor): British Paramountcy and Indian Revaissance part - I (2nd Edition) Part - 2, Bhavtiya Vidya Bhavan, Bombay, 1970.

4) Majumdar R.C. (Gen. Gditor) Struggle for Freedom (The history and Culture of the Indian People) Vol. XI. Bombay, Bhavtiya Vidya Bhavan, 1969.

5) Munshi, K.M,, Pilgrimage to Freedom. Vol. I, Bombay, Bhavtiya Vidya Bhavan, 1968.

6) Murthy, Navsima : Ms Madam Cama, Banglore, Rashtrothara Sahitya, 1973.

7) Pyarela : Mahatma Gandhi, The last Phase, Vols 1 and 2, Navjivan Publishing house, Ahmedabad, 1986, 1958.


**क) वर्तमानपत्रे/साप्ताहिक/मासिक/विशेषांक :-**

१) दैनिक केसरी, १७ जानेवारी १९२४.

२) दैनिक केसरी, २४ जानेवारी १९३३.

३) दैनिक केसरी, २८ जुलै १९३९.

४) दैनिक केसरी, २९ मे १९४०.

५) दैनिक केसरी, २८ ऑक्टोबर १९४०.

६) दैनिक केसरी, १६ नोव्हेंबर १९४५.

७) दैनिक केसरी, २३ नाव्हेंबर १९४५

८) दैनिक केसरी, १ मार्च १९४६.

२) १) दैनिक सकाळ, पुणे, २९ नाव्हेंबर १९३६.

३) १) दैनिक लोकमान्य, मुंबई, ८ मार्च १९३६.

२) दैनिक लोकमान्य, मुंबई, ८ ऑक्टो. १९३६.

३) दैनिक लोकमान्य, मुंबई, १९४५.

४) १) दैनिक अग्रणी; ९ जानेवारी १९४५.

५) १) दैनिक समाचार, सोलापूर ९ फेब्रुवारी १९३७.

६) १) दैनिक त्रिकाळ, नगर, ११ मार्च १९३९.

७) १) नवशक्ति, मुंबई, २ मे १९३५.

८) १) प्रभात, १४ मे. १९३५.

९) 'सावरकर ना.दा.' संपादक, (साप्ताहिक) श्रध्दानंद, मुंबई.

१) ३ फेब्रुवारी १९२७. २) १० फेब्रुवारी १९२७.

३) २४ फेब्रुवारी १९२७. ४) २१ एप्रिल १९२७.

५) ५ मे. १९२७. ६) १२ मे १९२७.

७) २१ जुलै १९२७. ८) ४ ऑगस्ट १९२७.

९) १५ सप्टेंबर १९२७. १०) १३ सप्टेंबर १९२८.

११) ४ मे १९२९. १२) १६ नोव्हेंबर १९२९.

१०) १) स्वराज्य, मुंबई, १ जुलै १९३६.

११) १) प्रवासी, मुंबई, २२ मे १९३५.

१२) १) विक्रम ऐतिहासिक कथा, मुंबई, २५ मार्च १९४४.

२) विक्रम ऐतिहासिक कथा, मुंबई, २२ जुलै १९४४.

१३) १) स्वातंत्र्य नाशिक, २९ नोव्हें. १९३६.

१४) १) प्रज्वलंत, साठे स्नेहलता, ३१ जाने. १९९५.

१५) १) नवजीवन गडकरी विशेषांक (ना.दा.सावरकर)संपादक, जाने. १९४४.

१६) १) झुंजार ताश्कंद, विशेषांक.

१७) १) मुंबई क्रॉनिकल, २४ नोव्हें. १९३३.

**२) दुय्यम साधने -**

**अ) पुस्तके -**


१) करंदीकर. शि.ल. 'सावरकर चरित्र', सीताबाई करंदीकर, (प्रकाशक) ३१९ १/२ सदाशिव पेठ, पुणे, १९४३.

२) कर्वे, निर्मला, 'हरिदिनी', लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९८५.

३) कानडे, रा.गो. 'मराठी नियत कालिकांचा इतिहास' (१८३२ ते १९३७) मंगेश नारायण कुलकर्णी, मुंबई, १९३८.

४) कार ई.एच. 'इतिहास म्हणजे काय'., कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

५) कानिटकर रा.प्र. 'क्रांतिच्या ज्वाला', चित्रशाळा प्रेस प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती, १९६७.

६) कुलकर्णी श्री.प्र. 'संघर्षपर्व', विक्रम सावरकर, लाखे प्रकाशन - मुकुंदराज पथ, महाल, नागपूर - २, १९९१.

७) गोखले, द.न. 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर', मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणे, १९४७.

८) गोगटे, ना.ब. 'हॉटसन-गोगटे आत्मवृत्त', पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, १९७२.

९) गोडबोले अरविंद, 'सावरकर विचारदर्शन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८३.

१०) जुवेकर अरविंद, (प्रकाशक) 'स्मृतिसंचय', सावरकर ना.दा. क्रांतीवीर बाबाराव सावरकर स्मारक मंडळ, सांगली, १९८६.

११) जोग, ब.ना. 'हिंदु-मुस्लिम ऐक्य : भ्रम आणि सत्य', उन्नती प्रकाशन, मुंबई, १९९०.

१२) जोशी वि.कृ, आणि लेले, रा.के. 'वृत्तपत्रांचा इतिहास', खंड - १, वासूदेव विषणूभट, मुंबई, १९५१.

१३) दाते शं.रा., 'भारतीय स्वातंत्र्याचे रणझुजार', काळ प्रकाशन, पुणे १९७०

१४) दाते, शं.रा. 'महाराष्ट्र हिंदू सभेच्या कार्याचा इतिहास', काळ प्रकाशन, पुणे, १९७५.

१५) देशपांडे सुधाकर, 'महाराष्ट्राचे शिल्पकार', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

१६) लेले, रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४.

१७) वेलकर प्रताप, 'लो. टिळक आणि डॉ. वेलकर', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९६.

१८) वेलकर प्रताप, 'तिसरा सावरकर अर्थात वीराग्रणी डॉ. नारायण दामोदर सावरकर', मनारमा प्रकाशन, मुंबई, २००२.

१९) सरदेसाई बी.एन. 'इतिहास लेखन पध्दती', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

२०) सावरकर, शां.शि. 'समग्र सावकर', खंड १ ते १० वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३.

२१) सावरकर, शां.शि. 'स्वा.वीर सावकर', भाग १ ते ४ खंड १ ते १० वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९७२.

२२) सावरकर बाळाराव,'वीर सावरकर सचित्र दर्शन' सिध्दी ऑफसेट, मुंबई, २५, १९९५.

२३) सावरकर वि.दा. 'हिंदु हृदयसम्राट', अनुवादित मराठी भाषांतर, पृथ्वीराज प्रकाशन, नागपूर १२, पहिली आवृत्ती १८४७.

२४) पटवर्धन शशिकला, (संपा) 'स्मृतिसंचय', सावरकर ना.दा. क्रांतिवीर बाबाराव सावरकर स्मारक मंडळ, सांगली १९८४-१९८५.

२५) भट वि.म. अभिनव भारत, गं.पा. परचुरे, प्रकाशन मंदिर, मुंबई १९५०.

२६) भांडारकर पु.ल.'समाजशास्त्रीय संशोधन पध्दती'

२७) हरदास बाळशास्त्री - 'भारतीय स्वातंत्र्यसमर' शंकर रामचंद्र दाते (प्रकाशक) १९५७.

**ब) इंग्रजी पुस्तके -**


1) Azad, Maulana, Abul Kalam : “India Wins Freedom, Longmans, Green and Co. New York, London, Toronto, 1960.
2) Chitragupt : Lift of Barrister Savarkar, B.G. Paul & Company, Madras, 1926.
3) Chirol, Valentine : Indian unrest (A print) Revised and enlarged from the times, Landon : Macmillan, 1910.
4) Dignan, Don. The Indian, Revolutionary problem in Brithis Diplomacy (1914-1919) Delhi : Allied Publishers, 1983.
5) Gupta, Manm,ath Nath, History of the IndianRevolutionary Movement, Bombay, : Somaiya, 1972.
6) Ghosh K.C., 'The Roll of Honour' Sahitya Samsad, Calcutta, 1965.
7) Joshi V.S. “Vasudeo Balvant Phadake” D.S. Marathe Vidya Bhavan Bhavan, Bombay 28, 1959.
8) Sarkar, Sumit : Modern India (1885-1947) Delhi Macmillan, 1983.
9) Savarkar, V.D. An Echo from Andmans. Nagpur V.V. Kelkar.
10) Savarkar, V.D., Indian War of Indipendence ($8^{th}$ edi.) Delhi : Rajdhani Granthghar, 1970.
11) Savarkar V.D. : Sox Glorious (Golden) Epoch of Indian Hisotyr, (Translated and edited by S.T. Godbole) Bombay : Dal Savarkar, Delhi : Rajdhani Granthghar, 1971. ($1^{st}$ edit.)
12) Savarkar V.D. : The Sotry of My Transportion for life Bombay, : Sadbhakti publications 1950.

**क) वर्तमानपत्रे -**

'तरुण भारत', 'देशदूत', 'नवा काळ', 'फ्रंटियर', 'भाला', 'महाराष्ट्र टाईम्स', 'विविधवृत्त', 'संदशे', 'प्रजापक्ष', 'हुतात्मा', 'ज्ञानप्रकाश', 'झारापकर'.

**परिशिष्टे**


१) वंशावळ.

२) जीवनपट.

३) छायाचित्रे.

# परिशिष्टे

## परिशिष्टे
## १. वंशावळ


नारायण
हरी
विश्वनाथ
महादेव
नारायण
विश्वनाथ
मोरोपंत
बाळ दीक्षित
दामोदर
खंडभट
गणेश
तात्याविश्वनाथ
सदाशिव
मल्हार
बाबा दीक्षित
दादा दीक्षित
विष्णु
(दत्तक घेतला)
हरी
वासुदेव
गणेश
भालचंद्र
मोरेश्वर
विनायक
वासुदेव
वामन
विष्णु
(दत्तक दिला)
दामोदर
रघुनाथ
बाळकृष्ण
गणेश
विनायक
नारायण

## २. जीवनपट

| | | |
|---|---|---|
| १८८८ | - | जन्म भगूर<br>प्राथमिक शिक्षण - भगूर<br>मॅट्रिक पास, श्री. शिवाजी विद्यालय, नाशिक. |
| १९०० | - | 'किशोरमंडळ' (मित्रमेळया ची बालशाखा) नाशिक. |
| १९०६ | - | वंदे मातरम्' खटला, नाशिक. |
| १९०९ | - | लॉर्ड मिटोंवर, अहमदाबाद येथे बॉम्ब टाकल्याचा आरोप व अटक. |
| १९०९ | - | कलेक्टर जॅक्सनचा वध, डॉ. सावरकर दोषी. न्यायमूर्ती. |
| १९१२ | - | नाशिक कटात अटक, ६ महिने सश्रम कारावास. |
| १९१२ | - | लॉर्ड हॉर्डिंग्जवर बॉम्बफेक, आरोप व अटक. |
| १९१३ | - | कलमत्ता मेडिकल कॉलेजात प्रवेश. |
| १९१६ | - | दंतवैद्यकी व होमिओपॅथी अंतिम परीक्षा उत्तीर्ण. |
| १९१७ | - | मुंबई येथे वैद्यकीय व्यवसायासाठी वास्तव्य, दवाखाना ताडदेव. |
| १९१८ | - | लोकमान्य टिळकांच्या शिवाजी, गणेशोत्सवात सक्रिय भाग, मुंबई. |
| १९१९ | - | श्री शिवजन्मोत्सव रायगड, अध्यक्ष : डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य वक्ते : डॉ. सावरकर, पोवाडेगान : डॉ. सावरकर. |
| ११/११/१९१९ | - | सावरकर बंधु सुटकेसाठी डॉ. सावरकरांनी ऐंशी हजार स्वाक्षऱ्या घेऊन ब्रिटिश सरकारकडे पाठविल्या. |
| १९१९ | - | गव्हर्नर विलंग्डन निषेधसभा, रॉयल, एशियाटिक सभागृह, नगर भुवन (टाऊन हॉल) पोलिसांकडून पट्टयाचा मार. |
| १९२० | - | मॉंटयुगो सुधारणा - सोलापूर परिषद, महनीय वक्ते डॉ. सावरकर, लोकमान्य टिळक, खापर्डे, प्रो. शिवराम महादेव परांजपे. |
| १९२० | - | मुंबई, चौपाटी येथे लो. टिळक दहनाची परवानगी, म्युनिसिपल कमिशनकडे गेलेल्या शिष्टमंडळाचे सभासद. |
| १९२० | - | इंडियन होमरुल लीगतर्फे लो. टिळक निधन - जाहिर शोकसभा, |

प्रमुख वक्ते, स्थळ कल्याण.

| | | |
|---|---|---|
| १९२० | - | लोकमान्य टिळक पर्स फंड कमिटी, मुंबई कार्यकर्ते : डॉ. सावरकर, डॉ. साठये, डॉ. वेलकर. |
| १९२० | - | लो. टिळक निधनानिमित्त मुंबई व उपनगर येथील विविध संस्थांच्या शोकसभेत, अध्यक्ष व महनीय वक्ते डॉ. सावरकर. |
| १९२०-२१ | - | मुंबई श्री गणेशोत्सवात व्याख्याने - कामतचाळ. |
| १९२२ | - | जगन्नाथाची चाळ, गंगाराम खत्री वाडी, परळ कामगार मैदान इ. |
| १९२१ - १९२३ | - | अध्यक्ष अखिल गिरगाव डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमिटी. |
| २६/११/१९२३ | - | राष्ट्रीय सेवादल व कॉंग्रेस स्वयंसेवक संघटना सर्वप्रथम स्थापन करण्याचे श्रेय. |
| १९२४ | - | बंगाल इलाखा दडपशाही जाहीर निषेध, साष्टी तालुका कॉंग्रेस, प्रमुख वक्ते. |
| १९२५ | - | जानेवारी, हिंदुमहासभा परिषद बेळगाव, उपस्थिती - लाला लजपतराय, राजेंद्रप्रसाद, डॉ. सावरकर. |
| १९२५- १९२७ | - | मुंबई महानगरपालिका सभासद, नगरसेवक - डॉ. सावरकर महापालिकेतील महत्त्वाचा ठराव मुलांना शारीरिक शिक्षण. |
| १९२५-१९३३ | - | दसरा वार्षिक उत्सव समिती, कार्यकारी सभासद - डॉ. सावरकर, इतर सभासद, कन्हैयालाल मुनशी, बॅ. जयकर, डॉ. देशमुख, डॉ. वेलकर. |
| १९२५ | - | ऑनररी सेक्रेटरी - दि कॉंग्रेस नॅशनॅलिस्ट म्युनिसिपल इलेक्शन बोर्ड. |
| ०८/१०/१९२५ | - | गणेशोत्सव, रत्नागिरी, अध्यक्ष डॉ. सावरकर, वक्ते 'निर्भिड' सं.अ.ह. गद्रे. |
| १९२५ | - | प्रमुख वक्ते - मुंबई गिरणीकामगार, राष्ट्रीय उत्सव मंडळ, कामगार मैदान, चिंचपोकळी. |
| १९२७-१९३० | - | संपादक - साप्ताहिक 'श्रध्दानंद' मुंबई - प्रकाशित लेखमाला भारताचा प्राचीन पुरातन इतिहास. |

१९२८ - इंग्रजांच्या अल्पसंख्यांक धोरणाविरुध्द निषेध परिषदमध्ये पुढाकार.

१९२८ - उपाध्यक्ष, मुंबई इलाखा हिंदुमहासभा, इतर सभासद स.का. पाटील, सीलम इ.

१९३० - ऑल इंडिया पोलिटिकल कॉन्फरन्स कार्यकारी मंडळाचे सभासद, महाराष्ट्र.

१९३० - लाहोरकट आरोपी सहाय्यक मंडळ, संयुक्त कार्यवाह, डॉ. सावरकर व श्री. शं. नवरे, अध्यक्ष - बॅ. जमनादास मेथा.

१९३१ - ते १९३७ प्रमुख कार्यकर्ते - श्रध्दानंद अनाथ महिलाश्रम, माटुंगा, मुंबई.

१९३२ - महात्मा गांधी कायदेभंगाची चळवळ, सक्रिय सहभाग व अटक.

१९३२ - न.चि. केळकर, षष्टयब्दीपूर्ती समारंभ, प्रमुख कार्यवाह : मुंबई.

१९३२ - हिंदु संरक्षक मंडळ, मुंबई, हिंदु मुसलमान दंग्यात पुढाकार इतर सभासद - नारायणलाल बन्सीलाल. एम.ए. डहाणूकर, पुरुषोत्तमदास ठाकूरदास, सय्याजीराव सिलम इ.

१९३३ - अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघ डॉ. सुब्राथन मंदिर प्रवेश बिल, मद्रास विधान सभा अस्पृश्यांची जाहीर जंगी सभा प्रमुख वक्ते डॉ. सावरकर, अध्यक्ष - मिढे पाटील.

१९३३ - दे.भ. अच्युत बळवंत कोल्हटकर स्मारक सभा, बॉम्बे थिएटर, वक्ते - डॉ. सावरकर, वीर वामनराव जोशी, भाई लालजी पेंडसे, वऱ्हाड पुढारी, वामणगावकर व समतानंद अ.ह. गद्रे.

१९३३ - नॅशनल लेबर कॉन्फरन्स, जिनिव्हा, हिंदी शिष्टमंडळ सभासद, डॉ. सावरकर.

१९३३ - ऑनररी सेक्रेटरी, डेमोक्रॅटिक स्वराज्य पार्टी, मुंबई.

१९३३ - सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, दक्षिण मुंबई, प्रमुख कार्यकर्ते.

१९३४ - ॲन्टी कम्युनल ॲवॉर्ड कॉन्फरन्स, कार्यकारी मंडळाचे सेक्रेटरी, मुंबई.

१९३४ - महाराष्ट्र नाटयसंमेलन कार्यकारी मंडळाचे सभासद.

| | | |
|---|---|---|
| १९३४ | - | मुंबई, उपनगर कल्ण, विरार, हिंदुमहासभा परिषद, वसई, उपाध्यक्ष - डॉ. सावरकर अध्यक्ष डॉ. मुंजे, उद्घाटक - पं. मदनमोहन मालवीय. |
| १९३४ | - | उपाध्यक्ष - अखिल मुंबई उपनगर व्यायाम संमेलन. |
| १९३५ | - | काँग्रेस गोल्डन ज्युबिली कमिटी सभासद, मुंबई अधिवेशन. |
| १९३५ | - | मुंबई इलाखा हिंदुमहासभा - अध्यक्ष. |
| १९३७ | - | अंदमान हंगर स्ट्राईक आणि राजबंदयांची मुक्तता मोहिम. हिदुमहासभेतर्फे चळवळ दादर. |
| १९३७ | - | भागानगर सत्याग्रह, अटक. |
| १९३४-१९३८ | - | अध्वर्यु- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुंबई इलाखा |
| १९३८ | - | रा.स्व. संघ गुरुपौर्णिमा रैली, परुंदरे स्टेडिअम अध्यक्ष. |
| १९४२ | - | अध्यक्ष - मुंबई इलाखा हिंदुस्थान सभा परिषद. |
| १९४५ | - | श्री शिवाजी महाराजांची बदनामी पुस्तक निषेध समिती कार्यवह - डॉ. सावरकर. |
| १९४८ | - | गांधीवध - उसळलेल्या दंग्यात जखमी. |
| १९४८ | - | उद्योगपती वेलणकर, सुवर्णतुला समिती. (गजानन मिल्स सांगली) प्रमुख कार्यवाह. |
| १९४९ | - | १९ ऑक्टोबर - शोचनीय निधन, दादर, मुंबई. |

## ३. नकाशा


## नाशिक जिल्हयाचा नकाशा




**(www.nashik.nic.in यांच्या सौजन्याने)**

## ४. छायाचित्रे

**डॉ. नारायण दामोदर सावरकर व त्यांचे बंधु यांची जन्म कुंडली.**




**डॉ. नारायण दामोदर सावरकर व त्यांचे बंधु यांची जन्म कुंडली.**




डॉ. नारायण दामोदर सावरकर (बाळ)

जन्म - १८८८ मृत्यू -१९४९



सौ. शांताबाई नारायण सावरकर **उर्फ हरिदिनी**



डॉ. ना. दा. सावरकर कुटुंब ( मे १९४४ ) सौ. शांताबाई, विक्रम सावरकर, गणेश दा. सावरकर,
अशोक सावरकर, डॉ. सावरकर, कु. हर्ष सावरकर, कु. निर्मला, कु. चपला

किशोर मंडळ, अभिनव भारताचे क्रांतिकारक सभासद

डॉ. नारायण सावरकरांचे सहकारी



अनंत लक्ष्मण कान्हरे

हुतात्मा



कृष्णाजी गोपाळ कर्वे

हुतात्मा



विनायक नारायण देशपांडे

हुतात्मा



स्वातंत्र्यशाहीर गोविंद त्रिंबक दरेकर

कवि गोविंद

# डॉ. नारायणराव सावरकरांचे सहकारी



वामनशास्त्री दातार




विश्वनाथ विनायक केळकर



श्री. र. वर्तक



कृष्णाजी बळवंत महाबळ



व्ही. व्ही. एस्. अय्यर



वि. म. भट

मातृसमान मॅडम कामाबाईना नारायणराव सावरकरांनी विद्यार्थीदशेत असताना पॅरीस येथे पाठविलेले प्रेमळ पत्र



वीरांगना मॅडम कामा

श्री राम

१०९ हॅरिसन रोड,
कलकत्ता,
१७ मार्च १९१६

माझ्या लाडक्या आईस,

लोभाचे दि. १८ चे पत्र पावले, अत्यानंद जाहला. प्रिय आई, तुला इतके दिवस चिंतेत ठेवले खरोखर चूक माझी. केवलला काही दिवस होतो, यास्तव टपालाचा दिवस हुकला. गेल्या वर्षी तू पाठविलेल्या सर्व रकमेची पोंच, तत्संबंधी पत्र तुला आजपावेतो मिळाले असेलच.

महिनाभर सध्या मी येथेच आहे. एप्रिल १ ला मी कलकत्ता सोडणार, तेव्हा मुंबई पत्त्यावर जबाब पाठीव. मुंबईचा पत्ता तुला माहित आहेच. पत्रांची, मनीऑर्डर्स, इ. ची व्यवस्था मुंबईच्या पोस्ट ऑफिसात करीन.

दोन्ही भगिनींचे, पत्नीचे प्रेमपूर्वक नमस्कार.

पत्राची अपेक्षा करणारा सर्वस्वी तुझाच लाडका
बाळ

( ता. क : प्रिय बंधु अय्यरचे वर्तमान कळविणे. )



**अखिल भारतीय हिंदुसभेच्या कार्यकारी मंडळाची सभा, मुंबई, : १० नोव्हेंबर १९३९**
उजवीकडून : १.डॉ. ना. दा. सावरकर , ४. डॉ. बा. शि. मुंजे, ५. बॅ. एन्. सी.चॅटर्जी, ७. बाबासाहेब खापर्डे,
अध्यक्ष - : स्वातंत्र्यवीर सावरकर १०.डॉ. शामाप्रसाद मुकर्जी व इतर बंगाल आणि मद्रासचे पुढारी

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥

डॉ. ना. दा. सावरकर.
Dr. N. D. SAVARKAR,
L.C.P.S., L.M.&S. (Hons.)
AND
DENTAL SURGEON.

श्रीराम


GIRGAUM,
Bombay, [illegible]

प्रिय वझकर,

मी उद्यां सकाळीं ८ च्या गाडीनें [illegible]
लिहित आहे. तुला भेटण्यास वेळ मिळेल
नाहीं असें दिसतें. श्री. गोपाळराव
चितळे हे तुझ्याकडे येतील. त्यांना पुढें
काय करावयाचें तें कळवि: व कळवावें
पण शक्य झाल्यास.

तूं आज जेवावयास येऊं शकला
असतास तर फार चांगलें झालें असतें.
जेवतांना तुझी फार आठवण झाली.


श्री. प्रिय दिलीप वगैरे यांना दिवाळी-
तील खेळाचीं [illegible] [illegible] [illegible]
तील कांहीं [illegible] [illegible] आहे — ये
आशेनें कीं पुढील आठवड्यांत [illegible]
[illegible] [illegible], आपण जर [illegible]



शूर शिपाई, सेनापती [illegible] [illegible]
[illegible] कुटुंबाचा [illegible] [illegible]
दिवाळीपर्यंत [illegible] [illegible] या
शंकेने आधीच पाठविले आहे.
कळावे. [illegible] [illegible]
आता १८ डि. [illegible] [illegible]
वंदे मातरम् !
[illegible] — सावरकर

**डॉ. ना.दा. सावरकरांचे स्वहस्ताक्षरात प्रताप वेलकरांस पत्र**

**महात्मा गांधींनी डॉ. ना.दा. सावरकरांना लिहिलेले पत्र.**



Dear Dr Savarkar

I have your letter. If the question of amnesty is reached the barrister must be released. But I entertain no hope of ever reaching that subject. Yours sinly

20 12/29 M K Gandhi

महात्मा गांधींचे हस्ताक्षर
बॅ. सावरकरांच्या सुटकेविषयी म. गांधी साशंक
डॉ. सावरकरांना लिहिलेले पत्र

**सावरकर घराण्याला मिळालेले मौजे राहुरी गावचे जहागिरीचे मोडी लिपीतील पत्र -**




श्री

(मुद्रा: श्री राजाराम नरपती हर्षनीधान बाळाजी बाजीराव प्रधान)

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाळाजी
पंडित प्रधान ता (तर्फ) मोकदम मौजे राहुरी पा (परगणे) नासिक सरकार
संगमनेर सुहुरसन सबा खमसैन मयाव अलफ वेदमुर्ती राजश्री मांगदेव दिक्षित
बिन हरि दिक्षित उपनांम सावरकर गोत्र वासिष्ठ सुत्र हिरण्यकेसी व नारायण
भट बिन कासिभट उपनांम खरे गोत्र कौसिक सुत्र हिरण्यकेसी म्हाहागरकर
हाली वस्ती मौजे भोगुर पा नासिक यांनी हुजुर को (कसबे) पुणीयाचे
मुक्कामी येऊन विदीत केले की आपन कुटुंबवत्सल असे कुटुंबाचा
योगक्षेम चालत नाही यास्तव स्वामिनी कृपाळु होऊन येकगांव नुतन
इनाम दिल्हा पाहिजे म्हणुन त्यावरुन मनास आणीतां हे थोर ब्राम्हण
सत्पात्र स्नानसंध्यादी षट्कर्मे आचरोन राजश्री ——— स्वामीस व
स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतुन आहेत यांचे चालवणे श्रेयस्कर जाणुन
यांजवर कृपाळु होऊन मौजे मजकुर हा गांव स्वराज्य व मोगलाई जागिर
व बाबती व सरदेशमुखी देखिल कुलासा कुलबाब कुलकानु हाली पटी व
पेस्तर पटी जलतरु पाशाण निधीनिक्षेप आदी करुन देखील इनाम तिजाई
खेरीज हकदार व इनामदार करुन अभयतां वेदमुर्तीस नुतन इनाम करार
करुन दिल्हा असे तरी मौजे मजकुर वेदमुर्तीचे दुमाल करुन यास व
यांचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्षी नविन पत्राचा
आक्षेप न करणे या पत्राची प्रति लिहुन घेऊन असल पत्र वेदमुर्ती
जवळ भोगवटीयास परतोन देणे जाणीजे छ २४ जिलकाद आज्ञा

प्रमाण (मुद्रा: लेखन सीमा)

**सावरकर घराण्याला मिळालेले मौजे भगूर गावचे जहागिरीचे मोडी लिपीतील पत्र -**


5132

5132

नक्कल इनाम १५६८ मौजे भगुर (स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर) ८२८९७

INAM COMMISSION

श्री गजानन गुरु

नक्कल

इनाम पत्र सके १६९५ विजयेनाम सवछरे माहे आश्वीन शुा १ ते दिवसी वेदशास्त्र संपन राजेश्री माहादेव दीक्षीत सावरकर मौजे भोगुर यास राणोजी देशमुख मोकदम मौजे मजकुर प्रा नासीक सन ११८३ कारणे इनामपत्र लीहुन दीले ऐसेजे तुम्ही थोर ब्राम्हण स्नानसंध्याशिल धर्म ते जाणोन तुम्हास मौजे मजकुर इनाम जमिन तीर्थरूप कैलसवासि आजोजी देशमुख यानी तपोवनाचे उत्तरेस देऊन कागद करून दील्य होता त्यास ते जमिन तुमचे उपयोगी नाही काजी सबब ते जमिनीचा कागद फाडुन टाकला तुम्हास वडीली इनाम जमिन दीली होती. ते चालवीली पाहिजे म्हणुन गावाचे पछमेस वाडी मसेन विराची त्याचे उत्तरेस वाले वोहल त्याचे पछमेस आबांड वाटेचे दक्षणेस जमिन मोकरा पायेनी २ दोन येकुण बिघे ६० साठ दिल्ही असे तीची चतुर्बंदी खितपसिल

पुर्व पछम ______ उत्तर दक्षण ______

येकुणं बिघे साठ दील्ही असे तेथे तुम्ही विहीर करून बागाईत व जीराइत तुमचे चितास येइल तैसे करून आनंद होत्सादी कर्मे करून गावाचे व राज्याचे अभीष्ठ चिंतन करीत जावे या जमिनीचा उपभोग घ्यावा या जमिनी विशई सरकारचा ~~सारी इस नाही तुम्ही वौशंपरपरा जमिनीचा~~
सारा पडीकतर आम्ही गावावर साधऊन घेऊ तुम्हाकडे सरकारचे सारी सट नाही तुम्ही वौशंपरपरा जमिनीचा भोगवटा घ्यावा

हे इनाम पत्र लेहुन दीधले असे

मोर्तब नागर

गोही

बि॥ हरि तीमाजी कुळकर्णी मौजे मजकुर